## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११९८

निर्णय दिनांक : १२.०५.२०१०

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. नारायण ग्यानबा बापमारे,<br>रा.मंगरुळ नं.१,ता. माजलगाव,<br>जि.बीड. | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय,माजलगाव,<br>जि.बीड. | : प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, माजलगाव,जि.बीड | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७.०४.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या दि.२०.०२.२००९ रोजीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अर्जाव्दारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १९.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी तहसीलदार, माजलगाव यांच्या नावाने दि. ०१.०१.२००९ रोजी दिलेल्या निवेदनावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही, दि. ०३.०७.२००८ रोजी झालेल्या दक्षता समितीच्या बैठकीच्या इतिवृत्ताची प्रमाणित प्रत, तसेच या कालावधीमध्ये

तालुक्यातील तहसील कार्यालयाकडून भेटी दिल्या गेलेल्या स्वस्त धान्य दुकानांची संख्या व त्या दुकानदारांचे संपूर्ण नाव, परवाना क्रमांक व दुकानाचे नावासह यादी आणि मंगरुळ नं.१,२,३ येथील रॉकेल विक्रेते व त्यांच्याकडील रॉकेल ग्राहकांच्या नावाची यादी - अशी माहिती शीघ्र टपालाद्वारे मागितली होती.अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कालावधी सन २००८ ते दि. १९.०१.२००९ असा होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २०.०२.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, माजलगाव यांच्याकडे प्रथम अपील केले तथापि या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत व जन माहिती अधिकारी हे स्वत: अथवा त्यांचा कोणीही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. ही माहिती त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही. ती त्यांना मिळावी आणि आयोगाने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमानुसार कारवाई करावी, अशी त्यांनी आपल्या युक्तिवादाच्या अखेरीस आयोगास विनंती केली.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.१९.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमातील कलम ७(१) मध्ये विहित केलेल्या मुदतीमध्ये प्रथम प्रतिसाद देणे आवश्यक होते. तथापि त्यांनी अशाप्रकारचा

कोणताही प्रतिसाद अपिलार्थीस दिलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले असता, त्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही. या सर्व घडामोडीमध्ये अपिलार्थी हे त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित राहिल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप हे इतके मर्यादित आहे की, अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना फारसे परिश्रम घ्यावे लागले असते अथवा त्यांच्या कार्यालयाची साधनसामग्री मोठया प्रमाणात वळवावी लागण्याची शक्यता होती, अशातील कोणतीही बाब या प्रकरणी संभवत नाही. त्यामुळे अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी टाळले असल्याचा व अशा कृतीद्वारे स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन अधिनियमातील कलम २०(२) च्या तरतुदीनुसार, जिल्हाधिकारी, बीड यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, माजलगाव (दि.१९.०१.००९ ते पुढे तीस दिवसांच्या कालावधीमध्ये कार्यरत असलेले) यांच्यावर यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत शीघ्र टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत शीघ्र टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

३) जिल्हाधिकारी, बीड यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी (दि.१९.०१.२००९ ते पुढे तीस दिवसांच्या कालावधीपर्यंत कार्यरत असलेले) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १२.०५.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नारायण ग्यानबा बापमारे,रा.मंगरुळ नं.१,ता. माजलगाव,जि.बीड.

२. जन माहिती अधिकारी,तहसील कार्यालय,माजलगाव, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, माजलगाव,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११९९

निर्णय दिनांक : १२.०५.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. हर्षवर्धन किशनराव दवणे,<br>रा.पावडेवाडी नाका, नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी,<br>आस्थापना विभाग,<br>स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,<br>नांदेड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कुलसचिव,<br>स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,<br>नांदेड | | |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपकुलसचिव,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
नांदेड

त्रयस्थ पक्ष : डॉ. दिपक शिंदे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४.०६.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ व ५ शी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी असद्हेतूने उपलब्ध करुन दिली नाही. ही माहिती जर सार्वजनिक केली तर त्यांचे पितळ उघडे पडण्याची

भीती माहिती अधिकाऱ्यास वाटत असल्यामुळे, त्यांनी ही माहिती अपिलार्थीस पुरविली नाही. ही माहिती अपिलार्थीस देण्यास जन माहिती अधिकारी जाणीवपूर्वक टाळाटाळ करीत असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असून, या अपील अर्जामध्ये त्यांनी आयोगास अशी विनंती केली आहे की, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ व ५ शी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त व्हावी आणि जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना प्रत्येकी रु.२५,०००/- इतकी शास्ती आयोगाने लावावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २३.०४.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष,डॉ.दिपक शिंदे यांच्या प्रपाठक पदावरील नेमणूकीसंदर्भात दि. १७.०९.१९९४ ते २३.०४.२००९ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ९ मुद्यांद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २३०५.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ व ५ वगळता उर्वरित मुद्यांवरील माहिती सशुल्क पुरविली. अपिलार्थीस प्राप्त झालेल्या माहितीमध्ये मुद्दा क्र. ४ व ५ शी संबंधित माहितीचा समावेश नसल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २५.०५.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १२.०६.२००९ रोजी निर्णय देऊन याद्वारे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ व ५ शी संबंधित माहिती अधिनियमातील कलम 8(1)(e) नुसार नाकारल्याची जन माहिती अधिकारी यांची कृती योग्य असल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्षाचे वकील श्री. एम.व्ही. घाटगे उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ व ५ शी संबंधित माहिती अपिलार्थीस उघड केल्यास अधिनियमातील कलम 8(1) (e) चा भंग होणार असल्यामुळे, त्यांनी ही माहिती अपिलार्थीस देण्याचे नाकारले आहे.

त्रयस्थ पक्षातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ व ५ शी संबंधित माहिती दिल्याने अधिनियमातील कलम ८(एक)(छ) चा भंग होणार असल्यामुळे ही माहिती अपिलार्थीस उघड करण्यात येऊ नये.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, सर्व उपस्थितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीमध्ये मुद्दा क्र. ४ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे डॉ. दिपक शिंदे यांची प्रपाठक पदावर निवड करणा ऱ्या निवड समितीच्या अहवालाची छायाप्रत आणि मुद्दा क्र. ५ द्वारे निवड समितीचे अध्यक्ष व सदस्य यांच्या नावाची त्यांच्या पूर्ण पत्त्यासह माहिती मागितली आहे. यापैकी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ शी संबंधित माहिती अधिनियमातील कलम १० चा वापर करुन ती अपिलार्थीस उघड करण्यास हरकत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली मुद्दा क्र. ४ शी संबंधित माहितीचे आयोगाने अवलोकन केले, यापैकी निवड समितीच्या बैठकीच्या इतिवृत्ताचा समावेश असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे. तथापि या इतिवृत्तामध्ये समितीचे अध्यक्ष व इतर सदस्य यांची नावे व स्वाक्षऱ्या आहेत. निवड समितीच्या सदस्यांची नावे उघड केल्यास निवड समितीच्या सदस्यांच्या व अध्यक्षांच्या जीवितास आणि शारीरिक सुरक्षिततेस धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याचा त्रयस्थ पक्षाचा युक्तिवाद

लक्षात घेऊन जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी निवड समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तातील निवड समितीच्या सदस्यांची व अध्यक्षांची नावे, पदनामे व स्वाक्षऱ्या हा भाग सोडून सर्व माहिती देण्यास हरकत नाही. ही माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ च्या संदर्भात संबंधित त्रयस्थ पक्षाचे वकील श्री. घाटगे यांनी आयोगास त्यांच्या युक्तिवादामध्ये अवगत केल्याप्रमाणे, ही माहिती उघड केल्याने अधिनियमातील कलम ८(एक)(छ) चा भंग होणार असल्याची शक्यता असल्याने आणि हा युक्तिवाद आयोगाला मान्य असल्याने ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस प्राप्त होणार नाही.

वरील परिच्छेदात अपिलार्थीस अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी द्यावयाची माहिती आणि त्यांना अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देय असलेल्या माहितीचे केलेले पृथक्करण पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ शी संबंधित वर स्पष्ट केल्याप्रमाणे भागशः देय माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याचे आदेशित करण्याची विनंती आयोगास केली आहे. या मुद्यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही असद्हेतूने टाळले असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने व अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील ज्या मुद्यांवरील माहिती देण्याचे नाकारले आहे, त्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या सद्सद्विवेकबुध्दीला स्मरुन माहिती अधिकार अधिनियमातील ज्या कलमांच्या आधारे अपिलार्थीस माहिती देण्याचे, त्या कलमांचा उल्लेख करुन म्हणजेच त्यांना योग्य वाटले, अशा कारणाचा आधार घेऊन माहिती नाकारली आहे, असे दिसून

येत आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी यांचेवर शास्ती लावण्याची अधिनियमामध्ये कोणतीही तरतूद नाही. सबब अपिलार्थीची जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची विनंती आयोग अमान्य करीत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ४ शी संबंधित माहितीतील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली भागशः माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : १२.०५.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. हर्षवर्धन किशनराव दवणे,समतानगर,पावडेवाडी नाका, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव, आस्थापना विभाग, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव (प्रशासकीय बाबी), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२००
निर्णय दिनांक : १२.०५.२०१०

१. श्री. ए.डी.पाटील, : अपिलार्थी
रा.कन्नड, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.),
जिल्हा परिषद, औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अति.मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : १) कार्यालयीन अधीक्षक,पंचायत विभाग,जिल्हा परिषद, औरंगाबाद
२) गट विकास अधिकारी,पंचायत समिती,कन्नड,जि.औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.), जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३.०६.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २२.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून, त्यांच्याविरुध्द कोणतीही चौकशी प्रलंबित नसताना जन माहिती अधिकारी

यांनी कोणत्या नियमाद्वारे रक्कम कपात केली व या प्रकरणी उपमुख्य कार्यकारी अधिकारी दोषी ठरु शकतात की नाही, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १७.०२.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०१.०६.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे अधिकृत प्रतिनिधी श्री.प्रदीपसिंग अंकुश पाटील, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्या अधिकृत प्रतिनिधीने त्यांच्या युक्तिवादाद्वारे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून, त्यांच्याकडील उपलब्ध माहिती त्यांना प्राप्त झाली असल्याचे व त्याबाबत त्यांची कोणतीही तक्रार आता राहिली नसल्यामुळे ते विचाराधीन अपील मागे घेत असल्याचे आयोगास अवगत केले व त्याप्रमाणे सुनावणीदरम्यान त्यांचे दि.१२.०५.२०१० रोजीचे निवेदन आयोगास सादर केले.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, अपिलार्थीच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, मूळात माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्यामुळे ती, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्याच

स्वरुपात ती अर्जदारास उपलब्ध करुन देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे इतपतच ही प्रक्रिया सीमित आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे अभिप्राय मागणे आणि जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांनी मागणी केलेल्या माहितीवर त्यांचे अभिप्राय अथवा त्यांच्या कृतीचे स्पष्टीकरण देणे अशाप्रकारच्या प्रक्रियांचा, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये समावेश नसल्याने,अपिलार्थीस मूळात त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. याही उपर अपिलार्थीच्या अधिकृत प्रतिनिधीने अपिलार्थीचे विचाराधीन अपील मागे घेत असल्याचे त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केले असल्याने आणि तसे आयोगास लेखी निवेदनाद्वारे सादर केले असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १२.०५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. ए.डी.पाटील,(सेवानिवृत्त ग्राम विकास अधिकारी)डॉ. जाधव गल्ली, छाजेडनगर, कन्नड, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, पंचायत विभाग,जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,कन्नड,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.),जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२०१

निर्णय दिनांक : १२.०५.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. अशोक भगवान शिंदे,<br>रा.टाकळी (दे.),ता.परळी वै.,जि.बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय,परळी वै. जि.बीड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, परळी वै.,जि.बीड | | |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, परळी वै. जि.बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२.०१.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही माहिती अधिकाऱ्याने कोणतीही माहिती दिली नसल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ३१.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे,त्यांनी स्वतः तहसीलदार यांना दि. २४.०७.२००६ रोजी समक्ष दिलेल्या तक्रार अर्जावर तसेच गावकरी मंडळ, देशमुख टाकळी यांनी जन माहिती अधिकारी यांना उद्देशून लिहिलेल्या दि. १७.१२.२००७ रोजीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत पुराव्यासह माहिती व कार्यवाही केली नसल्यास त्याबद्दलची स्वयंस्पष्ट कारणे

देऊन, कार्यवाही किती दिवसांत करणार याचा तपशील, अशी माहिती मागितली होती व त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात तक्रार करुनही त्यांचे कार्यालय अपहरण रक्कम व वसूलीसाठी कायदेशीर कार्यवाही करण्यास विलंब करीत असल्यामुळे त्यांच्यावर पुढील कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा स्पयंस्पष्ट खुलासा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितला होता. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी जून २००६ ते दि. ३१.१०.२००८ असा असून अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,परळी वै. यांच्याकडे दि. -०४.१२.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.१२.२००८ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या प्रकरणाची नायब तहसीलदार (पुरवठा) यांनी एक महिन्याच्या आत चौकशी करुन वरिष्ठांना अहवाल सादर करण्याच्या सूचना त्यांना दिल्या व या चौकशीच्या वेळी अपिलार्थीस स्वतः हजर राहण्याचे, या आदेशाद्वारे सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती यांचे प्रतिनिधी (श्री.बी.एस.सावजी ऊर्फ लाड,अ.का.) उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नसल्याचे अवगत केले व या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचे आयोगास स्पष्ट केले.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने, अपिलार्थीस अद्यापपावेतो कोणतीही माहिती दिली नसल्याचा आयोगासमोर युक्तिवाद केला. त्यांनी आयोगास पुढे असेही स्पष्ट केले की, जन

अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावरील निर्णयामध्ये दिलेल्या आदेशानुसार नायब तहसीलदार यांनी या प्रकरणाची चौकशी करुन यासंदर्भातील चौकशी अहवाल वरिष्ठांना सादर केलेला आहे.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण २ मुद्यांद्वारे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली आहे. या अर्जातील मुद्दा क्र. २ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून, 'त्यांच्या तक्रार अर्जावर कार्यवाही केली नसल्यास त्याबद्दलची कारणे आणि कार्यवाही किती दिवसात करणार याचा तपशील' तसेच 'त्यांचे कार्यालय अपहरण रक्कम वसूलीबाबतची कार्यवाही करीत नसल्याने त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही का करण्यात येऊ नये,याचा खुलासा', अशी माहिती मागितली आहे.अशाप्रकारची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्यामुळे, ही माहिती अपिलार्थीस मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्याच स्वरुपात ती अर्जदारास अधिनियमातील तरतुदीप्रमाणे उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करणे इतपतच सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कृतीबद्दलचे स्पष्टीकरण व खुलासे मागणे आणि जन माहिती अधिकाऱ्याने त्यांच्या कृतीबद्दलचे अथवा एखाद्या निर्णयाबद्दलचे खुलासे व स्पष्टीकरणे अर्जदारास देणे, अशाप्रकारची प्रक्रिया मूळात माहिती अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. मात्र त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र. १ शी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जात संदर्भित केलेल्या दि. २४.०७.२००६ रोजी तहसीलदार यांना दिलेल्या व

गावकरी मंडळ, देशमुख टाकळी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१७.१२.२००७ रोजी दिलेल्या तक्रार अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीचा तपशील म्हणजे या दोनही तक्रार अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने त्या तक्रार अर्जातील विषयासंदर्भात संबंधित प्राधिकरणाकडे दि. ३१.१०.२००८ पर्यंतच्या कालावधीमध्ये केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती व या विषयासंदर्भातील अभिलेख्यावरील टिपणीच्या प्रती, ही होय. ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील,परळी (वै) यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी वरील परिच्छेदात स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ शी संबंधित माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात वरील कालावधीमध्ये हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,परळी वै. यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ शी

संबंधित माहिती, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १२.०५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अशोक भगवान शिंदे,मु.टाकळी (दे.),पो. पांगरी,ता.परळी वै.,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय, परळी वै. जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, परळी वै.,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२०२

निर्णय दिनांक : १२.०५.२०१०

१. श्री. एल.एम.करंजकर, : अपिलार्थी
रा.परभणी.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपप्रबंधक (आस्था),
मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्रबंधक,
मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपकुलसचिव (आस्था),
मराठवाडा कृषि विद्यापीठ,
परभणी

जन अपिलीय अधिकारी : कुलसचिव,
मराठवाडा कृषि विद्यापीठ,
परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६.०५.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्याविरुध्द केलेल्या चौकशीच्या अहवालाच्या सहपत्रांसह प्रती आणि यासंदर्भातील जन माहिती अधिकारी यांच्याकडील अभिलेख्यावर उपलब्ध असलेल्या टिपणीच्या प्रती, अशी त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २९.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या स्वत:कडील अतिरिक्त कार्यभार आणि त्यांच्याविरुध्दच्या चौकशी संदर्भात सन २००६ ते २००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ५ मुद्यांद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथमत: त्यांच्या दि. २६.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ४५/- इतके त्यांना विद्यापीठामध्ये भरणा करण्याचे सूचित केले. या शुल्काचा भरणा त्यांनी दि. ३१.०३.२००९ रोजी केल्यानंतर अपिलार्थीस त्यांनी दि. ०२.०४.२००९ रोजीच्या पत्राद्वारे त्यांना आवश्यक असलेली माहिती पुरविली. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०५.०३.२००९ रोजी प्रथम अपील केले होते. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २७.०५.२००९ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि या सुनावणीसाठी अपिलार्थी गैरहजर राहिल्याने त्यांनी त्यांच्याकडील दि. २७.०७.२००९ रोजीच्या निर्णयाद्वारे अपिलार्थीचे अपील खारीज केले. हा निर्णय देण्यापूर्वीच अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असून या माहितीमध्ये त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली, त्यांनी अतिरिक्त कार्यभार सांभाळल्यानंतर त्यांना देय होणारे अतिरिक्त वेतन यासंदर्भातील माहिती, त्यांच्याविरुध्दचा चौकशीचा अहवाल व या अहवालावर विद्यापीठाने केलेल्या कार्यवाहीच्यासंदर्भातील माहिती त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ शी संबंधित, त्यांना अद्यापपावेतो द्यावयाची माहिती त्यांच्या विद्यापीठातील आहरण व

संवितरण अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस देण्यास ते आता तयार आहेत. तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांच्याविरुध्दच्या तक्रारीसंदर्भात प्राप्त झालेल्या चौकशी अहवालाच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस दिल्या आहेत.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २९.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये त्यांच्याविरुध्दच्या चौकशी अहवालाच्या प्रतीवर विद्यापीठाने केलेली कार्यवाही अशाप्रकारची माहिती, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.iii द्वारे मागितली आहे. या मुद्यासंदर्भात अपिलार्थीस माहिती देताना जन माहिती अधिकारी यांनी फक्त, "महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम १० अन्वये डॉ.करंजखेडकर तसेच श्रीमती ए.ए.पल्लेवार यांना या सेवानियमाअंतर्गत नियम ८ अन्वये ज्ञापन देण्यात आले आहे", अशी माहिती अपिलार्थीस दिली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार एखाद्या अर्जावर किंवा अहवालावर संबंधितांनी केलेली कार्यवाही म्हणजे या प्रकरणाशी संबंधित सर्व प्राधिकरणाशी जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती आणि या विषयावर त्यांच्याकडील अभिलेख्यावर उपलब्ध असलेल्या टिपणीच्या प्रती, ही होय. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. iii शी संबंधित माहिती अपिलार्थीस देत असताना अपिलार्थी व त्यांच्या सहायक श्रीमती पल्लेवार यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील तरतुदीअंतर्गत त्यांना ज्ञापन देण्यात आले असल्याचे कळविले आहे. तथापि हा निर्णय विद्यापीठाने घेताना तो निर्णय ज्या कागदपत्रांच्या आधारे घेतला आहे त्या कागदपत्रांच्या प्रती आणि हा निर्णय विद्यापीठाच्या ज्या अभिलेख्यावर घेण्यात आलेला आहे, त्या अभिलेख्यातील टिपणीच्या व पत्रव्यवहाराच्या प्रती त्यांना अपिलार्थीस आता द्याव्या लागतील. तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. v मधील त्यांना अतिरिक्त कार्यभाराबद्दल देय असलेल्या रकमेच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी शासनास सादर केलेल्या त्यांच्याकडील दि. २८.०१.२००९ रोजीच्या पत्राची प्रत पुरवावी लागेल.

अशाप्रकारे अपिलार्थीस अद्याप द्यावयाची राहिलेली माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आता कशाप्रकारे द्यावी लागेल, याचे वरील परिच्छेदामध्ये केलेले विवेचन पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या विरुध्द त्यांनी आदेशित केलेल्या चौकशीच्या निर्णयाप्रत येताना ज्या कागदपत्रांचा व टिपणीचा आधार घेतला आहे, त्या कागदपत्रांच्या व टिपणीच्या प्रती व अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र.V च्या संदर्भात त्यांच्या कार्यालयाच्या यासंदर्भातील दि. २८.०१.२००९ रोजीच्या पत्राची प्रत अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसांच्या आत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. III व V शी संबंधित माहिती, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व टपालाद्वारे पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : १२.०५.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. एल.एम.करंजकर,५५,प्रशांत, आनंदनगर,वसमत रोड,परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव (आस्था),मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव,मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११९४

निर्णय दिनांक १२-०५-२०१०

१ श्री. नंदकुमार भिमराज कुकलारे, : अपिलार्थी
द्वारा, साईकृपा फोटो स्टुडिओ, पोलीस चौकीसमोर, मु. पो.
लासूरस्टेशन, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
दुय्यम निबंधक कार्यालय, गंगापूर, जि. औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा दुय्यम निबंधक, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : दुय्यम निबंधक श्रेणी - १, गंगापूर, जि. औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी : सह जिल्हा निबंधक वर्ग-१, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती न देता त्यांच्या दिनांक ०६-०४-२००९ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी मोघम माहिती दिली व त्यांच्या मूळ आर्जास उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, मौजे शिरेगांव, तालुका गंगापूर येथील त्यांच्या मालकीच्या कथित गट क्रमांक १२१ मधील मनाई हुकुमाची आर सी एस नंबरसह साक्षांकित प्रत व शिरेगांव येथील गट क्रमांक १२३ ची नोंदणी दस्ताऐवजाची छायांकित प्रत, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीने सदरची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून ४८ तासाच्या आत शीघ्र टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०६-०४-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा शोध चालू असल्याचे व त्यांनी मागितलेली माहिती प्राप्त होताच त्यांना कळविण्याचे व अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात शिरेगाव येथील गट नंबर १२३ च्या दस्ताऐवजाची मागणी संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस नोंदणीकृत पावती सादर केल्यास त्यांना या मुद्यावरील माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात येईल, असे आश्वासित केले. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०४-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-०४-२००९ रोजीच्या आदेशाद्वारे अपिलार्थीने मागणी केलेल्या हुकुमनाम्याची प्रत प्राप्त झाल्यास ती अपिलार्थीस तात्काळ देण्याचे व अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात अपिलार्थीने आवश्यक तो पुरावा सादर केल्यानंतर शासकीय अभिलेख्याची प्रत अपिलार्थीस सशुल्क पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले व अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. मौजे शिरेगाव, तालुका गंगापूर येथील गट नंबर १२३ मधील त्यांच्या मालकीच्या शिवाराची विक्री करीत असताना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने या विक्रीची नोंद घेण्यास नकार दिला. या नकाराचे कारण त्यांनी अपिलार्थीस असे दिले की, या शिवाराच्या विक्रीवर मा. न्यायालयातर्फे मनाई हुकुम त्यांना प्राप्त झाला आहे. मा. न्यायालयाकडून त्यांना या मनाई हुकुमाच्या बाबतीत कधीही कळविण्यात आले नव्हते. तसेच या शिवाराच्या मालकी हक्कासंदर्भात किंवा इतर कोणत्याही मुद्यावर त्यांचा कोणत्याही न्यायालयात कसलाच वाद नाही, असे असताना जन माहिती अधिकारी यांनी केवळ त्यांच्या रजिस्टरमधील नोंदीच्या आधारे त्यांच्या शिवाराच्या विक्रीच्या व्यवहाराची नोंद घेण्यास नकार दिला आहे. सदरची माहिती त्यांच्या जीवनमरणाशी निगडीत आहे. सदरच्या भूखंडाचे क्षेत्र २ एकर असून त्यातील १ एकर क्षेत्र त्यांना कर्ज फेडण्यासाठी विकावयाचे आहे. परंतु त्यांच्या विक्रीच्या व्यवहाराची नोंद घेण्यास जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने असमर्थता दर्शविल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादाच्या अखेरीस या प्रकरणी त्यांना जन माहिती अधिकारी यांनी उशिरा माहिती दिली असल्यामुळे त्यांच्यावर नियमाप्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्या कार्यालयातील न्याय हुकूम नोंदवहीमध्ये मौजे शिरेगांव येथील गट क्रमांक १२३ ची नोंद घेतली असल्यामुळे, त्यांनी अपिलार्थीच्या या गट क्रमांकाच्या विक्रीची नोंद घेण्यास नकार दिला. त्यांच्याकडे न्यायालयाच्या मनाई हुकूमाची प्रत उपलब्ध नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात त्यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने जर गट क्रमांक १२३ च्या नोंदणी दस्ताची प्रत अथवा त्यांच्या कार्यालयाने संबंधिताना दिलेल्या पावतीची प्रत दिल्यास त्यांना अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ ची माहिती देण्यास सुकर होईल. त्यांच्याकडे असलेल्या अभिलेख्यामध्ये गट क्रमांकानिहाय नोंद ठेवली जात नाही. दर दिवशी ज्या क्रमाने जमिनीच्या खरेदी विक्रीचे व्यवहार

होत असतात त्याक्रमाने सदरचे अभिलेखे त्यांच्या कार्यालयात रजिष्टरमध्ये नोंद करुन जतन करुन ठेवले जातात. त्याप्रमाणे त्या अपिलार्थीस त्यांच्या अभिलेख कक्षातील संबंधित अभिलेख्याचा शोध घेण्यास (सर्च) विनामूल्य परवानगी देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३०-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीच्या मालकीच्या भूखंडाचा भाग त्यांना त्यांच्या वैयक्तिक कारणास्तव विकावयाचा असल्याने आणि त्यांच्या विक्रीच्या व्यवहाराची नोंद घेण्यास जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने कोर्ट हुकुमामुळे नाकारले असल्यामुळे अपिलार्थीस कोर्टाच्या मनाई हुकुमाची प्रत व आदेश क्रमांक आवश्यक आहे. अपिलार्थीच्या म्हणण्यानुसार या भूखंडासंदर्भात त्यांचे कोणत्याही न्यायालयात कोणत्याही प्रकारचे प्रकरण प्रलंबित नाही. यासंदर्भात आयोगाने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील न्यायालयाच्या मनाई हुकुमाच्या रजिस्टरचे अवलोकन केले असता, फक्त 'मौजे शिरेगाव गट नंबर १२३' एवढीच नोंद घेतली आहे. ही नोंद या रजिस्टरमध्ये कोणत्या कागदपत्राच्या आधारे घेतली याचा या रजिस्टरमध्ये कोणताही उल्लेख नाही. त्यामुळे या नोंदीस कितपत वैधता आहे याची आयोगास शंका वाटते. सदरची नोंद सध्याचे जन माहिती अधिकारी यांच्या पूर्वीच्या जन माहिती अधिकाऱ्याने घेतली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, ही नोंद त्यांच्या कार्यालयातील श्री. साळवे नावाच्या लिपीकाने घेतली आहे. अपिलार्थीस आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भात त्यांना माहिती देण्याकरिता हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३० दिवसाच्या आत, अभिलेख कक्षामध्ये स्वत: या अभिलेख्याचा शोध घ्यावा व या कालावधीमध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे त्यांना उपलब्ध झाले नाहीत तर हे अभिलेखे जतन करुन ठेवण्याची जबाबदारी ज्या कर्मचाऱ्यावर होती

त्या कर्मचाऱ्यावर त्यांनी सरकारी कागदपत्रे गहाळ केल्याप्रकरणी फौजदारी स्वरुपाचा गुन्हा नोंदवावा किंवा जर हे अभिलेखे या कालावधीमध्ये त्यांना प्राप्त झाले तर त्यांनी या अभिलेख्यातील अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची प्रत त्यांना विनामूल्य पुरवावी. याच कालावधीमध्ये त्यांनी ज्या न्यायालयाने भूखंड विक्रीवर मनाई हुकूम जारी केला आहे त्या न्यायालयामध्ये हजर राहून या गट क्रमांकावर न्यायालयाने एखादा मनाई हुकुम दिला आहे किंवा कसे याचाही शोध घ्यावा. या प्रकरणी सह जिल्हा निबंधक, औरंगाबाद यांनी दुय्यम निबंधक, गंगापूर यांना आवश्यक ते सहकार्य करावे व या माहितीचा पाठपुरावा त्यांच्या स्तरावर करावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी शिरेगाव येथील गट क्रमांक १२३ च्या नोंद पत्राची व जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने दिलेल्या पावतीची प्रत संबंधितांच्याकडून (अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये गट क्रमांक १२३ चे मालक त्यांचे काका असल्याचे सांगितले) प्राप्त करुन घेऊन ती जन माहिती अधिकारी यांना वरील परिच्छेदात नमूद केलेल्या कालावधीमध्ये सादर करावी. जेणेकरुन ही माहिती अभिलेख कक्षामधून शोधून ती अपिलार्थीस देणे जन माहिती अधिकारी यांना सुकर होईल.

वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य व शीघ्र टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी, असे जन माहिती अधिकारी यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने माहिती प्राप्त झाली असल्याचे आयोगास अवगत केले आहे. तथापि आयोगास असे आढळून आले आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत त्यांच्या सद्सद्विवेकबुध्दिला स्मरुन अपिलार्थीस वस्तुस्थितीची कल्पना दिली असल्यामुळे व या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीस माहिती देण्याचे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही असद्हेतूने नाकारले असल्याचे नि:संशयपणे सिध्द होत नाही, त्यामुळे

अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची विनंती, आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १२-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नंदकुमार भिमराज कुकलारे, द्वारा, साईकृपा फोटो स्टुडिओ, पोलीस चौकीसमोर, मु. पो. लासूरस्टेशन, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक श्रेणी - १, गंगापूर, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११९५

निर्णय दिनांक १२-०५-२०१०

१ श्री. ज्ञानेश्वर धनाजी पवार, : अपिलार्थी
रा. त्रिवेणी, जिल्हा न्यायालयामागे, केसरसिंगपुरा, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांचे कार्यालय, जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कृषी उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या माहितीच्या अधिकाराखाली केलेल्या अर्जास कोणताही प्रतिसाद दिला नाही आणि जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय दिलेला नाही. या प्रकरणी करावयाची कार्यवाही जन माहिती व अपिलीय अधिकारी एकमेकांवर ढकलत असल्यामुळे व या संपूर्ण प्रकारामुळे संबंधित प्राधिकरणाच्या बंडीग, शेततळी, गावतळी वगैरे कामावर गैरप्रकार उघडकीस येणार असल्यामुळे त्यांनी मागणी केलेली माहिती दडपण्यात येत आहे, असा त्यांचा संशय आहे. म्हणून या गावात कृषी विभागाकडून झालेल्या संपूर्ण कामाचे

रेकॉर्ड मागवून चौकशी होणे गरजेचे आहे. या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आयोगाकडे त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची मागणी कायम ठेवून कृषी खात्याकडून त्यांच्या गावामध्ये झालेल्या कामाची चौकशी व्हावी, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांनी कृषी अधिकारी, घनसावंगी श्री. ढेपे यांच्या विरुध्द त्यांच्या दिनांक १६-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये विनंती केलेल्या कार्यवाही संदर्भात जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्या कार्यालयाकडे मागितलेल्या माहितीमध्ये - बांधावर माती टाकण्यापूर्वी दोन शेतामधील बांध कोठून आहे याची मोजणी केली होती काय? माझी संमती नसताना हे का करण्यात आले? गरज नसताना पूर्व - पश्चिम बांध का टाकण्यात आले? या कामावर शासनाचा किती खर्च झाला ? व केलेली कार्यवाही व चौकशी अहवालाची प्रत - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०२-२००९ रोजी या संदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न देता त्यांच्याकडील दिनांक २१-०३-२००९ रोजीच्या पत्राद्वारे तालुका कृषी अधिकारी, घनसावंगी यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे सादर करण्याचे सूचित केले आणि या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. अशाप्रकारे संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांना अपेक्षित असलेल्या माहिती संदर्भात प्राप्त झालेल्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दिनांक ११-०५-२००९ रोजी विनामूल्य पुरविली आहे. अपिलार्थीने श्री. ढेपे यांच्या विरुध्द केलेल्या तक्रार अहवालाबाबत त्यांनी संबंधित उप विभागीय कृषी अधिकारी यांच्याकडे वारंवार लेखी पत्राद्वारे पाठपुरावा करुनही संबंधितांच्यांकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने श्री. ढेपे यांच्यावर त्यांच्या कार्यालयातर्फे अद्यापपावेतो कोणतीही कार्यवाही त्यांना करता आली नाही. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी उप विभागीय कृषी अधिकारी, परतूर यांना त्यांच्या कार्यालयातर्फे पाठविलेल्या दिनांक ०१-०४-२००८, ०५-०१-२००९, ०५-०६-२००९ व ०५-०५-२०१० रोजीच्या पत्राच्या प्रती आयोगास दाखविल्या . यावरुन अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ शी संबंधित माहिती देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी संबंधितांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला असल्याचे सिध्द होत आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील एकूण ५ मुद्यांपैकी मुद्दा क्रमांक १,२ व ३ शी संबंधित माहिती मूळात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण या मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती मागितल्याचे आढळून येत आहे. अशाप्रकारची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीत समाविष्ट होऊ शकणारी नसल्यामुळे, अपिलार्थीने मागणी केलेली ही माहिती अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्याचे सिध्द होत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे

त्याच स्वरुपात ती अर्जदारास अधिनियमातील तरतुदीनुसार देणे इतपत सीमित प्रक्रिया या अधिनियमामध्ये समाविष्ट आहे. अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीची कारणे अथवा त्यांच्या कृतीचे स्पष्टीकरण मागणे व जन माहिती अधिकारी यांनी ते अर्जदारास देणे यासारख्या प्रक्रियेंचा या अधिनियमामध्ये समावेश नाही. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १,२ व ३ शी संबंधित माहिती देय होत नाही. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व ५ द्वारे अपिलार्थीने मागणी केलेली, - या कामावर शासनाचा झालेला खर्च आणि त्यांच्या दिनांक १६-०६-२००७ रोजीच्या श्री. ढेपे यांच्याविरुध्द केलेल्या तक्रारावरील चौकशी अहवालाची प्रत आणि केलेली कार्यवाही, - ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. जन माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस दिनांक ११-०५-२००९ रोजी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, आयोगास असे आढळून येत आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली आहे. तथापि त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ च्या संदर्भात त्यांनी अद्यापपावेतो अपिलार्थीस कोणतीही माहिती पुरविल्याचे आयोगास आढळून येत नाही. याचे समर्थन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये केले आहे. त्यांच्या कार्यालयातील तालुका कृषी अधिकारी, घनसावंगी श्री. ढेपे यांच्याविरुध्द जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झालेल्या तक्रारीवर उप विभागीय कृषी अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही अद्यापपावेतो केल्याचे आयोगास आढळून येत नाही. परिणामी अपिलार्थी हे त्यांना अपेक्षित माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित राहिल्याचे आयोगास आढळून येत आहे. त्यामुळे या मुद्यावर अपिलार्थीस माहिती देताना जन माहिती अधिकारी यांनी, "अद्यापपावेतो अपिलार्थीच्या दिनांक १६-०६-२००७ रोजीच्या तक्रार अर्जावर त्यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही" असे त्यांना कळविणे योग्य राहिले असते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कृती या प्रकरणी केलेली नाही. आता त्यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस

दिनांक १६-०६-२००७ रोजीच्या तक्रार अर्जाची सद्यःस्थिती  अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य कळवावी.

माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती अर्जदारास देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे कर्मचारी व अधिकारी यांना देखील माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतूद आहे. हे पाहता, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करण्यासाठी जबाबदार असलेले उप विभागीय कृषी अधिकारी, परतूर हे अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवण्यास जबाबदार असल्याचे आयोगास आढळून येत आहे. सबब सचिव (कृषी) यांना या प्रकरणाशी संबंधित उप विभागीय कृषी अधिकारी, श्री. घाटगे (सध्या उप विभागीय कृषी अधिकारी, परतूर या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व ५ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (कृषी) यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांचे सहायक श्री. घाटगे (सध्या उप विभागीय कृषी अधिकारी, परतूर या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १२-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. ज्ञानेश्वर धनाजी पवार, रा. त्रिवेणी, जिल्हा न्यायालयामागे, केसरसिंगपुरा, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा कृषी उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय , जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (कृषी), मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११९६

निर्णय दिनांक १२-०५-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मोतीराम गयबू काळे,<br>मु. जानापुरी, पो. वडेपुरी, ता. लोहा, जि. नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कंधार, जि. नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत विभाग,<br>जिल्हा परिषद, नांदेड | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाशी संबंधित रोजगार हमी योजनेच्या धान्य वाटपासंदर्भात सन २००१-०२ ते २००५-०६ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ८

मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत समिती विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक २०-०४-२००९ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील कलम १९ (६) मध्ये विहित केलेल्या मुदतीत कोणताही निर्णय होऊ न शकल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. सांगवीकर जी. ओ., कनिष्ठ लेखाधिकारी, पंचायत समिती, कंधार उपस्थित आणि जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०९-१२-२००९ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी अपिलार्थीची सदर माहिती दिनांक ०९-१२-२००९ रोजी प्राप्त झाल्याची पोचसहीच्या पत्राची प्रत त्यांनी आयोगास सादर केली आहे. यावरुन अपिलार्थीस त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याचे आयोगास आढळून येत आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी आता अपिलार्थीस त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली आहे. प्राप्त माहितीवर अपिलार्थीने आयोगाकडे कोणताही लेखी युक्तिवाद सादर केलेला नाही अथवा यावर भाष्य करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर

उपस्थित नाहीत. आजच्या सुनावणीची कल्पना अपिलार्थीस, त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांनी निर्देशित केलेल्या भ्रमणध्वनीवर, आयोगाच्या कार्यालयाने दिनांक ११-०५-२०१० रोजी दिली आहे. तथापि अपिलार्थी आज रोजी सुनावणीसाठी उपस्थित नाहीत. हे पाहता अपिलार्थीचे प्राप्त माहितीने समाधान झाले असल्याचे अनुमान काढण्यात येत आहे.

अपिलार्थीस जरी आवश्यक ती माहिती प्राप्त झाली असली तरही त्यांनी दिनांक १८-०३-२००९ रोजी मागणी केलेली माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस दिनांक ०९-१२-२००९ रोजी प्राप्त झाली असल्याची बाब आयोगास दुर्लक्षित करता येणार नाही. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लागलेल्या विलंबाचे स्पष्टीकरण करण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी आयोगासमोर उपस्थित नाहीत. अथवा या संदर्भात त्यांनी त्यांचे कोणतेही लेखी स्पष्टीकरण आयोगास सादर केलेले नाही. हे पाहता अपिलार्थीस विलंबाने माहिती देण्यासाठीचे कोणतेही समर्थन त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरवून स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल व अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविल्यामुळे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कंधार यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती प्राप्त झाली असल्यामुळे, त्यांना माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश आयोग आता देत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कंधार यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १२-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मोतीराम गयबू काळे, मु. जानापुरी, पो. वडेपुरी, ता. लोहा, जि. नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कंधार, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११९७

निर्णय दिनांक १२-०५-२०१०

१ श्री. मन्मथ यशवंतराव पाटील, : अपिलार्थी

रा. जुन्या बसस्टॅन्डजवळ, डॉ. सोनी यांच्या घराजवळ,

चाकूर, ता. चाकूर, जि. लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

वनपरिक्षेत्र अधिकारी, तुळजापूर, जि. उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

उपविभागीय वन अधिकारी, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दिनांक २५-०४-२००८, १०-०६-२००८ , २३-०६-२००८ व ०७-१०-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असता, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे आणि आयोगास अशी विनंती केली आहे की, त्यांचे द्वितीय अपील किमतीसह मान्य करण्यात येऊन वन परिक्षेत्र अधिकारी, तुळजापूर यांना अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे सूचित करावे आणि त्यांच्यावर, जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक ०५-०५-

२००९ रोजीच्या आदेशाप्रमाणे माहिती न दिल्यामुळे, अधिनियमातील कलम २० नुसार कारवाई करण्यात यावी.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्यांचे वकील, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे आयोगासमोर उपस्थित आहेत.

आयोगापुढे अपिलार्थीचा दिनांक २५-०४-२००८ रोजीचा एकच माहितीसाठीचा अर्ज सादर करण्यात आला असून, अपिलार्थीचे म्हणणे असे आहे की, त्यांनी या प्रकरणी केलेल्या एकूण ४ माहितीसाठीच्या मूळ अर्जांची आयोगाने एकत्रितपणे सुनावणी घ्यावी. यापैकी आयोगास सादर करण्यात आलेल्या अपिलार्थीच्या दिनांक २५-०४-२००८ रोजीच्या अर्जासंदर्भात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १६-०६-२००८ रोजी आवश्यक ती माहिती सशुल्क पुरविल्याचे आयोगास आढळून येत आहे. उर्वरित तीन माहितीसाठीच्या अर्जांच्या बाबतीत सुनावणी पुढील तारखेस घेण्यात येईल असे आदेशित करण्यात येत आहे.

सुनावणीची तारीख संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १२-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मन्मथ यशवंतराव पाटील, रा. जुन्या बसस्टॅन्डजवळ, डॉ. सोनी यांच्या घराजवळ, चाकूर, ता. चाकूर, जि. लातूर

२ जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, तुळजापूर, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय वन अधिकारी, उस्मानाबाद यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२०३

निर्णय दिनांक १२-०५-२०१०

१ श्री. मच्छिंद्र संपतराव म्हस्के, : अपिलार्थी

राहुलनगर, रेल्वेस्टेशनजवळ, विनर बेकरीसमोर,

औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय,

औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय,

औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये (अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाच्या प्रतीवर, दिनांक २३-०१-२००७ अशी तारीख नमूद केली आहे) जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो), औरंगाबाद यांच्याकडे सन २००६-०७ या कालावधीमध्ये उपविभागीय अभियंता, (स्थानिक स्तर), औरंगाबाद, फुलंब्री या यंत्रणेस महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत वितरीत करण्यात आलेला निधी व सदर निधी ज्या हजेरीपत्रकावर खर्च करण्यात आला त्या हजेरीपत्रकाच्या प्रती व दिनांक, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती. तथापि ही माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी टाळाटाळ करत असल्याचे वाटल्यावरुन, अपिलार्थीने यानंतर अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-०३-२००९ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीस तात्काळ माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचा प्रथम अपील अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला असून, या अपील अर्जावर निर्णयही जन माहिती अधिकारी यांनी अपिलीय अधिकारी या नात्याने दिला आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज प्राप्त झाल्यानंतर, त्यांनी हा अपील अर्ज सक्षम प्राधिकरणाकडे (अतिरिक्त जिल्हाधिकारी, औरंगाबाद) यांच्याकडे पाठवून देण्याऐवजी, या अपील अर्जावर त्यांनी स्वतःच निर्णय दिला, ही जन माहिती अधिकारी यांची कृती सर्वस्वी गैर व चुकीची आहे. या निर्णयानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०६-०४-२००९ रोजी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली, तथापि आवश्यक ती माहिती उपलब्ध होऊनही अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर व जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस या प्रकरणाशी संबंधित माहिती दिनांक ०६-०४-२००९ रोजी व्यक्तिशः हस्तांतरीत केली असून ती माहिती प्राप्त झाल्याचे अपिलार्थीचे दिनांक १०-०५-२०१० रोजीचे पत्र त्यांनी त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ आयोगास सादर केले. सदरचे पत्र अपिलार्थीने आयोगास उद्देशून लिहिलेले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती विभागाकडून प्राप्त झाली असल्याचे नमूद करुन, यासंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नाही, म्हणून त्यांचा अर्ज निकाली काढण्यात यावा, अशी आयोगास विनंती केली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती दिनांक ०६-०४-२००९ रोजी पुरविली असून, प्राप्त माहितीवर अपिलार्थीचा कोणताही आक्षेप नाही, तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी स्वतःच जन अपिलीय अधिकारी या नात्याने अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देण्याची त्यांची कृती चुकीची आहे, असे त्यांच्या निदर्शनास येथे आणून देण्यात येत आहे. तसेच अपिलार्थीने मागणी केलेल्या एकूण दोन मुद्दयापैकी एका मुद्दयाशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध होती व दुस-या मुद्दयाची माहिती त्यांच्या कार्यालयाचा एक भाग असलेल्या तहसीलदार, फुलंब्री यांच्याकडे होती. अशा प्रकरणी त्यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित होते, परंतु त्यांनी अशा प्रकारे कार्यवाही न करता संबंधित तहसीलदार व क्षेत्रीय यंत्रणांकडून ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी खटाटोप केला, परिणामी अपिलार्थीस अपेक्षित माहिती विलंबाने प्राप्त झाली. त्यांच्या हातून घडलेल्या अशा

प्रकारच्या अनियमिततेमुळे त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून, त्यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी यापुढे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रत्येक अर्जावर सतर्कतेने व अधिनियमाव्दारे विहित केलेल्या तरतुदीमध्ये व मुदतीत कार्यवाही करावी. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचा अपील अर्ज निकाली काढण्याची आयोगास विनंती केली आहे. त्यांना आवश्यक ती सर्व माहिती प्राप्त झाली असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १२-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मच्छिंद्र संपतराव म्हस्के, राहुलनगर, रेल्वेस्टेशनजवळ, विनर बेकरीसमोर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२०४

निर्णय दिनांक १२-०५-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. भाऊसाहेब क-हाळे पाटील,<br>जी-१/२८२, त्रिवेणीनगर, सिडको, एन-७, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>दिनवाडा ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय, मौजे वैरागड, वार्ड क्रमांक ३, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी,<br>पंचायत समिती, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, दिनवाडा, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद |
| | जन अपिलीय अधिकारी | : | विस्तार अधिकारी (प.), पंचायत समिती, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी समाधानकारक माहिती न दिल्यामुळे विचाराधीन अपील त्यांनी आयोगाकडे केल्याचे नमूद केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याचे नमूद करुन, त्यांच्यावर शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष अभिषेक ॲग्रो इंडस्ट्रीज जिनींग ॲण्ड प्रेसिंग मील, वैरागड, वॉर्ड क्रमांक ३ यांच्यासंदर्भात जानेवारी २००४-०५ ते डिसेबर २००८ या कालावधीतील काही माहिती एकूण सहा मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने या अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती त्यांना कोणत्या माध्यमाव्दारे अपेक्षित आहे, हे नमूद केलेले नाही.

यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी काही माहिती अपिलार्थीस दिनांक ११-०२-२००९ रोजी पुरविली, तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०३-२००९ रोजी प्राप्त झालेली माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी असल्याचे वाटल्यावरुन प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर व तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी हजर आहेत.

संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ११-०२-२००९ रोजी माहिती पुरविल्याचा युक्तिवाद केला.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास मुद्देनिहाय माहिती दिलेली नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधित आहे. अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाविषयी मागितलेल्या संबंधित माहितीचे स्वरुप सार्वजनिक असल्यामुळे ती उघड करण्यासाठी त्रयस्थ पक्षास प्रत्यवाय असू नये. अपिलार्थीने मागणी केलेल्या मुद्दयावरील संपूर्ण माहिती, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविली नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित माहिती - त्यांनी बांधकामासाठी रितसर परवानगी घेतली आहे का ? - त्यांना, जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही, मात्र उर्वरित सर्व मुद्दयांवरील माहिती त्यांना देय होत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व्दारे विचारलेली माहिती ही, अधिनियमातील तरतुदीशी विसंगत असल्यामुळे व ती अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या ' माहिती ' या शब्दाच्या व्याख्येमध्ये समाविष्ट होण्यासारखी नसल्यामुळे, ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. उर्वरित पाच मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २६-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना मुद्देनिहाय, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत रजिस्टर्ड टपालाव्दारे व विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ वगळता उर्वरित सर्व मुद्दयांवरील मुद्देनिहाय माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत रजिस्टर्ड टपालाव्दारे व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १२-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. भाऊसाहेब क-हाळे पाटील, जी-१/२८२, त्रिवेणीनगर, सिडको, एन-७, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, दिनवाडा, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (प.), पंचायत समिती, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२०५

निर्णय दिनांक १२-०५-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मनिष भगवानदास अग्रवाल,<br>ए-५१, नाथनगर, सिंधी कॉलनी मागे, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पूर्व)<br>विभाग, नाशिक | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पूर्व)<br>विभाग, नाशिक | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून, या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना सुनावणीचे पत्र न देता त्यांच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय घेतल्याने आणि सदरचा निणर्य दिशाभूल करणारा असल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. या अर्जाव्दारे आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती एकूण तीन मुद्दयाव्दारे व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३१-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ९६ इतके जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले, तथापि या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे न करता, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-०३-२००९ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. या आदेशाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी गैरहजर व अपिलार्थी आणि जन माहिती अधिकारी हजर आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे मान्य केले.

जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात केल्यास सात दिवसाच्या आत त्यांना माहिती देण्याचे आयोगास आश्वासित केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः मागितली आहे. माहिती अधिकार

अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ' व्यक्तिशः ' माहितीची मागणी केल्यानंतर, या अर्जाच्या पुढील सर्व घडामोडी जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क साधून ज्ञात करुन घेणे हे अर्जदाराचे उत्तरदायित्व असते. या प्रकरणी अपिलार्थीने हे उत्तरदायित्व योग्य प्रकारे पार पाडले नाही. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून तीस दिवसाच्या आत अपिलार्थीस, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क अधिनियमातील कलम ७ (३) (क) मधील तरतुदीप्रमाणे, आवश्यक असलेल्या तपशीलासह कळविले. परंतु अपिलार्थीने या शुल्काचा या संपूर्ण घटनाक्रमामध्ये भरणा करण्याची कधीही तयारी दर्शविल्याचे आयोगास आढळून येत नाही. अशा प्रकारे या प्रकरणी अपिलार्थीने अधिनियमातील कलम ७ (५) चा भंग केला असल्याने, त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न होण्यासाठी ते स्वतःच जबाबदार असल्याचे सिध्द होत आहे. सबब, अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे करुन, तदनंतर ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः हस्तगत करुन घ्यावी. जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा त्यांच्याकडे केल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस ही माहिती, अधिनियमातील तरतुदीनुसार विहित केलेल्या कालावधीमध्ये व्यक्तिशः पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक १२-०५-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मनिष भगवानदास अग्रवाल, ए-५१, नाथनगर, सिंधी कॉलनी मागे, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पूर्व) विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पूर्व) विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२९८

निर्णय दिनांक १२-०५-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. चंगेडे शशिकांत पेमराज,<br>३४६३, खिस्त गल्ली, अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>पुणे ग्रामीण पोलिस अधीक्षक कार्यालय, पुणे | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा पोलिस अधीक्षक (ग्रामीण), पाषाण, पुणे | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : | उपविभागीय पोलीस अधिकारी, दौंड विभाग |
| | जन अपिलीय अधिकारी | : | अपर पोलिस अधीक्षक, पुणे ग्रामीण |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांचे कर्तव्य असताना देखील ती देण्यास टाळाटाळ केल्याने आणि विहित मुदतीत माहिती न दिल्याने व अपूर्ण माहिती दिल्यामुळे त्यांनी, विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०२-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, पुणे शिरुर रस्त्यावरील टोल नाक्यावरील टोल वसुलीसंदर्भात सन

२००० ते २००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण सात मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - रांजणगांव टोल नाक्यावर मा. उच्च न्यायालयाच्या ज्या आदेशान्वये पोलिस बंदोबस्त देण्यात आला त्या आदेशाची सत्यप्रत, सदर ठेकेदाराने टोल चूकवून जाणा-या वाहनामुळे सुमारे १८ कोटी रुपयाचे नुकसान झाल्याच्या केलेल्या तक्रारीनुसार, जन माहिती अधिकारी यांच्या खात्यातर्फे अपिलार्थीने दिलेल्या गाड्याच्या नंबरची आर. टी. ओ. कडील माहिती घेऊन, मोटार वाहन कायद्यानुसार त्यांच्यावर दाखल केलेल्या गुन्हयाच्या अहवालाच्या सत्यप्रती, पोलीस संरक्षणाबाबत ठेकेदाराकडून वसूल झालेली रक्कम, डिव्हायडर तोडण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी संबंधित खात्याशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या सत्यप्रती, या रस्त्यावरील अतिक्रमणाबाबत खात्याकडून केलेल्या पत्रव्यवहाराच्या सत्यप्रती, रस्त्यावरील डिव्हायडर तोडलेल्या जागेजवळ झालेल्या आपघाताची माहिती व सदर रस्त्यावर डिसेंबर महिन्यातील एक दिवस टोल वसूली बंद ठेवण्यात येते त्याची व या टोल नाक्यावर वसुली बंदमुळे झालेल्या नुकसानीसाठी ठेकेदाराने केलेली मागणी याची माहिती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून साधारण टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २१-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली, तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर, जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-११-२००८ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीचे अपील मान्य केले आणि अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २, ४, ५, ६ व ७ शी संबंधित माहिती सात दिवसाच्या आत पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती जन अपिलीय अधिकारी यांनी या अपील निर्णयाबरोबर पुरविल्याचे, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत आहे. तथापि अपिलीय अधिकारी यांच्या आदेशातील मुदतीत

अपेक्षित उर्वरित माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी हजर आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत, तथापि त्यांनी त्यांचा युक्तिवाद लेखी स्वरुपात आयोगास सादर केला असून, त्यामध्ये असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०४-११-२००८ रोजी आदेशित करुनही त्यांना, जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती दिली नाही व जी दिली ती अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे, त्यांच्या या मुद्दया-संदर्भात त्यांनी लेखी युक्तिवादामध्ये असे स्पष्ट केले आहे की, टोल चुकवून गेलेल्या वाहनाबाबत ७०,००० गुन्हे दाखल झाले आहेत, असे मा. उच्च न्यायालयाकडील प्रतिज्ञापत्रामध्ये म्हटले आहे. त्यांनी मोटार व्हेईकल कायद्यानुसार दाखल केलेल्या गुन्ह्याबाबतची कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली असता, त्यांनी ती अपिलार्थीस दोन वर्षापासून पुरविलेली नाहीत. या कागदपत्रांच्या प्रती अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य देण्याचे आदेश व्हावेत व संबंधितांवर दंडात्मक व विभागीय चौकशीची कार्यवाही करावी, अशी त्यांनी या लेखी युक्तिवादा-मध्ये आयोगास विनंती केली आहे. या युक्तिवादामध्ये त्यांनी पुढे असेही नमूद केले आहे की, दर डिसेंबरमध्ये टोल नाका बंद का असतो, याची माहिती त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारली असता, त्यांनी ठेकेदाराच्या संगनमताने जानेवारीमध्ये टोल नाका चालू असतो, अशी खोटी माहिती दिली आहे. शासनास खोटी माहिती दिल्याने व वरील सर्व कारणास्तव सेवाशर्तीच्या नियमानुसार संबंधितांना दंडीत करावे व संबंधित ठेकेदाराने खोटी माहिती देऊन राज्य माहिती आयोगाची केलेली दिशाभूल पाहता, संबंधितांवर योग्य ती कार्यवाही करावी, अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः दिनांक २१-०८-२००८ रोजी व तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश दिल्यानंतर

दिनांक ०६-०५-२०१० रोजी आवश्यक ती माहिती पुरविली असून टोल चुकवून गेलेल्या वाहनांबद्दल त्यांच्याकडे, अपिलार्थीने म्हटल्याप्रमाणे एकूण ७०,००० गुन्हे दाखल झालेले नाहीत. टोल चुकवून गेलेल्या वाहनाबाबत त्यांच्याकडे एकही गुन्हा दाखल झालेला नाही, त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक दोनच्या संदर्भात त्यांनी अपिलार्थीस ' निरंक ' अशी माहिती पुरविली आहे. मोटार वाहन कायद्याचा भंग केल्याबाबत त्यांच्याकडे कोणताही गुन्हा सन २००० ते २००८ या कालावधीमध्ये नोंद झालेला नाही, त्यामुळे याबाबत त्यांच्याकडे ' निरंक ' अशी माहिती आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये दर डिसेंबरमध्ये टोल नाका बंद का असतो, याची माहिती विचारली आहे, तथापि ही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्यामुळे, त्यांनी या मुद्दयावर संबंधित ठेकेदार यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेऊन ती ठेकेदाराकडून जशीच्या तशी अपिलार्थीस पुरविली आहे. ठेकेदाराच्या प्रतिनिधीने दिनांक ०५-०५-२०१० रोजीच्या पत्राव्दारे त्यांना ही माहिती दिली आहे. अपिलार्थीपासून त्यांनी कोणतीही माहिती असद्हेतूने दडविली नाही किंवा अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी टाळाटाळ केलेली नाही. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना शिरुर येथील पोलिस स्टेशनवर अवलंबून राहावे लागत होते व याच बरोबर शिरुर पोलिस स्टेशनकडून त्यांना ज्याप्रमाणे माहिती प्राप्त झाली त्याप्रमाणे त्यांनी ती अपिलार्थीस पुरविली आहे. त्यांच्याकडे ठेकेदाराकडून, टोल चुकवून जाणा-या वाहनांमुळे १८ कोटी रुपयाचे नुकसान झाल्याची तक्रार प्राप्त झालेली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या मूळ अर्जाव्दारे एकूण सात मुद्दयांशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. यापैकी मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाच्या सुनावणीच्या निर्णयाबरोबर अपिलार्थीस पुरविली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व्दारे टोल चुकवून जाणा-या वाहनांच्या संदर्भात, जन माहिती अधिकारी यांच्या खात्यातर्फे आर. टी. ओ. खात्याकडून माहिती घेऊन

संबंधित गाडी मालकांवर मोटार वाहन कायद्यानुसार दाखल केलेल्या गुन्ह्याच्या अहवालाच्या सत्यप्रती मागितल्या आहेत, तथापि या संदर्भात संबंधित पोलिस स्टेशनने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अशा प्रकारची माहिती ' निरंक ' असल्याचे कळविले आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे मोटार वाहन कायद्यानुसार, शिरुर पोलिस स्टेशनकडे एकही गुन्हा सन २०००-०८ मध्ये नोंदविला गेला नाही, त्यामुळे त्यांनी या मुद्दयावर ' निरंक ' अशी माहिती दिली आहे. उपलब्ध कागदपत्रावरुन ही ' माहिती ' बरोबर असल्याचे दिसून येत आहे. मुद्दा क्रमांक ३ व्दारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २१-०८-२००८ रोजी पुरविली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे पुणे शिरुर रस्त्यावरील डिव्हायडर फोडण्यासंबंधी खात्याकडून झालेल्या पत्रव्यवहाराच्या सत्यप्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितल्या होत्या, तथापि यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी ११ आरोपीच्या विरुध्द शिरुर पोलिस स्टेशनमध्ये मालमत्ता विद्रुपित कायदा कलम ३, ७ अन्वये दाखल झालेल्या गुन्ह्याच्या प्रती अपिलार्थीस पुरविल्या आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली ही माहिती चुकीची आहे, कारण या मुद्दयाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे पुणे शिरुर रस्त्यावरील डिव्हायडर फोडण्यासंबंधी खात्याकडून त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या पत्रांच्या व यासंदर्भात त्यांनी केलेल्या पत्रव्यवहाराच्या सत्यप्रतीची मागणी केली आहे. तेव्हा यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भात, त्यांच्याकडे सार्वजनिक बांधकाम विभागातील पुणे शिरुर रस्त्याचे डिव्हायडर तोडण्यासाठी प्राप्त झालेल्या पत्राच्या व त्या पत्रावरील जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने दिलेल्या उत्तराच्या प्रती अपिलार्थीस विनामूल्य पुरवाव्यात. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ मध्ये या रस्त्यावरील अतिक्रमणा-बाबत खात्याकडून केल्या गेलेल्या पत्रव्यवहाराच्या सत्यप्रती मागितल्या आहेत, तथापि जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, या रस्त्यावर झालेल्या अतिक्रमणाबाबत, त्यांच्याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कोणताही पत्रव्यवहार केला गेला नाही, त्यामुळे

त्यांनी ही माहिती अपिलार्थीस ' निरंक ' असल्याचे कळविले आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ व्दारे अपिलार्थीने रस्त्यावरील डिव्हायडर तोडलेल्या जागेजवळ झालेल्या अपघाताची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे या मुद्दयाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप हे अत्यंत मोघम आहे. ' अपघाताची माहिती ' म्हणजे नेमकी कोणत्या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे, हे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये स्पष्ट केले नाही, तरीही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी डिव्हायडर तोडलेल्या जागेजवळ चार अपघात झाले आहेत त्याच्या क्राईम रजिस्टरचा उतारा त्यांच्या दिनांक ०६-०५-२०१० रोजीच्या पत्राव्दारे दिलेला आहे, त्यामुळे या मुद्दयावर अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७ व्दारे अपिलार्थीने या रस्त्यावर डिसेंबर महिन्यातील एक दिवस टोल वसुली कोणत्या कायद्याच्या कोणत्या नियमाने बंद ठेवण्यात येते, अशी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. या मुद्दयावर असे स्पष्ट करण्यात येत आहे की, या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीने पोलीस अधीक्षकाकडे न मागता ती त्यांना सार्वजनिक बांधकाम विभागाकडून घ्यावी लागेल, कारण टोल वसूली करण्यासंदर्भात संबंधित ठेकेदाराचा सार्वजनिक बांधकाम विभागाशी करार झालेला आहे. या करारामधील तरतुदीची अंमलबजावणी करण्याचा पोलिस विभागाचा संबंध नाही, त्यामुळे जर या रस्त्यावर डिसेंबर महिन्यात टोल वसूली बंद करण्यात येत असेल तर, ती कोणत्या नियमान्वये बंद करण्यात येते, ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे असणे मूळात अभिप्रेत नाही. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या या मुद्दयासंदर्भात असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी या मुद्दयावरील माहिती, सार्वजनिक बांधकाम विभागा-कडून प्राप्त करुन घ्यावी.

वरील परिच्छेदामध्ये अपिलार्थीने मागणी केलेली व अपिलार्थीस देय असलेली माहिती यांचे केलेले विश्लेषण पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित, अपिलार्थीने मागणी केलेली

माहिती त्यांना, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अर्जामध्ये, संबंधितांवर त्यांनी अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरविल्याबद्दल शास्तीची व शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याची विनंती केली आहे. यासंदर्भात असे आढळून येत आहे की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला आहे आणि यातील काही माहिती जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-११-२००८ रोजी निर्णय दिल्यानंतर अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून ती दिनांक १२-११-२००८ पर्यंत प्राप्त होणे आवश्यक होते ती त्यांना दिनांक ०६-०५-२०१० रोजी प्राप्त झालेली आहे. ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी, जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या नियंत्रणाखालील शिरुर पोलिस स्टेशनवर अवलंबून राहणे भाग होते, असे त्यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती अर्जदारास देण्याकरिता, जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सहायक यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक हे अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र होत आहेत. सबब, जिल्हा पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या सहायकांवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत टपालाव्दारे विनामूल्य पुरवावी.

३. जिल्हा पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या सहायकावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १२-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. चंगेडे शशिकांत पेमराज, ३४६३, खिस्त गल्ली, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, दौंड विभाग यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलिस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हा पोलिस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२९९

निर्णय दिनांक १२-०५-२०१०

१ श्री. निळकंठ भिवनाजी राऊत, : अपिलार्थी
रा. तळणी, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय,
जिल्हा परिषद, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नांदेड

त्रयस्थ पक्ष : श्री. सुभाष लक्ष्मण तावडे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे व त्यांनी दिनांक १९-०४-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेला प्रथम अपील अर्ज त्यांनी फेटाळल्यामुळे, विचाराधीन अपील आयोगाकडे केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना, त्यांनी दिनांक ०३-१२-२००७ रोजीच्या लोकशाहीदिनी, मौजे तळणी, तालुका हदगांव येथील घर नंबर १०८८ च्या खुल्या जागेवरील श्री.

सुभाष लक्ष्मण तावडे यांनी केलेल्या अतिक्रमणाच्या चौकशीच्या कार्यवाहीबाबत काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - अपिलार्थीने दिनांक ३१-१२-२००७ रोजी लोकशाहीदिनी केलेल्या तक्रार अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली चौकशी व केलेली कार्यवाही, लोकशाहीदिनी दिलेल्या अर्जाची चौकशी किती दिवसात करणे आवश्यक आहे, विहित कालावधीत चौकशी न झाल्यास त्याची जबाबदारी कोणाची, संबंधित जबाबदार अधिका-यावर कोणती कार्यवाही केली जाईल व केलेल्या चौकशी व कार्यवाही अहवालाची प्रत - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात दिनांक १९-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २०-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे सदरची माहिती, माहिती अधिकार अधिनियमाच्या कक्षेत बसत नसल्याने अपिलार्थीचे अपील फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या दिनांक २१-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे संमिश्र स्वरुपाची माहिती मागितली आहे. यातील अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-१२-२००७ रोजीच्या लोकशाहीदिनी, मौजे तळणी, तालुका

हदगांव येथील घर क्रमांक १०८८ च्या खुल्या जागेवरील श्री. सुभाष लक्ष्मण तावडे यांनी केलेल्या अतिक्रमणासंदर्भात तक्रार केली होती, या तक्रारीवर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही म्हणजे, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ३१-१२-२००७ रोजीच्या तक्रार अर्जामध्ये त्यांनी संदर्भित केलेल्या तक्रारीवर जन माहिती अधिकारी यांनी विविध प्राधिकरणाशी दिनांक २१-०२-२००८ पर्यंतच्या कालावधीत केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती आणि यासंदर्भात त्यांच्याकडील अभिलेख्यावर उपलब्ध असलेल्या अभिलेख्यातील टिपणीच्या प्रती, ही होय. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित सर्व मुद्दयाव्दारे, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनिमयातील तरतुदीशी सुसंगत नसल्यामुळे, या मुद्दयाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे अभिप्राय आणि भविष्यकाळातील माहिती मागितली असल्यामुळे आणि ही माहिती अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या ' माहिती ' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्यामुळे, ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. या मुद्दयातील फक्त कार्यवाही अहवालाची प्रत इतकीच माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे.

वरील परिच्छेदात अपिलार्थीने मागणी केलेल्या आणि त्यांना देय असलेल्या माहितीचे केलेले पृथक्करण पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांना देय असलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत टपालाव्दारे व विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांच्या कार्यालयातील संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल आणि याव्दारे त्यांनी स्वतःला अधिनियामतील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले असल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना त्यांच्या कार्यालयाचे या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत टपालाव्दारे व विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना त्यांच्या कार्यालयातील या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १२-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. निळकंठ भिवनाजी राऊत, रा. तळणी, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२१६

निर्णय दिनांक : १३.०५.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. परमेश्वर रंगनाथराव गित्ते,<br>रा. परळी वै., जि.बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी,<br>तालुका कृषि कार्यालय, परळी वै.,<br>जि.बीड. | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी,<br>परळी वै. जि.बीड | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५.०६.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी जाणूनबुजून माहिती दिली नसल्यामुळे व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असताना सुनावणीच्या दिवशी जन अपिलीय अधिकारी गैरहजर राहिले आणि दुसऱ्या दिवशी अपिलार्थी त्यांच्या कार्यालयामध्ये गेले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस, लेखी कळवू असे सांगून त्यांचे प्रथम अपील निकाली काढले, त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे आणि त्यांना जन माहिती अधिकारी यांनी जाणूनबुजून माहिती न दिल्यामुळे त्यांचेवर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २४.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या शाळेशी संबंधित दि. ०१.०१.२००७ ते २४.१२.२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती टपालाद्वारे मागितली होती. तथापि ही माहिती अपिलार्थीस प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२१.०२.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेता त्यांच्याकडील दि. २५.०३.२००९ रोजीच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांना तात्काळ माहिती देण्याचे सूचित केले असल्याचे अपिलार्थीस अवगत करुन त्यांचे अपील निकाली काढल्याचे, या पत्राद्वारे कळविले. त्यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी अथवा त्यांचा प्रतिनिधी यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाही.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जाची पाहणी करता, येथे अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी नाकारल्याने त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केले असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्याच्या दृष्टीने जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परळी वै. जि.बीड यांनी अपिलार्थीच्या दि. २१.०२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन आपले आदेश लिखित स्वरुपात पारीत करणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी ,परळी वै., जि.बीड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या दि. २१.०२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय लिखित स्वरुपात पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी ,परळी वै., जि.बीड यांनी अपिलार्थीच्या दि. २१.०२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक १३.०५.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. परमेश्वर रंगनाथराव गित्ते,दिवाणी न्यायालय, परळी वैजनाथ, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी,तालुका कृषि अधिकारी कार्यालय,परळी वैजनाथ, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,परळी वैजनाथ, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२१७
निर्णय दिनांक : १३.०५.२०१०

१. श्री. राजेंद्र किसनराव गुप्ते, : अपिलार्थी
रा.बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपविभागीय अभियंता,
जिल्हा परिषद, लघुपाटबंधारे, उपविभाग,बीड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
जिल्हा परिषद, लघुपाटबंधारे, विभाग,बीड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपअभियंता,
जिल्हा परिषद, लघुपाटबंधारे,
उपविभाग,बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६.१०.२००९ रोजी फेर सादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १५.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील कोल्हापूरी पध्दतीचा बंधारा,लोळदगाव,ता.बीड या बांधकामासंदर्भात, सदरच्या बंधाऱ्याचे काम सुरु झाल्यापासून दि. १५.०१.२००९ रोजीच्या कालावधीपर्यंतची माहिती एकूण ४१ मुद्यांद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १९.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये प्रपत्रामध्ये माहिती मागणी केल्याने, ती देण्याचे नाकारले व या कामांसंदर्भातील सर्व अभिलेखे तपासणीसाठी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असल्याचे अपिलार्थीस कळविले व त्यांच्याकडे माहितीच्या प्रतीच्या झेरॉक्ससाठीची फीस व टपाल फीस चलनाद्वारे राष्ट्रीयकृत बँकेत जमा केल्यास, झेरॉक्स प्रतीमध्ये माहिती देण्यात येईल, असे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या प्रतिसादामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१९.०३.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १६.०४.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती द्यावी असे मोघम आदेश पारित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी या अपिलाचा निर्णय देताना अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जातील ४१ मुद्यांपैकी फक्त ५ मुद्यांचा परामर्ष घेतला असल्याचे आयोगास आढळून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयानंतरही माहिती उपलब्ध न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १५ ते ४१ शी संबंधित माहिती अद्यापपावेतो प्राप्त होणे बाकी आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी प्रथम अपील करण्यापूर्वीच दि. १६.०३.२००९ रोजी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती पुरविली आहे.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने

त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १५ ते ४१ या मुद्यांवरील माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होणे बाकी असल्याचे आयोगास स्पष्ट केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या दि.१६.०४.२००९ रोजीच्या निर्णयाचे अवलोकन केले असता, या निर्णयामध्ये त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आणि अपिलार्थीस प्रथमतः जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती या मुद्यांवर कोणतेही भाष्य केलेले नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १५ ते ४१ चे अवलोकन करता असे आढळून येत आहे की, या मुद्यांपैकी अपिलार्थीस मुद्दा क्र. १५,१६,१९,२१,२२,२३,२६,२७,२८,२९ या मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीने यापैकी मुद्दा क्र. १६,२१,२२,२३ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून विशिष्ट प्रपत्रामध्ये माहिती मागविली आहे. अशा प्रपत्रातील अपिलार्थीस माहिती देण्याचे बंधन जन माहिती अधिकारी यांना नाही. तथापि अपिलार्थीने ज्या मुद्यावर त्यांच्याकडे माहिती मागितली आहे, त्या मुद्यावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडील अभिलेख्यामधील ज्या कागदपत्रांवर उपलब्ध आहे, त्या कागदपत्रांच्या प्रती त्यांना आता अपिलार्थीस पुरवाव्या लागतील. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १५,१६, मुद्दा क्र. २१ मधील ४ थ्या देयकाची प्रत, मुद्दा क्र. २२, मुद्दा क्र.२३ मधील ५ व्या देयकाची प्रत आणि मुद्दा क्र. २६ ते २९ शी संबंधित संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील या माहिती व्यतिरिक्त उर्वरित मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे स्पष्टीकरण व खुलासे अपेक्षित करणारी माहिती मागविल्याचे आयोगास आढळून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे, त्या स्वरुपात ती अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे इतकीच सीमित प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत आहे. अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दलची

स्पष्टीकरणे व खुलासे मागणे आणि जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कृतीबद्दलची स्पष्टीकरणे वा खुलासे अर्जदारास करणे, अशाप्रकारच्या प्रक्रियांचा यामध्ये समावेश नाही. त्यामुळे अपिलार्थीस या मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून दहा दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेल्या त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक १३.०५.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजेंद्र किसनराव गुप्ते,रा.कृष्णाई, अयोध्यानगर,एमआयडीसी एरिया,बीड,ता.जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता,जिल्हा परिषद, लघुपाटबंधारे, उपविभाग,बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,जिल्हा परिषद, लघुपाटबंधारे, विभाग, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२१८

निर्णय दिनांक : १३.०५.२०१०

१. श्री. एकनाथ वामन गायकवाड, रा.औरंगाबाद. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता,श्रेणी -१, जायकवाडी पाटबंधारे उपविभाग क्र.५, औरंगाबाद. : प्रतिवादी

२. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,औरंगाबाद.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक अभियंता,श्रेणी -१, जायकवाडी पाटबंधारे उपविभाग क्र.५, औरंगाबाद.

जन अपिलीय अधिकारी : उप कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग, नाथनगर (उत्तर) पैठण,जि.औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. के.जी.पाठक

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९.०७.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न दिल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ व ४ ची माहिती, पंधरा दिवसांच्या आत पुरविण्याचे सूचित केले असता, ही माहिती

त्यांना दि. २७.०७.२००९ पर्यंत प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेल्या या विलंबामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार कार्यवाही करण्याच्या विनंतीबरोबर त्यांनी अपिलार्थीस द्यावयाची उर्वरित माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे आदेशित करण्याची विनंती आयोगास केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०६.०५.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष, श्री. के.जी.पाठक, वरिष्ठ लिपीक यांच्यासंदर्भात एकूण ५ मुद्यांद्वारे स्पीड पोस्टाने काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने सदरचा अर्ज सहायक अभियंता श्रेणी-१, जायकवाडी पाटबंधारे उपविभाग क्र.५, औरंगाबाद यांना उद्देशून केला होता. तथापि या प्रकरणी ते माहिती अधिकारी नसल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतदीनुसार सदरचा अर्ज या प्रकरणाशी संबंधित माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग,नाथनगर (उत्तर),पैठण यांच्याकडे दि. ०८.०५.२००९ रोजी पाठविला, तथापि या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिल्याचे आढळून येत नाही.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण यांच्याकडे दि.२२.०६.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०८.०७.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ शी संबंधित माहिती त्यांना पंधरा दिवसांच्या आत पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि ही मुदत व्यपगत होऊनही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सर्व संबंधितांनी केलेला युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागणी केलेली माहिती जरी त्रयस्थ पक्षाशी संबंधित असली तरी ती सार्वजनिक स्वरुपाची असल्यामुळे, ती उघड करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोणताही प्रत्यवाय नव्हता. तथापि अपिलार्थीच्या दि. ०६.०५.२००९ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २२.०६.२००९ रोजी प्रथम अपील केल्यानंतर दि. ०३.०७.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १,२ व ५ च्या संदर्भातील माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस ही माहिती प्राप्त झाल्याची अपिलार्थीची पोचसही आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास उपलब्ध करुन दिली. यानंतर अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ व ४ शी संबंधित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २९.०७.२००९ रोजी उपलब्ध करुन देण्यात आली. यावरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर अपिलार्थीस उर्वरित माहिती पुरविली आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ शी संबंधित माहिती त्यांना प्राप्त न झाल्याचे आयोगास अवगत केले आहे. परंतु ही माहिती प्राप्त झाल्याची पोचसही त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०३.०७.२००९ रोजी दिली आहे. हे पाहता, अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.५ शी संबंधित माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच पाच दिवसांच्या आत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीने आज रोजी सुनावणीमध्ये केलेल्या युक्तिवादामध्ये संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद न दिल्याने, अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे. या प्रकरणाशी संबंधित एकूण वस्तुस्थिती पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०६.०५.२००९ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमातील कलम ७(१) मध्ये विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०८.०७.२००९ रोजी पंधरा दिवसांच्या आत माहिती देण्याचे आदेशित करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी हा कालावधी व्यपगत झाल्यानंतरच उर्वरित माहिती दिली आहे, असे आयोगास आढळून आले आहे.

त्यामुळे,उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभाबाबद्दल त्यांच्यावर अधिनियमातील कलम २०(२) च्या तरतुदीनुसार, प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य अभियंता तथा मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद यांच्याकडे करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ शी संबंधित संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य अभियंता तथा मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर

प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १३.०५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. एकनाथ वामन गायकवाड,द्वारा श्री.मधुकर गोविंद चाबुकस्वार, श्री. चव्हाण यांचे घर,प्लॉट नं.६१, वसंतनगर,जवाहर कॉलनी, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता श्रेणी -१,जायकवाडी पाटबंधारे उपविभाग क्र.५,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.. जन अपिलीय अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता,जायकवाडी पाटबंधारे विभाग, नाथनगर (उत्तर) पैठण,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य अभियंता तथा मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२१९

निर्णय दिनांक : १३.०५.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. अशोक बाळाधन उके,<br>रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी,<br>परीक्षा विभाग,<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,<br>औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी,<br>परीक्षा विभाग,<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,<br>औरंगाबाद | | |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपकुलसचिव,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : परीक्षा नियंत्रक,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०.०६.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पूर्ण आणि वेळेवर माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे.या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील माहितीशिवाय, "सन २००७ मधील एप्रिल,मे,२००७ व ऑक्टोबर,२००८

एल.एल.बी.III च्या उत्तरपत्रिकांच्या झेरॉक्स प्रती आणि त्या तपासणाऱ्या प्राध्यापकांची नावे", ही अतिरिक्त माहिती अपेक्षिली असल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २८.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील सन २००७ एप्रिल, मे, २००७-०८ मध्ये एल.एल.बी.-I तथा एल.एल.बी.- III च्या उत्तरपत्रिकांच्या झेरॉक्स आणि तपासणाऱ्या प्राध्यापकांची नावे, या विषयावर सन २००७-०८ या कालावधीतील काही माहिती एकूण ८ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे मागितली असून त्यांच्या अर्जामध्ये त्यांनी ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २६.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देय असलेली माहिती विनामूल्य पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०२.०३.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी आपले आदेश दि. १५.०४.२००९ रोजी पारीत केले व या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.४,५ व ८ शी संबंधित माहिती अपिलार्थीस पुरवली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस दि. २६.०२.२००९ रोजी पुरविली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ व २ द्वारे अपिलार्थीने

मागणी केलेली माहिती ही, अधिनियमातील कलम ८(१)(छ) चा भंग करणारी असल्यामुळे त्यांनी ती अपिलार्थीस दिली नाही आणि अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ द्वारे अपिलार्थीने ही माहिती जतन करुन ठेवण्याचा विहित कालावधी व्यपगत झाल्यानंतर अन्य विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकेची प्रत मागितली असल्याने विद्यापीठाच्या नियमानुसार त्यांना ही माहिती अपिलार्थीस पुरवता आली नाही. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.७ द्वारे मागणी केलेल्या माहितीच्या माध्यमातून जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागितली असल्यामुळे त्यांनी ती अपिलार्थीस पुरविली नाही. अपिलार्थीच्या मुद्दा क्र.८ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांना अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज प्राप्त झाला त्यावेळी अपिलार्थीला त्यांच्या मुद्दा क्र.८ द्वारे नेमकी कोणत्या माहितीची अपेक्षा आहे, याचा बोध होत नव्हता. तथापि याचे स्पष्टीकरण अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २४.०३.२००९ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी केले असल्याने, त्यांनी अपिलार्थीस दि.१५.०४.२००९ रोजीच्या पत्राद्वारे आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली आहे.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी दि. २६.०२.२००९ रोजी व तदनंतर दि. १५.०४.२००९ रोजी अपिलार्थीस त्यांना अधिनियमातील तरतुदीनुसार देय असलेली संपूर्ण माहिती पुरविली आहे.

अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीस मूळात त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ व ७ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण या मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागविली आहे. अशाप्रकारची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्यामुळे ती माहिती अपिलार्थीस मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही.उर्वरित सहा मुद्यांवरील अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आणि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहितीच्या

मागणीशी सर्वसाधारणपणे सकृतदर्शनी सुसंगत माहिती पुरविल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ द्वारे त्रयस्थ पक्षाच्या एल.एल.बी.- I च्या सन २००६-०७ मध्ये घेण्यात आलेल्या उत्तरपत्रिकांच्या प्रतींची मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली आहे.उत्तरपत्रिकांच्या छायाप्रतींकरिता विद्यार्थ्याने स्वत:, ते शिक्षण घेत असलेल्या महाविद्यालयामार्फत विद्यापीठाकडे अशाप्रकारची मागणी त्या-त्या परीक्षांचा निकाल लागल्यापासून दहा दिवसांपर्यंतच्या कालावधीत करण्याचे, विद्यापीठाचे नियम आहेत व अशापध्दतीने ज्या विद्यार्थ्याने स्वतःच्या उत्तरपत्रिकेच्या प्रतीची मागणी केली आहे, केवळ त्याच विद्यार्थ्यास या नियमास अनुसरुन उत्तरपत्रिकेची प्रत संबंधित महाविद्यालयामार्फत प्राप्त होऊ शकते. या प्रकरणी अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाच्या उत्तरपत्रिकांच्या प्रती माहिती अधिकाऱ्याकडे मागितल्या असल्याने ही माहिती अर्थात विद्यापीठाच्या या नियमानुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. राज्य माहिती आयोगाने वेळोवेळी अशाप्रकारे उत्तरपत्रिका मागण्याचा विद्यार्थ्यांना हक्क असू शकत नाही, अशा अर्थाचे निर्णय दिलेले आहेत. अशाचप्रकारचे निर्णय वेळोवेळी केंद्रीय माहिती आयोग व मा. उच्च न्यायालयाने देखील दिलेले आहेत. याच भूमिकेशी सहमती दर्शवून अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ शी संबंधित माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देखील देता येणार नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ द्वारे पेपर तपासणाऱ्या प्राध्यापकांची नावे, अशी माहिती अपेक्षिली आहे. तथापि ही माहिती अपिलार्थीस उघड केल्याने संबंधित त्रयस्थ पक्षाच्या जीवितास व शारीरिक सुरक्षिततेस धोका होण्याची शक्यता असल्याने जन माहिती अधिकारी यांनी ती अपिलार्थीस अधिनियमातील कलम ८(१)(छ) अन्वये नाकारली आहे. ही माहिती उघड केल्यास संबंधित त्रयस्थ पक्षाच्या जीवितास व शारीरिक सुरक्षिततेस धोका होण्याची शक्यता आहे,असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये केले आहे. तथापि या मुद्याचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद मान्य करण्यात येऊन, अपिलार्थीस त्यांनी या मुद्यावर योग्य कारणास्तव माहिती नाकारल्याचे अनुमान काढण्यात येत आहे.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित सर्व मुद्यांवर अपिलार्थीस देय असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहीत मुदतीत पुरवली असल्याने व अपिलार्थीस अद्यापपावेतो अप्राप्त असलेली माहिती प्राप्त होऊ शकत नसल्याचे वरील परिच्छेदात स्पष्ट केले असल्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती अपिलार्थीस देय असणार नाही. याही पेक्षा महत्त्वाचे असे आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे. परंतु याबाबत माहितीसाठीच्या अर्जासोबत सबळ पुरावा म्हणून त्यांनी श्री. बाळाधन पैकूजी उके या व्यक्तीचे अंजनगाव पंचायत समितीचे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र जोडले आहे. मूळात अर्जदार व ही व्यक्ती या दोन वेगवेगळया व्यक्ती आहेत. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार ज्या अर्जदाराने माहिती मागितली आहे, त्या अर्जदारास त्यांचा स्वत:चा दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचा सबळ पुरावा त्यांच्या मूळ अर्जासोबत जोडणे शासनाच्या सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र. आर.टी.आय. २००५/ सी.आर. ३१५/०५/५,दिनांक ११.१०.२००५ मधील तरतुदीनुसार अभिप्रेत आहे. या तरतुदीचा अपिलार्थीने या प्रकरणी भंग केला असल्याचे आणि वरील परिच्छेदात नमूद केलेल्या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन पुढील आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १३.०५.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अशोक बाळाधन उके,द्वारा, डोंगरे धनराज किशनलाल, घर नं. १.५.१५,कुंभारगल्ली, बेगमपूरा,हनुमान मंदिराजवळ,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२२०

निर्णय दिनांक : १३.०५.२०१०

१. श्री. रामा बापु गावंडे, : अपिलार्थी
रा.सोयगाव, जि.औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सिव्हील सर्जन,
सामान्य रुग्णालय, जळगाव.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा शल्य चिकित्सक,
सामान्य रुग्णालय, जळगाव

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मुख्य प्रशासकीय अधिकारी,
सामान्य रुग्णालय, जळगाव

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५.०६.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०५.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष, श्रीमती ज्योती नंदू पाटील, यांच्या संदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"ज्योती नंदु पाटील रा.कढोली ता.एरंडोल येथील महिलेचे दि.१७-८-०६ रोजी सामान्य रुग्नालय जळगाव येथे शव अच्छेदन झाले त्याचे शरीराचे आतील भाग (व्हि.सी.आर.) मीळावे व त्या बाबतचे रीपोटची माहीती देणे."

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतला आहे.)

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी दि. १६.०८.२००६ ते १७.०८.२००६ असा होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून शीघ्र टपालाद्वारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.०२.०३.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन त्रयस्थ पक्षाचा व्हिसेरा त्यांनी घेतला नसल्याने अपिलार्थीस माहिती देता येत नसल्याचे अपिलार्थीस कळविले व सोबत निवासी वैद्यकीय अधिकारी (चि.) व पोस्टमार्टेम रजिस्टरची छायाप्रत अपिलार्थीस पाठविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जिल्हा शल्य चिकित्सक, जळगाव यांच्याकडे दि. ०४.०५.२००९ रोजी या संदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या त्यांच्याकडील दि. १४.०५.२००९ रोजीच्या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीचा पुनरुच्चार केला. जन अपिलीय अधिकारी यांच्या या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्रयस्थ पक्ष, त्यांची मृत मुलगी, कै. ज्योती नंदू पाटील यांच्या व्हिसेरा रिपोर्टची

आवश्यकता आहे. तो रिपोर्ट त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्वरित मिळावा, अशी अपेक्षा त्यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये व्यक्त केली.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस दि.०२.०३.२००९ रोजीच्या पत्राद्वारे पुरविली आहे. अपिलार्थीने ज्या त्रयस्थ पक्षाच्या व्हिसेरा अहवालाची माहिती मागितली आहे, तो व्हिसेरा अहवाल त्यांच्याकडे मूळात उपलब्ध नसल्यामुळे त्यांना ही माहिती अपिलार्थीस देता येणे शक्य नाही.त्यांच्या रुग्णालयामार्फत, ज्योती नंदू पाटील यांचे शवविच्छेदन केले असता, त्यांचा मृत्यू नैसर्गिकरितीने (Cardio respiratory arrest due to A.M.I.) झाला असल्याचे आढळल्याने त्यांनी श्रीमती ज्योती नंदू पाटील यांच्या शरीराचा कोणताही भाग काढून घेतला नाही व तो तपासणीसाठी इतरत्र कोठेही पाठविला नाही. त्यामुळे अपिलार्थीस अपेक्षित असलेला व्हिसेरा रिपोर्ट त्यांना अपिलार्थीस देता आला नाही.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ०५.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळात कोणत्याही स्वरुपात अस्तित्त्वात नसल्याने व ही माहिती अस्तित्त्वात नसल्याचे कारण संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केला असल्यामुळे, आता अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षा करता येणार नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीची मागणी करता येते. परंतु या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती कोणत्याही स्वरुपात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळात ती अस्तित्त्वात नसल्याने, अपिलार्थीची माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीन्वये त्यांनी जिल्हा शल्य चिकित्सक, जळगाव यांच्याकडे मागणी केलेली माहिती ते अपिलार्थीस उपलब्ध करुन देऊ शकत नाहीत. यापृष्ठयर्थ त्यांनी योग्य ते समर्थन आज रोजी सुनावणीमध्ये केले असून त्यांचे समर्थन आयोग मान्य करीत आहे व अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १३.०५.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रामा बापु गावंडे,अध्यक्ष, सत्यशोधक सेवाभावी संस्था, सोयगाव,ता.सोयगाव, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी,सामान्य रुग्णालय, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक,सामान्य रुग्णालय, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२१२

निर्णय दिनांक १३-०५-२०१०

१ श्री. शेख नजीर शेख बुऱ्हाण, : अपिलार्थी
मु. बोरगाव सारवाणी, पो. बोरगाव बाजार, ता. सिल्लोड,
जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद कार्यालय,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : मुख्याध्यापक, इनामुल उलुम उर्दू हायस्कूल, बोरगांव सारवाणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाप्रमाणे माहिती देण्याचे नाकारले

असल्यामुळे व संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाने त्यांना माहिती नाकारली असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष इनामुल उलूम उर्दू हायस्कूल, बोरगाव सारवाणी या शाळेसंदर्भात काही माहिती एकूण ७ मुद्यांद्वारे व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी फेब्रुवारी २००२ ते जानेवारी २००९ असा होता. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सदरच्या शाळेविरुध्द आलेल्या तक्रार अर्जाच्या प्रती, शाळेने शिक्षक भरती करताना दिलेल्या जाहिराती, मुलाखतीला आलेल्या एकूण उमेदवाराची नोंदणी व त्यांच्या घेतलेल्या मुलाखती, ज्या शिक्षकाना कामावर घेतले त्यांची योग्यता तपासणी अहवाल, शाळेविरुध्द आलेल्या तक्रारीवर शिक्षण विभागाने केलेला तपास व कार्यवाही अहवाल, शिक्षणाधिकारी यांनी घेतलेल्या सुनावणीचा व तपासाचा अहवाल, संस्थेच्या सदस्यांनी १००/- रु. बॉन्डवर लिहून दिलेल्या बॉन्ड पत्राची प्रत व शिक्षकांना दिलेल्या वैयक्तिक मान्यतेसाठी संस्थेने शिक्षणाधिकारी यांच्याकडे दिलेल्या फाईलचे पूर्ण रेकॉर्ड - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०२-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडून प्राप्त करुन घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले व त्यांनी मागणी केलेली माहिती संबंधित शाळेकडे उपलब्ध असल्याचे नमूद करुन अपिलार्थीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी या नात्याने संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडे पाठविला असल्याचे अपिलार्थीस अवगत केले. यानंतर अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २५-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे परत या माहितीकरिता स्मरणपत्र दिले. संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाने त्यांच्या दिनांक ०३-०३-२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती देण्याचे त्यांना अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाला नसल्याच्या कारणास्तव नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या

तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन सुनावणीचे इतिवृत्त दिनांक २४-०४-२००९ रोजी जारी केले. या इतिवृत्तामध्ये अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जासंदर्भात शिक्षणाधिकारी यांनी घेतलेल्या बैठकीमध्ये, "अर्जदार यांनी त्यांचे दिनांक ०९-०१-२००९ रोजीच्या अर्जाच्या संदर्भातील जी माहिती शिक्षणाधिकारी कार्यालयाच्या अभिलेख्यामध्ये उपलब्ध आहे ती निरीक्षण करुन आवश्यकतेनुसार संबंधित शाखा प्रमुखाकडून हस्तगत करुन घेण्याचे शिक्षणाधिकारी यांनी सूचविले," असे नमूद केले आहे. या इतिवृत्तामध्ये शिक्षणाधिकारी यांनी कोणतेही आदेश पारित केलेले नाहीत. शिक्षणाधिकाऱ्याने सूचना देऊनही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी माहिती अधिकारात मागितलेली माहिती शिक्षणाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त करुन घेण्यासाठी ते त्यांच्या कार्यालयात वारंवार उपस्थित राहिले असता, त्यांना ही माहिती शिक्षण विभागाने नाकारली. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी शिक्षणाधिकारी कार्यालयास दिनांक २५-०२-२००९ रोजी दिलेल्या पत्राची प्रत आयोगास सादर केली आहे. यावरुन अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः प्राप्त करुन घेण्यापृष्ठ्यर्थ त्यांनी आपले उत्तरदायित्व योग्य प्रकारे पार पाडले असल्याचे आयोगाच्या निदर्शनास येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ते अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत देण्यासाठी तयार आहेत. अपिलार्थीने त्यांच्याकडे मागणी केलेल्या अर्जातील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात शिक्षकांची नेमणूक करताना त्यांची योग्यता तपासणी अहवाल ठेवण्याची पध्दत शिक्षण विभागाकडे प्रचलीत नाही. त्यामुळे या मुद्यावरील माहिती ते अपिलार्थीस देऊ शकणार नाहीत, असे त्यांनी आयोगासमोर स्पष्ट केले. जन माहिती अधिकारी यांनी पुढे

अपिलार्थीस माहिती देण्याच्या संदर्भात असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने या प्रकरणी मागणी केलेली माहिती २००२ सालापासूनची होती आणि त्यांच्या नियंत्रणाखाली जिल्ह्यातील एकूण ६७२ शाळा असून प्रत्येक शाळेसंदर्भात अशा प्रकारचे त्यांच्याकडे माहितीसाठीचे अर्ज प्राप्त होत असतात आणि त्यांच्याकडील कर्मचाऱ्यांची संख्या फक्त दोन इतकी असल्यामुळे त्यांना या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देता आली नाही. ही माहिती शाळेकडून अपिलार्थीस त्वरित उपलब्ध होईल अशा उद्देशाने त्यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज दिनांक ०२-०२-२००९ रोजी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडे पाठवून दिला होता.

त्रयस्थ पक्षाने असा युक्तिवाद केला की, त्यांच्याविरुध्द शिक्षणाधिकाऱ्याकडे प्राप्त झालेल्या तक्रार अर्जाच्या प्रती अपिलार्थीस उघड करण्यासाठी त्यांची कोणतीही हरकत नाही.

वरील घटनाक्रम, सर्व संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०९-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे शिक्षणाधिकारी (माध्यमिक), विभाग यांच्या कार्यालयाकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीने शिक्षण विभागाकडे मागणी केलेल्या माहितीतील मुद्यांचे अवलोकन केले असता, ही सर्व माहिती, सर्वसाधारण परिस्थितीत, शिक्षण विभागाकडेच उपलब्ध असणे अनिवार्य आहे. कारण शाळेच्या विरुध्द केलेल्या तक्रारी या शिक्षण विभागाकडेच केल्या गेल्या असणार. शिक्षणाधिकारी हे ज्या शाळांना शासकीय अनुदान नियमानुसार प्राप्त होत असते त्या शाळेमधील शिक्षकांच्या नेमणूकांना अंतिम मान्यता देत असतात. त्यांच्या मान्यतेशिवाय संबंधित संस्था शिक्षकांच्या नेमणूका करु शकत नाहीत. त्यामुळे या मुद्याशी संबंधित व इतर अनुषंगिक माहिती ही शिक्षण विभागाकडेच असणार हे उघड आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये शाळेविरुध्द आलेल्या तक्रारीवर शिक्षण विभागाने केलेली कार्यवाही, तक्रारीवर केलेला तपास, शिक्षणाधिकाऱ्याने या संदर्भात घेतलेली सुनावणी, संस्थेच्या सदस्यांनी १००/- रु. बॉन्डवर लिहून दिलेले पत्र ही सर्व माहिती शिक्षण विभागाकडेच उपलब्ध असून ही माहिती त्यांनी त्यांच्या दिनांक ०२-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडून प्राप्त करुन घेण्याचे सुचविले. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी

(माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांची, त्यांच्याकडे माहिती असूनही अपिलार्थीस या माहितीसाठी शाळेच्या मुख्याध्यापकाशी संपर्क साधण्याचे सूचित करण्याची कृती ही सर्वथा गैर व सर्वस्वी चुकीची आहे. त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०२-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे अप्रत्यक्षपणे त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देण्याऐवजी अपिलार्थीची दिशाभूल केली असे म्हणणे या प्रकरणी जास्त योग्य राहिल. जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन कोणताही निर्णय न देता एखाद्या बैठकीचे इतिवृत्त जारी करावे अशा पध्दतीने अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांचा कथित निर्णय दिला आहे. जन अपिलीय अधिकारी यांची, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त झालेल्या प्रथम अपील अर्जावर अशाप्रकारे निर्णय घेण्याची त्यांची कृती पूर्णतः चुकीची आहे, असे त्यांच्या येथे निदर्शनास आणून देण्यात येत आहे व इतःपर त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त झालेल्या प्रत्येक अपील अर्जावर दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून, ते नोंदवून त्यावर आपला निर्णय लेखी स्वरुपात पारित करणे व त्या निर्णयाची प्रत सर्व संबंधितांना देणे अशा प्रकारची पध्दत अवलंबवावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहिती मागितल्या-नंतर त्यांनी स्वतः जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क साधून माहिती घेण्याचा प्रयत्न त्यांच्याकडील दिनांक २५-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे केल्याचे सिध्द होत आहे. त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य पुरवावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात त्यांनी युक्तिवादामध्ये स्पष्ट केलेली वस्तुस्थिती त्यांनी अपिलार्थीच्या निदर्शनास याच पत्रामध्ये आणावी, असेही त्यांना सूचित करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांना, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर त्यांनी सतर्कतेने कार्यवाही करावी, असे सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी, पूर्वनियोजित वेळी स्वत: उपस्थित राहून, जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १३-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेख नजीर शेख बुऱ्हाण, मु. बोरगाव सारवाणी, पो. बोरगाव बाजार, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२१३

निर्णय दिनांक १३-०५-२०१०

१ श्री. अब्दुल माजीद महंमद इब्राहीम, : अपिलार्थी

रा. बरकतपुरा, अर्धापूर, ता. अर्धापूर, जि. नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

ग्राम विकास अधिकारी, ग्राम पंचायत कार्यालय, अर्धापूर,

जि. नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अर्धापूर, जि. नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-०६-२००९ रोजी नोंदविलेले त्यांचे दिनांक ०४-०६-२००९ रोजीचे व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊनही या अपिलाचा निर्णय अपिलार्थीस न कळविल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या ग्रामपंचायतीतील कर्मचाऱ्यांच्या संदर्भात व इतर मुद्यांवर सर्वसाधारण

स्वरुपाची अशी संमिश्र माहिती व्यक्तिशः मागितली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - ग्राम विकास अधिकारी मुख्यालयी राहत असल्यास जानेवारी २००९ या कालावधीतील त्यांच्या घराचे फोटो व त्या घराचे भाडे, ग्रामविकास अधिकाऱ्यासह सर्व कर्मचाऱ्यांची पदनिहाय यादी व टाईम टेबल व ग्रामविकास अधिकाऱ्याकडे रहिवासी प्रमाणपत्राची मागणी केल्यास ते ग्रामपंचायतीच्या सदस्यांच्या सह्या आणण्याचा सल्ला ज्या ग्रामपंचायतीच्या ठरावाच्या आधारे अथवा परिपत्रकाच्या आधारे देतात त्या ठरावाच्या किंवा परिपत्रकाच्या सत्यप्रती - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही यानंतर जन माहिती अधिकाऱ्याशी संपर्क न साधता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अर्धापूर यांनी दिनांक ०८-०५-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दिनांक ११-०५-२००९ पर्यंत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी दिनांक १०-०५-२००९ रोजी अपिलार्थीच्या घरी गेले असता, अपिलार्थीने ही माहिती मुदतीत दिली नसल्याचे कारण दर्शवून ती स्वीकारण्यास नाकारले आणि वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाप्रमाणे अपिलार्थीस दिनांक १०-०५-२००९ रोजी माहिती देऊ केली असता, अपिलार्थीने ही माहिती स्वीकारण्याचे नाकारले. अपिलार्थीच्या या कृतीचा पंचनामा त्यांनी केला असून या पंचनाम्याची प्रत त्यांनी आयोगास सादर केली आहे. यानंतर दिनांक २८-०४-२०१० रोजी त्यांनी अपिलार्थीस पुनश्च माहिती देऊ केली असता, अपिलार्थीने ही माहिती स्वीकारली असेही त्यांनी आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीपैकी काही माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील ग्रामविकास अधिकाऱ्याच्या घराचे जानेवारी २००९ मधील फोटो व त्यांच्या भाडे पावत्या ही माहिती अपिलार्थीस मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. उर्वरित दोनही मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार 'व्यक्तिशः' माहितीची मागणी केल्यानंतर या अर्जाच्या संदर्भात पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेणे हे संबंधित अर्जदाराचे उत्तरदायित्व असते. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचे हे उत्तरदायित्व योग्य प्रकारे पार पाडले असल्याचा कोणताही सबळ पुरावा आयोगासमोर आलेला नाही किंवा, या संदर्भात तोंडी युक्तिवाद करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित केल्याप्रमाणे दिनांक १०-०५-२००९ रोजी जन माहिती अधिकाऱ्याने माहिती देऊ केली असता, अपिलार्थीने या माहितीचा, ती मुदतीत नाही, या कारणास्तव स्वीकार केला नाही आणि आयोगाकडे द्वितीय अपील केले, ही अपिलार्थीची कृती सर्वथा गैर व चुकीची आहे. अपिलार्थीच्या या कृतीवरुन त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये त्यांना फारसे स्वरस्य नसावे, अशी आयोगाची धारणा झाली आहे आणि आजच्या सुनावणीच्या वेळी असलेली त्यांची अनुपस्थिती लक्षात घेता आयोगाची ही धारणा अधिकच दृढ होत आहे. तथापि आता अपिलार्थीने, त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती स्वीकृत केली असल्यामुळे व अपिलार्थीस देण्यात आलेली माहिती ही त्यांच्या मागणीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आढळल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १३-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अब्दुल माजीद महंमद इब्राहीम, रा. बरकतपुरा, अर्धापूर, ता. अर्धापूर, जि. नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्राम पंचायत कार्यालय, अर्धापूर, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अर्धापूर, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२१४

निर्णय दिनांक १३-०५-२०१०

१ श्री. विजयकुमार सदाशिवराव सोमठाणकर, : अपिलार्थी

रा. 'समृध्दी', ३१ चंद्रलोक, ज्योतीनगर, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

नगर भूमापन कार्यालय, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

अधीक्षक, भूमी अभिलेख, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती पुरविल्यामुळे आणि त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७ ते ९ ची माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिली नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने अपिलार्थीस पुरविलेल्या नकाशातील सि. स. सर्वे क्रमांक १६२९५/३० च्या संदर्भात काही माहिती एकूण ९ मुद्यांद्वारे व्यक्तिशः मागितली

होती. तथापि अपिलार्थीस ही माहिती विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याच्या कारणास्तव जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०८-०४-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस ८ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २८-०४-२००९ रोजी अपिलार्थीस माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आणि जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७ शी संबंधित माहितीची त्यांना आता आवश्यकता नाही. त्यामुळे त्यांच्या द्वितीय अपील अर्जातील त्यांच्या विनंतीमधील मुद्दा क्रमांक ७ वगळण्यात यावा. त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ८ व ९ शी संबंधित माहिती त्यांना आवश्यक असल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ८ व ९ द्वारे मागणी केलेली माहिती त्यांच्या पी. आर. कार्डासहीत स्वयंसूची यादीवरुन अपिलार्थीस देणे त्यांना आवश्यक आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ९ च्या संदर्भात जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना जिल्हा निरीक्षक भूमी अभिलेख यांनी दिनांक १३-०७-१९९५ रोजी पाठविलेल्या अहवालाची प्रत त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकाऱ्याने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७, ८ व ९ शी संबंधित माहिती दिली नसल्याने विचाराधीन अपील केले असल्याचे नमूद केले. यापैकी अपिलार्थीकडे त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा

क्रमांक ७ शी संबंधित माहिती उपलब्ध असल्याने त्यांनी मुद्दा क्रमांक ७ शी संबंधित माहितीची विनंती मागे घेतली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ८ ची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्वयंसूची यादीमध्ये उपलब्ध असणे शक्य आहे. या स्वयंसूची यादीवरून, ज्यामध्ये प्रत्येक मालमत्तेचे हस्तांतरण करण्यासाठी केली गेलेली विनंती आणि हस्तांतरण ज्या कागदपत्राच्या आधारे झाले आहे त्या कागदपत्राच्या मूळ प्रती उपलब्ध असतात त्या त्यांना अपिलार्थीस उपलब्ध करुन देता येतील. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ९ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, जिल्हा निरीक्षक भूमी अभिलेख, औरंगाबाद यांनी जिल्हाधिकाऱ्याला दिनांक १३-०७-१९९५ रोजी पाठविलेल्या अहवालाची प्रत त्यांच्याकडे आता उपलब्ध नाही. या प्रश्नावर मूळात दिनांक १३-०७-१९९५ रोजीचे अपिलार्थीने संदर्भीत केलेले पत्र अस्तित्वात आहे किंवा कसे या संदर्भात आयोगाने अपिलार्थीकडे पुरावा मागितला असता, अपिलार्थीने या दिनांकाच्या पत्राचा संदर्भ जिल्हाधिकारी यांनी त्यांना उद्देशून दिनांक ३१-०८-१९९५ रोजीच्या दिलेल्या पत्रामध्ये दिल्याचे आढळून येत आहे. यावरुन दिनांक १३-०७-१९९५ रोजी जिल्हा निरीक्षक भूमी अभिलेख, औरंगाबाद यांनी जिल्हाधिकाऱ्याकडे हा अहवाल पाठविला असल्याचे सिध्द होत आहे. आता जर ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध नसेल तर त्यांनी या अहवालाची प्रत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून आवश्यक वाटल्यास माहिती अधिकाराच्या कायद्याचा उपयोग करुन, प्राप्त करुन घेऊन, ती अपिलार्थीस पुरवावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १३-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ८ व ९ शी संबंधित माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कोणत्याही कार्यालयीन दिवशी, पूर्वनियाजित वेळी

स्वतः उपस्थित राहून, जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ८ व ९ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १३-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विजयकुमार सदाशिवराव सोमठाणकर, रा. 'समृध्दी', ३१, चंद्रलोक, ज्योतीनगर, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद यांना या निकाल-पत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२१५

निर्णय दिनांक १३-०५-२०१०

१ श्री. सुग्रीव सोपानराव मुंडे, : अपिलार्थी
सा. आत्ताच एक्स्प्रेस कार्यालय, जे-१३, विजयश्री कॉलनी,
एन-५, सिडको, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
महाव्यवस्थापक, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
महाव्यवस्थापक, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र,
औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : विशेष कार्य अधिकारी, समन्वय विभाग, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून, या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, औरंगाबाद यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न

घेतल्यामुळे किंवा निर्णय न दिल्यामुळे संबंधितांवर नियमानुसार योग्य ती कारवाई होण्यासाठी व आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या विभागाशी संबंधित मार्च २००४ ते मार्च २००९ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ७ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या महितीमध्ये - त्यांच्या कार्यालयासाठी खरेदी केल्या जाणाऱ्या साहित्याची नावे, पुरवठा दरांची नावे व त्यांच्या कार्यालयात किती रकमेची खरेदी एकाच वेळी करता येते, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत आतापर्यंत देण्यात आलेल्या (कोण कोणत्या प्रकारचे प्रशिक्षण देण्यात आले) प्रशिक्षणाची माहिती, प्रत्येक प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत दिल्या जाणाऱ्या सवलती व प्रशिक्षणार्थीकडून आकारले जाणारे शुल्क, या संदर्भात शासन आदेशाची प्रत, प्रत्येक वर्षी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने उपरोक्त कालावधीमध्ये ज्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले त्या विद्यार्थ्यांची नावे, पत्ते, वर्षनिहाय त्यांच्याकडून आकारलेले शुल्क, शुल्काच्या पावतीची छायांकित प्रत, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालातील अभियंत्याना महिन्यासाठी किती रक्कम आगावू दिली जाते व त्यातून ते कोणता खर्च भागवितात त्या कर्मचाऱ्यांची नावे व त्यांना मिळालेल्या रकमेचा तपशिलवार हिशोब, त्यांच्या कार्यालयाने आतापर्यंत केलेल्या कामांच्या इस्टीमेटच्या छायांकित प्रती, वर्क ऑर्डर, कामावर झालेल्या खर्चाच्या रकमेचा तपशील तसेच एम. बी. रेकॉर्डच्या छायांकित प्रती, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात विदेशावरुन व बाहेर गावावरुन प्रशिक्षणासाठी विद्यार्थी येतात का? येत असल्यास त्यांच्या राहण्याची व जेवणाची सोय कोण करते, (आपण करता की विद्यार्थीच करतात) तसेच त्यांच्याकडून किती शुल्क (फिस) आकारली जाते त्यांच्या छायांकित प्रती आणि बाहेरील विदेशातून येणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे व संपर्क / मोबाइल नंबर/ फोन नंबर - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाने मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २५-०३-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्याकडील माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०४-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, २, ३, ४ व ७ शी संबंधित माहिती प्राप्त झाली नाही. ती त्यांना त्वरित जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळावी अशी अपेक्षा त्यांनी आयोगाकडे व्यक्त केली.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो द्यावयाची राहिलेली माहिती त्यांना देण्यासाठी एक महिन्याचा कालावधी लागेल असे आयोगास सांगितले. या कालावधीचे स्पष्टीकरण करताना जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने ज्या वर्षाशी संबंधित माहिती त्यांच्याकडे मागितली आहे त्या कालावधीत त्यांच्या संस्थेतर्फे अंदाजे एकूण ३ लाख विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. या विद्यार्थ्यांचे पत्ते त्यांच्या क्षेत्रिय कार्यालयाकडून प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांना खूप काळ लागेल. तसेच अपिलार्थीने त्यांच्याकडे मागणी केलेल्या फीच्या पावत्या संदर्भात त्यांनी आयोगास असे अवगत केले की, या फीच्या पावत्या अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित राहून पाहू शकतात. गेल्या चार वर्षात त्यांनी दिलेल्या पावत्याची संख्या प्रचंड असल्यामुळे व ही माहिती अपिलार्थीस प्रतीद्वारे पुरविण्यासाठी त्यांच्याकडे आवश्यक तो निधी उपलब्ध नसल्यामुळे ते ही माहिती अपिलार्थीस तपासणीसाठी विनामूल्य उपलब्ध करुन देऊ शकतील.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे विस्तृत प्रमाणात माहिती मागितली आहे. ही माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन

देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयाची साधनसामग्री निश्चितपणे प्रमाणाबाहेर वळवावी लागणार असल्याची आयोगाची खात्री झाली आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती व अपिलार्थीस त्यांनी आतापर्यंत द्यावयाची राहिलेली माहिती पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १,२,३,४ व ७ शी संबंधित माहिती त्यांना अपूर्ण स्वरुपात पुरविली असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७ मधील जन माहिती अधिकारी यांना देय असणाऱ्या माहितीचा समावेश त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भातील माहितीमध्ये आहे. हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस - त्यांच्या कार्यालयामार्फत खरेदी केल्या जाणाऱ्या साहित्याची व पुरवठादारांची यादी, एकाच वेळी खरेदीसाठीची त्यांच्या कार्यालयाची मर्यादा, संदर्भीत आदेशाच्या प्रती, त्यांच्या कार्यालयातर्फे उपरोक्त कालावधीमध्ये देण्यात आलेल्या प्रशिक्षणार्थींची यादी व तिचे स्वरुप, प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे देण्यात येत असलेले साहित्य या संदर्भात शासनाने काढलेल्या आदेशाची प्रत, उपरोक्त कालावधीमध्ये ज्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले गेले आहे त्या विद्यार्थ्यांची नावे व पत्ते ही माहिती त्यांनी अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी, विद्यार्थ्यांकडून जन माहिती अधिकारी यांनी वसूल केलेल्या शुल्काच्या पावत्यांच्या प्रतीकरिता त्यांनी ही माहिती अपिलार्थीस पुढील आदेशामध्ये विहित केलेल्या कालावधीत त्यांना तपासणीसाठी विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. ही संपूर्ण प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत करावयाची आहे.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून, जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १३-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुग्रीव सोपानराव मुंडे, सा. आत्ताच एक्स्प्रेस कार्यालय, जे-१३, विजयश्री कॉलनी, एन-५, सिडको, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी, समन्वय विभाग, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२२१

निर्णय दिनांक १३-०५-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. राहुल कुंडलिक पगारे,<br>रा. जायकवाडी (उत्तर), तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, पैठण,<br>तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, पैठण,<br>तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. त्यांनी घेतलेल्या निर्णयानुसार अपिलार्थीस सात दिवसाच्या आत माहिती देणे आवश्यक असूनही संबंधित जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस सात दिवसाच्या आत माहिती न दिल्याने व अपिलार्थीस त्या माहितीपासून वंचित ठेवल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर जास्तीत जास्त दंड आकारण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००० ते २००९ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण आठ मुद्दयाव्दारे व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने, त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०५-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी गैरहजर आणि अपिलार्थी हजर आहेत. त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील त्यांच्या विनंतीशी सुसंगत युक्तिवाद आयोगासमोर केला.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २५-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे, जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली आहे, त्यामुळे या प्रकरणी माहितीसाठीच्या अर्जाच्यासंदर्भातील पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे उत्तरदायित्व अपिलार्थीचे होते आणि या प्रकरणी त्यांनी त्यांचे उत्तरदायित्व योग्य प्रकारे पार पाडले नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास येत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ मधील, नगरपरिषदेचे अग्निशामक दल कार्यरत आहे काय, वाहने योग्य व कार्यक्षम आहेत काय, या भागावरील, मुद्दा क्रमांक ५ मधील, अग्नीशामक कर्मचा-याचे वेतन दरमहा दिले जाते काय आणि मुद्दा क्रमांक ६ मधील, अग्निशामक दलाने कारवाई केली नसल्यास का केली नाही, नागरिकांच्या मालमत्तेचे आपत्कालीन परिस्थितीत नुकसान होत आहे त्यास नगरपरिषद जबाबदार नाही काय, या

भागावरील माहिती अपिलार्थीस देय होत नाही, कारण अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४, ५ व ६ मधील काही भागांव्दारे अपिलार्थीने मागणी केलेली ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे अभिप्राय व स्पष्टीकरणे अपेक्षित करणा-या स्वरुपाची असल्याचे आढळून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या ' माहिती ' या शब्दाच्या व्याख्येचे अवलोकन केले असता, असे आढळून येईल की, माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांना अर्जदाराने मागणी केलेली माहिती, त्यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध असेल त्या स्वरुपात त्यांनी ती अर्जदारास विहित तरतुदीनुसार देण्यासंदर्भात कार्यवाही करणे अशा प्रकारची प्रक्रिया अभिप्रेत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयाबद्दलची अथवा कृतीबद्दलची कारणे अथवा स्पष्टीकरणे अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणे आणि जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कृतीची स्पष्टीकरणे अर्जदारास करणे, अशा प्रकारच्या प्रक्रियांचा या अधिनियमामध्ये समावेश नसल्यामुळे, ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही, मात्र त्यांच्या दिनांक २५-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जातील उर्वरित सर्व माहिती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे, ती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावी लागेल. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली अपिलार्थीस देय असलेली उर्वरित माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून १५ दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १३-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राहुल कुंडलिक पगारे, रा. जायकवाडी (उत्तर), तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी, मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२२२

निर्णय दिनांक १३-०५-२०१०

१ श्री. मधुकर हिराजी मुळे, : अपिलार्थी
शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
परभणी

त्रयस्थ पक्ष : मुख्याध्यापक, सिध्देश्वर विद्यालय, कळगांव

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो माहिती न दिल्यामुळे आणि जन अपिलीय अधिका-याने त्यांच्या प्रथम अपील अर्जावर अद्यापपावेतो निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी, त्रयस्थ पक्ष गैरहजर व अपिलार्थी आणि जन माहिती अधिकारी, यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थीच्या प्रतिनिधीस, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या प्रतिनिधीने आवश्यक ती माहिती हस्तांतरीत केली असल्यामुळे, अपिलार्थीचे अधिकृत प्रतिनिधी श्री. विश्वनाथ बाबुराव भायेकर यांनी आज रोजी आयोगास उद्देशून लिहिलेले पत्र सादर केले असून, या पत्रामध्ये त्यांनी त्यांना, जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त झाली असल्यामुळे आणि आता त्यांची कोणतीही तक्रार राहिली नसल्यामुळे आणि आता आयोगाकडे दाखल केलेले विचाराधीन अपील ते मागे घेत असल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीच्या प्रतिनिधीस आवश्यक ती माहिती प्राप्त झाली असल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेले व्दितीय अपील आता मागे घेतले असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १३-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मधुकर हिराजी मुळे, शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२२३

निर्णय दिनांक १३-०५-२०१०

१ श्री. देशमुख मोहमंद हारुण अमीनमियाँ, : अपिलार्थी
व्दारा, न्यू इंडिया फूट वेअर, सिल्लोड, तालुका सिल्लोड,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
भूमि अभिलेख विभाग, जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
म. रा. पुणे - ०१

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
जमाबंदी आयुक्त आणि संचालक (उप), भूमि अभिलेख,
म. रा. पुणे - ०१

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कार्यालय अधीक्षक, कार्यालय जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, म. रा. पुणे - ०१

जन अपिलीय अधिकारी : उप संचालक, भूमि अभिलेख, कार्यालय जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, म. रा. पुणे - ०१

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक ०२-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १, २, ४, ८ व १० शी संबंधित माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अधिनियमातील कलम ८ (ई) व (जी) नुसार नाकारले आहे. अपिलार्थीस माहिती नाकारण्याची जन माहिती अधिकारी यांची कृती नैसर्गिक न्यायाच्या व तत्वाच्या विरुध्द असल्यामुळे, या मुद्दयावरील माहिती त्यांना अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी आणि जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० नुसार शास्तीची कार्यवाही करावी व त्याची नोंद माहिती अधिकारी व सहायक माहिती अधिकारी यांच्या सेवापुस्तिकेवर घेण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०२-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कार्यालयात भूकरमापक / टंकलेखक (टायपिस्ट) या पदाकरिता घेण्यात आलेल्या दिनांक २८-०९-२००८ रोजीच्या परीक्षेबाबत काही माहिती एकूण दहा मुद्दयांव्दारे मागितली होती. अपिलार्थीने या अर्जामध्ये संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती ' व्यक्तिशः न भेटल्यास रजिस्टर्ड पोहच पावतीव्दारे ' अशा माध्यमाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २७-०१-२००९ व दिनांक २९-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस अनुक्रमे त्यांनी मागणी केलेली माहिती १६५ पृष्ठांची असल्यामुळे, ती माहिती दिनांक ०२-०२-२००९ अखेर कार्यालयीन वेळेत येऊन जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावी, असे अपिलार्थीस सूचित केले व दिनांक २९-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३३० अधिक पोस्टेज खर्च ५० रुपये मनीऑर्डर किंवा चलनाव्दारे भरुन चलनाची मूळ प्रत त्यांच्याकडे सादर करण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या पत्रांवर अपिलार्थीने काय कार्यवाही केली हे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन समजून येत नाही. तथापि यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय

अधिकारी तथा जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे दिनांक २४-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-०३-२००९ रोजी निर्णय पारित करुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील उपलब्ध असलेली माहिती पुरविल्याचा निष्कर्ष काढून, अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. के. आर. तवरेज, प्राचार्य, भूमि अभिलेख प्रशिक्षण संस्था, औरंगाबाद हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ व्दारे, त्यांनी मागणी केलेली माहिती उघड केल्याने कोणतेही व्यापक जनहित साध्य होत नसल्याने, अपिलार्थीस ही माहिती त्यांनी उघड केली नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित, मॉडेल अन्सरची प्रत अपिलार्थीस देणे त्यांना आवश्यक वाटले नाही, कारण अपिलार्थीस दिलेले परीक्षेचे गुण त्यांनी इतर विद्यार्थ्यांबरोबर जाहीर केले होते. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ८ व्दारे, अपिलार्थीने ज्या माहितीची मागणी केली आहे त्या माहितीसंदर्भात त्यांनी असे स्पष्ट केले की, या पदाकरिता नेमणूक करताना वेगवेगळ्या विभागाकडून परीक्षक नेमले होते. सर्व परीक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्याला दिलेले गुण एकत्रित करुन त्यांनी हे एकत्रित गुण अपिलार्थीस कळविले आहेत आणि हे गुण त्यांच्या विभागाच्या संकेतस्थळा-वर प्रसिध्द केले आहेत. ही माहिती उघड केल्याने व्यापक जनहित साध्य होईल असे त्यांना वाटत नसल्याने व तसेच परीक्षकांची नावे व स्वाक्ष-या उघड झाल्यास त्यांच्या जीवितास धोका होऊ शकतो असेही त्यांना वाटत असल्यामुळे मुद्दा क्रमांक १० शी संबंधित माहिती देखील उघड करण्याचे आदेशित करु नये, अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ व्दारे, त्यांनी मागणी केलेली माहिती उघड न करण्याची घेतलेली भूमिका आजवर आयोगाने घेततेल्या भूमिकेशी सुसंगत आहे. आयोगाकडे वेळोवेळी दाखल झालेल्या अशा प्रकारे उत्तरपत्रिकांच्या प्रतीची मागणी करणा-या अनेक अपिलार्थीच्या अर्ज प्रकरणी अशी माहिती उघड केल्याने अधिनियमातील कलम ८ (१) (ङ) चा भंग होत असल्यामुळे, ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना उघड करता येणार नाही, अशी भूमिका घेतलेली आहे. कारण ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे, जन माहिती अधिकारी आणि संबंधित परीक्षक यांच्यातील विश्वासाश्रित संबंधामुळे त्यांना प्राप्त झाली आहे. या प्रकरणी देखिल ती माहिती उघड केल्याने अधिनियमातील कलम ८(१) (ङ) चा भंग होणार असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधित माहिती उघड न करण्याची कृती बरोबर आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबधित माहिती अपिलार्थीस उघड न करण्याच्या समर्थनाविषयी जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद आयोग अमान्य करत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने भूकरमापक / टंकलेखक (टायपिस्ट) पदाकरिता त्यांच्याकडे घेण्यात आलेल्या परीक्षेच्या आदर्श उत्तरपत्रिकाची प्रत उघड केल्याने व्यापक जनहित साध्य होईल, अशी आयोगास खात्री आहे. अशा प्रकारच्या उत्तरपत्रिका उघड केल्याने, या परीक्षेमध्ये जे विद्याथी अनुत्तीर्ण झाले त्यांना त्यांचे नेमके कोठे चुकले याचा त्यांना बोध होऊन त्यांना स्वतःच्या कार्यशैलीमध्ये सुधारणा घडवून आणता येईल, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित माहिती आता उघड करावी लागेल. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ८ व्दारे, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे तोंडी परीक्षेत मुलाखत घेणा-या समितीने मुलाखतीस जे गुण दिले आहेत त्यांच्या स्व हस्ताक्षरातील

दिलेल्या सर्व उमेदवारांच्या गुणाची यादी गुणासह, आरक्षणासह मागितली आहे. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, ही माहिती उघड केल्याने काही अंशी अधिनियमातील कलम ८ (१) (ङ) चा निश्चितपणे भंग होईल, तथापि अपिलार्थीस त्यांना मुलाखतीमध्ये प्रत्येक परीक्षकाने दिलेले गुण ज्ञात करुन घेण्याचा हक्क आहे, असे आयोग मानतो. सबब, जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातल कलम १० च्या तरतुदीचा वापर करुन, असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांच्याकडे संबंधित निवड समितीने तोंडी परीक्षेत मुलाखत घेताना प्रत्येक परीक्षकाने जे गुण विद्यार्थ्यांना दिले आहेत, त्या गुणपत्रिकेवरील संबंधित परीक्षकांची नावे, परीक्षकांच्या सह्या अथवा अनुषंगिक माहिती उघड न करता, ही माहिती अपिलार्थीस उघड करण्यास हरकत नाही. या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, परीक्षकाच्या हस्ताक्षरावरुन अपिलार्थीस कोणत्या परीक्षकाने किती मार्कस् दिले, याचा बोध होऊ शकेल. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली ही माहिती संबंधित परीक्षकाच्या हस्ताक्षराच्या स्वरुपात न देता, ती माहिती त्यांनी टंकलिखीत करुन नंतर अपिलार्थीस पुरवावी. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १० व्दारे, अपिलार्थीने परीक्षकांची नावे, त्यांचे पद व त्यांचे पत्ते, अशी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर केलेल्या युक्तिवादाशी सहमती दर्शवून, ही माहिती उघड केल्याने अधिनियमातील कलम ८ (छ) चा भंग होणार असल्यामुळे, ती माहिती अपिलार्थीस उघड न करण्याची जन माहिती अधिकारी यांची कृती योग्य आहे.

अशा प्रकारे अपिलार्थीस अद्याप जन माहिती अधिकारी यांनी द्यावयाची माहिती व अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांना देय असलेली माहिती, याचे वरील परिच्छेदात केलेले पृथक्करण पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व मुद्दा क्रमांक ८ शी संबंधित माहिती अपिलार्थीस, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत टपालाव्दारे विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये, जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे शास्ती लावण्याची आयोगास विनंती केली आहे. या मुद्दयावर असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अपिलार्थीने मूळात त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज योग्य प्रकारे भरलेला नाही. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून निश्चितपणे कोणत्या माध्यमाव्दारे माहिती अपेक्षित आहे, त्याचा त्यांनी योग्य तो खुलासा जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेला नाही. त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "व्यक्तिशः न भेटल्यास रजिस्टर्ड पोच पावतीव्दारे," अशा दोनही माध्यमाव्दारे माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियमा-तील तरतुदीनुसार कोणत्या माध्यमाव्दारे अर्जदारास माहिती अपेक्षित आहे याचे विकल्प अर्जदारास उपलब्ध करुन दिलेले आहेत. यापैकी अर्जदाराने एकाच विकल्पाची निवड करणे अभिप्रेत आहे. या बाबत अपिलार्थीने दोनही विकल्प निवडले असल्यामुळे आणि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस काही माहिती देऊन विहित मुदतीत प्रतिसाद दिल्यामुळे, अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याची विनंती आयोग अमान्य करीत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व ८ शी संबंधित माहिती, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व टपालाव्दारे पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १३-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. देशमुख मोहमंद हारुण अमीनमियाँ, व्दारा, न्यू इंडिया फूट वेअर, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, कार्यालय जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, म. रा. पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप संचालक, भूमि अभिलेख, कार्यालय जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, म. रा. पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२२४

निर्णय दिनांक १३-०५-२०१०

१ श्री. सत्तार खान पि. खाजा खान, : अपिलार्थी

रा. खोकडपुरा, घर क्रमांक ५-२४-६२, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

प्रादेशिक परिवहन कार्यालय, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी

प्रादेशिक परिवहन कार्यालय, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-०५-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती.

' ट्रक क्रमांक MH 20 AA 7417 बाबत आरण्यास मा. न्याधिस कडुन गाडी माल नामे गफफारखान पिता खाजाखान यांचे नावे वरील ट्रक नामंतर करण्यास आदेश देण्यात अ

होते व दि. ६/२/०७ पासुन दि. २९/२/२०० पर्यंत आपण गफफार खान पिता खाजाखान यांचे नावे वरील ट्रक ट्रान्सफर केलेली त्या संपुर्ण (तपसील)अम्हास देणे अर्जासोबत वकिलामा नोटीस ची झेरॉक्स प्रत जोडुन देत आहे.'

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतलेला आहे)

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २९-०६-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या मोटार वाहनाच्या हस्तांतरणाबाबतची तत्कालीन स्थिती अवगत केली, तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-०६-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जाव्दारे वेगळ्याच माहितीची मागणी केली. या अपील अर्जामध्ये, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १४-०३-२००५ ते ३१-१२-२००७ या कालावधीमध्ये ट्रकचे मालकी हक्क का ट्रान्सफर केले नाही, अशी माहिती जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे मागितली. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे व तसेच न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे त्यांच्या गाडीचे मालकीचे हस्तांतरण का होऊ शकले नाही याचीही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक असल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जास त्यांनी दिनांक २९-०६-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद दिला आहे, त्यांनी आयोगास असे अवगत केले की, मोटार वाहन क्रमांक एम. एच. २० ए ए ७४१७ हे दिनांक १४-०३-२००५ रोजी तत्कालीन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. सी. एम. सोनटक्के यांच्या आदेशान्वये धनको सिटी कॉर्प फायनान्स प्रा. लि. यांच्या नावे करण्यात आले व तदनंतर दिनांक १८-०३-२००५ रोजी उप प्रादेशिक परिवहन कार्यालय पेण (रायगड) येथे श्री अब्दुल नबी शेख यांच्या नावाने ना हरकत प्रमाणाआधारे करण्यात आले आहे. या प्रकरणी मा. जिल्हा न्यायाधीश-१, औरंगाबाद यांच्या आर. सी. ए. क्रमांक ३७७/२००५ मध्ये या वाहनाची मालकी अपिलार्थीच्या नावाने पूर्ववत करण्याच्या आदेशास मा. उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांनी दिनांक ११-०२-२००८ अन्वये अंतरिम स्थगिती दिली आहे.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २९-०५-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची असल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीने या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, ' संपूर्ण तपशील ' अशी माहिती मागितली आहे. परंतु ' संपूर्ण तपशील ' म्हणजे नेमकी कोणत्या मुद्दयावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे, यासंदर्भात त्यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये खुलासा केलेला नाही. त्यांना आता, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्याचे, आयोगासमोरील केलेल्या युक्तिवादावरुन दिसून येत आहे. तथापि अशा स्वरुपाची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या ' माहिती ' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होऊ शकत नसल्यामुळे, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी न्यायालयाच्या निर्णयानुसार का कार्यवाही केली नाही, ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. अपिलार्थीच्या मागणीचे एकंदरीत स्वरुप पाहता, या वाहनाच्या हस्तांतरणाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे असलेल्या

संपूर्ण नस्तीची झेरॉक्स प्रत त्यांनी आज रोजी बरोबर आणली असून, ही माहिती ते आता अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत. ही माहिती अपिलार्थीच्या मूळ अर्जाव्दारे त्यांनी मागणी केलेल्या माहितीशी, जरी ती मोघम स्वरुपाची असली तरी, सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आयोगास सकृतदर्शनी आढळून येत आहे. या माहितीचे अवलोकन केले असता अपिलार्थीस, जन माहिती अधिकारी यांनी संबंधित वाहनाचे हस्तांतरण न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे का केले नाही, याचा उलगडा होण्यास मदत होऊ शकते. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणाशी संबंधित त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या नस्तीची संपूर्ण छायांकीत प्रत अपिलार्थीस, हे आदेश निर्गमीत होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीन दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२.	जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १३-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सत्तार खान पि. खाजा खान, रा. खोकडपुरा, घर क्रमांक ५-२४-६२, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२३००

निर्णय दिनांक १३-०५-२०१०

१ श्री. गोपाळभाऊ बस्तीरामजी मंत्री, : अपिलार्थी
पोलीस स्टेशनच्या मागे, मानवत, तालुका मानवत,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मानवत,
तालुका मानवत, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), सेलू,
तालुका सेलू, जिल्हा परभणी

त्रयस्थ पक्ष : श्री. सोमनाथ रंगनाथ ढालकरी व श्री. स. सत्तार स. यासिन

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०२-२००९ रोजी आणि मुंबई राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १५-०५-२००८ रोजीच्या एकाच अर्जावर राज्य माहिती आयोगाच्या मुंबई व औरंगाबाद येथील कार्यालयात दोन वेगवेगळी

स्वतंत्र व्दितीय अपिले दाखल केली होती. त्यापैकी राज्य माहिती आयोगाच्या, औरंगाबाद येथील कार्यालयात नोंदविलेल्या अपील अर्जावर, आयोगाने दिनांक १४-०७-२००९ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश निर्गमीत केले आहेत आणि या आदेशाव्दारे अपिलार्थीचे अपील मान्य केले आहे.

अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर आयोगाने यापूर्वीच दिनांक १४-०७-२००९ रोजी निर्णय दिला असल्याने, अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर वेगळ्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही, त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १३-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गोपाळभाऊ बस्तीरामजी मंत्री, पोलीस स्टेशनच्या मागे, मानवत, तालुका मानवत, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी, तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मानवत, तालुका मानवत, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी, तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२२९

निर्णय दिनांक : १४.०५.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. मोतीराम गयबू काळे,<br>रा. जानापूरी, ता.लोहा,जि.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक प्रकल्प अधिकारी,<br>जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नांदेड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्रकल्प संचालक,<br>जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नांदेड | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६.०६.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेण्यासाठी कधीही न कळविल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १०.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००१-०२ ते दि.२९.०१.२००७ या कालावधीतील विस्तृत व्याप्ती असलेली काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०६.०३.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने

समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दि.१९.०३.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर कोणताही निर्णय न झाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस दोन टप्प्यामध्ये दिली असून प्रथमतः दि.०६.०३.२००९ रोजी काही माहिती व उर्वरित माहिती दि.१५.०६.२००९ रोजी पूर्णपणे देण्यात आली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी अपिलार्थीचे, त्यांना संपूर्ण माहिती दिल्याचे दि. १५.०६.२००९ रोजीचे कबूलीपत्र आयोगास सादर केले. यावरुन ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि.१५.०६.२००९ रोजी परिपूर्णरित्या अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे आयोगास आढळून आले आहे.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि.०६.०३.२००९ व तदनंतर दि.१५.०६.२००९ रोजी म्हणजेच त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील सादर केल्यानंतर प्राप्त झाली असल्यामुळे, अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर नव्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक १४.०५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मोतीराम गयबू काळे,रा. जानापूरी, पो. वडेपुरी, ता.लोहा,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रकल्प अधिकारी,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रकल्प संचालक,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२३०

निर्णय दिनांक : १४.०५.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. मनोज उत्तमसा साहुजी,<br>रा.औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी,<br>वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई. | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी,<br>वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई. | | |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मुख्य प्रशासकीय अधिकारी,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई

जन अपिलीय अधिकारी : सहसंचालक,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२.०७.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी सर्वजण उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थी यांनी त्यांचे आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक १४.०५.२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता संपूर्ण माहिती प्राप्त झ ाली असून प्राप्त माहितीसंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नाही त्यामुळे ते त्यांचे विचाराधीन अपील क्रमांक १२३०/०९ स्वखुषीने मागे घेत आहेत.

खुद्द अपिलार्थीनेच त्यांचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील आता मागे घेतले असल्याने व ते रद्द करण्याची त्यांनी विनंती केली असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील क्रमांक १२३०/०९ , दिनांक ०२.०७.२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १४.०५.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मनोज उत्तमसा साहुजी,रा.चिंतामणी पांडे यांचे घर, कुंवारफल्ली,राजाबाजार, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी,वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक,वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२३१

निर्णय दिनांक : १४.०५.२०१०

१. श्री. संजय गोपाळराव सोनखेडे, रा.औरंगाबाद. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, दुय्यम निबंधक कार्यालय क्र.-१, औरंगाबाद. : प्रतिवादी

२. जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सह दुय्यम निबंधक वर्ग-२, औरंगाबाद क्र.१

जन अपिलीय अधिकारी : सह जिल्हा निबंधक वर्ग-१, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८.०७.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०४.०४.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे एन.ए.४४ किंवा एन.ए.४५ नसल्यास रजिस्ट्री कधी होते,या विषयावर एकूण ३ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - एन.ए.४४ किंवा ४५ असल्यास रजिस्ट्री कोणत्या नियमान्वये होते, त्या नियमांची प्रत, एन.ए.४४, एन.ए.४५ नसल्यास रजिस्ट्री कोणत्या नियमान्वये होते व दि.०१.०४.२००८ ते ०४.०४.२००९ पर्यंत झालेल्या रजिस्ट्रीची माहिती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०४.०५.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरवली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार सह जिल्हा निबंधक,औरंगाबाद यांच्याकडे दि. ०६.०५.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १८.०५.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दुय्यम निबंधक कार्यालयाशी संपर्क साधण्याचे सूचित केले. या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये नियमबाहय नोंद होत असल्याचे त्यांना वाटत असल्यामुळे त्यांनी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, एन.ए.४४ व एन.ए.४५ ही अनुक्रमे जिल्हाधिकारी व तहसीलदार यांनी केलेली एन.ए. ची कार्यवाही आहे. कोणत्याही नागरिकाने जिल्हाधिकारी व तहसीलदार यांच्याकडून, पारीत केल्या गेलेल्या एन.ए.आदेशाची प्रत त्यांच्याकडे सादर केल्यानंतर नोंदणी अधिनियम १९०८ मधील तरतुदीनुसार त्यांच्या कार्यालयातर्फे जमिनीच्या अशाप्रकारच्या खरेदी-विक्री व्यवहाराची नोंद केली जाते. एन.ए.४४ किंवा एन.ए.४५ नसेल तर त्यांच्या कार्यालयातर्फे कोणत्याही खरेदी-विक्री व्यवहाराची नोंदणी केली जात नाही.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीवर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये योग्य तो खुलासा केला आहे. त्याप्रमाणे ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देण्यास हरकत नाही. तथापि अपिलार्थीस एन.ए.४४ किंवा एन.ए.४५ च्या संदर्भात दस्तऐवजांची नोंद, नोंदणी अधिनियम, १९०८ मधील ज्या कलमान्वये केली जाते, त्या कलमाच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी पुरवल्यास अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त होऊ शकेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांच्याकडील दस्तऐवजांची नोंद, नोंदणी अधिनियम, १९०८ मधील ज्या कलमाच्या तरतुदीअन्वये केली जाते, त्या कलमाची प्रत त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. तीन मुद्यांद्वारे, 'दि. ०१.०४.२००८ ते ०४.०४.२००९ या कालावधीमध्ये झालेल्या रजिस्ट्रीची माहिती', अशी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितली असल्याचे दिसून येत आहे. या मुद्यासंदर्भात,'---- रजिस्ट्रीची माहिती',म्हणजे नेमक्या कोणत्या मुद्यावरील माहिती हे, अपिलार्थीने त्यांच्या मुद्यामध्ये स्पष्ट केले नसल्यामुळे अपिलार्थीने या मुद्याद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप मोघम असल्याचे स्पष्ट होत आहे. अशाप्रकारची मोघम स्वरुपाची माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती 'या शब्दाच्या व्याख्येमध्ये समाविष्ट होणारी नसल्यामुळे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नसल्याचे सिध्द होत आहे. परिणामी या मुद्यावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय असणार नाही.

अपिलार्थीस देय असलेली माहिती व ती अपिलार्थीस आता कशाप्रकारे द्यावयाची, याचे वरील परिच्छेदामध्ये केलेले स्पष्टीकरण पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, वर स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ व २ शी संबंधित

माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ व २ शी संबंधित संपूर्ण माहितीसह, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : १४.०५.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संजय गोपाळराव सोनखेडे,रा.एन-११, जी,१९/५, नवजीवन कॉलनी,हडको,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक वर्ग-२,औरंगाबाद क्र.१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२३२

निर्णय दिनांक : १४.०५.२०१०

१. श्री. अली अहेमद हबीब अहमद, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मालमत्ता अधिकारी,
महानगरपालिका,औरंगाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपआयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद
प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : उपआयुक्त (सिडको),
महानगरपालिका, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८.०७.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो माहिती न दिल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १४.०५.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे औरंगाबाद शहरातील मोहल्ला नागेश्वरवाडी येथील सिटी सर्व्हे नं.४६७७ (जुना सर्व्हे नं.८६) ही मिळकत वडिलोपार्जित असून ती जागा महानगरपालिकेच्या मालकीची असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी,वक्फ मंडळ,औरंगाबाद यांना दि. २८.०४.२००९ रोजी ज्या कागदपत्रांच्या आधारे कळविले, त्या कागदपत्रांच्या प्रतींची मागणी केली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १५.०६.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १३.०७.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दि. १७.०७.२००९ पर्यंत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती दि.१७.०७.२००९ रोजी देऊ केली. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी देऊ केलेली माहिती स्वीकारण्याचे नाकारले व वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सर्व संबंधितांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही, असा व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती देऊ केली असता अपिलार्थीने ती स्वीकारण्याचे नाकारले, असा आयोगासमोर युक्तिवाद केला.

या संदर्भात अपिलार्थीने त्यांनी महानगरपालिकेच्या कार्यालयात बऱ्याच वेळा चकरा मारुन त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही आणि जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती स्वीकारण्याचे त्यांनी कधीही नाकारले नाही, असा युक्तिवाद केला व आयोगास असे स्पष्ट केले की, आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून ते पूर्वनियोजित वेळी ही माहिती स्वतः हस्तगत करुन घेतील.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केलेली आहे. माहिती

अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार 'व्यक्तिशः' माहितीची मागणी केल्यानंतर माहितीसाठीच्या अर्जासंदर्भातील पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे उत्तरदायित्त्व हे संबंधित अर्जदाराचे असते. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचे हे उत्तरदायित्त्व योग्य प्रकारे पार पाडले असल्याचा कोणताही सबळ पुरावा आयोगासमोर सादर केलेला नाही किंवा ही बाब ते आयोगासमोर सुनावणीमध्ये केलेल्या युक्तिवादामध्ये सिध्द करु शकले नाहीत.यामुळे जन माहिती अधिकारी यांचा, अपिलार्थीस त्यांनी दि. १७.०७.२००९ रोजी माहिती देऊ केली असता ती अपिलार्थीने स्वीकारली नाही हा युक्तिवाद, आयोग मान्य करीत आहे.

आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्यासोबत आणली असून या माहितीचे अवलोकन केले असता, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे सकृतदर्शनी आढळून येत आहे. ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्यासाठी जन माहिती अधिकारी तयार आहेत. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीन दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : १४.०५.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अली अहेमद हबीब अहमद,रा.जुना बाजार,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मालमत्ता अधिकारी,महानगरपालिका,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२३३

निर्णय दिनांक : १४.०५.२०१०

१. श्री. दत्तात्रय सोनाजी वऱ्हाडे, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
समाजकल्याण अधिकारी,गट-अ,
जिल्हा परिषद, औरंगाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कनिष्ठ लिपिक,
समाज कल्याण अधिकारी
कार्यालय,जि.प.औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : समाज कल्याण अधिकारी, गट-अ,
जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१.०७.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी, त्यांनी माहिती अधिकारात मागितलेली माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १३.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे वृध्द कलावंतांना देण्यात येत असलेल्या मानधनाबाबत व जन माहिती अधिकारी

यांच्या कार्यालयाकडून वृध्द कलावंतांना देण्यात येणाऱ्या योजनांसंदर्भात काही माहिती एकूण चार मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कालावधी सन २००२ ते दि.१३.०२.२००९ असा होता. अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद करुन या संदर्भात पुरावा म्हणून त्यांच्या रेशनकार्डाची झेरॉक्स प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केली होती. तथापि या पुराव्याच्या वैधतेबाबत जन माहिती अधिकारी यांच्या मनात संदेह निर्माण झाल्यावरुन त्यांनी त्यांच्या कार्यालयाच्या दि.२५.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जासोबत जोडलेल्या रेशनकार्डाची वैधता तपासण्यासाठी पुरवठा अधिकारी औरंगाबाद यांच्याकडे संदर्भ केला. पुरवठा अधिकारी यांच्याकडून जन माहिती अधिकारी यांना कोणताही पुरावा प्राप्त झाला नाही. मध्यंतरीच्या कालावधीत अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीने दि. १६.०३.२००९ जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०१.०६.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडे ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचा सबळ पुरावा दाखल करण्याचे व ते दारिद्रयरेषेखालील असल्यास विनामूल्य व नसल्यास सशुल्क माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी व अपिलार्थी यांच्यामध्ये बराच पत्रव्यवहार झाला. अंतिमतः जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. २५.०६.२००९ रोजीच्या पत्रान्वये त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.२३४/- त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. अशाप्रकारे पत्रव्यवहार होऊनही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती न मिळाल्यामुळे, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सर्व संबंधितांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी आवश्यक त्या शुल्काचा भरणा करण्यासाठी चलनाची प्रत उपलब्ध करुन घेऊन जन माहिती अधिकारी यांच्या

कार्यालयाकडे, कार्यालयाचा शिक्का व त्यांची स्वाक्षरी मागितली असता, त्यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्याने त्या चलनाच्या प्रतीवर शिक्का मारुन दिला, तथापि जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील कोणत्याही अधिकारी/कर्मचाऱ्याने त्यावर स्वाक्षरी करुन न दिल्यामुळे अंतिमतः त्या चलनाद्वारे त्यांना शासकीय कोषागारात त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काची रक्कम भरता आली नाही, त्यांनी मागितलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे, असाही त्यांनी आयोगासमोर युक्तिवाद केला.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि.२५.०६.२००९ रोजीच्या पत्रान्वये त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.२३४/- भरण्याचे सूचित केले होते. तथापि या शुल्काचा अपिलार्थीने भरणा न केल्यामुळे, त्यांना अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. तथापि आता ही माहिती ते अपिलार्थीस सशुल्क उपलब्ध करुन देण्यास तयार आहेत.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने अपिलार्थीस अपूर्ण चलन भरुन दिल्यामुळे अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क शासकीय कोषागारात भरु शकले नाहीत, ही चूक जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाची आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार आहे. ही माहिती अपिलार्थीस ते सशुल्क देण्यासाठी तयार आहेत, तथापि माहितीपोटीचे शुल्क शासकीय कोषागारात ते त्यावेळी भरु शकले नाहीत, ही बाब लक्षात घेता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी. (आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती दि. १८.०५.२०१० रोजी सकाळी ११.०० वा. उपलब्ध करुन देण्याचे कबूल केले आहे.)

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : १४.०५.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दत्तात्रय सोनाजी वऱ्हाडे,रा.नवजीवन कॉलनी, हडको, एन-११,ए-३४/१,हडको, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ लिपीक, समाज कल्याण अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी,गट-अ,जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२२५

निर्णय दिनांक १४-०५-२०१०

१ श्री. स्वामी जी. एम., : अपिलार्थी
रा. 'तन्मय' खिवंसरापार्क, प्लॉट नं. १३, गारखेडा परिसर,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
कामगार उपायुक्त (रोजगार हमी कार्यालय), औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
सहायक आयुक्त, कामगार उपायुक्त यांचे कार्यालय,
औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सरकारी कामगार अधिकारी, कामगार उपायुक्त यांचे कार्यालय, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : सहाय्यक कामगार आयुक्त, कामगार उपायुक्त यांचे कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून, या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मुद्देनिहाय माहिती न पाठवून मोघम स्वरुपाची माहिती पाठविल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील मुद्देनिहाय माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या क्षेत्रातील दुकान परवानगीबाबत एकूण ३ मुद्दे आणि त्यातील उप मुद्यांद्वारे या विषयासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सेव्हन हिल ते शिवाजीनगर रेल्वे क्रॉसिंग व आकाशवाणी ते चेतक घोडा रोड या रस्त्यावरील एकूण दुकानांची संख्या व डिसेंबर २००८ अखेर दिलेल्या दुकान परवान्याची एकूण संख्या, ज्यांच्या दुकानात मजूर नाही व मालक, बेरोजगार व महिला स्वतः दुकान चालवितो / चालविते यांना साप्ताहिक बंद दिवस लागू आहे काय, जास्तीची फी भरुन साप्ताहिक बंद दिवशी दुकान चालू ठेवता येईल का? तसे असल्यास जास्तीची फी किती? - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १७-०४-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस औरंगाबाद शहरातील नोंदीत दुकानांची संख्या (डिसेंबर - २००८ अखेर) ५१,४५५ इतकी असल्याचे अपिलार्थीस कळविले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०६-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०१-०७-२००९ रोजी निर्णय देऊन त्यांच्या कार्यालयातर्फे क्षेत्रनिहाय माहिती ठेवली जात असल्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना रस्तेनिहाय देता येणार नाही, या कारणास्तव त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून सेव्हन हिल ते शिवाजीनगर रेल्वे क्रॉसिंग व आकाशवाणी ते चेतक घोडा या रस्त्यावरील दुकानाची एकूण संख्या

व या रस्त्यावरील डिसेंबर २००८ अखेर दिलेल्या दुकान परवान्याची एकूण संख्या व इतर माहितीची आजही आवश्यकता आहे. त्यांना विशिष्ट माहिती न देता जन माहिती अधिकारी यांनी सर्वसाधारण स्वरुपाची व मोघम माहिती दिलेली आहे. त्यांनी मूळ अर्जाद्वारे अपेक्षिल्याप्रमाणे त्यांना मुद्देनिहाय माहितीची आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे रस्तेनिहाय अशी उपलब्ध नसून ती क्षेत्रनिहाय उपलब्ध आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या क्षेत्राशी संबंधित आहे त्या क्षेत्राकरिता त्यांच्या कार्यालयातर्फे एका निरीक्षकाची नेमणूक केली गेली आहे. अपिलार्थीस जर एखाद्या विशिष्ट दुकानाविषयी काही माहितीची आवश्यकता असेल तर ती अपिलार्थीस त्यांनी वेगळा अर्ज केल्यास सदर माहिती उघड करण्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. यावर अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना माहिती अधिकाऱ्याच्या कार्यालयाकडून दुकान परवाना देताना एका फॉर्मवर दुकानदारांचा संपूर्ण पत्ता व दुकान ज्या रस्त्यावर आहे त्या रस्त्याचे नाव जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून घेतले जाते. त्यामुळे ही माहिती रस्तेनिहाय जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात असणे आवश्यक आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ३ मुद्यांद्वारे माहितीची मागणी केली आहे. त्यातील मुद्दा क्रमांक २ व ३ मधील "खालील व्यक्तिंना साप्ताहीक बंद दिवस लागू आहे काय?" व "जास्तीची फी भरुन साप्ताहिक बंद दिवशी दुकान चालू ठेवता येईल का?" या भागावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण या मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागविली आहे. जी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीत समाविष्ट होऊ शकत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे वैयक्तिक अभिप्राय अथवा मते किंवा त्यांचे एखाद्या कृतीबद्दलचे स्पष्टीकरण त्यांच्याकडे मागणे आणि जन माहिती अधिकाऱ्याने अर्जदाराने मागितल्याप्रमाणे त्यांच्या कृतीचे स्पष्टीकरण अर्जदारास

देणे अशा प्रक्रियेचा समावेश नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ३ मधील निर्देशीत केलेला भाग या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व ३ मधील, 'साप्ताहीक बंद दिवशी दुकान चालू ठेवण्यासंदर्भात लागणाऱ्या जास्तीच्या फीच्या संदर्भातील माहिती' अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. यापैकी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या रजिस्टरमध्ये ठेवली जाते, त्या रजिस्टरचे आयोगाने अवलोकन केले असता, या रजिस्टरमध्ये दुकानाचा पत्ता एवढाच भाग या मुद्याशी संबंधित असल्याचे दिसून येते. परंतु अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांचे कार्यालय कोणत्याही दुकानास परवानगी देताना ही दुकाने ज्या रस्त्यावर आहेत त्या रस्त्याची माहिती देत असते. अशाप्रकारची माहिती दुकानदाराकडून घेऊन त्यांची नोंद जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत विहित रजिस्टरमध्ये ठेवली जात नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही एका दुकान निरीक्षकाच्या कार्यक्षेत्राशी संबंधित आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी संबंधित दुकान निरीक्षकाच्या कार्यक्षेत्रातील त्यांच्या कार्यालयाकडे ठेवल्या जाणाऱ्या रजिस्टरमध्ये ज्या दुकानदाराच्या पत्त्यावर अपिलार्थीने निर्देशीत केलेल्या रस्त्याची नोंद आहे त्या दुकानासंदर्भातील अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ द्वारे विचारलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. तसेच या माहितीबरोबरच त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ मधील, जास्तीची फी भरुन साप्ताहिक बंद दिवशी दुकाने चालू ठेवण्याची तरतूद मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम १९४८ मधील ज्या कलमामध्ये, उपकलमामध्ये आहे, त्या नियमाची व कलम, उपकलमाची प्रत त्यांनी अपिलार्थीस याच कालावधीमध्ये विनामूल्य पुरवावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व ३ अंशतः ही माहिती वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १४-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. स्वामी जी. एम., रा. 'तन्मय' खिवंसरापार्क, प्लॉट नं. १३, गारखेडा परिसर, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी, कामगार उपायुक्त यांचे कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक कामगार आयुक्त, कामगार उपायुक्त यांचे कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२२६

निर्णय दिनांक १४-०५-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. दामोधर शंकरराव घुगे,<br>मु. पो. पांगरी, ता. जिंतूर, जि. परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, सेलू,<br>जि. परभणी | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषी अधिकारी, सेलू, जि. परभणी | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाशी संबंधित विस्तृत व्याप्ती असलेली, त्यांच्या कार्यालयातर्फे पार पाडल्या गेलेल्या कामाच्या संदर्भात एकूण २७ मुद्यांद्वारे व तद्अनुषंगिक इतर मुद्यांद्वारे, दिनांक ०१-०३-२००८ ते ३१-०३-२००८ या कालावधीशी संबंधित, काही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २६-०२-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक १५-०७-२००९ रोजी व्यक्तिशः दाखविली असून, अपिलार्थीने ही माहिती पाहिली आहे व पाहणी केलेल्या माहितीने अपिलार्थीचे समाधान झाल्याचे आणि त्यांची याबाबतीत कोणतीही तक्रार नसल्याचे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना दिनांक १५-०७-२००९ रोजी लेखी कबूल केले आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना कागदपत्राच्या स्वरुपात देण्यासाठी त्यांच्याकडे आवश्यक ते अनुदान उपलब्ध नसल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस ही माहिती व्यक्तिशः दाखविली. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे दिनांक १५-०७-२००९ रोजीचे त्यांना सादर केलेले कबूली पत्र आयोगास सादर केले. या कबूली पत्रावर अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दाखविल्याचे व ती पाहून अपिलार्थीचे समाधान झाले असल्याची कबूली अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना दिल्याचे स्पष्ट होत आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप मोठे आहे. ही माहिती कागदपत्राच्या स्वरुपात अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे आवश्यक ते अनुदान अपलब्ध नसल्यामुळे त्यांनी ही माहिती अपिलार्थीस दाखविली असून, अपिलार्थीचे त्यावर

समाधान झाले असल्याची कबूली अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना उद्देशून लिहिलेल्या दिनांक १५-०७-२००९ रोजीच्या पत्रामध्ये दिलेली आहे. हे पाहता अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून, त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज केल्यानंतर उपलब्ध झाली असल्याचे दिसून येत आहे. याचबरोबर आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीस यासंदर्भात जन माहिती अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, सेलू यांनी दिनांक १५-०६-२००९ रोजीच्या पत्राद्वारे त्यांनी प्रथम अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती लेखी स्वरुपात देऊ केली असून, या माहितीपोटी प्रतिपृष्ठ रु. २/- इतक्या शुल्काची मागणी त्यांनी अपिलार्थीकडे केली असल्याचे दिसून येत आहे. तथापि सदर शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने या माहितीची जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून पाहणी केली आणि वर नमूद केलेले पत्र जन माहिती अधिकारी यांना दिले. यावरुन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून उपलब्ध झाली असल्याचे अनुमान काढण्यात येऊन, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १४-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दामोधर शंकरराव घुगे, मु. पो. पांगरी, ता. जिंतूर, जि. परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, सेलू, जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, सेलू, जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२२७

निर्णय दिनांक १४-०५-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. ए. डी. पाटील,<br>रा. डॉ. जाधव गल्ली, छाजेडनगर, कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी : | १) कार्यालयीन अधीक्षक, पंचायत विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद<br>२) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कन्नड, जि. औरंगाबाद |
| | जन अपिलीय अधिकारी : | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, औरंगाबाद |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०६-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक १४-०५-२०१० रोजीचे एक पत्र आयोगास सादर करण्यात आले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे व याबाबत त्यांची कोणतीही तक्रार राहिलेली नाही. त्यामुळे त्यांचे विचाराधीन द्वितीय अपील क्रमांक १२२७/२००९ ते स्वखुषीने मागे घेत आहेत. या अर्जामध्ये अखेरीस अपिलार्थीने सदर अपील रद्द करण्यात यावे, अशी विनंती आयोगास केलेली आहे.

अपिलार्थीच्या या पत्राचे अवलोकन करता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर निर्णय देण्याचे कोणतेही प्रयोजन उरले नसल्याने अपिलार्थीचे आयोगाकडील विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील क्रमांक १२२७/२००९, दिनांक २३-०६-२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १४-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. ए. डी. पाटील, रा. डॉ. जाधव गल्ली, छाजेडनगर, कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, पंचायत विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कन्नड, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२२८

निर्णय दिनांक १४-०५-२०१०

१ श्री. जालिंधर जयवंत नागरगोजे, : अपिलार्थी
प्रतिनिधी, सा. आत्ताच एक्स्प्रेस, प्लॉट नं. पी ४/४/६,
विठ्ठलनगर, रामनगर, एन - २, सिडको, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद,
जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद,
जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग),
जिल्हा परिषद, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०७-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे प्रथम अपील न घेतल्याने व त्यांना आवश्यक ती माहिती उपलब्ध न करुन दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व संबंधितांवर नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती आणि अपिलीय अधिकारी हे आयोगासमोर उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक १४-०५-२०१० रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे व याबाबत त्यांची कोणतीही तक्रार राहिलेली नाही. त्यामुळे त्यांचे विचाराधीन द्वितीय अपील क्रमांक १२२८/२००९ ते स्वखुषीने मागे घेत आहेत. या अर्जामध्ये अखेरीस अपिलार्थीने सदर अपील रद्द करण्यात यावे, अशी विनंती आयोगास केलेली आहे.

अपिलार्थीच्या या पत्राचे अवलोकन करता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर निर्णय देण्याचे कोणतेही प्रयोजन उरले नसल्याने अपिलार्थीचे आयोगाकडील विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्रमांक १२२८/२००९, दिनांक १५-०७-२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १४-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जालिंधर जयवंत नागरगोजे, प्रतिनिधी, सा. आत्ताच एक्स्प्रेस, प्लॉट नं. पी ४/४/६, विठ्ठलनगर, रामनगर, एन - २, सिडको, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद,

जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२३४

निर्णय दिनांक १४-०५-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अंकुश साहेबराव सानप,<br>१७६, शास्त्रीनगर, हेडगेवार हॉस्पिटलच्या मागे, गारखेडा<br>परिसर, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)<br>उपविभाग, नाथनगर (उत्तर), पैठण, तालुका पैठण,<br>जिल्हा औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असल्यामुळे, संपूर्ण माहिती मिळण्यासाठी त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-०४-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील, त्यांच्या कार्यालयाने दिनांक ०१ ऑक्टोबर २००८ ते ३१ मार्च २००९ च्या कालावधीत केलेल्या कामाशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - कामाची यादी, कामांच्या मोजमापाच्या गोषवा-याची प्रमाणित प्रत आणि या कामावर झालेला खर्च - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अधिनियमाव्दारे विहीत केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-०५-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०१-०६-२००९ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०६-०६-२००९ रोजी काही माहिती पुरविली, तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी गैरहजर आणि अपिलार्थी हजर आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे ०१ ऑक्टोबर २००८ ते ३१ मार्च २००९ या कालावधीशी संबंधित माहिती मागितली असता, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी ०१ ऑक्टोबर २००८ ते ३१ डिसेंबर २००८ या कालावधीशी संबंधित माहिती दिली. त्यांना अद्यापपावेतो जानेवारी ते मार्च २००९ या कालावधीशी संबंधित माहिती व त्यांच्या मूळ अर्जातील मोजमापाच्या गोषवा-याच्या प्रमाणित प्रती, ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून येणे बाकी आहे.

अपिलार्थीच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी जन माहिती अधिकारी वा जन अपिलीय अधिकारी अथवा त्यांच्या कार्यालयाचे कोणीही आयोगासमोर उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून ०१ जानेवारी २००९ ते ३१ मार्च २००९ या कालावधीशी संबंधित त्यांच्या कार्यालयाने केलेल्या कामाच्या गोषवा-याच्या प्रमाणित प्रती, केलेल्या कामाची यादी आणि या कामावर झालेला खर्च, ही माहिती प्राप्त होणे बाकी आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती देणे भाग आहे. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस आता अपिलार्थीच्या मूळ अर्जातील ०१ जानेवारी २००९ ते ३१ मार्च २००९ या कालावधीशी संबंधित संपूर्ण माहिती व अपिलार्थीच्या मूळ अर्जातील कामाच्या मोजमापाच्या गोषवा-याच्या प्रमाणित प्रती ही माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस प्रथमतः अपूर्ण माहिती देऊन संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. वि. मा. टेळे, उपविभागीय अभियंता) यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस सचिव (जलसंपदा) यांना करण्यात येत आहे.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, नाथनगर (उत्तर), पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्या-पासून सात दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## **आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती वर निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (जलसंपदा) यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. वि. मा. टेळे, उपविभागीय अभियंता) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १४-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अंकुश साहेबराव सानप, १७६, शास्त्रीनगर, हेडगेवार हॉस्पिटलच्या मागे, गारखेडा परिसर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, नाथनगर (उत्तर), पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२३५

निर्णय दिनांक १४-०५-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सुधाकर पंडीतराव पाटील,<br>टिळकनगर, सिल्लोड, तालुका सिल्लोड,<br>जिल्हा औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा सदस्य सचिव, कार्यालय विभागीय समाजकल्याण<br>अधिकारी, औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, जाती प्रमाणपत्र<br>पडताळणी समिती, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : | संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद |
| | जन अपिलीय अधिकारी | : | विभागीय समाजकल्याण अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद |
| | त्रयस्थ पक्ष | : | श्री. अ. सत्तार अ. नबी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्रयस्थ पक्ष श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी यांच्या वैधता प्रमाणपत्राचे पुरावे व अहवालाच्या माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आढळून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, जन अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्षाचे प्रतिनिधी हजर आहेत.

सुनावणीच्या वेळी त्रयस्थ पक्षाने त्यांची बाजू मांडण्यासाठी सुनावणीची तारीख पुढे ढकलण्याची आयोगास विनंती केली आहे. त्रयस्थ पक्षाची विनंती मान्य करण्यात येऊन या अपील अर्जाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १४-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुधाकर पंडीतराव पाटील, टिळकनगर, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३३६

निर्णय दिनांक १४-०५-२०१०

१ श्री. गणेश साहेबराव लांडगे, : अपिलार्थी
पंचशिलनगर (मंजरथ रोड), माजलगांव,
तालुका माजलगांव, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
तहसील कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव,
जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगांव,
तालुका माजलगांव, जिल्हा बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे आणि जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलाची सुनावणी न घेतल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, माजलगांव तालुक्यातील व शहरातील रॉकेल पुरवठ्यासंदर्भात एकूण चार

मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सन २००२ साली नुतनीकरण झालेल्या स्वस्त धान्य दुकान, रॉकेल परवाने, किरकोळ रॉकेल परवाने व हॉकर्स परवान्याच्या रजिस्टर झेरॉक्स प्रती, सन २००५ या वर्षी माजलगाव तालुक्यातील स्वस्त धान्य दुकान, रॉकेल परवाने यादी, किरकोळ परवाने, हॉकर्स परवान्याचे नुतनीकरण झालेल्या रजिस्टरच्या झेरॉक्स प्रती, तसेच स्वस्त धान्य दुकानास रॉकेल परवानाधारक, किरकोळ परवानाधारक, रॉकेल हॉकर्स यांच्या नावाने असलेल्या लायसन्सच्या झेरॉक्स प्रती, ऑगस्ट, सप्टेबर २००८ या महिन्यामध्ये रॉकेल नियतनानुसार तहसीलदार कार्यालयाच्या सर्व ठोक रॉकेल विक्रेत्यास दिलेल्या रॉकेल वाटपाच्या यादीच्या झेरॉक्स प्रती व सप्टेबर २००८ या महिन्याच्या रॉकेल नियतानाच्या कोट्याची झेरॉक्स प्रत - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीस अपेक्षित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्यामुळे, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतेही आदेश पारीत न केला गेल्यामुळे व परिणामी अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या माहितीपासून वंचित रहावे लागल्याकारणाने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगा-समोर उपस्थित नाही. सुनावणीची नोटीस पाठवून व तसेच जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील श्री. शेवाळे यांच्याशी दूरध्वनीव्दारे दिनांक १३-०५-२०१० रोजी संपर्क साधून सुनावणीसाठी हजर राहण्याची सूचना देऊनही जन माहिती अधिकारी स्वतः अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत, याची आयोगाने सखेद नोंद घेतली आहे.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही

अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे, अपिलार्थीस ती जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) मधील विहित केलेल्या मुदतीत देणे त्यांना भाग होते, तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती केली नाही. जन अपिलीय अधिकारी हे त्यांच्या प्रथम अपील सुनावणीच्या वेळी गैरहजर राहिले. महसूल विभागाच्या अधिका-यांच्या या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाचा परिपाक म्हणून, अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित राहिल्याचे आयोगास आढळून येत आहे. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २२-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी. अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देय असतानाही ही माहिती अपिलार्थीस प्राप्त होण्यापासून वंचित ठेवून संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे स्वतःला अधिनियमातील कलम (२०) मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब सचिव (महसूल) यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, माजलगाव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड (दिनांक २२-०९-२००८ व तदनंतर तीस दिवसापर्यंत कार्यरत असलेले) यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने, ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांच्या कार्यालयातून हे आदेश निर्गमित झाल्यापासून १५ दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही ,याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २२-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

३. सचिव (महसूल) यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड (दिनांक २२-०९-२००८ व तदनंतर तीस दिवसापर्यंत कार्यरत असलेले) यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंग-विषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १४-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गणेश साहेबराव लांडगे, पंचशिलनगर (मंजरथ रोड), माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२३०१

निर्णय दिनांक १४-०५-२०१०

१ श्री. शेरसिंघ हिरासिंघ फौजी, : अपिलार्थी
रा. बडपुरा, भगतसिंग रोड,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा पोलिस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा पोलिस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : अपर पोलिस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी गोपनीयतेचे कारण दर्शवून माहिती देण्याचे नाकारले, त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, त्यांनी माहिती अधिका-याचा निर्णय कायम ठेवून त्यांचे प्रथम अपील फेटाळले व त्यांना हेतुपुरस्सर चुकीची माहिती दिल्यामुळे, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) च्या तरतुदीप्रमाणे २५,००० रुपये इतकी शास्ती लावावी आणि त्यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही आदेशित करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, गुरुचरणसिंघ उत्तमसिंघ घडीसाब यांची चौकशी पूर्ण झाली का ? व केव्हा, चौकशी दरम्यान तक्रारीच्या अनुषंगाने माझी विचारपूस संबंधी काही उल्लेख आहे का ? असल्यास त्याची सत्यप्रत देण्याची कृपा करावी, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २१-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन श्री. गुरुचरणसिंघ उत्तमसिंघ घडीसाब यांची पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून चौकशी झाली होती, त्यात आपल्या नावाची तक्रार नसल्याने आपल्या विचारपूस संबंधी अहवालात उल्लेख नसल्याचे अपिलार्थीस कळविले आणि इतर माहिती अपिलार्थीस अधिनियमातील कलम ८ (१) (J) व गोपनीयतेच्या कारणास्तव नाकारली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे आदेश पारीत करुन, जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी घेतलेल्या भूमिकेशी सहमती दर्शवत अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी गैरहजर व अपिलार्थी आणि जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीची श्री. गुरुचरणसिंघ उत्तमसिंघ घडीसाब यांनी पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो यांच्याकडे तक्रार केली आहे, तथापि या तक्रारीची प्रत त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये उल्लेख केलेले श्री. गुरुचरणसिंघ उत्तमसिंघ घडीसाब यांनी त्यांच्याकडे कोणतीही तक्रार केली नाही. यासंदर्भातील कोणतीही कागदपत्रे त्यांच्या अभिलेख्यावर उपलब्ध नाहीत. श्री. शेरसिंघ हिरासिंघ यांचा या प्रकरणाशी संबंधित त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या कागदपत्रामध्ये उल्लेख नसल्यामुळे श्री. शेरसिंघ हिरासिंघ यांची विचारापूस केलेली नाही. तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेले त्रयस्थ पक्ष श्री. गुरुचरणसिंघ उत्तमसिंघ घडीसाब यांची चौकशी त्यांच्या कार्यालयातर्फे दिनांक ०१-०९-२००५ रोजी पूर्ण झालेली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमा-तील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक १७-०३-२००९ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील श्री. गुरुचरणसिंघ उत्तमसिंघ घडीसाब यांची चौकशी पूर्ण झाली का, ? तक्रारीच्या अनुषंगाने माझी विचारपूस संबंधी काही उल्लेख आहे का ? या मुद्दयांवरील माहिती अपिलार्थीस मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून, ती अधिनियमातील कलम २ (च) मधील तरतुदीशी सुसंगत नसल्यामुळे देय होत नाही. माहिती अधिकार अधिनियमा-तील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे अभिप्राय व मते अपेक्षित करणारी माहिती मागणे आणि जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे अभिप्राय अर्जदारास देणे अशा प्रकारच्या प्रक्रियेचा यामध्ये समावेश नाही, त्यामुळे अपिलार्थीच्या या मुद्दयांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. अपिलार्थीच्या अर्जातील श्री. गुरुचरणसिंघ उत्तमसिंघ घडीसाब यांची चौकशी केव्हा पूर्ण झाली, श्री. गुरुचरणसिंघ उत्तमसिंघ घडीसाब यांच्याविरुध्द केलेल्या व अपिलार्थीने केलेल्या तक्रारीची सत्यप्रत, ही माहिती देखील अपिलार्थीस उघड केल्यास अधिनियमातील कलम ८ (१) (g) व (j) चा भंग होणे संभवत असल्याच्या कारणास्तव ही माहिती अपिलार्थीस उघड करण्याचे जन माहिती अधिकारी यांनी नाकारले. जन माहिती अधिकारी यांची ही कृती बरोबर आहे, कारण लाचलुचपत प्रतिबंध विभागाकडे प्राप्त होणा-या तक्रार अर्जाच्या सत्यप्रती माहिती अधिका-याने दिल्या तर या माहितीव्दारे त्यांच्या कार्यालयास माहिती प्राप्त होण्याचा स्त्रोत उघड होईल आणि

तक्राररदाराच्या शारीरिक सुरक्षिततेस हानी पोहचू शकेल अशी शक्यता असल्यामुळे आणि तसेच या तक्रार अर्जाची प्रत अपिलार्थीस उघड केल्याने कोणतेही व्यापक जनहित साध्य होण्याची शक्यता नसल्याची आयोगाची खात्री झाली असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांची या मुद्दयासंदर्भातील माहिती उघड न करण्याची कृती बरोबर असल्याचे आढळून येत आहे. या मुद्दयासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे स्पष्ट केले की, अपिलार्थीच्या तक्रार अर्जाची प्रत त्यांच्याकडे उपलब्धच नाही. ही प्रत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास सादर केल्याचा कोणताही पुरावा अपिलार्थीच्या प्रतिनिधीकडे आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगास दाखविण्यासाठी उपलब्ध नाही, हे पाहता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या तक्रार अर्जाची प्रत त्यांच्या कार्यालयात प्राप्त झाली नाही हा त्यांच्या प्रतिनिधीचा युक्तिवाद, आयोग मान्य करीत आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करताना त्यांच्या मूळ माहितीची व्याप्ती वाढवून काही अतिरिक्त मुद्दयावर माहिती मागितली आहे, ही अपिलार्थीची चूक आहे. तेव्हा या प्रकरणाशी संबंधित जर अतिरिक्त मुद्दयावर अपिलार्थीस काही माहिती हवी असेल तर, त्यांनी त्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या-कडे स्वतंत्र अर्ज करावा, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्रथम अपील करताना अपिलार्थीस त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जातील त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीची व्याप्ती वाढविता येणार नाही, हे त्यांनी लक्षात घ्यावे.

वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली आणि अपिलार्थीस देय असलेली माहिती यांचे केलेले पृथक्करण पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस श्री. गुरुचरणसिंघ उत्तमसिंघ घडीसाब यांची चौकशी पूर्ण झाली असल्यास ती कोणत्या तारखेस पूर्ण झाली, या मुद्दयावरील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत टपालाव्दारे व विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत टपालाव्दारे व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १४-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेरसिंघ हिरासिंघ फौजी, रा. बडपुरा, भगतसिंग रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा अपर पोलिस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा पोलिस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२३०२

निर्णय दिनांक १४-०५-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शेख छुन्नुमियाँ शेख कडुमियाँ,<br>रा. तळनेवाडी, तालुका गेवराई, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई, तालुका<br>गेवराई, जिल्हा बीड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार /उपविभागीय अधिकारी, तहसील<br>कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : | नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई,<br>तालुका गेवराई, जिल्हा बीड |
| | जन अपिलीय अधिकारी | : | तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई, तालुका<br>गेवराई, जिल्हा बीड |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी गैरहजर व अपिलार्थी आणि जन माहिती अधिकारी हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक १४-०५-२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, विचाराधीन व्दितीय अपिलासंदर्भातील मूळ अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता प्राप्त झाली असून, प्राप्त माहितीसंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नाही, त्यामुळे ते त्यांचे विचाराधीन अपील क्रमांक २३०२/२००८ स्वखुषीने मागे घेत आहेत.

खुद्द अपिलार्थीनेच त्यांचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील आता मागे घेतले असल्याने व ते रद्द करण्याची त्यांनी विनंती केली असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १४-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेख छुन्नुमियाँ शेख कडुमियाँ, रा. तळनेवाडी, तालुका गेवराई, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२४१

निर्णय दिनांक : १५.०५.२०१०

१. श्रीमती देशमुख एस.पी. : अपिलार्थी
लातूर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा क्रीडा अधिकारी, लातूर.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपसंचालक,क्रीडा व युवक सेवा,
लातूर विभाग, लातूर.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३.०७.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रीडा अधिकारी,लातूर यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आयोगाकडे आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०८.०४.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती एकूण १२ मुद्याद्वारे व्यक्तिशः मागितली होती. तथापि ही माहिती विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक,क्रीडा, लातूर यांच्याकडे दि.१२.०५.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ११.०६.२००९ रोजी निर्णय देऊन पाच दिवसांच्या आत अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती

अधिकारी यांना सूचित केले. तथापि या कालावधीनंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर दि. १४.०७.२००९ रोजी माहिती पुरविली गेली आहे. तथापि त्यांना पुरविण्यात आलेली माहिती ही खोटी व अपूर्ण असल्याचे त्यांना वाटत आहे. अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीतील कोणत्या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस खोटी व अपूर्ण वाटत आहे, याची आयोगाने विचारणा केली असता, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या मुद्दा क्र. ३ व ८ शी संबंधित माहिती खोटी असल्याचे वाटत आहे, असे त्यांनी आपल्या युक्तिवादाद्वारे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दि.१४.०७.२००९ रोजी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि.०८.०४.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना दि. १३.०७.२००९ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. तथापि व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीसाठी व्यक्तिशः संपर्क साधला असल्याचा कोणताही सबळ पुरावा अपिलार्थी आयोगासमोर सादर करु शकले नाहीत. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती प्राप्त झाल्याचा मुद्दा निकाली निघत आहे. अपिलार्थीचे जन

माहिती अधिकारी यांनी त्यांना पुरविलेल्या त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ व ८ शी संबंधित प्राप्त माहितीवर आक्षेप आहेत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "माझी रजा नामंजूर करण्यापूर्वी कार्यालयात कोणाचीही रजा मंजूर करण्यात येणार नाही, याबाबत लेखी आदेश काढले होते का, असल्यास त्या आदेशाची प्रत व आतापर्यंत माझ्या किरकोळ व अर्जित रजा किती मंजूर करण्यात आल्या", अशी माहिती मागविली आहे. यापैकी, 'अपिलार्थीची रजा नामंजूर करण्यापूर्वी, कोणाचीही रजा मंजूर करण्यात येणार नाही, याबाबत लेखी आदेश काढले होते का', या भागाशी संबंधित अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या माहितीसंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात त्यांनी ती अर्जदारास अधिनियमातील तरतुदीनुसार उपलब्ध करुन देणे इतपतच प्रक्रिया यामध्ये सीमित आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कोणत्याही कृतीबद्दल अथवा निर्णयाबद्दल कारणे अथवा खुलासे मागणे आणि जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कृतीबद्दल कारणे अर्जदारास देणे अशाप्रकारच्या प्रक्रियांचा त्यामध्ये समावेश नाही. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ मधील त्यांची रजा नामंजूर करण्यापूर्वी, कोणाचीही रजा मंजूर करण्यात येणार नसल्याबाबत लेखी आदेश काढले होते का, या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळात माहिती देय होत नाही. याच मुद्यावरील उर्वरित भागावर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १३.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे माहिती पुरवली आहे. अपिलार्थीस त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ८ च्यासंदर्भात प्राप्त झालेली माहिती खोटी आहे, असे वाटत आहे. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ८ चे अवलोकन केले असता, या मुद्याद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना, 'त्यांनी दि. ३१.०३.२००९ रोजी १०.३० वा. सर्वसाधारण व्यायामशाळा विकास अनुदानाबाबत उपसंचालक यांच्याकडून मंजूरी आणा, अन्यथा बिल कोषागारात दाखल करता येणार नाही व अनुदान लॅप्स होईल,सदरील विषयाचे कार्यासन तुमच्याकडे आहे,सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहिल, असे भेडसावत होता,याबाबत खुलासा', अशी माहिती मागितली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या या

मुद्यावरुन अपिलार्थीस, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेल्या प्रशासकीय स्वरुपातील सूचनेबाबात जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचा खुलासा अपेक्षित असल्याचे आयोगास आढळून येत आहे. यासंदर्भात वरील परिच्छेदात स्पष्ट केल्याप्रमाणे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबद्दलचे खुलासे व स्पष्टीकरण अपेक्षित असल्याचे या प्रकरणी अनुज्ञेय नसल्यामुळे अपिलार्थीस मूळात त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ८ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देय नाही. त्यामुळे या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देणे अपेक्षित नाही. अशाप्रकारे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीतील ज्या मुद्यावरील माहिती त्यांना खोटी व अपूर्ण असल्याचे आढळून येत असल्याचे त्यांनी नमूद केले आहे, ते दोनही मुद्दे वरील परिच्छेदात स्पष्ट केल्याप्रमाणे निकाली निघत असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक १५.०५.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्रीमती देशमुख एस.पी.शासकीय संक्रमण निवासस्थान, बंगला नं.३, जुना औसा रोड,लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रीडा अधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक,क्रीडा व युवक सेवा,लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२४२

निर्णय दिनांक : १५.०५.२०१०

१. श्री. जालींधर जयवंत नागरगोजे, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
जायकवाडी पाटबंधारे विभाग क्र.२,
परभणी

२. जन अपिलीय अधिकारी,
अधीक्षक अभियंता व प्रशासक,
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,
औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : सहायक अधीक्षक अभियंता व प्रशासक,
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,
औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२.०७.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती अपूर्ण व असमाधानकारक असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दि. १८.०५.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील जायकवाडी प्रकल्प डाव्या कालव्याबाबत, २००५-२००९

या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ६ मुद्यांद्वारे मागितली होती. या अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०९.०७.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपीलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १७.०७.२००९ रोजी घेऊन, या संदर्भात आपले निर्णय दि. २४.०७.२००९ रोजी पारित केले आणि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती मोघम स्वरुपात व व्यापक असल्यामुळे, ही माहिती अपिलार्थीस दाखविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि सुनावणीच्या दिवशीच म्हणजे दि. १७.०७.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहितीच्या प्रती पुरविल्याचे आयोगास आढळून येत आहे. परंतु प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी यांचा प्रतिनिधी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आयोगासमोर उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण आहे. या माहितीमध्ये त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३,४ व ५ शी संबंधित माहितीचा समावेश नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दि. १७.०७.२००९ रोजी त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती विनामूल्य उपलब्ध करुन दिलेली आहे.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १७.०७.२००९ रोजी दिलेल्या माहितीचे अवलोकन करता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३,४ व ५ शी

संबंधित माहिती दिल्याचे आयोगास आढळून येत आहे. त्यामुळे अपिलार्थीचा, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिल्याचा युक्तिवाद सिध्द होत नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक १५.०५.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जालींधर जयवंत नागरगोजे,रा.प्लॉट नं. पी ४/४/६,विठ्ठलनगर,रामनगर,एन-२, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,जायकवाडी पाटबंधारे विभाग क्र.२, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता व प्रशासक,लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२४३

निर्णय दिनांक : १५.०५.२०१०

१. श्री. केंद्रे पी.सी., : अपिलार्थी
रा.अहमदपूर, जि.लातूर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४.०७.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या भविष्य निर्वाह निधीबाबत जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २५.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडे त्यांच्या भविष्य निर्वाह निधीसंदर्भात दि. १३.०२.१९८६ ते ३०.११.२००२ च्या कालावधीतील व्याजासह रक्कम, सदर रक्कम मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडे विलंबाने वर्ग केल्यामुळे या विलंबास जबाबदार कोण, अशी माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३०.०४.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २७.०७.२००९ रोजी सुनावणी ठेवली, तथापि या सुनावणीसाठी अपिलार्थी गैरहजर राहिल्याने अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय होऊ शकला नाही. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी होऊ न शकल्यामुळे अपिलार्थीने त्यांच्याकडे या विषयाबाबत दि. १७.०७.२००९ रोजी माहिती अधिकाराखाली परत नव्याने अर्ज केला. त्यावेळी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ३५/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने सदर शुल्क न भरल्यामुळे ते अपिलार्थीस ही माहिती पुरवू शकले नाहीत.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २५.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील त्यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या रकमेचे हस्तांतरण करण्याचे प्रकरण प्रलंबित असल्याबाबतचे कारण व त्यांच्या आर्थिक नुकसानीस जबाबदार कोण, या विषयावरील माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण ही माहिती, माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दलची

कारणे अथवा खुलासे विचारणे आणि जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कृतीबद्दलची कारणे व खुलासे अर्जदारास देणे अशाप्रकारच्या प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत नाहीत. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील या भागामधील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे देय होत नाही. मात्र या अर्जातील उर्वरित भागावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीने त्यांच्या दि.२५.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती मागितली असता, या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीमध्ये विहित केलेल्या कालावधीतच प्रतिसाद देणे गरजेचे होते. तथापि संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अशाप्रकारचा कोणताही प्रतिसाद या मुदतीमध्ये दिला नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील त्यांना देय असलेली माहिती अधिनियमातील कलम ७(६) नुसार विनामूल्य व रजिस्टर्ड पोस्टाद्वारे पुरवावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक १५.०५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. केंद्रे प्रल्हाद पंढरीनाथ,अ.प.पंचायत समिती, अहमदपूर, ता.अहमदपूर, जि.लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२४४

निर्णय दिनांक : १५.०५.२०१०

१. श्री. पांडुरंग निवृत्तीराव मोने, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
प्राथमिक शाळा, वडोद तांगडा,
ता.भोकरदन, जि.जालना.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, भोकरदन,जि.जालना

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (शिक्षण),
पंचायत समिती, भोकरदन, जि. जालना.

त्रयस्थ पक्ष : श्री. उत्तम पुंडलिक तांगडे व
श्रीमती सुनंदा पुंडलिक तांगडे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०.०७.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०६.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष, श्री. उत्तम पुंडलिक तांगडे व श्रीमती सुनंदा पुंडलिक तांगडे,

वडोद तांगडा, ता.भोकरदन यांच्या प्रवेश-निर्गम उताऱ्याची नक्कल मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने दि. १७.०७.२००९ रोजी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भोकरदन यांच्याकडे यासंदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर गट विकास अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. २१.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे त्यांना प्रथम अपील गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, भोकरदन यांच्याकडे सादर करण्याचे सूचित कले. तथापि त्यांनी गट शिक्षणाधिकारी यांच्याकडे अशाप्रकारचा प्रथम अपील अर्ज सादर न करता आयोगाकडे दि. ३०.०७.२००९ रोजी वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत, जन माहिती व अपिलीय अधिकारी आयोगासमोर उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना अपिलार्थीचा दि. ०६.०६.२००९ रोजीचा माहितीसाठीचा अर्ज मूळात प्राप्त झालेला नाही. त्यांना गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, भोकरदन यांच्याकडील दूरध्वनीवरुन प्राप्त झालेल्या सूचनेप्रमाणे ते आज रोजी आयोगासमोर सुनावणीसाठी उपस्थित आहेत. या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (शिक्षण) हे आयोगासमोर उपस्थित आहेत. त्यांनी आयोगास असा खुलासा केला की, अपिलार्थीच्या दि. १७.०७.२००९ रोजीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नाही.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे

की, या प्रकरणी अपिलार्थीचा दि. ०६.०७.२००९ रोजीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज मुख्याध्यापक यांच्याकडे प्राप्त झालेला नाही. तसेच अपिलार्थीने सदरचा अर्ज मुख्याध्यापकाकडे सादर केल्याचा कोणताही सबळ पुरावा आयोगाकडे त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत आयोगास सादर केलेला नाही अथवा यासंदर्भात स्पष्टीकरण करण्यासाठी ते आयोगासमोर उपस्थित नाहीत. तसेच गट विकास अधिकारी,पंचायत समिती, भोकरदन यांच्या दि. २१.०७.२००९ रोजीच्या सूचनेप्रमाणे त्यांनी या प्रकरणाशी संबंधित त्यांचा प्रथम अपील अर्ज गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती अथवा या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांच्याकडेही सादर केल्याचा कोणताही पुरावा आज रोजी सुनावणीच्यावेळी आयोगाकडे उपलब्ध नाही व या संदर्भात तोंडी युक्तिवाद करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. हे पाहता, आवश्यक त्या कागदपत्रांच्या व संबंधितांच्या उपस्थितीअभावी अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक १५.०५.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पांडुरंग निवृत्तीराव मोने,रा.अंबाली निवास, समतानगर,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,प्राथमिक शाळा, वडोद तांगडा,ता.भोकरदन, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (शिक्षण),पंचायत समिती, भोकरदन, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२४५

निर्णय दिनांक : १५.०५.२०१०

१. श्री. शेख विखार अहेमद कबीर अहेमद, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपअभियंता,नगर रचना विभाग,
महानगरपालिका, औरंगाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : सहायक संचालक, नगर रचना,
महानगरपालिका, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५.०८.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मागितलेली माहिती दिली नसून त्यांच्या अपिलाच्या सुनावणीच्या वेळी त्यांना समाधानकारक माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून,न.भू.क्र.१४५१९ हा सर्व्हेनंबर कोणत्या कारणास्तव रिझर्व केला, कोणत्या ऑर्डरने रिझर्व केला, या ऑर्डरविषयी नोटीस पासून आदेशाची पूर्ण माहिती मिळावी व साईट क्र.३४५ हा जन माहिती अधिकारी यांनी कोणत्या आधारे दिला, अशी अतिरिक्त माहिती मागितली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०२.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे,"नगर भूमापन क्र.१४५१९ क्रांतीचौक कोणत्या आरक्षणाने बाधित आहे. (आ.क्र.३४५) बाधित असल्यास त्याच्या आदेशाची प्रत", अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३०.०६.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.१००/- इतके त्यांना महानगरपालिकेत भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा न करता त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात दि.१४.०७.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील अभिलेख्यावर दि.१८.०७.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस गॅझेटची प्रत व एम.आर.अँड टी.पी.ची झेरॉक्स प्रत देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. १८.०७.२००९ रोजी उपलब्ध करुन दिली.तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आयोगासमोर उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद कला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून न.भू.क्र.१४५१९ हा सर्व्हे नंबर कोणत्या आदेशाने व कोणत्या कारणाने रिझर्व केला, त्या आदेशाची, नोटीसपासून आदेशापर्यंतची पूर्ण माहिती प्राप्त व्हावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांनी दि. १८.०७.२००९ रोजी पुरविली आहे.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ०२.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. १८.०७.२००९ रोजी पुरवली आहे.

अपिलार्थीच्या एकूण मागणीवरुन अपिलार्थीस त्यांच्या सर्व्हेनंबरचा उल्लेख, राज्य शासनाने प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेमध्ये अपेक्षित असल्याचे दिसून येत आहे. तथापि शासनाने पारित केलेल्या अधिसूचनेमध्ये अपिलार्थीच्या सर्वेनंबरचा उल्लेख नाही, कारण अशा अधिसूचनेमध्ये प्रत्येक सर्वे क्रमांकाचा उल्लेख केला जात नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास स्पष्ट केले आहे. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्याच स्वरुपात ती जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास देणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात त्यांनी ती अपिलार्थीस दिली आहे, असे आढळून येत आहे. तसेच अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीशिवाय इतर अतिरिक्त माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे, यासंदर्भात त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्वतंत्र अर्ज करावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. या प्रकरणाशी संबंधित संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिली असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** — **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक १५.०५.२०१०** — **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख विखार अहेमद कबीर अहेमद,एक्सलस मोटर्स, क्रांती चौक गार्डनच्या पाठीमागे, क्रांती चौक,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता,नगर रचना विभाग,महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना,महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२३७

निर्णय दिनांक १५-०५-२०१०

१ श्री. एकनाथ वामन गायकवाड, : अपिलार्थी
द्वारा, मधुकर गोविंद चाबुकस्वार, श्री. चव्हाण यांचे घर,
प्लॉट क्र. ६१, वसंतनगर, जवाहर कॉलनी, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता, जायकवाडी पाटबंधारे उपविभाग
क्र. ५, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,
औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक अभियंता श्रेणी १, जायकवाडी पाटबंधारे उप विभाग क्र. ५, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : उप कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग नाथनगर (उत्तर), पैठण, जि. औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अर्धवट, चुकीची आणि अप्रमाणित माहिती मिळाली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०४-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. आर. आर. मांडे, लिपीक यांच्या घर भाड्यासंदर्भात एकूण ४ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - त्रयस्थ पक्ष श्री. आर. आर. मांडे हे कॉलनीतून बदलून गेल्याची तारीख, क्वॉर्टर सोडल्याची तारीख, त्यांनी कोणत्या मार्केट रेटने घरभाडे भरले या संदर्भातील अभिलेख्याच्या प्रती, श्री. मांडे यांना क्वॉर्टर सोडण्याबाबत किती पत्र दिली त्या पत्राच्या झेरॉक्स सर्टिफाईड कॉपीज, टेंपररी शेडला मार्केट रेट किती व परमनंट क्वॉर्टरला मार्केट रेट किती या बाबतचा जी. आर. व जे कर्मचारी पत्र्याच्या शेडमध्ये रहतात त्यांना कोणत्या रेटने व कोणत्या जी. आर.नुसार भाडे वसूल केले जाते त्याची प्रत - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी ११-०१-२००१ ते १६-०४-२००९ असा असून अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीने सदरचा अर्ज उप विभागीय अभियंता, जायकवाडी पाटबंधारे उपविभाग क्रमांक ५ यांना उद्देशून केला होता. तथापि त्यावेळी कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग नाथनगर (उत्तर), पैठण हे जन माहिती अधिकारी असल्यामुळे, त्यांनी दिनांक १८-०४-२००९ रोजी कार्यकारी अभियंत्याकडे अपिलार्थीचा अर्ज पाठविला. यानंतर कार्यकारी अभियंत्याने परत त्यांच्याकडील दिनांक २९-०४-२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती देण्याचे सहायक अभियंता यांना सूचित केले. यानंतर सहायक अभियंता यांनी दिनांक ११-०५-२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती तयार असल्याचे आणि शुल्क भरुन ही माहिती त्यांच्याकडून घेऊन जाण्याचे सूचित केले. सदरचे पत्र अपिलार्थीस मिळाल्यानंतर त्यांनी पैसे

भरल्यानंतर माहिती घेऊन जाण्यात येईल असा अभिप्राय जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक ११-०५-२००९ रोजीच्या पत्रावर दिला आहे. तथापि यानंतर शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०५-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२-०६-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस या माहितीशी संबंधित सर्व अभिलेखे दाखविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतर अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्याकडे कधीही उपस्थित राहिले नाहीत. परंतु हा निर्णय देण्यापूर्वी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २८-०५-२००९ रोजी माहिती पुरविली होती. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने आणि प्राप्त माहिती चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे वाटल्यावरुन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याचे नमूद करुन, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असल्याचे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचा युक्तिवाद आयोगासमोर केला व अपिलार्थीस त्यांनी पुरविलेली माहिती आयोगास दाखविली.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १६-०४-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. परंतु अपिलार्थीस त्यांनी दिलेली माहिती ही अपिलार्थीने

मागणी केलेल्या माहितीशी पूर्णपणे विसंगत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ च्या संदर्भात त्यांच्या कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, औरंगाबाद यांना उद्देशून लिहिलेल्या एका पत्राची प्रत दोनदा दिली आहे. या पत्रामध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील श्री. मांडे यांच्या बदलीचा दिनांक व त्यांनी कोणत्या मार्केट रेटने घरभाडे भरले याबाबतचा कोणताही उल्लेख नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ द्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. आर. आर. मांडे यांना क्वॉर्टर सोडण्याबाबत त्यांच्या कार्यालयातील दिलेल्या पत्रांच्या प्रतींची माहिती मागितली होती. तथापि अशी माहिती अपिलार्थीस देण्याऐवजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी कार्यकारी अभियंता यांना लिहिलेल्या दिनांक ०४-११-२००९ रोजीच्या पत्राची प्रत दिली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ द्वारे, "अपिलार्थीने टेंपरवरी शेडला मार्केट रेट किती व परमनंट क्वॉर्टरला मार्केट रेट किती," अशी माहिती विचारली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या ताब्यात असणारी शासकीय निवासस्थानाकरिता त्यांच्या कार्यालयाने मार्केट रेट (बाजार दर) निश्चित करणे हा त्यांच्या कार्यालयाच्या निवासस्थान व्यवस्थापनाचा भाग आहे. त्यामुळे ही माहिती देखील जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असावयास हवी. परंतु या ऐवजी त्यांनी अपिलार्थीस शासनाच्या दिनांक ०५-१०-१९८५ च्या परिपत्रामध्ये नमूद केलेला दर अपिलार्थीस पुरविला आहे. या मुद्यावर अपिलार्थीस हा दर अपेक्षित नसून जन माहिती अधिकारी यांच्या प्रत्यक्षात ताब्यात असलेल्या तात्पुरत्या व कायमस्वरुपी निवासस्थानाच्या बाजार दराची आवश्यकता आहे, ही बाब जन माहिती अधिकारी यांनी लक्षात घेतलेली नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती ही बरोबर आहे.

अशाप्रकारे वरील परिच्छेदात अपिलार्थीस देय असलेली आणि जन माहिती अधिकारी यांनी त्यांना प्रत्यक्षात पुरविलेली माहिती याचे अवलोकन करता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १,२ व ३ च्या संदर्भात चुकीची माहिती दिली असल्याचे सिध्द होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे

की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १,२ व ३ शी संबंधित अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना सत्य स्वरुपात, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीस दिनांक ११-०५-२००९ रोजीच्या पत्राद्वारे माहिती अधिकाऱ्याने शुल्क भरुन माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले असता, अपिलार्थीने या पत्रावर शुल्क भरल्यानंतर माहिती घेऊन जाण्याचा अभिप्राय देऊन, जन माहिती अधिकारी यांच्याकडे कधीही त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा करण्याची तयारी दर्शविली नसल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कोणतीही कारवाई आयोग आदेशित करीत नाही. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जातील चार मुद्यांच्यापैकी चौथ्या मुद्यावर बरोबर आणि मुद्दा क्रमांक १, २ व ३ या मुद्यांवर चुकीची माहिती दिली असल्याने अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १, २ व ३ शी संबंधित माहिती अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसांच्या आत, कोणत्याही कार्यालयीन दिवशी, पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून, जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी, असे अपिलार्थीस सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १,२ व ३ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १५-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. एकनाथ वामन गायकवाड, द्वारा, मधुकर गोविंद चाबुकस्वार, ग्रामसेवक, निवृत्त तहसीलदार, श्री. चव्हाण यांचे घर, प्लॉट क्र. ६१, वसंतनगर, जवाहर कॉलनी, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता श्रेणी १, जायकवाडी पाटबंधारे उप विभाग क्र.५, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग नाथनगर (उत्तर), पैठण, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२३८

निर्णय दिनांक १५-०५-२०१०

१ श्री. सचिन सुर्यकांत सुरडकर, : अपिलार्थी

रा. एन.-७, के.-७, सिडको, बजरंग कॉलनी, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

प्राचार्य, सरस्वती भुवन विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

प्राचार्य, सरस्वती भुवन विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपप्राचार्य, सरस्वती भुवन विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती प्राप्त झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची, त्रयस्थ पक्ष श्री. सुरडकर यांच्या सेवापुस्तिका अद्ययावत करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्याची व त्यांच्या सेवा मुक्ती आदेशाची व राजीनामा दिला असल्यास त्यांच्या राजीनाम्याची प्रत व संस्थेने बजावलेल्या नोटिसच्या पोच पावतीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. सुर्यकांत गणपत सुरडकर यांच्या संदर्भात काही माहिती एकूण ६ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - श्री. सुरडकर यांच्या मूळ नेमणूक पत्राची प्रत, त्यांच्या सेवा समाप्ती संबंधी कागदपत्रांच्या प्रती, श्री सुरडकर यांना मूळ सेवापुस्तिकेची द्वितीय प्रत दिली असल्यास त्याची पोच पावती किंवा त्यांच्या मूळ सेवापुस्तिकेची छायांकित प्रत, श्री. सुरडकर यांनी सेवा सोडताना किंवा त्यांना सेवेतून कमी करताना किंवा त्यानंतरच्या जवळच्या कालावधीत त्यांनी वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केले असल्यास त्याची प्रत, श्री. सुरडकर यांनी सेवा निवृत्ती वेतन मिळण्यासाठी अर्ज केला आहे काय? असल्यास त्याची प्रत व त्या संबंधातील कार्यवाही कोणत्या टप्प्यावर चालू होती त्याबाबत सविस्तर माहिती, श्री. सुरडकर यांना ज्या दराने वेतन अदा केले आहे त्याबाबतचे अंतिम वेतन प्रमाणपत्र - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून शीघ्र टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १३-१२-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती देण्यासाठी त्यांना काही कालावधी लागणार असल्याचे कळविले व त्यानंतर अपिलार्थीने दिनांक १७-१२-२००८ रोजी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १५० इतके जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरले. यानंतर त्यांनी दिनांक २२-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य यांनी अपिलार्थीस दिनांक ०९-०४-२००९ रोजी एक पत्र देऊन अपिलार्थीस परत

माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी ज्या त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मागितली आहे तो त्रयस्थ पक्ष म्हणजे त्यांचे वडील असून त्यांचे सेवानिवृत्तीचे प्रकरण सरस्वती भूवन महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी अद्यापपावेतो शासनाकडे पाठविले नसल्यामुळे, त्यांना ही माहिती आवश्यक आहे. त्यांच्या वडिलांचे सेवानिवृत्ती प्रकरण प्राचार्यांनी शासनाकडे पाठविल्यास त्यांचे समाधान होऊ शकेल.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्या त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात त्यांच्याकडे माहिती मागितली आहे, त्या त्रयस्थ पक्षासंदर्भातील माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक २२-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे व नंतर दिनांक ०९-०४-२००९ रोजीच्या पत्राद्वारे पुरविली असून, त्रयस्थ पक्षाच्या सेवापुस्तिकेच्या प्रती त्यांच्याकडे उपलब्ध आहेत. तथापि त्रयस्थ पक्ष त्यांच्या सेवा कालावधीमध्ये अंदाजे ६ महीने इतक्या कालावधीसाठी विना परवानगी गैरहजर होते. त्याची नोंद तत्कालीन प्राचार्यांनी त्रयस्थ पक्षाच्या सेवापुस्तिकेत न घेतल्यामुळे त्रयस्थ पक्षाच्या सेवानिवृत्ती प्रकरणात त्यांना काहीही कार्यवाही करता येत नाही. तथापि या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध संपूर्ण माहिती सशुल्क पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये केलेली विनंती आयोगास मान्य करता येणार नाही. कारण माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात त्यांनी ती अर्जदारास अधिनियमातील तरतुदीनुसार उपलब्ध करुन देण्यासंदर्भात कार्यवाही करावयाची आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा

क्रमांक १ व ६ चे अवलोकन केले असता, या अर्जातील मुद्दा क्रमांक ५ मधील, "श्री. सुरडकर यांनी सेवानिवृत्ती वेतन मिळण्यासाठी अर्ज केला आहे काय? " या भागावरील माहिती अपिलार्थीस देय होत नाही. कारण या मुद्याद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे अभिप्राय अपेक्षिले आहेत. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडून एखाद्या प्रकरणात अथवा त्यांनी घेतलेल्या निर्णयावर त्यांचे अभिप्राय व त्या संदर्भात त्यांचे स्पष्टीकरण मागणे व जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांच्या कृतीबद्दल अथवा निर्णयाबद्दल स्पष्टीकरण देणे अशाप्रकारच्या प्रक्रियेचा समावेश नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ मधील हा भाग वगळता उर्वरित सर्व माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २२-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे त्यांच्याकडे ती माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध होती त्याच स्वरुपात त्यांनी पुरविल्याचे आयोगास आढळून येत आहे. त्यामुळे अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त होणे बाकी असल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, अशाप्रकारच्या सेवाविषयक प्रश्नासंदर्भात वेगळे स्वतंत्र प्राधिकरण अस्तित्वात असल्याने अपिलार्थीने त्या प्राधिकरणाकडे आपल्या सेवानिवृत्ती वेतनासंदर्भातील गाऱ्हाण्याची तड लावून घ्यावी.

या प्रकरणी आयोगास असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस १७ पृष्ठांची माहिती टपालाद्वारे पुरविली आहे व यासाठी त्यांना एकूण ५९/- रु. इतका खर्च आला असताना, त्यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे शुल्क म्हणून रु. १५०/- इतके वसूल केले आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले जास्तीचे शुल्क रु. ९१/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत मनीऑर्डरने परत पाठवावे. मनीऑर्डरच्या कमिशनपोटीचा खर्च जन माहिती अधिकारी यांच्या संस्थेने सहन करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. ९१/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत मनीऑर्डरद्वारे परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १५-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सचिन सुर्यकांत सुरडकर, रा. एन.-७, के.-७, सिडको, बजरंग कॉलनी, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उपप्राचार्य, सरस्वती भुवन विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, सरस्वती भुवन विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२३९

निर्णय दिनांक १५-०५-२०१०

१ श्री. रामा बापु गावंडे, : अपिलार्थी

अध्यक्ष सत्यशोधक, से. भा. संस्था, सोयगाव,

ता. सोयगाव, जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

पोलीस निरीक्षक, जिल्हा पेठ पोलीस स्टेशन, जळगाव

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगाव

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप विभागीय पोलीस अधिकारी जळगाव उपविभाग, जळगाव

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मागणी केलेली माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये पोलीस

निरीक्षक, जिल्हा पेठ पोलीस स्टेशन, जळगाव यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्रीमती ज्योती नंदू पाटील यांच्या मृत्यू संदर्भात काही माहिती एकूण ३ मुद्यांद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०४-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक यांनी दिनांक १६-०४-२००९ रोजी निर्णय देऊन उपविभागीय पोलीस अधिकारी, जळगाव यांना अपिलार्थीस त्यांच्या रेकॉर्डवरील उपलब्ध माहिती विनामूल्य देण्याचे सूचित केले व अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. तथापि यानंतर अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधींनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अमळनेर, उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित आहे.

अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावरील निर्णयाचे अवलोकन केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०१-०४-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देताना उपविभागीय पोलीस अधिकारी, अमळनेर यांना पक्षकार केलेले नाही. त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांचा दिनांक १६-०४-२००९ रोजीचा दिलेला निर्णय चुकीचा आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पोलीस अधीक्षक यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०१-०४-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच

३० दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपले आदेश याच कालावधीमध्ये पारित करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, अपिलार्थी अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, हे आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालील-प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दिनांक ०१-०४-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १५-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रामा बापु गावंडे, अध्यक्ष सत्यशोधक, से. भा. संस्था, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, जळगाव उपविभाग जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२४०

निर्णय दिनांक १५-०५-२०१०

१ श्री. शेख नईम मोईनोउद्दीन, : अपिलार्थी
मु. पो. पिशोर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद कार्यालय,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मुख्याध्यापक, नॅशनल उर्दू प्राथमिक शाळा,
पिशोर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : मुख्याध्यापक, नॅशनल उर्दू प्राथमिक शाळा,
पिशोर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना अपूर्ण माहिती मिळाल्याचे नमूद केले असून, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी शालेय समितीची स्थापना व १६ शिक्षकांचे रुजू आदेश व जॉईनिंग रिपोर्ट यापैकी १३ शिक्षकांचे जॉईनिंग रिपोर्ट दिले व बाकी ३ शिक्षकांचे जॉईनिंग रिपोर्ट दिले नाहीत व १६ शिक्षकांचे रुजू आदेश दिले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांनी ही माहिती

देण्याचे मुख्याध्यापकांना आदेशित करुनही त्यांनी ही माहिती अपिलार्थीस दिली नसल्याचे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास या अपील अर्जाद्वारे आणले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, नॅशनल उर्दू प्राथमिक शाळा, पिशोर, तालुका कन्नड यांच्या संस्थेची शाळा समिती, पदाधिकारी व संस्थेची नावे, शाळा स्थापनेपासून ते आजपर्यंत, नॅशनल उर्दू प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापक व कार्यरत शिक्षक, शाळा सोडून गेलेले शिक्षक, एकूण १६ लोकांचे नियुक्ती आदेश व रुजू आदेशाची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नॅशनल उर्दू प्राथमिक शाळा पिशोर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद यांनी त्यांच्याकडील दिनांक २७-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या संस्थेने शाळा स्थापना झाल्या-पासून शालेय समिती स्थापन केली नसल्याचे अपिलार्थीस अवगत केले व नॅशनल उर्दू प्राथमिक शाळा पिशोर या शाळेच्या स्थापनेपासून ते आजपर्यंत नेमलेल्या शिक्षकांच्यापैकी एकूण १३ शिक्षकांच्या नियुक्ती आदेशाची प्रत देऊन त्यांचे रुजू आदेश वैयक्तिक मान्यता घेण्याकरिता शिक्षणाधिकारी कार्यालयास सादर करण्यात आले असल्याचे अपिलार्थीस अवगत केले. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-०६-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस उर्वरित ३ शिक्षकांचे नियुक्ती आदेश, १६ शिक्षकांचे रुजू आदेश व शाळा समिती स्थापनेसंदर्भात उर्वरित माहिती १० दिवसाच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या कालावधीत अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आणि जन माहिती अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो १६ शिक्षकांचे नियुक्ती आदेश व रुजू आदेश प्राप्त झालेले नाहीत. या आदेशाच्या प्रती त्यांना त्वरित मिळाव्यात, अशी अपेक्षा त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये व्यक्त केली.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये त्यांना ज्या कालावधीशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे त्या कालावधीचा उल्लेख केलेला नाही. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २७-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी एकूण १३ शिक्षकांच्या नियुक्ती आदेशाच्या सत्यप्रती अपिलार्थीस विनामूल्य पुरविल्या आहेत. तथापि संबंधितांचे रुजू आदेश त्यावेळी मुख्याध्यापकाकडे उपलब्ध नसल्यामुळे व हे आदेश मूळ प्रतीत त्यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे पाठविले असल्यामुळे, त्यांना अपिलार्थीस या मुद्यावर माहिती देता आली नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे आता ती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस पुरवावी लागेल. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी व्यपगत झाला असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आता उर्वरित माहिती अधिनियमातील कलम ७ (६) मध्ये विनामूल्य पुरवावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अद्यापपावेतो द्यावयाच्या राहिलेल्या ३ शिक्षकांच्या नियुक्ती आदेशाच्या सत्यप्रती व १६ शिक्षकांच्या रुजू आदेशाच्या सत्यप्रती त्यांनी, आवश्यक वाटल्यास, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,

औरंगाबाद यांच्या कार्यालयाकडून त्या प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील शालेय समितीच्या स्थापने-संदर्भात त्यांच्या संस्थेने शाळा स्थापन झाल्यापासून शालेय समितीची स्थापना केली नाही किंवा सदस्यांची नेमणूक केलेली नाही, असे दिनांक २७-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे त्यांना कळविले आहे. यासंदर्भात अपिलार्थीचा काही आक्षेप असल्यास त्यांनी शिक्षण विभागाच्या वरिष्ठ प्राधिकरणाकडे त्यांच्या आक्षेपाची नोंद करुन त्यांच्याकडून, या मुद्यावरील त्यांच्या गाऱ्हाण्याची तड लावून घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्याध्यापक, नॅशनल उर्दू प्राथमिक शाळा, पशोर, ता. कन्नड यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती आता त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १५-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेख नईम मोईनोउद्दीन, मु. पो. पिशोर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नॅशनल उर्दू प्राथमिक शाळा, पिशोर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२४६

निर्णय दिनांक १५-०५-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. दत्ता सटवाजी धनवे,<br>रा. वडाचीवाडी, पोस्ट दुधड, तालुका हिमायतनगर,<br>जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>पंचायत समिती कार्यालय, हिमायतनगर, तालुका<br>हिमायतनगर, जिल्हा नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हिमायतनगर,<br>तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, दुधड, तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड |
| | जन अपिलीय अधिकारी | : | विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती कार्यालय, हिमायतनगर, तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०८-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक १५-०५-२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, विचाराधीन व्दितीय अपिलासंदर्भातील मूळ अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता प्राप्त झाली असून प्राप्त माहितीसंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नाही, त्यामुळे ते त्यांचे विचाराधीन अपील क्रमांक १२४६/२००९ स्वखुषीने मागे घेत आहेत.

खुद्द अपिलार्थीनेच त्यांचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील आता मागे घेतले असल्याने व ते रद्द करण्याची त्यांनी विनंती केली असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १५-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दत्ता सटवाजी धनवे, रा. वडाचीवाडी, पोस्ट दुधड, तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, दुधड, तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती कार्यालय, हिमायतनगर, तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२४७

निर्णय दिनांक  १५-०५-२०१०

१ श्री. स. मंजूर अली स. खुर्शीद अली, : अपिलार्थी
रा. बरकतपुरा, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा
(कन्या), अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, अर्धापूर,
तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०८-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३१-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा (कन्या), अर्धापूर

यांच्याकडे, त्यांच्या शाळेतील शिक्षकांच्या संदर्भात एकूण तीन मुद्दयाव्दारे काही माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - शाळेतील शिक्षकांची रुजू झालेल्या तारखेसहीत यादी, त्यांच्या शाळेतील सर्व शिक्षक कोणकोणत्या गावाहून दररोज येणेजाणे करतात त्याचा खर्चासह तपशील, तसेच शाळेतील शिक्षकांपैकी किती शिक्षक मुख्यालयी राहतात त्या निवासाचे फोटो, घर क्रमांक व घरभाडे पावती (जानेवारी २००९) सह - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सन २००८-०९ असा कालावधीशी संबंधित होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, अर्धापूर यांच्याकडे दिनांक २७-०५-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर निर्णय न होऊ शकल्यामुळे व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांच्या मूळ अर्जातील, शाळेतील सर्व शिक्षक दररोज कोणकोणत्या गावाहून शाळेत येणेजाणे करतात त्यांच्या खर्चाचा तपशील, ही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही, कारण अशा प्रकारची माहिती अधिकृतरित्या अथवा अनधिकृतरित्या ते संबंधित शिक्षकांकडून मिळवत नाहीत. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व ३ शी संबंधित माहिती त्यांच्याकडे उपलब्ध असून, ती माहिती ते अपिलार्थीस देण्यास तयार आहेत. यासंदर्भात अपिलार्थीस त्यांनी माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले असता, अपिलार्थी त्यांच्याकडून ही माहिती अद्यापपावेतो घेऊन गेलेले नाहीत, त्यामुळे अपिलार्थीस माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. तसेच अपिलार्थीने

माहितीसाठीचा मूळ अर्ज केल्यानंतर, या माहितीच्या संदर्भात अपिलार्थीने त्यांच्याशी या माहितीसंदर्भात कधीही संपर्क साधलेला नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीपैकी, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ३ शी संबंधित माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची नाही. अपिलार्थीने ज्या माहिती अधिका-याकडे ही माहिती मागितली आहे ते माहिती अधिकारी एका जिल्हा परिषदेच्या शाळेचे मुख्याध्यापक आहेत. जिल्हा परिषदेमध्ये शिक्षकांना त्यांच्या पगारामध्ये दरमहा घरभाडे अदा करताना त्यांच्याकडून पुरावा म्हणून घरभाड्याच्या पावतीची मागणी करण्याचे नियम अथवा तशी पध्दत प्रचलीत नाही, त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या शाळेतील शिक्षक कोणकोणत्या गावाहून दररोज येणेजाणे करतात त्याचा तपशील आणि घराचे भाडे, घरभाडे पावती, घर क्रमांक ही माहिती, ती सार्वजनिक स्वरुपाची नसल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित शाळेतील शिक्षकांची ते शाळेत रुजू झाल्यापासूनची दिनांकासह यादी ही माहिती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेता येईल. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या मुद्दयावरील व मुद्दा क्रमांक ३ वरील त्यांच्या शाळेतील सर्व शिक्षक मुख्यालयी राहत असल्याबाबतची माहिती अपिलार्थीस देण्याची आयोगासमोर तयारी दर्शविली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार, अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर त्यांच्या अर्जासंदर्भातील पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे उत्तरदायित्व संबंधित अर्जदाराचे असते. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचे हे उत्तरदायित्व योग्य प्रकारे पार पाडले नसल्याचे, जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादावरुन

दिसून येत आहे. तसेच या संदर्भात अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत या मुद्दयासंदर्भात कोणताही सबळ पुरावा जोडलेला नसल्यामुळे, अपिलार्थीने त्यांचे उत्तरदायित्व योग्य प्रकारे पार पाडले नसल्याच्या आयोगाच्या निष्कर्षाचे दृढीकरण होत आहे, त्यामुळे आता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी मागणी केलेल्या माहितीतील त्यांना देय असलेली माहिती ही सशुल्क प्राप्त करुन घ्यावी लागेल. ही माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थीस सात दिवसाची मुदत देण्यात येत आहे व जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित संपूर्ण व मुद्दा क्रमांक ३ मधील त्यांच्या शाळेतील किती शिक्षक मुख्यालयी राहतात यासंदर्भातील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत सशुल्क व व्यक्तिशः पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी मुख्याध्यापक, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा (कन्या), अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांच्या कार्यालयातून हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व सशुल्क हस्तगत करुन घ्यावी, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व ३ मधील मुख्यालयी राहत असलेल्या शिक्षकासंदर्भातील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत व्यक्तिशः व सशुल्क पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १५-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. स. मंजूर अली स. खुर्शीद अली, रा. बरकतपुरा, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा (कन्या), अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी, तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२४८

निर्णय दिनांक १५-०५-२०१०

१ श्री. मधुकर सखाराम थिट्टे, : अपिलार्थी
रा. मकोडी, तालुका सेनगांव, जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सेनगांव, तालुका
सेनगांव, जिल्हा हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपजिल्हाधिकारी, हिंगोली

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : उपविभागीय अधिकारी (महसूल), हिंगोली
त्रयस्थ पक्ष : श्री. सुभाष उत्तमराव चाटसे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने तहसीलदार, सेनगांव यांच्याकडून त्यांना माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व त्यांना आवश्यक असलेल्या माहितीच्या संदर्भात ' केरोसीन उचलाबाबत माहे डिसेंबर २००८ चे मौजे मकोडी येथील पर्यायी व्यवस्था श्री. सुभाष उत्तमराव चाटसे मौजे पिंपरी, तालुका सेनगांव, जिल्हा हिंगोली यांनी उचलाबाबत माहिती ' असे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

' माहे डिसेंबर २००८ चे केरोसीन उचलाबाबत श्री. सुभाष उत्तमराव चाटसे (पिंपरी) लिंग '

ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्या माध्यमाव्दारे अपेक्षित आहे, याचा त्यांनी या अर्जामध्ये कोणताही उल्लेख केला नाही.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०६-०४-२००९ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीचे अपील मान्य केले व जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, सेनगांव यांना अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष गैरहजर व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे मोघम स्वरुपाची माहिती मागितली आहे, तथापि या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस बोलावून त्यांना दाखविण्यासाठी ते तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०४-०२-२००९ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले

असता, त्यावरुन अपिलार्थीस "केरोसीन उचलाबाबतची डिसेबर २००८ शी संबंधित माहिती" म्हणजे नेमकी कोणत्या मुद्दयावरील माहिती हवी आहे याचा बोध होत नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मोघम स्वरुपात माहितीची मागणी केली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागताना ती स्पष्ट स्वरुपात आणि नेमकी मागविणे अभिप्रेत आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मोघम स्वरुपात माहिती मागविल्याचे आयोगास आढळून येत आहे. त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांच्या मूळ माहितीची व्याप्ती वाढविल्याचे आयोगास आयोगास आढळून येत आहे. यासंदर्भात अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी जन माहिती अधिका-याकडून, त्यांनी त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये मागणी केलेल्या वाढीव व्याप्तीची माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी, जन माहिती अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार स्वतंत्र अर्ज करावा म्हणजे त्यांना त्यांच्या या प्रकरणाशी संबंधित मूळ अर्जातील वाढीव व्याप्तीची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेता येईल. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार, अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जी माहिती मागितली आहे, तिचे मोघम स्वरुप पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १५-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मधुकर सखाराम थिट्टे, रा. मकोडी, तालुका सेनगांव, जिल्हा हिंगोली.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सेनगांव, तालुका सेनगांव, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२४९

निर्णय दिनांक १५-०५-२०१०

१ श्री. ए. डी. पाटील, : अपिलार्थी
डॉ. जाधव गल्ली, छाजेडनगर, कन्नड, तालुका कन्नड,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),
जिल्हा परिषद, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : १. कार्यालयीन अधीक्षक, पंचायत विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद
२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कन्नड, जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक १५-०५-२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर करण्यात आले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, विचाराधीन व्दितीय अपिलासंदर्भातील मूळ अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता प्राप्त झाली असून प्राप्त माहितीसंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नाही, त्यामुळे ते त्यांचे विचाराधीन अपील क्रमांक १२४९/२००९ स्वखुषीने मागे घेत आहेत.

खुद्द अपिलार्थीनेच त्यांचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील आता मागे घेतले असल्याने व ते रद्द करण्याची त्यांनी विनंती केली असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १५-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. ए. डी. पाटील, डॉ. जाधव गल्ली, छाजेडनगर, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, पंचायत विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कन्नड, जिल्हा औरंगाबाद

४ जन अपिलीय अधिकारी, तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२९१३

निर्णय दिनांक १५-०५-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मुरलीधर बजरंग चांडगे,<br>म्युन्सिपल कॉलनी, दर्गा रोड, परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उप आयुक्त (आस्था), विभागीय आयुक्त कार्यालय,<br>औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी,<br>तथा अपर आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय,<br>औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-१२-२००८ रोजी फेरसादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी वेळोवेळी केलेल्या निवेदनानुसार वेळीच कार्यवाही केली किंवा कसे याबाबतची निवेदननिहाय माहिती प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी, विचाराधीन अपील आयोगाकडे केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०२-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांनी स्वतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेळोवेळी दिलेल्या निवेदनावर केलेल्या कार्यवाहीविषयी एकूण चार मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - अपिलार्थीने दिलेल्या दिनांक ०७-०४-२००३ रोजीच्या आक्षेप निवेदनावर व निवेदन दिनांक ०७-०४-०३, ३०-०९-२००५, १३-०१२-२००५, १७-१२-०५, १९-०६-२००६, २३-११-२००६, २५-०३-२००७ व ०२-०७-२००७ या निवेदनावर केलेल्या कार्यवाहीची प्रत, अपिलार्थीच्या दिनांक १९-०३-२००७ रोजीच्या आमरण उपोषणाच्या नोटीसीवर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही आणि शासनाने दिनांक ०१-०८-१९९६ पासून सुधारीत जेष्ठतासूची करण्याबाबत दिलेल्या पत्राची प्रत - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०२-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस पुरविली, तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-०९-२००७ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर व जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०२-०८-२००७ रोजी त्यांच्या मूळ अर्जाशी संबंधित संपूर्ण माहिती पुरविल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली माहिती, विशेषतः जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या त्यांच्याकडील दिनांक ०२-०८-२००७ रोजीच्या कथित माहितीचे अवलोकन केले असता, आयोगास असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या

माहितीमध्ये दिनांक १९-०३-२००७ रोजीच्या नोटिशीवर करण्यात आलेली कार्यवाही व शासनाच्या दिनांक ०१-०८-१९९६ पासून सुधारीत ज्येष्ठता सूची करण्याबाबत दिलेल्या आदेशाच्या पत्राची प्रत या मुद्दयांवरील माहितीचा यामध्ये समावेश नाही असे आढळून येत आहे. अपिलार्थीच्या दिनांक १९-०३-२००७ रोजीच्या आमरण उपोषणाच्या नोटिशीवर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही म्हणजे, अपिलार्थीची आमरण उपोषणाची नोटीस त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून या विषयासंदर्भात त्यांनी वेगवेगळ्या प्राधिकरणाशी केलेला पत्रव्यवहार आणि या विषयी त्यांच्या-कडील अभिलेख्यावर उपलब्ध असलेल्या दिनांक ०३-०७-२००७ पर्यंतच्या टिपणीच्या प्रती, ही होय. ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविली नसल्याचे आयोगास आढळून आले. तसेच शासनाकडून जन माहिती अधिकारी यांना दिनांक ०१-०८-१९९६ पासून ज्येष्ठता सूची करण्याबाबत दिलेल्या आदेशाची प्रत, जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविली, तथापि या प्रतीचा समावेश त्यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीमध्ये नाही. यावरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जामधील मुद्दा क्रमांक ३ व ४ शी संबंधित माहिती अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही.

अपिलार्थीने मागणी केलेल्या या मुद्दयांवरील माहिती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांना ती अपिलार्थीस, सशुल्क माहिती देण्याचा कालावधी व्यपगत झाला असल्यामुळे, त्यांना ती अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (६) प्रमाणे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी लागेल. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ४ शी संबधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून निवेदननिहाय माहिती प्राप्त झाली नाही असे त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील करण्याचे कारण दर्शविले आहे. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अपिलार्थीने या

प्रकरणी मूळात त्यांच्या मूळ अर्जाव्दारे निवेदननिहाय माहिती मागितलेली नाही, त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती निवेदननिहाय देय होत नाही. अपिलार्थीच्या निवेदनावर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने वेगवेगळ्या प्राधिकरणाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०२-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे पुरविल्या आहेत, त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ ची माहिती पुरविल्याचे सिध्द होत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ४ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १५-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुरलीधर बजरंग चांडगे, म्युन्सिपल कॉलनी, दर्गा रोड, परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त (आस्था), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२५८
निर्णय दिनांक : १७.०५.२०१०

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.मल्लिकार्जुन श्रीरंग पाटील,<br>रा. उजनी, ता.औसा, जि.लातूर. | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>श्री गणेश विद्यालय, उजनी, ता.औसा,<br>जि.लातूर. | : प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, लातूर. | |

त्रयस्थ पक्ष : श्री. जे.अ.मुकडे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७.०७.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ च्या संदर्भातील माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले असल्याचे नमूद करुन त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ शी संबंधित माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०५.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित काही माहिती एकूण चार मुद्यांद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती अपिलार्थीस पुरवली. तथापि ही माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०६.०५.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.०६.२००९ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १,२ व ४ शी संबंधित माहिती देण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी त्रयस्थ पक्षासह उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी सर्व संबंधितांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती वगळता उर्वरित माहिती दि. २६.०६.२००९ रोजी उपलब्ध करुन दिली आह. या प्रकरणाची पार्श्वभूमी स्पष्ट करताना त्यांनी आयोगास असे सांगितले की, अपिलार्थीने ज्या त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात त्यांच्याकडे माहितीची मागणी केली आहे तो त्रयस्थ पक्ष श्री. जे.अ.मुकडे, यांची त्यांच्या संस्थेमार्फत दि. २१.०८.२००६ ते २०.०८.२००९ या कालावधीकरिता शिक्षण सेवक म्हणून नेमणूक करण्यात आली होती. तथापि या नेमणूकीस शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.लातूर यांनी मान्यता नाकारल्यानंतर श्री. मुकडे यांनी मा. न्यायालयाकडे धाव घेतली व मा. न्यायालयाच्या निर्णयानुसार शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी त्यांच्याकडील दि. २३.१०.२००८ रोजीच्या आदेशान्वये श्री. मुकडे यांच्या नेमणूकीस दि. १५.०६.२००७ या मानीव दिनांकास मान्यता दिली. श्री. मुकडे यांच्या कथित दि. १५.०६.२००७ रोजीच्या नेमणूकीसंदर्भात

त्यांनी अपिलार्थीस दि. २९.०६.२००९ रोजी आवश्यक तो खुलासा सादर केला असून यासंदर्भात अपिलार्थीस ही माहिती मिळाल्याची पोच त्यांनी आयोगास दाखविली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केलेली वस्तुस्थिती व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. २ मधील श्री. जे.अ.मुकडे यांच्या नेमणूकीचे दि. १५.०६.२००७ रोजीचे आदेश मूळात अस्तित्त्वात नसल्यामुळे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अमूर्त स्वरुपातील असल्याचे सिध्द होत आहे.श्री. मुकडे यांच्या शिक्षण सेवक या पदावरील नेमणूकीच्या आदेशानंतर शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, लातूर यांनी श्री. मुकडे यांना दिलेला मानीव दिनांक १५.०६.२००७ व यासंदर्भातील आवश्यक तो खुलासा अपिलार्थीस प्राप्त झाला असल्याने, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता कोणतीही माहिती प्राप्त होणे बाकी नसल्याचे आयोगास आढळून येत आहे व जी माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो प्राप्त होणे बाकी असल्याचे त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केले आहे, ती माहिती मूळात अस्तित्त्वात नसल्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होणार नाही व यासंदर्भातील आवश्यक ती सर्व कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक १७.०५.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.मल्लिकार्जुन श्रीरंग पाटील,रा. उजनी, ता.औसा, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,श्री गणेश विद्यालय, उजनी, ता.औसा, जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२५९

निर्णय दिनांक : १७.०५.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.सौदागर म.रफी पाशामियॉ,<br>रा.वलांडी, ता.देवणी, जि.लातूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>पोलीस निरीक्षक,<br>पोलीस ठाणे, देवणी, जि.लातूर | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस अधीक्षक, लातूर | | |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपविभागीय पोलीस अधिकारी, निलंगा, जि.लातूर

जन अपिलीय अधिकारी : अपर पोलीस अधीक्षक, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५.०६.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती न दिल्याने आणि जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर अद्यापि आदेश न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व या अर्जाद्वारे आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १९.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे गु.र.नं.९५/०८ च्या संदर्भात अटकसूचीची फॉर्म यादी, आरोपी दाखल फिर्याद मूळ कागदपत्रांची प्रत, एफ.आय.आर.प्रत,पंचनामा प्रत, दि. ०१.१०.२००८ रोजी गु. र.नं. ९५/०८

मधील अटक केलेल्या आरोपींची नावे व अटक करतेवेळेस साक्षीदारांची नावे असलेल्या कागदपत्रांच्या प्रती आणि गुन्हयातील संबंधित कागदपत्रे, अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने माहितीसाठीचा सदरचा अर्ज पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे, देवणी यांना उद्देशून केला होता. अपिलार्थीने पोलीस निरीक्षक, देवणी यांच्याकडे केलेला अर्ज माहितीच्या अधिकाराखाली केला असल्याने व या प्रकरणी, पोलीस निरीक्षक, देवणी हे माहिती अधिकारी म्हणून नेमले गेले नसल्यामुळे त्यांनी अपिलार्थीचा दि. १९.०३.२००९ रोजीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, निलंगा यांच्याकडे दि. ०४.०५.२००९ रोजीच्या पत्राद्वारे पाठविला. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०८.०५.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली कागदपत्रे त्यांनी कोर्टात सादर केली असल्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या वकिलामार्फत ही कागदपत्रे त्यांना कोर्टाकडून परस्पर उपलब्ध करुन घेण्याचे सूचित केले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दि. २९.०४.२००९ रोजी पोलीस अधीक्षक, लातूर यांच्याकडे प्रथम अपील केले असता या अपिलावर निर्णय न लागल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दि. १९.०३.२००९ रोजीच्या अर्जास त्यांनी दि. ०८.०५.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती न्यायालयाकडून त्यांच्या वकिलामार्फत उपलब्ध करुन घेण्याची समज दिली. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आज रोजी उपलब्ध नाही.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी अपिलार्थीने मूळात त्यांचा

माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, निलंगा यांच्याकडे न करता तो पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे, देवणी यांच्याकडे दि. १९.०३.२००९ रोजी सादर केला आहे. अर्जदाराने मागणी केलेली माहिती, सार्वजनिक प्राधिकरणाच्या संबंधित अधिकाऱ्याकडे उपलब्ध नसल्यास माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेल्या अर्जातील माहिती ज्या प्राधिकरणाकडे उपलब्ध आहे, त्या प्राधिकरणाकडे अर्जदाराचा अर्ज प्राप्त होताच पाच दिवसांच्या आत पाठवून देऊन त्या पत्राची प्रत अर्जदारास देणे अशाप्रकारची कार्यवाही करणे त्यांना भाग होते. तथापि ही कृती पोलीस निरीक्षक, देवणी यांनी पाच दिवसांच्या आत न करता सुमारे पावणे दोन महिन्याच्या विलंबाने केली आहे. या विलंबास अपिलार्थीस जबाबदार धरता येणार नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असून तिचे स्वरुप सार्वजनिक आहे. त्यामुळे उपविभागीय पोलीस अधिकारी, निलंगा यांना ही माहिती अपिलार्थीस आता कोर्टाकडून प्राप्त करुन घेऊन ती विनामूल्य पुरवावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, निलंगा यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य व टपालाद्वारे पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, निलंगा यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती कोर्टाकडून उपलब्ध करुन घेऊन, अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक १७.०५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.सौदागर म.रफ पाशामियॉ,रा.वलांडी, ता.देवणी, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,निलंगा, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२६०

निर्णय दिनांक : १७.०५.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. एस.एम.फारुकी,<br>रा.परभणी. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>कृषि विकास अधिकारी,<br>जिल्हा परिषद, परभणी. | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, परभणी. | | |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : जिल्हा कृषि अधिकारी,
जिल्हा परिषद, परभणी
जन अपिलीय अधिकारी : कृषि विकास अधिकारी,
जिल्हा परिषद, परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना ज्येष्ठता यादीनुसार पूर्वलक्षी प्रभावाने पदोन्नती मिळणेबाबत माहिती मिळावी म्हणून त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०७.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, 'ज्येष्ठता यादीनुसार पूर्वलक्षी प्रभावाने पदोन्नती मिळणेबाबत' या विषयावर, "मी दिलेल्या अर्जाची यादी आणि अर्जाची झेरॉक्स प्रती जोडली आहे. इतके अर्ज देऊन मला पदोन्नती मिळाली नाही व त्याची कारणे देण्यात यावीत, मला पदोन्नती व डीमडेट ताबडतोब द्यावे", अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १५.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस असे अवगत केले की, माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कारणे देण्याची आणि मानीव दिनांक मंजूर करणेबाबत प्रावधान नाही. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या अशाप्रकारच्या अभिप्रायाबरोबरच अपिलार्थीस पदोन्नती न देण्याबाबतची कारणे पुढे दिली आहेत. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २९.१२.२००७ (सदर तारीख चुकीची आहे) रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०३.०३.२००८ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीस दि. १५.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे कळविलेली कार्यवाही नियमाप्रमाणे असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले असल्याचे दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी दि. १५.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांची भूमिका अपिलार्थीस स्पष्ट केल्याचे आयोगास अवगत केले.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ०७.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी वेळोवेळी अर्ज

करुनही त्यांना पदोन्नती न देण्याबाबतची कारणे अशी माहिती मागवून, त्यांना पदोन्नती व मानीव दिनांक देण्याची विनंती केली आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी पूर्णपणे विसंगत आहे. माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे इतपतच सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबाबतची कारणे अथवा स्पष्टीकरणे मागणे आणि जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांच्या कृतीबद्दलची अथवा निर्णयाबद्दलची कारणे व स्पष्टीकरणे देणे अशाप्रकारच्या प्रक्रियांचा माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींमध्ये समावेश नाही. त्याचबरोबर अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या पदोन्नती व मानीव दिनांक ताबडतोब द्यावा, अशी विनंती केली आहे. या मुद्याद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही माहितीची मागणी केलेली नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून या अर्जाद्वारे अपेक्षित केलेली कार्यवाही ही पूर्णपणे प्रशासकीय स्वरुपाची असून अशाप्रकारच्या प्रशासकीय कार्यवाहीच्या विनंतीसंदर्भात निर्णय देण्यासाठी वेगळे स्वतंत्र प्राधिकरण उपलब्ध आहे. अपिलार्थीस आवश्यक वाटल्यास त्या प्राधिकरणाकडे ते आपली विनंती नोंदवू शकतात व गाऱ्हाण्याची तड लावून घेऊ शकतात. अशाप्रकारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, अधिनियमातील तरतुदींशी मूळात सुसंगत नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडून ती अपिलार्थीस मूळात देय होत नाही. परिणामी अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १७.०५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. एस.एम.फारुकी,रा.संत तुकारामनगर, विसावा नाका,पाथरी रोड,परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा कृषि अधिकारी,जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कृषि विकास अधिकारी,जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२६१

निर्णय दिनांक : १७.०५.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती विमल गणपत निला,<br>रा.कबनसांगवी, ता.चाकूर, जि.लातूर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण),<br>जिल्हा परिषद, लातूर. | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, लातूर. | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३.०६.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २७.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"1) टी.सी.ची बनावटची कॉपी,

2) 96 ची नेमणूक आदेश 87 चा नेमणूक आदेश

1) कोर्टाची व अधिकारी यांना देवून दिशाभुल केल्या नवि पासचा खोटा दाखल माझ्या नावे तयार केल्याचे मुळ शिक्षणास शाहजानी औराद या शाळेचा नावार तयार केलेली टी.सी. ची माहिती व टी.सी.देण्यात यावे

2) कोर्टत व मा.आयूक्त साहेब यांना दि. १७-११-२००८ या आपील संमधित दाखल केलेले पुर्णनेमणूक आदेश देण्यात यावे."

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतला आहे.)

अपिलार्थीने सदरची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीने हा अर्ज उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण) जिल्हा परिषद, लातूर यांना उद्देशून केला होता. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याने त्यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीच्या अर्जाची प्रत, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या प्राधिकरणाकडे उपलब्ध आहे, त्या प्राधिकरणाकडे, म्हणजे बाल विकास प्रकल्प अधिकारी, चाकूर यांच्याकडे दि. ०२.०३.२००९ रोजीच्या पत्राद्वारे पाठवून दिली. तथापि बाल विकास प्रकल्प अधिकारी, चाकूर यांनी या अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०८.०४.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १८.०५.२००९ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीस तात्काळ विनामूल्य माहिती देण्याचे प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवायोजना, चाकूर यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, चाकूर हे उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना हवी असल्याचा युक्तिवाद आयोगासमोर केला.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी या त्यांच्या प्राधिकरणाकडे अंगणवाडी सेविका या पदावर कार्यरत होत्या. या पदावरुन त्यांना प्रशासकीय कारणास्तव सेवेतून कमी करण्यात आले असून वारंवार त्यांच्या कार्यालयासमोर, आयुक्त कार्यालयासमोर उपोषणास बसणे आणि सतत गैरहजर राहणे या कारणास्तव त्यांना नोकरीतून कमी करण्यात आले आहे. अपिलार्थीने त्यांच्या नेमणूकीच्या वेळी त्यांच्या अर्जासोबत सादर केलेल्या टी.सी.ची प्रत खोटी आढळल्यामुळे, अपिलार्थीने त्यांची त्यावेळी दाखल केलेली कागदपत्रे पोलीस स्टेशन उदगीर येथे पुढील चौकशीसाठी देण्यात आली आहेत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र. १ शी संबंधित माहिती पोलीस स्टेशन उदगीरकडे उपलब्ध आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या १९९६ च्या व १९८७ च्या नेमणूक आदेशाच्या प्रती मागितल्या आहेत. तथापि १९९६ साली अपिलार्थीची नेमणूक झाली नव्हती, या मुद्यावर अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी यांनी मा. न्यायालयामध्ये त्यांची १९९६ साली नेमणूक झाली असल्याचे नमूद केले होते, असे आयोगास सांगितले. तथापि यासंदर्भात कोणताही सबळ पुरावा त्या आयोगास सादर करु शकल्या नाहीत, त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील १९८७ च्या नेमणूक आदेशाच्या प्रती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस या मुद्यासंदर्भात द्याव्या लागतील.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे, याचा आयोगास बोध होत नाही. आज रोजी आयोगासमोर अपिलार्थीने केलेल्या युक्तिवादावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कथित बनावट टी.सी.ची प्रत, त्यांच्या १९९६ व १९८७ मध्ये दिलेल्या नेमणूक

आदेशाच्या प्रती, अशी माहिती हवी असल्याचे आढळून येत आहे. यापैकी अपिलार्थीची सन १९९६ ची नेमणूकीची प्रत मूळात अस्तित्त्वात आहे किंवा कसे, हे आयोगास कळण्यास मार्ग नाही, कारण यासंदर्भात अपिलार्थीने ही माहिती अस्तित्त्वात असल्याबाबतचा कोणताही सबळ पुरावा आयोगाकडे सादर केलेला नाही. त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस १९८७ सालच्या नेमणूकीचे आदेश आणि कथित बनावट टी.सी.ची प्रत व त्यांच्या मूळ अर्जातील इतर अनुषंगिक माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जर उदगीर पोलीस स्टेशनकडे उपलब्ध होती तर जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांच्या आत उदगीर पोलीस स्टेशनकडे पाठवून त्या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस देणे त्यांना भाग होते. तथापि आता अपिलार्थीस माहिती देण्यास विलंब झाला असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी उदगीर पोलीस स्टेशन यांच्याकडे त्यांनी या प्रकरणाशी संबंधित दाखल केलेल्या कागदपत्रांमधील अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कागदपत्राच्या प्रती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात,वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे उदगीर पोलीस स्टेशन यांच्याकडे त्यांनी या प्रकरणी दाखल केलेल्या कागदपत्रांमधील अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित

कागदपत्रांच्या प्रती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवाव्यात.

**औरंगाबाद**
**दिनांक : १७.०५.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्रीमती विमल गणपत निला,रा.कबनसांगवी, (व्हाया नळेगाव), ता.चाकूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२५४

निर्णय दिनांक १७-०५-२०१०

१ श्री. दिगंबर भिकाजी वानेगावकर, : अपिलार्थी
रा. ब्लॉक नं. ५, सेंट्रल फॅसिलीटी बिल्डींग, एन - ७,
सिडको, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
प्रादेशिक दुग्ध विकास अधिकारी, शासकीय दूध योजना,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
प्रादेशिक दुग्ध विकास अधिकारी, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : प्रशासकीय अधिकारी, प्रादेशिक दुग्ध विकास अधिकारी कार्यालय, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : उपायुक्त प्रशासन (दुग्ध व्यवसाय), मुंबई

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्यामुळे व त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती उपलब्ध न झाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, प्रादेशिक दुग्ध विकास अधिकारी यांच्या कार्यालयाकडील, जानेवारी २००७ ते दिनांक २५-०२-२००९ या कालावधीशी संबंधित काही माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जानेवारी २००८ मध्ये कार्यालयाने दिलेल्या जाहिरातीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयाने विविध पदांसाठी अर्ज मागविले होते, त्यांच्या लेखी परीक्षा घेऊन निवड करण्यात आलेल्या उमेदवारांच्या संपूर्ण प्रक्रियेच्या संचिकेच्या व संबंधित उमेदवाराच्या नियुक्ती पत्राच्या प्रती, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने जानेवारी २००७ ते दि. २६-०२-२००९ पर्यंत दिलेल्या विविध पदावरील व संवर्गातील नियुक्ती व बढती आदेशाच्या प्रती, या कालावधीमध्ये करण्यात आलेल्या बदल्यांच्या आदेशाच्या प्रती, या कालावधीतील अनुशेष - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०९-०४-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २१२/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे अपिलार्थीस सूचित केले. त्याप्रमाणे अपिलर्थीने या शुल्काचा भरणा दिनांक १६-०४-२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०७-०५-२००९ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि मागितलेली माहिती प्राप्त झाली नसल्याच्या कारणास्तव अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०५-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने आणि आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आणि जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ५ मुद्यांद्वारे माहिती मागितली असता, त्यांना फक्त त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात आवश्यक ती माहिती प्राप्त झाली. परंतु ही माहिती अपूर्ण आहे, कारण त्यांनी मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे जानेवारी २००७ ते दि. २५-०२-२००९ पर्यंतची माहिती मागितली असता, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी २३ आक्टोबर २००८ ते २४-०२-२००९ या कालावधीशी संबंधित माहिती दिलेली आहे. या माहितीमध्ये जानेवारी २००७ ते २२ ऑक्टोबर २००८ या कालावधीतील माहितीचा समावेश नाही. या कालावधीमध्ये दिलेल्या बढती संदर्भात अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी कोणतेही भाष्य केलेले नाही. याच बरोबर त्यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित चार मुद्यांवरील कोणतीही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो पुरविलेली नाही. त्यांना पुरविण्यात आलेल्या एकूण ४८ पानाच्या माहितीमध्ये त्यांना नको असलेल्या ३३ पृष्ठांची माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने त्यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती पुरविल्याचे आयोगासमोर कबूल केले. अपिलार्थीस पुरविण्यात आलेली माहिती त्यांना आयोगास दाखविता आली नाही. अपिलार्थीस अपूर्ण माहिती देण्याचे कोणतेही समर्थन त्यांना पुरेपूर संधी देऊनही ते आयोगासमोर करु शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ५ मुद्यांद्वारे व्यक्तिशः माहिती मागविली होती. व्यक्तिशः माहिती मागितल्यानंतर अपिलार्थीने जन माहिती

अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे दिनांक १६-०४-२००९ रोजी आवश्यक त्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे केल्यानंतर त्यांनी दिनांक ३०-०४-२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांना, त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त न झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आणून दिले आहे. यावरुन व्यक्तिशः माहिती मागितल्यानंतर अर्जदाराने पार पाडावयाचे उत्तरदायित्व या प्रकरणी अपिलार्थीने योग्यरित्या पार पाडल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने स्मरणपत्र दिल्यानंतर त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०७-०५-२००९ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि ही माहिती अपूर्ण असल्याचे अपिलार्थीचे म्हणणे आहे. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस अपूर्ण माहिती दिल्याची आयोगासमोर कबूली दिली आहे. अपिलार्थीस संपूर्ण माहिती न देण्याचे समर्थन आयोगाने पुरेपूर संधी देऊनही जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगासमोर करु शकले नाहीत. हे पाहता आता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १,२,४ व ५ शी संबंधित संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी व मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात ऑक्टोबर २००७ ते २२ ऑक्टोबर २००८ या कालावधीमध्ये त्यांच्या कार्यालयाने कोणतेही बढती आदेश पारित केले नसल्यास त्याप्रमाणे अपिलार्थीस कळवावे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दिनांक ३१-०३-२००९ रोजी अगर तत्पूर्वी सशुल्क माहिती देणे अभिप्रेत असताना त्यांना प्रत्यक्षात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०७-०५-२००९ रोजी सशुल्क माहिती पुरविली असल्याने आणि तीही अपूर्ण स्थितीतील असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीकडून त्यांनी माहितीपोटीचे दिनांक १६-०४-२००९ रोजी स्वीकारलेले शुल्क रु. २१२/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत परत करावे लागेल.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कोणत्याही कार्यालयीन दिवशी

पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून, जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी.

या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही कमी कालावधीशी संबंधित असल्याने, मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांच्या कार्यालयाची साधनसामग्री मोठ्या प्रमाणात वळवावी लागत असल्याची कोणतीही बाब या प्रकरणी संभवत नाही. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीला आयोगासमोर अपिलार्थीस अपूर्ण माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कृतीचे, आयोगाने पुरेपूर संधी देऊनही, कोणतेही समर्थन करता आले नाही. हे पाहता या प्रकरणाशी संबंधित सर्व जन माहिती अधिकारी हे अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र होत आहेत. आज रोजी आयोगासमोर जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, प्रादेशिक दुग्ध विकास अधिकारी यांचे कार्यालय हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यांना बचावाची संधी देण्याच्या दृष्टीने असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांच्यावर व या प्रकरणाशी संबंधित त्यांच्या सर्व सहायकांवर, ज्यांना अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतूद आहे अशा सर्वांवर, अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपेक्षित माहितीपासून वंचित ठेवल्याबद्दल एकूण २५,०००/- रु. इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी आयोगास, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत सरळ सादर करावा. या कालावधीमध्ये त्यांचा या संदर्भातील खुलासा प्राप्त न झाल्यास हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

प्रसंगावशात आयोगास असे आढळून आले आहे की, या प्रकरणी उपायुक्त प्रशासन (दुग्ध व्यवसाय), मुंबई तथा जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही सुनावणी घेतल्याचे आयोगास आढळून येत नाही. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचा प्रथम

अपील अर्ज प्रादेशिक दुग्ध विकास अधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे केला आहे. त्यांनी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज उपायुक्त प्रशासन (दुग्ध व्यवसाय), मुंबई यांच्याकडे पाठविला किंवा कसे हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्राच्या अभावी कळण्यास मार्ग नाही. या संदर्भातील संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त, प्रशासन (दुग्ध व्यवसाय), मुंबई यांची भूमिका स्पष्ट करण्यासाठी ते आयोगासमोर उपस्थित नाहीत. हे पाहता, सचिव (दुग्ध विकास) यांनी प्रादेशिक दुग्ध विकास अधिकारी, औरंगाबाद व उपायुक्त प्रशासन (दुग्ध व्यवसाय), मुंबई यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीची यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित उर्वरित माहिती व मुद्दा क्रमांक १,२,४ व ५ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

३. या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व संबंधित सहायक यांच्यावर, त्यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपेक्षित माहितीपासून वंचित ठेवल्याबद्दल एकूण रु. २५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी आयोगास, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत सादर करावा.

४. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. २१२/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १७-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दिगंबर भिकाजी वानेगावकर, रा. ब्लॉक नं. ५, सेंट्रल फॅसिलीटी बिल्डींग, एन - ७, सिडको, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, प्रादेशिक दुग्ध विकास अधिकारी यांचे कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त प्रशासन (दुग्ध व्यवसाय), मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, (दुग्ध विकास विभाग), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२५५

निर्णय दिनांक १७-०५-२०१०

१ श्री. राजेश्वर रामराव कुलकर्णी, : अपिलार्थी
द्वारा, ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्प मंडळ, सिंचन भवन, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता, दक्षता पथक, औरंगाबाद परिमंडळ,
पाटबंधारे विभाग, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, औरंगाबाद परिमंडळ
पाटबंधारे विभाग, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी, त्यांनी मागितलेली माहिती जाणिवपूर्वक न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे नमूद करुन, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या स्वतःच्या पदोन्नतीसंदर्भात एकूण ६ मुद्यांद्वारे काही माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ११-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०३-२००९ रोजी या संदर्भात प्रथम अपील केले. अपिलार्थीचा सदरचा अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०३-२००९ रोजी प्राप्त झाला. या अपिलावर सुनावणी घेऊन अपिलार्थीचे व जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून त्यावर निर्णय देण्याऐवजी जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, औरंगाबाद परिमंडळ, पाटबंधारे विभाग, औरंगाबाद यांनी त्यांच्याकडील दिनांक ०६-०४-२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये जे प्रकरण संदर्भीत केले आहे त्या प्रकरणाची सद्यःस्थिती - अपिलार्थीच्या मानीव दिनांकाच्या प्रस्तावाची छाननी परिमंडळ स्तरावर करण्यात येत असल्याचे अपिलार्थीस कळविले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी आयोगासमोर उपस्थित आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास या प्रकरणाची वस्तुस्थिती स्पष्ट केली. त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयातील चतुर्थ श्रेणी कर्मचारी - "दप्तरी" या पदावर कार्यरत होते. त्यांना शासन मान्यतेनंतर औरंगाबाद परिमंडळातर्फे वर्ग ३ पदावर पदोन्नती देण्यात आली. अपिलार्थीस वर्ग ३ पदावर पदोन्नती दिल्यानंतर अपिलार्थीने या पदोन्नतीचा मानीव दिनांक त्यांना मिळण्यासंदर्भात परिमंडळाकडे संदर्भ केला असता, अपिलार्थीस वर्ग ४ मधील संवर्गातून वर्ग ३ मधील संवर्गात दिलेली पदोन्नती चुकीची आढळल्याने त्यांनी शासन मान्यतेनुसार अपिलार्थीस परत, वर्ग ४ मधील "दप्तरी" या मूळ पदावर नेमणूक दिली. या

प्रकरणाच्या अनुषंगाने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक ११-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीपैकी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक 'अ' व 'ब' वगळता उर्वरित कोणत्याही मुद्यांवरील जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात त्यांनी ती अर्जदारास अधिनियमातील तरतुदीनुसार देण्यासंदर्भात कार्यवाही करणे इतपत सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दलचे अथवा निर्णयाबद्दलचे कारण व स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणे आणि जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांच्या कृतीच्या समर्थनापृष्ठ्यर्थ स्पष्टीकरण देणे अशा प्रकारच्या प्रक्रियेचा या अधिनियमामध्ये समावेश नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक 'क', 'ड', 'इ' आणि 'उ' या मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक 'अ' व 'ब' शी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. त्यापैकी मुद्दा क्रमांक 'अ' शी संबंधित- परिमंडळ समितीच्या बैठकीत त्यांच्या मानीव दिनांकाच्या प्रकरणासंदर्भात कार्यालयीन टिपणी तयार करण्यात आलेलीच नाही - अशी माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविली आहे. मुद्दा क्रमांक 'ब' च्या संदर्भात मा. लोक आयुक्त कार्यालयाकडून त्यांच्या कार्यालयास अपिलार्थीने त्यांच्या मूळ

अर्जामध्ये संदर्भीत केलेल्या पत्राच्या प्रती प्राप्त झाल्या नाहीत, अशी वस्तुस्थिती दर्शविणारी माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ११-०२-२००९ रोजी पुरविली आहे. हे पाहता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीनुसार देय असलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ११-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे विनामूल्य व अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत दिली असल्यामुळे, अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त होणे बाकी नाही. अपिलार्थीस त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी जाणिवपूर्वक टाळले असल्याचे देखील या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत नसल्यामुळे व त्यांना देय असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत विनामूल्य पुरविली असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १७-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राजेश्वर रामराव कुलकर्णी, द्वारा, ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्प मंडळ, सिंचन भवन, नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, दक्षता पथक, औरंगाबाद परिमंडळ, पाटबंधारे विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, औरंगाबाद परिमंडळ पाटबंधारे विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२५६

निर्णय दिनांक १७-०५-२०१०

१ श्री. शेख नजीर शेख बाबमिया, : अपिलार्थी

प्रॉमिज टेलर, रेल्वे स्टेशन मस्जिदच्या बाजूला, जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

आगार व्यवस्थापक, राज्य परिवहन महामंडळ, जालना

आगार, जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

विभाग नियंत्रक, विभागीय कार्यालय, राज्य परिवहन

महामंडळ, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना ७ दिवसात माहिती देण्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०६-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात सन १९७४ ते ७६ पर्यंत काम केल्याचे हजेरीपत्रक व वॉचमन गेटवर असलेल्या आवक जावक रजिस्टरची प्रत

प्रमाणित स्वरुपात आणि त्यांनी सन १९७४ ते ७६ या कालावधीमध्ये वॉचमनची कामगिरी केली परंतु त्यांना दिल्या गेलेल्या सर्व कागदपत्राच्या झेरॉक्स प्रती अस्पष्ट दिल्याने त्यावरुन त्यांनी काम केल्याचे इतर दिवस स्पष्ट दिसत नसल्याने त्यांना स्पष्ट स्वरुपात माहिती मिळावी, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २५-०६-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ११६/- इतके त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०६-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०६-०७-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या कालावधीनंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांच्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना देण्यासाठी प्रस्तावित केलेली माहिती ही अस्पष्ट असल्याचे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे ज्या हजेरी पत्रकाच्या प्रतीची माहिती मागितली आहे. तशा प्रकारची माहिती जतन करुन ठेवण्याचा कालावधी ३ वर्षाचा असून, ही माहिती नष्ट केली गेली असण्याची शक्यता आहे. कारण त्यांच्या कार्यालयात आता १९७४ ते ७६ या कालावधीतील हजेरीपत्रकाची कोणतीही प्रत उपलब्ध नाही. अपिलार्थीस त्यांच्या हजेरीच्या दिवसासंदर्भात माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने त्यांनी अपिलार्थीच्या

पगार पत्रकाची प्रत अपिलार्थीस सशुल्क देऊ केली असता व या प्रतीकरिता लागणारे आवश्यक ते शुल्क रु. ११६/- इतके अपिलार्थीने त्यांच्याकडे या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कधीही भरलेले नाही. केवळ माहिती अस्पष्ट आहे या कारणास्तव ते ही माहिती घेण्याचे नाकारत आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे, ती जतन करुन ठेवण्याचा कालावधी व्यपगत झाला असल्याने आणि नष्ट झाली असण्याची शक्यता पाहता जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस उपलब्ध होणार नाही. तथापि केवळ अपिलार्थीस त्यांच्या मागणीशी सुसंगत माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मागणी केलेली माहिती सशुल्क देऊ केली असता ती घेण्याचे देखील अपिलार्थी नाकारत असल्याचे आयोगास आढळून येत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या प्रश्नाशी संबंधित, त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या माहिती व्यतिरिक्त इतर माहिती देण्यासाठी खटाटोप त्यांच्या पातळीवर करु नये. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे जर उपलब्ध होऊ शकत नसेल तर त्यांनी अपिलार्थीस तसे, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः कळवावे.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून हे आदेश निर्गमित झाल्यापासून ७ दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. ही माहिती अपिलार्थीच्या प्रतिनिधीस देय असणार नाही. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १७-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेख नजीर शेख बाबमिया, प्रॉमिज टेलर, रेल्वे स्टेशन मस्जिदच्या बाजूला, जालना

२ जन माहिती अधिकारी तथा आगार व्यवस्थापक, राज्य परिवहन महामंडळ, जालना आगार, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, विभागीय कार्यालय, राज्य परिवहन महामंडळ, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२५७

निर्णय दिनांक १७-०५-२०१०

१ श्री. मरकड अंकुशराव दादाराव, : अपिलार्थी
मु. पो. गोंदी, ता. अंबड, जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, गोंदी, ता.
अंबड, जि. जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अंबड, जि. जालना

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, अंबड, जि. जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. त्यांनी या अपील अर्जामध्ये आयोगाच्या असेही निदर्शनास आणले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी त्यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन न दिल्यामुळे व त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे माहिती अधिकाराच्या कायद्याचे उल्लंघन केले असल्यामुळे त्यांनी

विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय गोंदी, ता. अंबड, जि. जालना यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित एकूण १२ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०४-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी वेळोवेळी सुनावण्या ठेवल्या असता, अपिलार्थी या सुनावणीसाठी गैरहजर राहिले आणि नंतर त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी आयोगासमोर उपस्थित आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दोन तीन महिन्यापूर्वी त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती दिलेली आहे. अपिलार्थीस त्यांनी नेमकी कोणती माहिती दिली व अपिलार्थीस माहिती मिळाल्याबाबतच्या पोचसहीबाबत आयोगाने जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारणा केली असता, त्यांच्याकडे या संदर्भातील कोणतीही कागदपत्रे आता उपलब्ध नसल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या एकूण १२ मुद्यांवरील माहितीपैकी

मुद्दा क्रमांक ३, ५, ७ व १० शी संबंधित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ मध्ये "एम बी. रजिस्टरच्या छायांकित प्रती" अशी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. अपिलार्थीस नेमक्या कोणत्या कामाचे एम.बी. रजिस्टर अथवा कोणत्या कालावधीशी संबंधित माहिती हवी आहे याचा उल्लेख त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या मूळ अर्जामध्ये केलेला नाही. मुद्दा क्रमांक ५ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी अपिलीय अधिकारी, पंचायत समिती, अंबड यांच्याकडे कबूल करुन अपिलार्थीस माहिती का दिली नाही याचे स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेले आहे. मुद्दा क्रमांक ७ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे "वित्त आयोगाची रक्कम किती मिळाली याबाबत योग्य व अचुक माहिती" अशी माहिती मागितली आहे. या माहितीशी संबंधित कालावधीचा उल्लेख त्यांनी आपल्या माहितीसाठीच्या अर्जामध्ये केलेला नाही. मुद्दा क्रमांक १० द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून नेमकी कोणत्या मुद्यावरील विशिष्ट माहिती हवी आहे याचा कोणासही बोध होणे शक्य नाही. अशाप्रकारे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३, ५, ७ व १० द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मोघम स्वरुपाची व त्यांच्या कृतीबद्दलचे कारण अपेक्षित करणारी माहिती, जी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही, अशी मागितली आहे. त्यामुळे या मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होणार नाही. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील वरील मुद्दे वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत आहे. आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केलेल्या युक्तिवादाच्या वेळी ही माहिती त्यांनी अपिलार्थीस दिल्याचे आयोगास अवगत केले. तथापि या संदर्भातील कोणताही सबळ पुरावा त्यांनी आयोगास सादर न केल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचा, त्यांनी गेल्या दोन तीन महिन्यापूर्वी अपिलार्थीस माहिती दिली हा

युक्तिवाद, आयोग फेटाळून लावत आहे व जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३,५,७ व १० वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व टपालाद्वारे पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. बी.बी. टकले, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, गोंदी या पदावर कार्यरत) यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. आयोगासमोर त्यांना अपिलार्थीस माहिती दिल्यापृष्ठ्यर्थ कोणताही पुरावा सादर करता आला नाही. यावरुन त्यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती दिली नसल्याचा निष्कर्ष काढण्यात येत आहे. संबंधित ग्रामविकास अधिकाऱ्याने त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे अधिनियमातील कलम ७ मधील तरतुदीचा भंग करुन स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, श्री. टकले बी. बी. यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली त्यांच्या मूळ अर्जातील देय माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी श्री. बी. बी. टकले, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय,

गोंदी, ता. अंबड, जि. जालना यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्यची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १७-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मरकड अंकुशराव दादाराव, मु. पो. गोंदी, ता. अंबड, जि. जालना

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, गोंदी, ता. अंबड, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, अंबड, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२६२

निर्णय दिनांक १७-०५-२०१०

१ श्री. धन्यकुमार हनुमंत माने, : अपिलार्थी
रा. शिराढोण, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार (पुरवठा विभाग), तहसील कार्यालय,
उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी : तहसीलदार, तहसील कार्यालय, उस्मानाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. डी. पी. बांगड, श्री. डी. एम. घोडके, श्री. श्रीकांत कुलकर्णी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून, त्रयस्थ पक्ष श्री. डी. पी. बांगड व श्री. श्रीकांत कुलकर्णी यांची माहिती मिळाली नसल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, श्री. डी. पी. बांगड, श्री. डी. एम. घोडके व श्री. श्रीकांत कुलकर्णी, उस्मानाबाद या किरकोळ रॉकेल विक्रेत्यांच्या संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी दिनांक ०१-०१-२००२ ते २७-११-२००८ असा होता. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - संबंधित रॉकेल विक्रेत्यांचे साठा रजिस्टर, पावतीबुकाच्या झेरॉक्स प्रती, त्यांना किती के. एल. रॉकेल मिळते, त्यांचे लायसन्स कधीचे आहे व किती वेळेस रिनिव्ह झाले, या विक्रेत्यांवर शासकीय कार्यवाही झाली असेल तर त्याची माहिती - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७-०१-२००९ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही श्री. डी. पी. बांगड व श्री. श्रीकांत कुलकर्णी यांच्यासंदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष गैरहजर व तत्कालीन जन माहिती अधिकारी आणि अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०९-०१-२००९ रोजी आवश्यक ती माहिती विनामूल्य पुरविली असून, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील पावती बुकाच्या व साठा रजिस्टरच्या प्रतीची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने त्यांनी

ही माहिती अपिलार्थीस दिनांक १२-०१-२००९ रोजी दाखविली. त्यावेळी अपिलार्थीने या माहितीची त्यांना आता आवश्यकता नसल्याची लेखी कबूली दिली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १२-०१-२००९ रोजीच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिलेल्या कबुली पत्राची प्रत आयोगास दाखविली. या पत्रामध्ये अपिलार्थीने सर्व त्रयस्थ पक्षाची माहिती त्यांना समक्ष दाखविण्यात आली, त्यांनी मागणी केलेल्या माहितीची त्यांना आवश्यकता नसल्याचे नमूद केले आहे व यानंतर आयोगाकडे परत श्री. डी. पी. बांगड व श्री. श्रीकांत कुलकर्णी यांची माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून व्दितीय अपील केले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे आणि अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलाशी संबंधित त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची त्यांना आवश्यकता नसल्याची लेखी कबुली त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०१-२००९ रोजी दिलेली आहे हे पाहता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो त्रयस्थ पक्षाची कोणत्या संदर्भातील माहिती प्राप्त होणे बाकी आहे याचा उलगडा आयोगास होत नाही व तसेच या मुद्दयावर भाष्य करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १७-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. धन्यकुमार हनुमंत माने, रा. शिराढोण, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२६३

निर्णय दिनांक १७-०५-२०१०

१ श्री. स. वजीर स. अहमद, : अपिलार्थी
रा. बरकतपूरा, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय,
अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अर्धापूर,
तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नसल्याचे आयोगास अवगत केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, अर्धापूर यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाशी संबंधित जानेवारी २००९ ते मार्च २००९ या कालावधीतील ग्रामसभेच्या नोटिसा, विषयपत्रिकेच्या राजीव गांधी निवारा क्रमांक २ बाबत ग्रामसभा घेण्यासाठी ग्रामपंचायतीला पारीत

केलेल्या आदेश पत्राची प्रत, या योजनेसाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे आलेल्या लाभार्थ्यांच्या अर्जाच्या सत्यप्रती, दवंडी रजिस्टरची सत्यप्रत आणि ग्रामसभेच्या उपस्थितीपटाची सत्यप्रत, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती. तथापि विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०४-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीस दिनांक १५-०६-२००९ पर्यंत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना दिनांक ०१-०६-२००९ रोजी आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित केल्याप्रमाणे, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १२-०६-२००९ रोजी माहिती देऊ केली असता अपिलार्थीने ही माहिती घेण्यासाठी त्यांना मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून, नकार दिला व वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर व जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती आजही तयार असून, ते ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत. ही माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक १२-०६-२००९ रोजी देऊ केली असता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मुदतीत माहिती दिली नसल्याचे कारण दर्शवून, ही माहिती स्वीकारण्यास नकार दिला. या घटनेचा पंचनामा त्यांनी ग्रामस्थांच्या उपस्थितीत दिनांक १२-०६-२००९ रोजी केला असून, या पंचनाम्याची प्रत त्यांनी आयोगास दाखविली. पंचनाम्याच्या प्रतीवरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देऊ केली असता, ती माहिती स्वीकारण्यास अपिलार्थीने नाकारल्याचे सिध्द होत आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते जन माहिती अधिकारी यांच्याकडे ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी व्यक्तिशः कधीही उपस्थित राहिले नाहीत. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार, जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने ' व्यक्तिशः ' माहितीची मागणी केल्यास माहितीसाठीचा अर्ज केल्यानंतर या अर्जाच्या संदर्भातील पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे उत्तरदायित्व हे अर्जदाराचे असते. या प्रकरणी अशा प्रकारचे उत्तरदायित्व अपिलार्थीने पार पाडल्याचा कोणताही सबळ पुरावा आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही. तसेच या संदर्भातील तोंडी खुलासा करण्यासाठी ते आयोगासमोर उपस्थित नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १२-०६-२००९ रोजी देऊ केलेल्या माहितीचे आयोगाने अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती ही, त्यांनी मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आयोगास सकृतदर्शनी आढळून आले आहे. वास्तविक पाहता, अपिलार्थीने जर ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १२-०६-२००९ रोजी स्वीकृत केली असती तर, त्यांना आयोगाकडे व्दितीय अपील करण्याचे कोणतेही कारण राहिले नसते. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती व्यक्तिशः मागणे व नंतर ती मुदतीत प्राप्त झाली नसल्याचे कारण दर्शवून, अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील करणे अशा प्रकारच्या प्रवृत्ती वाढीस लागल्याचे आयोगाच्या निदर्शनास येत आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती देऊ केली होती. अपिलार्थीने मूळात व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही, त्यांनी त्यांचे अशा प्रकरणीचे उत्तरदायित्व योग्य पार पाडले नाही आणि जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती स्वीकृत केली नाही. यावरुन अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये त्यांना स्वारस्य नसावे व केवळ माहिती अधिका-यास त्रास देण्यासाठी आयोगाकडे

व्दितीय अपील केले असावे, असे अनुमान काढून अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १७-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. स. वजीर स. अहमद, रा. बरकतपूरा, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२६४

निर्णय दिनांक १७-०५-२०१०

१ श्री. अब्दुल माजिद महंमद इब्राहिम, : अपिलार्थी

रा. बरकतपुरा, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा मुख्याध्यापक, एकता प्राथमिक शाळा (उर्दू), अर्धापूर,

तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या शाळेचे शैक्षणिक वर्ष २००० ते २००९ या कालावधीतील, पहिली ते पाचवी या वर्गनिहाय व वर्षनिहाय विद्यार्थ्यांची पटसंख्या आणि शिक्षकांची यादी, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीने यापूर्वी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली असताना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे त्यांना

सूचित केले होते. त्याप्रमाणे त्यांनी यावेळी त्यांच्याकडील दिनांक ०९-०४-२००९ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांच्याकडे भरण्याचे सूचित केले. तथापि जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे आवश्यक त्या शुल्काचा भरणा न करता, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक २९-०४-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने आणि अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती आजही तयार आहे व ते ही माहिती अपिलार्थीस देण्यास तयार आहेत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांच्याकडे आजपर्यंत कधीही उपस्थित झालेले नाहीत, त्यामुळे त्यांना अपिलार्थीस ती माहिती पुरविता आली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केलेली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार, ' व्यक्तिशः ' माहितीच्या मागणीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केल्यानंतर या अर्जाच्या पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे उत्तरदायित्व

अर्जदाराचे असते. तथापि या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचे हे उत्तरदायित्व अद्यापपावेतो पार पाडले नसल्याचे जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादावरुन स्पष्ट होत आहे. तसेच अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत ते जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांनी मागणी केलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधी उपस्थित राहिले, याचा कोणताही सबळ पुरावा जोडलेला नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार असून ते ही माहिती अपिलार्थीस देण्यास तयार आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले आहे की, अपिलार्थीस देण्यासाठी त्यांच्याकडे एकूण ५८ पृष्ठांची माहिती तयार आहे. हे पाहता अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी, त्यांना हे आदेश प्राप्त होताच जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ११६ इतक्या रकमेचा भरणा त्यांच्या शाळेत करुन, ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १७-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अब्दुल माजिद महंमद इब्राहिम, रा. बरकतपुरा, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, एकता प्राथमिक शाळा (उर्दू), अर्धापूर,

तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२६५

निर्णय दिनांक १७-०५-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती येरमुलवार रंजिता पिराजी,<br>रा. कुंडलवाडी, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.),<br>जिल्हा परिषद, नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मागितलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी तीस दिवसाच्या आत न देता मोघम, अर्धवट व दिशाभूल करणारी व सत्यप्रती या स्वाक्षरित स्वरुपात नसल्याबद्दल त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-०४-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयातर्फे घेण्यात आलेल्या कंत्राटी ग्रामसेवक लेखी

परीक्षेच्या संदर्भात काही माहिती एकूण तीन मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-०५-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले व अपिलार्थीस दिनांक -०६-२००९ रोजीच्या पत्राव्दारे माहिती दिली. परंतु प्राप्त माहिती दिशाभूल करणारी असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०६-२००९ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी आवश्यक ती सर्व माहिती दिनांक २६-०६-२००९ रोजी पुरविली आहे. अपिलार्थीस ही माहिती त्यांनी सशुल्क पुरविली की विनामूल्य पुरविली आहे यासंदर्भातील आवश्यक तो खुलासा त्यांना आयोगाकडे करता आला नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून तीन मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २६-०६-२००९ रोजीच्या पत्रात त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा

क्रमांक १ व २ शी संबंधित माहिती उपलब्ध करुन दिली आहे. मुद्दा क्रमांक ३ व्दारे, अपिलार्थीने त्यांनी मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या परीक्षा क्रमांकाच्या परिक्षार्थीच्या उत्तरपत्रिकाच्या झेरॉक्स प्रती मागितल्या होत्या. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अशा प्रकारची माहिती अर्जदारास देय होणार नाही अशा प्रकारची भूमिका आयोगाने यापूर्वी वेळोवेळी घेतली आहे. मा. उच्च न्यायालय व विविध माहिती आयोगाने देखील अशा प्रकारची भूमिका घेतली आहे हे पाहता, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भातील उत्तरपत्रिकांच्या प्रती, ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय नाही. परंतु या अर्जातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली उर्वरित माहिती, दिनांक २९-११-२००८ रोजी एन. टी. (ब) प्रवर्गातील कंत्राटी ग्रामसेवकांच्या वेतन अदा केल्याच्या पे रोलच्या साक्षांकीत झेराक्स प्रती, ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीस दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी विनादिनांकाच्या व विनास्वाक्षरीच्या पत्राने ही माहिती अपिलार्थीस पंचायत समिती मुखेड, किनवट, देगलूर व मुदखेड यांच्याकडून परस्पर प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीस अशा प्रकारची माहिती देण्याची कृती ही सर्वथा गैर व चुकीची आहे. जर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती पंचायत समितीशी संबंधित होती तर, अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाच्या आत अधिनियमातील कलम ६(३) (एक) प्रमाणे संबंधित पंचायत समितीकडे पाठवून, त्या पत्राची प्रत अपिलार्थीस देणे त्यांना भाग होते. तथापि अशा प्रकारची कृती त्यांनी केली नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांना विनामूल्य पुरवावी लागेल हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ३ मधील नांदेड जिल्हा परिषदेने दिनांक २९-११-२००८ रोजी निवड केलेल्या एन. टी. (ब) वर्गातील कंत्राटी ग्रामसेवकांच्या पे रोलच्या प्रती साक्षांकीत स्वरुपात, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत व्यक्तिशः व

विनामूल्य पुरवाव्यात. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ च्या संदर्भातील दिनांक २६-०६-२००९ रोजी पुरविलेल्या माहितीमुळे अपिलार्थीची कशी दिशाभूल होत आहे, हे त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये स्पष्ट केलेले नाही किंवा यासदर्भात तोंडी युक्तिवाद करण्यासाठी त्या आयोगासमोर उपस्थित नाहीत हे पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिशाभूल करणारी माहिती दिली हा अपिलार्थीचा आक्षेप, फेटाळून लावण्यात येत आहे. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये त्यांना आवश्यक असलेल्या माहितीशी संबंधित कालावधीचा उल्लेख केलेला नाही, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना संबंधित कंत्राटी ग्रामसेवकाच्या नोव्हेंबर २००८ ते मार्च २००९ पर्यंतच्या सर्व पे रोलच्या प्रती द्याव्या लागतील.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), जिल्हा परिषद, नांदेड यांच्या कार्यालयातून हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ मधील कंत्राटी ग्रामसेवकाच्या दिनांक २९-११-२००८ ते २८-०४-२००९ या

कालावधीशी संबंधित पे रोलच्या प्रती साक्षांकीत स्वरुपात त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवाव्यात.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १७-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्रीमती येरमुलवार रंजिता पिराजी, रा. कुंडलवाडी, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२७०

निर्णय दिनांक : १८.०५.२०१०

१. श्री. रमेश बाबुराव क्षीरसागर, : अपिलार्थी
रा.लातूर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
राज्य परिवहन महामंडळ,
लातूर.

२. जन अपिलीय अधिकारी,
राज्य परिवहन महामंडळ,
लातूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : विभागीय अभियंता,
राज्य परिवहन महामंडळ,
विभागीय कार्यालय, लातूर.

जन अपिलीय अधिकारी : विभाग नियंत्रक,
राज्य परिवहन महामंडळ,
विभागीय कार्यालय, लातूर.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७.०७.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण, खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिल्या कारणाने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०९.०४.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाची सन २००२ ते दि.०९.०४.२००९ या कालावधीशी संबंधित,"मुख्य बसस्थानक व्यापारी संकुल (सुनिल टेरेसेस) च्या संचिकेची (नकाशासहीत) छायाप्रत" अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २२.०५.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्याकडील व्यापारी संकुलासंदर्भात उपलब्ध असलेली माहिती पुरविली. या पत्राद्वारे त्यांनी अपिलार्थीस व्यापारी संकुलाच्या नकाशाची प्रत पुरविल्याचे आयोगास आढळून येत आहे. तथापि या पूर्वीच अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २१.०५.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न देता अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. १४.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे त्यांना माहिती देण्याचे श्री. स्वामी, कनिष्ठ अभियंता यांना सूचित केले असल्याचे अपिलार्थीस कळविले. यानंतर अपिलार्थी आणि जन अपिलीय अधिकारी यांच्यामध्ये झालेल्या पत्रव्यवहारावरुन जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २२.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस विभागीय अभियंता (स्थापत्य) यांना माहिती देण्याच्या सूचना दिल्याचे अपिलार्थीस कळविले. तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षेप्रमाणे माहिती प्राप्त न झाल्याने, व्यथित होऊन त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तत्कालीन जन माहिती अधिकारी,श्री.ए.डी.मोताळे व जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक यांचे प्रतिनिधी, श्री. वामनराव एकलुरे, कनिष्ठ अभियंता उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीस आयोगासमोर कोणताही युक्तिवाद करता आला नाही. अपिलार्थीस त्यांनी

आवश्यक ती माहिती पुरविली किंवा कसे, हे त्यांना आयोगासमोर स्पष्ट करुन सांगता आले नाही अथवा यासंदर्भातील कोणतीही कागदपत्रे ते आयोगास सादर करु शकले नाहीत.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. ०९.०४.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये व्यक्तिशः माहितीची मागणी केलेली आहे. ही माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी जन माहिती अधिकारी यांच्यकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींनुसार केल्यानंतर माहितीसाठीच्या केलेल्या अर्जासंदर्भातील पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे उत्तरदायित्त्व हे अपिलार्थीचे होते. या प्रकरणी सदरचे उत्तरदायित्त्व अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या पत्रव्यवहारावरुन, पार पाडले असल्याचे आयोगास आढळून येत आहे. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती आता विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून दहा दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक १८.०५.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रमेश बाबुराव क्षीरसागर,द्वारा, मनोज बाबुराव शिंदे मोतीनगर, रिंग रोड, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा विभागीय अभियंता,राज्य परिवहन महामंडळ,विभागीय कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक,राज्य परिवहन महामंडळ,विभागीय कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२७१

निर्णय दिनांक : १८.०५.२०१०

१. श्री. गणेश दगडू होळे, : अपिलार्थी
रा.लातूर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
कार्यालय जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, लातूर.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,लातूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक निबंधक, सहकारी संस्था (प्र.), जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था लातूर यांचे कार्यालय

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९.०७.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणाशी संबंधित वस्तुस्थिती आयोगास स्पष्ट केली.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे,"मजूर विभागाच्या दि.०१.०१.२००९ पासून

ते २३.०६.२००९ पर्यंतच्या कालावधीतील प्रोसिडींग बुक व कार्यवाटपाचा तक्ता, शिफारस पत्र व संबंधित खात्याकडून आलेल्या काम मागणी अर्जाची पाहणी करण्यासाठी दि. २५.०६.२००९ किंवा २६.०६.२००९ या तारखेस कार्यालयीन वेळेमध्ये पाहणी करण्यासाठी वेळ देण्याबाबत", अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १४.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस मजूर संस्थेच्या संदर्भातील अभिलेखे तपासणीसाठी दि. २३.०७.२००९ रोजी ११.०० वा. उपलब्ध करुन देत असल्याचे, अपिलार्थीस कळविले. तथापि अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांनी विहित केलेल्या वेळेमध्ये हजर न होता ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दुपारी ०४.०० वाजता उपस्थित राहिले. परंतु त्या वेळी ज्या कर्मचाऱ्याकडे हे अभिलेखे तपासणीसाठी उपलब्ध होते, ते कर्मचारी कामकाजास्तव बाहेर गेल्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दुसऱ्या दिवशी ११.०० वा. हजर राहण्याच्या सूचना दिल्या तथापि दुसऱ्या दिवशी जन माहिती अधिकारी यांच्याकडे हजर राहण्याऐवजी अपिलार्थीने दि. २९.०६.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय घेण्याची मुदत संपण्याच्या अगोदरच अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर दि. ३०.०७.२००९ रोजी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,लातूर यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन अपिलार्थीस आवश्यक असलेले अभिलेखे आठ दिवसांच्या आत तपासणीसाठी उपलब्ध करुन देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाप्रमाणे अपिलार्थीने दि. ०३.०८.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून संबंधित अभिलेख्यांची तपासणी केली व या तपासणी नंतर त्यांचे पूर्ण समाधान झाले असल्याचे जन

माहिती अधिकारी यांना लेखी कबूलीपत्र दिले. यावरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी तपासणीसाठी आवश्यक असलेले अभिलेखे अपिलार्थीने आयोगाकडे दि. २९.०७.२००९ रोजी द्वितीय अपील केल्यानंतर उपलब्ध करुन दिले व अशाप्रकारे अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून उपलब्ध झाली असल्यामुळे आणि तसेच अपिलार्थीने या प्रकरणी प्रथम अपील केल्यानंतर अधिनियमातील तरतुदीमध्ये विहित केलेला कालावधी व्यपगत होण्यापूर्वीच आयोगाकडे द्वितीय अपील केलेले असल्यामुळे अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर वेगळयाने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक १८.०५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गणेश दगडू होळे, सुळ गल्ली, खडक हनुमान,लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था (प्र.), जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था लातूर यांचे कार्यालय यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२७२

निर्णय दिनांक : १८.०५.२०१०

१. श्री. मुरलीधर रामराव गोडबोले, : अपिलार्थी
रा. मुखेड, जि.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
समाज कल्याण अधिकारी कार्यालय,
जिल्हा परिषद, लातूर.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, लातूर.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : समाज कल्याण अधिकारी गट-अ,
जिल्हा परिषद, लातूर.

त्रयस्थ पक्ष : (१) मुख्याध्यापक, राजीव गांधी निवासी मतिमंद विद्यालय, औराज शहाजनी,(२) मुख्याध्यापक,स्वामी रामानंद तीर्थ निवासी मुकबधीर विद्यालय, औराज शहाजनी, (३) मुख्याध्यापक,इंदिरा गांधी निवासी अपंग विद्यालय, औराज शहाजनी, (४) मुख्याध्यापक, अस्थिव्यंग कर्मशाळा,उदगीर,(५) मुख्याध्यापक,प्रेरणा निवासी मतिमंद विद्यालय, उदगीर व (६) मुख्याध्यापक, जीवन विकास मतिमंद कर्मशाळा, उदगीर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३.०७.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मुद्देनिहाय माहिती न देता अपूर्ण माहिती दिली, त्यामुळे त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ११.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २५.०४.२००४ ते ११.०२.२००९ या कालावधीशी संबंधित त्यांच्या नियंत्रणाखालील मुख्याध्यापक, राजीव गांधी निवासी मतिमंद विद्यालय, औराज शहाजनी, मुख्याध्यापक,स्वामी रामानंद तीर्थ निवासी मुकबधीर विद्यालय, औराज शहाजनी, मुख्याध्यापक, इंदिरा गांधी निवासी अपंग विद्यालय, औराज शहाजनी, मुख्याध्यापक,अस्थिव्यंग कर्मशाळा, उदगीर, मुख्याध्यापक,प्रेरणा निवासी मतिमंद विद्यालय, उदगीर व मुख्याध्यापक,जीवन विकास मतिमंद कर्मशाळा, उदगीर या शाळांच्या संदर्भात काही माहिती एकूण ६ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जन माहिती अधिकारी यांनी या शाळांच्याकरिता किती मुलांवर किती पदांना मान्यता देण्यात आली, त्या शाळांना संच मान्यता देण्यात आली असल्यास त्या संच मान्यतेची शाळानिहाय झेरॉक्स प्रत, या कालावधीतील सर्व कर्मचाऱ्यांच्या शैक्षणिक, व्यावसायिक व आर.सी.आय.प्रमाणपत्राच्या झेरॉक्स प्रती आणि त्या कर्मचाऱ्यांचे कायम आणि कंत्राटी असे विवरण, संच मान्यतेकरिता वापरलेले निकष, संच मान्यता देण्याबाबत आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांचे ना हरकत प्रमाणपत्र घेतले किंवा कसे, स्पष्ट सविस्तर खुलासा, मा. उच्च न्यायालयाचा आदेश नसताना जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त शाळांतील कर्मचाऱ्यांना संच मान्यता कोणत्या कारणास्तव दिली,सविस्तर खुलासा, संस्थेने संच मान्यता घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जाची झेरॉक्स प्रत - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून साक्षांकित स्वरुपात मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १७.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस ही माहिती संबंधित शाळेचे मुख्याध्यापक हे जन माहिती अधिकारी म्हणून नेमले गेले असल्याने त्यांच्याकडून घेण्याचे सूचित केले. तथापि यानंतर अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १६.०३.२००९ रोजी प्रथम अपील केले.या

अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २९.०४.२००९ रोजी निर्णय देऊन ज्या शाळांनी अपिलार्थीस शुल्क भरण्याबाबत रक्कम कळविली नाही, त्या शाळांच्या मुख्याध्यापकांनी अपिलार्थीस तात्काळ विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने, त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आणि अस्थिव्यंग कर्मशाळा, उदगीर, प्रेरणा निवासी मतीमंद विद्यालय, उदगीर व जीवन विकास मतीमंद कर्मशाळा, उदगीर यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या कार्यक्षेत्रातील एकूण सहा शाळांच्या संदर्भात माहिती मागविली असता, त्यातील औराद शहाजनी येथील तीन शाळांच्या मुख्याध्यापकांनी त्यांच्या शाळेशी संबंधित माहिती अपिलार्थीस पुरविली आहे व उदगीर येथील, अस्थिव्यंग कर्मशाळा, प्रेरणा निवासी मतीमंद विद्यालय व जीवन विकास मतीमंद कर्मशाळा या तीन शाळांनी, अपिलार्थीने त्यांच्याकडे आवश्यक त्या शुल्काचा भरणा न केल्यामुळे अपिलार्थीस माहिती पुरविली नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी उदगीर येथील तीनही शाळांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित असून अपिलार्थीने त्यांच्याकडे शुल्काचा भरणा केल्यास ते अपिलार्थीस माहिती देण्यास तयार असल्याचे त्यांनी आयोगास सांगितले.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ११.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ३ मधील, ज्या कर्मचाऱ्यांना संच मान्यता देण्याबाबत आयुक्त, अपंग कल्याण पुणे यांचे प्रमाणपत्र घेतले किंवा कसे? स्पष्ट सविस्तर

खुलासा देण्यात यावा, मुद्दा क्र. ४ मधील, मा. उच्च न्यायालयाचे आदेश असताना उपरोक्त शाळांतील कर्मचाऱ्यांना संच मान्यता कोणत्या कारणास्तव दिली, याचा सविस्तर खुलासा, या मुद्यांवरील माहिती वगळता, उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून, ती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे, देय होत आहे. मुद्दा क्र. ३ मधील अंशत: व मुद्दा क्र. ४ मधील अंशत: भागाद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबद्दलचे स्पष्टीकरण अथवा कारणे मागणे आणि जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कृतीबद्दलचे अथवा निर्णयाचे समर्थन करणारे स्पष्टीकरण अर्जदारास देणे अशाप्रकारची प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये ज्या स्वरुपात उपलब्ध असते, त्या स्वरुपात ती अर्जदारास अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देण्यासंदर्भात कार्यवाही करणे इतपतच सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, ही माहिती समाज कल्याण अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध असावयास हवी, असे दिसून येते. कारण अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील एकूण सहा शाळांना दिलेल्या संच मान्यतेसंदर्भात माहिती मागितली आहे. अशाप्रकारच्या अपंग शाळांमधील शिक्षकांच्या व कर्मचाऱ्यांच्या संच मान्यता समाज कल्याण अधिकारी देत असतात. यावरुन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्याकडेच उपलब्ध असावयास हवी, असे असूनही त्यांनी मुख्याध्यापक हे जन माहिती अधिकारी आहेत, या कारणास्तव अपिलार्थीचा मूळ अर्ज संबंधित शाळांच्या मुख्याध्यापकांकडे त्यांच्याकडील दि. १७.०२.२००९ रोजींच्या पत्रांद्वारे पाठविला. ही जन माहिती अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,लातूर यांची कृती सर्वस्वी गैर व चुकीची आहे. मुख्याध्यापक यांची माहिती अधिकारी म्हणून केलेली नेमणूक ही केवळ त्यांच्या शाळेशी संबंधित माहितीपुरतीच मर्यादित आहे. समाज कल्याण अधिकाऱ्याने प्रशासकीय प्रमुख या नात्याने दिलेल्या निर्णयासंदर्भात शाळेच्या

मुख्याध्यापकाशी झालेल्या पत्रव्यवहारासंदर्भातील माहिती समाजकल्याण अधिकाऱ्याकडेच उपलब्ध असावयास हवी. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे संस्थेने समाज कल्याण अधिकाऱ्याकडे संच मान्यतेकरिता सादर केलेल्या प्रस्तावाच्या प्रतींची माहिती मागविली आहे. ही माहिती समाज कल्याण अधिकाऱ्याकडे असावयास हवी, कारण अशाप्रकारच्या प्रकरणात समाज कल्याण अधिकारी यांचे कार्यालय मान्यता देत असते. असे असूनही त्यांनी अपिलार्थीस स्वतः माहिती न देता संबंधित शाळांच्या मुख्याध्यापकांना माहिती देण्याचे सूचित केले. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास टाळाटाळ केली, असे मानणे जास्त संयुक्तिक राहिल, असे आयोगास वाटते. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना समाज कल्याण कार्यालय, जिल्हा परिषद, लातूर या कार्यालयामार्फत हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असताना देखील त्यांनी अपिलार्थीचा अर्ज संबंधित शाळांकडे पाठवून व एकप्रकारे अपिलार्थीस माहिती देण्याचे टाळून त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २०(२) च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी, जि.प.लातूर यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच अपिलार्थीस, दहा दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी, जि. प. लातूर यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक १८.०५.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुरलीधर रामराव गोडबोले,द्वारा नवजीवन बालवाडी, शिवाजीनगर, मोंढा रोड,मुखेड, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी गट-'अ',जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२७३

निर्णय दिनांक : १८.०५.२०१०

१. श्री. हनमंत काशीराव देशमुख, : अपिलार्थी
रा. भोकर, जि.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग,भोकर,जि.नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी,
सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर,जि.नांदेड

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
भोकर, जि.नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९.०७.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ३०.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील, "ग्रामीण रुग्णालय ते मैसा रोडच्या डांबरीकरणाच्या कामाबाबत",काही माहिती तीन मुद्यांद्वारे व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सन २००७-०८ मध्ये करण्यात आलेल्या कामाच्या इस्टीमेटची झेरॉक्स प्रत, सन

२००८-०९ मध्ये करण्यात आलेल्या त्याच कामाच्या इस्टीमेटची झेरॉक्स प्रत व हे काम एका वर्षाच्या आत पुन्हा कोणत्या नियमानुसार करण्यात आले, त्याबद्दलची माहिती - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून तीस दिवसांत माहिती प्राप्त झाली नाही, या कारणास्तव अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १९.०५.२००९ रोजी प्रथम अपील केले.या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १५.०६.२००९ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीस आठ दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित कले. तथापि मध्यंतरीच्या काळात दि. ०८.०६.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ व २ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. १५.०६.२००९ रोजी प्राप्त झाली व नंतर परत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १९.०६.२००९ रोजी मुद्दा क्र.३ शी संबंधित माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली. परंतु यानंतरही अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस मुद्दा क्र. १ व २ शी संबंधित माहिती दि. ०८.०६.२००९ रोजीच्या पत्राद्वारे व मुद्दा क्र. ३ शी संबंधित माहिती दि. १९.०६.२००९ रोजी दिली आहे.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ व २ शी संबंधित माहिती दि. ०८.०६.२००९ रोजीच्या पत्राद्वारे उपलब्ध करुन दिल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या अपिलार्थीच्या दि. १५.०६.२००९ रोजीच्या

पोचसहीवरुन दिसून येत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ च्या संदर्भात मात्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचा जो पुरावा सादर केला आहे, त्या पुराव्यावर आयोग विश्वास ठेवत नाही. कारण या पुराव्यामध्ये अपिलार्थीस मुद्दा क्र. ३ ची माहिती प्राप्त झाल्याची कबूली अपिलार्थीने त्यांच्या स्वाक्षरीसह जन माहिती अधिकारी यांना दिलेली नाही, तसेच अपिलार्थीस माहिती देताना जन माहिती अधिकारी यांनी, ठेकेदाराशी झालेल्या करारपत्रामधील कलम २० मधील तरतुदीनुसार त्यांनी ठेकेदाराकडून खचलेल्या रस्त्याचे काम परत करुन घेतले, असे नमूद केले आहे. परंतु अपिलार्थीस ठेकेदाराबरोबर झालेल्या करारपत्राच्या कलम २० ची प्रत दिली नाही, जी त्यांनी अपिलार्थीस देणे आवश्यक होते. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ शी संबंधित माहिती देण्याच्या दृष्टीने, त्यांनी या कामाकरिता ठेकेदाराशी केलेल्या करारपत्रातील कलम २० च्या तरतुदीची प्रत अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ शी संबंधित माहिती - त्यांनी या कामाकरिता ठेकेदाराशी केलेल्या करारपत्रातील कलम २० च्या तरतुदीची प्रत - अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक १८.०५.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. हनमंत काशीराव देशमुख, मु.पो. देशमुख गल्ली,भोकर, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम उपविभाग, भोकर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२६६

निर्णय दिनांक १८-०५-२०१०

१ श्री. लहुदास दौलत गणवीर, : अपिलार्थी
द्वारा, श्री. राजु ढोले, घर नं. जी-१८/५, संभाजी कॉलनी,
एन-६, सिडको, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक, शिवाजी विद्यालय, सावळदबारा, ता.
सोयगांव, जि. औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. नारायण रायभान कोलते

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जासोबत दारिद्र्यरेषेखालील प्रमाणित प्रत जोडली असताना देखील ती न जोडल्याचे सांगून जन माहिती अधिकारी यांनी त्यांना हेतूपुरस्सर माहिती देण्याचे टाळले असल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, अधिनियमातील कलम १९ (६) मध्ये विहित केलेल्या मुदतीत जन अपिलीय अधिकाऱ्याने सुनावणी न घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याचे टाळले. या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री. नारायण कोलते यांच्यावर

माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार कारवाई करण्याचे आदेश सचिव, शिक्षण विभाग मुंबई यांना द्यावेत, असे नमूद केले आहे. या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-०४-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या स्वतःबाबत एकूण ७ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जन माहिती अधिकारी यांचा कायम रहिवासी पत्ता, जन माहिती अधिकारी यांच्या शाळेच्या शंभर / पन्नास बिंदु नामावलीनुसार मंजूर पदनामासह पदांचा तपशील, संस्थेने भरलेल्या जागा पदनामासह, जन माहिती अधिकारी यांच्या नियुक्ती आदेशाची प्रत व सेवापुस्तिकेची आणि पदोन्नती आदेशाची प्रत, जन माहिती अधिकारी यांनी नियुक्तीपासून ते दिनांक ०४-०४-२००९ पर्यंत दाखल केलेल्या मालमत्ता विवरणाच्या सत्यप्रती, जन माहिती अधिकारी यांच्या विरुध्द सिडको पोलीस स्टेशनमध्ये दाखल झालेल्या एका गुन्हा प्रकरणी जिल्हा परिषदेने काही कारवाई केलेली असल्यास त्यांना बजावलेल्या नोटीसाची जन माहिती अधिकारी यांनी या तपशीलात दिलेली उत्तरे व संस्थेने तथा जिल्हा परिषदेने केलेली कारवाई, जन माहिती अधिकारी यांच्या शाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नावे, पदनाम, नियुक्ती आदेशाच्या सत्यप्रती आणि सेवापुस्तिकेची सत्यप्रत व जन माहिती अधिकारी यांना संस्थेत नियुक्ती दिल्यापासून ते दिनांक ०४-०४-२००९ पर्यंत त्यांनी वेळोवेळी घेतलेल्या कर्ज प्रकरणाचा तपशील, दिलेल्या हमीपत्राचा तपशील, एकूण कर्ज रक्कम, परत फेड, थकबाकी रक्कम - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून रजिस्टर्ड टपालाने मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०३-०४-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन (या पत्रामध्ये ४ हा आकडा चुकून पडला असून तो ५ असा वाचावा असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास यावेळी विनंती केली) अपिलार्थीस असे कळविले की, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जात नमूद केल्याप्रमाणे ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती

असल्याचा कोणताही सबळ पुरावा त्यांनी माहिती अधिकाराच्या अर्जाबरोबर सादर केला नसल्यामुळे, या प्रमाणपत्राची प्रत त्यांच्याकडे सादर करण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि यानंतर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे कार्यवाही न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०५-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-०७-२००९, १०-०८-२००९ व १७-०८-२००९ रोजी सुनावण्या ठेवून कोणताही निर्णय दिला नाही. अशाप्रकारे अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी त्रयस्थ पक्ष, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०४-०४-२००९ रोजीच्या मूळ अर्जास दिनांक ०३-०५-२००९ रोजी प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रावर दिनांक ०३-०४-२००९ अशी तारीख चुकून पडलेली आहे. त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०४-०४-२००९ रोजीच्या मूळ अर्जासोबत ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र जोडले नव्हते. त्यामुळे ते अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती देऊ शकले नाहीत. त्यांनी या संदर्भात अपिलार्थीस दिनांक ०३-०५-२००९, २२-०५-२००९, ०८-०६-२००९, १२-०७-२००९ व २१-०७-२००९ रोजी या संदर्भात पत्रव्यवहार केला असता, त्यांनी अपिलार्थीस उद्देशून लिहिलेली दिनांक १२-०७-२००९ व २१-०७-२००९ रोजीची पत्रे त्यांना, अपिलार्थीने त्यांच्या राहण्याच्या जागेचा पत्ता बदलल्याने, विनातामिली परत प्राप्त झाली आहेत. अपिलार्थीशी एवढा पत्रव्यवहार करुन अपिलार्थीने त्यांच्याकडे ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचा पुरावा सादर केलेला नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्यासाठी ते आज तयार आहेत. या प्रकरणी जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष हे एकच असून त्रयस्थ पक्ष या

नात्याने त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी हे त्यांच्याकडे अशाच प्रकारची वैयक्तिक स्वरुपाची माहिती वारंवार मागवित असतात. सुनावणीसाठी कधीही उपस्थित राहत नाहीत व वेळोवेळी वाद उत्पन्न करुन त्यांना त्रास देत असतात. या संदर्भात अपिलार्थी त्यांच्याशी वेळी अवेळी दुरध्वनीवरुन संपर्क साधून त्यांना माहिती न देण्याबाबतची कारणे विचारत असतात. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जासोबत दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्र जोडले नसल्याचे शपथपत्र आयोगास सादर केले आहे.

जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष हे एकच असून, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या विषयी एकूण ७ मुद्यांवर माहिती मागितली आहे. या ७ मुद्यांपैकी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४, ५, ६ व ७ शी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ द्वारे मागणी केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्या वैयक्तिक माहितीशी संबंधित असून, ही माहिती अपिलार्थीस उघड केल्याने ते कोणते व्यापक जनहित साध्य करु शकतील याचा खुलासा त्यांनी आयोगाकडे लेखी स्वरुपात आजतागायत सादर केलेला नाही व त्याच बरोबर आयोगास देखील, अपिलार्थीस त्यांच्या या मुद्यावर वरील माहिती उघड केल्यास कोणतेही व्यापक जनहित साध्य होणार नाही, परंतु त्रयस्थ पक्षाच्या वैयक्तिक बाबीत आगंतुक हस्तक्षेप होऊन अधिनियमातील कलम ८ (१) (ञ) चा भंग मात्र होईल असे वाटत असल्यामुळे, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी या मुद्यावरील माहिती उघड करण्याची आवश्यकता नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ च्या संदर्भात अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाच्या विरुध्द सिडको पोलीस स्टेशनमध्ये दाखल केलेल्या गुन्ह्यासंदर्भात माहिती मागितली आहे. तथापि हा गुन्हा कोणी व कधी दाखल केला, गुन्ह्याचा

क्रमांक इत्यादी तपशील त्यांनी या मुद्यामध्ये दिलेला नाही. या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असा खुलासा केला की, सदर तक्रार त्यांच्या भावाच्या पत्नीच्या माहेरच्या लोकांनी त्यांच्या भावाविरुध्द केली असून, त्यांचा या तक्रारीशी अधिकृतरित्या कोणताही संबंध नाही. ही तक्रार त्यांच्या कौटूंबिक वादातून केली गेलेली आहे. याचा त्यांच्या कर्तव्यकाळाशी कोणताही संबंध नाही. जन माहिती अधिकारी यांच्या या विधानावरुन ही माहिती देखील जन माहिती अधिकारी यांच्या संबंधित व वैयक्तिक स्वरुपाची असल्याने व ही सार्वजनिक स्वरुपाची नसल्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना उघड करण्याची आवश्यकता नाही. याच बरोबर अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७ द्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी संस्थेकडून नियुक्ती झाल्यापासून ते आजपर्यंत वेळावेळी काढलेल्या कर्जासंदर्भात काही तपशीलाची मागणी केली आहे. जन माहिती अधिकारी यांनी वेळोवेळी वित्तीय सहाय्य करणाऱ्या संस्थेकडून काढलेले कर्ज ही माहिती त्यांच्या वैयक्तिक माहितीचा भाग असून, या माहितीचे स्वरुप सार्वजनिक नसल्यामुळे अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांना उघड करण्याची आवश्यकता नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या सेवापुस्तिकाच्या पृष्ठांची मागणी त्यांच्याकडे केली आहे. या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, सेवापुस्तिकेच्या पहिल्या पानावरील मुद्दा क्रमांक ५ मधील - शारीरिक खुणा - मधील माहिती वगळता उर्वरित माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची असल्यामुळे व शरीरावरील खुणा- ही माहिती अपिलार्थीच्या खाजगी बाबीच्या संबंधित असल्यामुळे आणि ती त्यांची वैयक्तिक असल्यामुळे या माहितीला सार्वजनिक माहिती असे म्हणता येणार नाही. हा भाग वगळता अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची असल्यामुळे ती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस उघड करावी लागेल. आता ही माहिती उघड करण्यासाठी अपिलार्थीस त्यांचे, ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे वैध प्रमाणपत्र जन माहिती अधिकारी यांना सादर करावे लागेल. जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या युक्तिवादावरुन अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे

दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्र सादर करण्यासाठी टाळाटाळ केली असल्याचे आयोगास आढळून आले आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस, त्यांनी त्यांच्याकडे ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतर, त्यांना ही माहिती विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने जर, त्यांना देय असलेल्या माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे कोणतेही वैध प्रमाणपत्र सादर केले नाही तर मात्र अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क प्राप्त करुन घ्यावी लागेल. अपिलार्थीने त्यांना या माहितीची आद्यापही आवश्यकता असल्यास संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत एकतर त्यांचे दारिद्र्यरेषेचे वैध प्रमाणपत्र जन माहिती अधिकारी यांना सादर करुन त्यांच्याकडून विनामूल्य माहिती प्राप्त करुन घ्यावी अथवा त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क प्रतिपृष्ठ रु. २ याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरुन ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क प्राप्त करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. लहुदास दौलत गणवीर, द्वारा, श्री. राजु ढोले, घर नं. जी-१८/५, संभाजी कॉलनी, एन-६, सिडको, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शिवाजी विद्यालय, सावळदबारा, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२६७

निर्णय दिनांक १८-०५-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सैय्यद मोबीनउद्दीन सैय्यद अल्लाउद्दीन,<br>रा.घर क्रमांक १-१२-७१, जुना बाजार, औरंगाबाद / ऑफिस<br>शॉप नं. ४, आमेर मार्केट, जुना बाजार, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्य वक्फ बोर्ड अधिकारी, महाराष्ट्र स्टेट वक्फ बोर्ड<br>कार्यालय, औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य वक्फ बोर्ड अधिकारी, महाराष्ट्र स्टेट वक्फ बोर्ड<br>कार्यालय, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी : | कार्यालयीन अधीक्षक, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद |
| | जन अपिलीय अधिकारी : | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद |
| | त्रयस्थ पक्ष : | श्री. सैय्यद सलीमोद्दीन मुतवल्ली |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक १५-०४-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, थडी मस्जीद व कब्रस्थान, अचलपूर, जिल्हा अमरावती च्या या विषायाने दिलेले आदेश क्रमांक ३०७४ दिनांक १७-०८-२००४ रोजीची सत्यप्रत, या प्रकरणात श्री. सय्यद सलीमोद्दीन मुतवल्ली यांनी दाखल केलेल्या पिटीशन अर्जाची प्रत व कब्रस्थानाच्या बाँड्रीच्या बांधकाम गेटकरिता व दुरुस्तीकरिता परवानगी मागणीच्या पत्राची प्रत, अशी माहिती व्यक्तिश: मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य वक्फ बोर्ड अधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक २९-०५-२००९ रोजी या संदर्भात प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०८-०६-२००९ रोजीच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती संबंधितांच्याकडून प्राप्त होऊ न शकल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी आयोगासमोर उपस्थित आणि त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, संबंधितांच्यावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणाशी संबंधित संपूर्ण माहिती अपिलार्थीस ३ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आता जन माहिती अधिकारी हे त्यांना ३ दिवसाच्या आत विनामूल्य देण्यासाठी तयार आहेत. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३ दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. ही माहिती अपिलार्थीच्या प्रतिनिधीस देय असणार नाही. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

आता जरी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी हे विनामूल्य माहिती उपलब्ध करुन देत असतील तरी या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना दिनांक ०८-०६-२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केल्याची बाब आयोगाच्या नजरेआड करता येणार नाही. याच बरोबर अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता अपिलार्थीस, त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीपासून वंचित ठेवण्यासाठी कोणतेही समर्थनीय कारण मूळात अस्तित्वात असू शकत नाही, अशी आयोगाची खात्री झाली आहे. त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे असद्‌हेतूने टाळले असल्याची आयोगाची धारणा झाली आहे. अशाप्रकारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली सार्वजनिक स्वरुपाची व देय असलेली माहिती त्यांना

अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत न पुरवून स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, वक्फ बोर्ड, औरंगाबाद यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. शेख जफर सध्या हिंगोली येथे कार्यरत) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, वक्फ बोर्ड, औरंगाबाद यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. शेख जफर सध्या हिंगोली येथे कार्यरत) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्यची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सैय्यद मोबीनउद्दीन सैय्यद अल्लाउद्दीन, रा.घर क्रमांक १-१२-७१, जुना बाजार, औरंगाबाद / ऑफिस शॉप नं. ४, आमेर मार्केट, जुना बाजार, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२६८

निर्णय दिनांक १८-०५-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. पंडीतराव शामराव पतंगे,<br>रा. गणपती मंदीराजवळ, माळोदे गल्ली, हदगांव, जि. नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>पंचायत समिती कार्यालय, हदगांव, जि. नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद,<br>नांदेड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०८-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी, पंचायत समिती, हदगांव यांच्याकडे, एप्रिल २००६ ते ऑक्टोबर २००८ या कालावधीमध्ये त्यांच्या कार्यालयाअंतर्गत करण्यात आलेल्या विविध कामासाठी किती व कोणते गौण खनिज वापरले, त्याबाबत किती गौण खनिज कर कपात करुन घेतले, असा एकूण कपात

केलेला कर शासनाकडे वर्ग केल्याबाबतच्या दस्तऐवजाची प्रत व एजंसीने किंवा ग्रामपंचायतीने शासनाकडे परस्पर गौण खनिज कर भरलेला असल्यास त्या दस्तऐवजाची प्रत, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

यानंतर अपिलार्थीने दिनांक ०४-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे माहिती अधिकाऱ्यास या माहितीकरिता स्मरणपत्र दिले. तथापि तदनंतरही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक २३ ०४-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी १४-०५-२००९ रोजी सुनावणी ठेवली होती. नंतर ती परत दिनांक ०९-०६-२००९ रोजी व २६-०६-२००९ रोजी ठेवली. अशाप्रकारचा पत्रव्यवहार आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. परंतु अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणीचा निर्णय आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही. यानंतर अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगा-समोर उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः मागितल्यानंतर या अर्जासंदर्भातील पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे उत्तरदायित्व हे पूर्णपणे अपिलार्थीचे होते. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचे हे उत्तरदायित्व त्यांच्या दिनांक ०४-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे पार पाडल्याचे आयोगास आढळून येत आहे. कारण अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ०४-०२-२००९ पर्यंत कोणतीही

माहिती प्राप्त न झाल्याची बाब जन माहिती अधिकारी, पंचायत समिती , हदगांव यांच्या निदर्शनास आणून दिली आहे. या पत्राची प्रत पंचायत समिती, हदगांव कार्यालयास दिनांक ०४-०२-२००९ रोजी प्राप्त झाली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमातील कलम ७ (१) मधील तरतुदीप्रमाणे हा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाच्या आत त्यांना माहिती देण्यासंदर्भात सकारात्मक किंवा नकारात्मक स्वरुपाचा प्रतिसाद देणे अपेक्षित होते. परंतु संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जास कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिलेला नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, या अपिलावर सुनावणी घेण्याचे पंचायत समितीचे जन अपिलीय अधिकारी यांनी टाळले व अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नाही. परिणामी अपिलार्थी हे त्यांना अपेक्षित माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणा-शिवाय वंचित राहिल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे त्यांच्या दिनांक १५-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी हेतूपुरस्सर टाळाटाळ केल्याचे वरील परिच्छेदामध्ये स्पष्ट झाले असल्याने संबंधित जन माहिती अधिकारी हे अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र होत आहेत. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, हदगाव यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्यची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पंडीतराव शामराव पतंगे, रा. गणपती मंदीराजवळ, माळोदे गल्ली, हदगांव, जि. नांदेड

२ जन माहिती अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, हदगांव, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी-संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२६९

निर्णय दिनांक १८-०५-२०१०

१ श्री. टेकाळे शेषराव एकनाथ, : अपिलार्थी

रा. पो. कुपटी (मा.), ता. माहूर, जि. नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, कार्यालय, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०८-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती न पुरविल्यामुळे आणि जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, कुपटी (मा.), किनवट / माहुर येथील केंद्रीय प्राथमिक शाळा (आनंतवाडी) च्या मालकी जागेसंदर्भात सन १९६३ ते २००९ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या शाळेच्या स्थापनेचा दिनांक, शाळेच्या जागेची मालकी कोणाची, सदर जागा कुणी कशा प्रकारे दिली, शाळेच्या जागेचे

एकूण क्षेत्रफळ, चतु:सिमाच्या ग्रामपंचायत कार्यालयाच्या नोंदीप्रमाणे पत्र, शाळा बांधकामाच्या वेळी जागा क्षेत्र दाखविलेला नकाशा व कागदपत्रे, अशी माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०५-२००९ रोजी या संदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी देखील कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर, आयोगाच्या कार्यालयातर्फे दिनांक १५-०५-२०१० रोजी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयास दुरध्वनीवरुन कळवून, उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज प्राप्त झाल्यापासून या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे प्रतिसाद देणे अभिप्रेत आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या, त्यांनी अधिनियमातील कमल १९ (१) मधील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नाही. परिणामी अपिलार्थी त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही

समर्थनीय कारणाशिवाय वंचित राहिले आहेत, असे आढळून येत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीस कोणतीही माहिती न पुरवून संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट करुन स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब सचिव (शालेय शिक्षण विभाग), मंत्रालय, मुंबई यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (शालेय शिक्षण विभाग), मंत्रालय, मुंबई यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्यची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. टेकाळे शेषराव एकनाथ, रा. पो. कुपटी (मा.), ता. माहूर, जि. नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (शालेय शिक्षण विभाग), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२७४

निर्णय दिनांक १८-०५-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सत्यनारायण देवराव जाधव,<br>रा. पारवा खु., तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, पारवा खु.,<br>तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,<br>हिमायतनगर, तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड | : | प्रतिवादी |

प्रत्याक्षात : जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती, हिमायतनगर, तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०८-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक १८-०५-२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की,

विचाराधीन व्दितीय अपिलासंदर्भातील मूळ अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता प्राप्त झाली असून प्राप्त माहितीसंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नाही, त्यामुळे ते त्यांचे विचाराधीन अपील क्रमांक १२७४/२००९ स्वखुषीने मागे घेत आहेत.

खुद्द अपिलार्थीनेच त्यांचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील आता मागे घेतले असल्याने व ते रद्द करण्याची त्यांनी विनंती केली असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सत्यनारायण देवराव जाधव, रा. पारवा खु., तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, पारवा खु., तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती, हिमायतनगर, तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२७५

निर्णय दिनांक १८-०५-२०१०

१ सौ. पुष्पा युवराजसिंह हजारी, : अपिलार्थी
म्हाडा कॉलनी, रायगडनगर, एन ९, आर-२६, घ. नं. ३६०,
हडको, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कारागृह महानिरीक्षक तथा पोलिस महासंचालक
(विशेष), महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : स्वीय सहायक, कारागृह महानिरीक्षक, पुणे
जन अपिलीय अधिकारी : कारागृह उपमहानिरीक्षक (मु.), कारागृह महानिरीक्षणालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०२-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या पतीच्या संदर्भात एकूण सहा मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - त्यांच्या पतीची बदली प्रतिकुल अहवाल जो कारागृह उपमहानिरीक्षक यांनी पाठविला त्या अहवालाची छायांकीत प्रत, दिनांक २८-०१-२००९ चुकून २८-१२-२००९ म्हणून टाकलेली पाठविलेल्या फॅक्सबाबत व नंतर प्रत्यक्ष दिनांक ०२-०२-२००९ ला दिलेल्या तक्रार अर्जावर अथवा भ्रष्टाचार अर्जावर काय कारवाई केली, दिनांक २७-१२-२००८ रोजी मार्फत अधीक्षक औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह माहिती अर्जावर काय कारवाई केली, दिनांक ०१-१०-२००८ रोजी मार्फत अधीक्षक औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह रायडर मेसेंजर फक्त इंधन खर्च संबंधित अधिका-यांनी दिला दैनंदिन भत्ता दिला नाही अर्ज केला काय कारवाई केली, दिनांक १०-१२-२००८ रोजी मुलांचे उच्च शिक्षणाकरिता कुटूंबकल्याण निधीतून कर्ज कॉलेजचे स्टेटमेंट दरवर्षी ५५ हजार रुपये असे मागितले त्याबाबत, बदली प्रवासभत्ता का दिला नाही काय कारवाई संबंधितांवर करणार - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०४-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जाची प्रत जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाने त्यांच्या दिनांक २५-०६-२००९ रोजीच्या पत्राव्दारे अधीक्षक, औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह यांचेकडे पाठवून त्यांना अपिलार्थीस सशुल्क माहिती पुरविण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या पतीने हीच माहिती कारागृह उपमहानिरीक्षक व कारागृह महानिरीक्षक यांच्याकडे मागितली असता त्यांना ती देण्यात आली. या प्रकरणी अपिलार्थीचा दिनांक ०२-०३-२००९ रोजीचा मूळ अर्ज त्यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी दिनांक २५-०६-२००९ रोजी अपिलार्थीचा अर्ज या प्रकरणाशी संबंधित माहिती ज्या प्राधिकरणाकडे उपलब्ध होती त्या प्राधिकरणाकडे म्हणजे अधीक्षक, मध्यवर्ती कारागृह, औरंगाबाद यांच्याकडे पाठविला. अपिलार्थीचे पती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीचा वापर करुन अशाच प्रकारची माहिती वारंवार मागवतात. या प्रकरणी त्यांनी ज्या माहितीची मागणी केली आहे ती माहिती अपिलार्थीच्या पतीस उप महानिरीक्षक कारागृह यांच्याकडून पूर्वीच प्राप्त झाली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्रयस्थ पक्ष श्री. युवराजसिंह हजारी यांच्यासंदर्भात त्यांच्या सेवेबाबतची वैयक्तिक माहिती मागितली आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ही माहिती एकूण सहा मुद्दयाव्दारे मागितली आहे. त्यापैकी मुद्दा क्रमांक १ व्दारे त्यांनी उप महानिरीक्षक मध्यवर्ती कारागृह, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या पतीच्या बदलीसंदर्भात त्यांच्या वरिष्ठांना पाठविलेल्या अहवालाची प्रत मागितली आहे. आयोगाने, अपिलार्थीने मागणी केलेल्या व जन माहिती अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात उपलब्ध असलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, हा प्रस्ताव कारागृह उप महानिरीक्षक यांनी कारागृह महानिरीक्षक यांच्याकडे एका विश्वासाश्रित नात्याने पाठविल्याचे दिसून येत आहे. हा अहवाल अपिलार्थीस उघड केल्याने अधिनियमातील कलम ८ (१) (ङ) मधील तरतुदीचा निश्चितपणे भंग होईल आणि तो अपिलार्थीस उघड केल्याने कोणतेही व्यापक जनहित साध्य होईल असे आयोगास वाटत नसल्यामुळे, ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होणार नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २, ३ व ५ च्या संदर्भात, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप

अत्यंत मोघम असे आहे. त्यांनी या मुद्दयांमध्ये, त्यांनी केलेल्या तक्रार अर्जावरील कारवाई, अशा स्वरुपाची माहिती मागितली आहे, तथापि हा अर्ज त्यांनी कोणास उद्देशून व कोणत्या कारणास्तव केला याचा उल्लेख केलेला नाही अथवा या अर्जाच्या प्रती त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासोबत जोडलेल्या नाहीत, त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २, ३ व ५ च्या संदर्भातील माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ व्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या पतीच्या बदलीचा प्रवासभत्ता का दिला नाही आणि संबंधितांवर काय कारवाई करणार ? अशी अधिनियमातील कलम २ (च) मध्ये विहित केलेल्या ' माहिती ' या शब्दाच्या व्याख्येशी विसंगत माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार, अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दलची कारणे अथवा खुलासे विचारणे आणि अर्जदाराने मागणी केलेल्या माहितीवर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कृतीबाबतची स्पष्टीकरणे अर्जदारास देणे, अशा प्रकारच्या प्रक्रियेचा अधिनियमातील ' माहिती ' या शब्दाच्या व्याख्येमध्ये समावेश नाही. तसेच या मुद्दयावरील संबधितांवर काय कारवाई करणार ? अशा भागाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसलेली भविष्यकाळातील माहिती मागितली आहे, ही माहिती देखील माहिती अधिकार अधिनियमातील ' माहिती ' या शब्दाच्या व्याख्येशी विसंगत असल्यामुळे, ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित माहिती मात्र, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले आहे की, त्यांनी रायडर मेसेंजरच्या खर्चाबद्दल व दैनंदिन भत्त्याबद्दल जिल्हा कोषागारात १,६६९ रुपयाचे बील दिनांक १२-०५-२०१० रोजी सादर केले असून, हे बील मंजूर झाल्यावर अपिलार्थीच्या पतीस ही रक्कम अदा करता येईल. या मुद्दाबाबत जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या

मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठी-चा मूळ अर्ज कारागृह महानिरीक्षक, पुणे यांना उद्देशून केला होता. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती कारागृह महानिरीक्षक, पुणे यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नव्हती, अशा वेळी त्यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) मधील तरतुदीनुसार अपिलार्थीच्या अर्जाची प्रत, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या प्राधिकरणाकडे उपलब्ध होती, त्या प्राधिकरणाकडे सदरचा अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाच्या आत पाठवून त्याची प्रत अपिलार्थीस देणे जरुरीचे होते, तथापि त्यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज पाच दिवसाच्या आत पाठविण्याऐवजी, सदर अर्ज ५२ दिवसांच्या विलंबाने पाठविला. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या दिनांक २८-०४-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, अधिनियमातील कलम १९ (६) मध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये कोणतीही कार्यवाही न करुन, अपिलार्थीस त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीपासून वंचित ठेवले आहे. अशा प्रकारे या प्रकरणी कारागृह महानिरीक्षक व कारागृह उप महानिरीक्षक यांनी अपिलार्थीस अपेक्षित माहिती-पासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवले असल्याचे आयोगास आढळून येत आहे. या प्रकरणी अपिलार्थीस अपेक्षित माहितीपासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवून, संबंधित जन माहिती अधिकारी, कारागृह महानिरीक्षक, पुणे यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल ते अधिनियमातील कलम २० मधील तरतुदी-प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र होत आहेत. सबब, सचिव (गृह) यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे व विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (गृह) यांना, या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. पुष्पा युवराजसिंह हजारी, म्हाडा कॉलनी, रायगडनगर, एन ९, आर-२६, घ. नं. ३६०, हडको, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा स्वीय सहायक, कारागृह महानिरीक्षक, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कारागृह उपमहानिरीक्षक (मु.), कारागृह महानिरीक्षणालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (गृह), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२७६

निर्णय दिनांक १८-०५-२०१०

१ श्री. शेख हबीब पाशा पिता गुलाम रसूल, : अपिलार्थी
घर नंबर १-१६-३२, जुना बाजार, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती आर्थिक
विकास महामंडळ मर्यादित, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास
महामंडळ मर्यादित, मुंबई

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : जिल्हा व्यवस्थापक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : महा व्यवस्थापक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, मुंबई

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, अपिलार्थीने आपल्या माहितीसाठीचा मूळ अर्ज रजिस्टर्ड पोस्टाने पाठविला असून सदर अर्ज स्वीकारण्यासाठी जन

माहिती अधिकारी यांनी नकार दिला, त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यावर कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८-०४-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयातर्फे सन २००८ ते २००९ या कालावधीमध्ये केलेल्या कर्जवाटपाच्या संदर्भातील अभिलेख्याची व तत्सम साहित्याची तपासणी करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना विनंती केली होती. अपिलार्थीने सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे नोंदणीकृत टपालाव्दारे पाठविला होता. हे टपाल स्वीकृत करण्यास जन माहिती अधिकारी यांनी नकार दिल्यामुळे अपिलार्थीने रजिस्टर्ड टपालाव्दारे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०४-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी गैरहजर व अपिलार्थी आणि जन माहिती अधिकारी हजर आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये केलेल्या विनंतीशी सुसंगत असा युक्तिवाद आयोगासमोर केला.

आजच्या सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेले अभिलेखे त्यांना तपासणी-साठी उपलब्ध करुन देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे तपासणीसाठी मागणी केलेले अभिलेखे त्यांना, हे आदेश

निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत तपासणीसाठी विनामूल्य उपलब्ध करुन द्यावेत. या प्रकरणी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज न स्वीकारुन, संबंधित जन माहिती अधिकारी (श्रीमती सु. वा. वानरे, तत्कालीन जिल्हा व्यवस्थापक, वसंतराव नाईक विकास महामंडळ, औरंगाबाद) यांनी स्वत:ला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यासाठी पात्र ठरविले आहे. संबंधित जन माहिती अधिकारी श्रीमती सु. वा. वानरे, तत्कालीन जिल्हा व्यवस्थापक, वसंतराव नाईक विकास महामंडळ, औरंगाबाद या आता नियत वयोमानानुसार शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाल्याने त्यांच्यावर कोणतीही कारवाई आदेशित करण्यात येत नाही.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे वरील परिच्छेदात निर्देशित केलेल्या कालावधीमध्ये, कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी स्वत: उपस्थित राहून त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्राची तपासणी करावी. अपिलार्थीस ही तपासणी त्यांच्या प्राधिकृत प्रतिनिधी-मार्फत करणे अनुज्ञेय असणार नाही, याची त्यांनी नोंद घ्यावी. या अभिलेख्यातील आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य पुरवाव्यात.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अजाव्दारे तपासणीसाठी मागणी केलेले अभिलेखे त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत तपासणीसाठी विनामूल्य उपलब्ध करुन द्यावेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेख हबीब पाशा पिता गुलाम रसूल, घर नंबर १-१६-३२, जुना बाजार, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा व्यवस्थापक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा महा व्यवस्थापक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२७७

निर्णय दिनांक १८-०५-२०१०

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. रामचंद्र दिनकर रत्नपारखी,<br>रत्नकुंज निवास, जवाहर कॉलनी, नगर रोड, बीड | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,<br>महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१ | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अपर निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,<br>पुणे - ०१ | : प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप निबंधक, सहकारी संस्था (पतसंस्था), कार्यालय सहकार आयुक्त, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी एका पुस्तकातील पानाची झेरॉक्स प्रत पाठविली असून, त्यात त्यांनी मागणी केलेल्या अर्जातील फक्त प्रथम क्रमांकाच्या परिपत्रकाचा उल्लेख आहे, परंतु बाकी ९ संस्थांसंदर्भात त्यामध्ये उल्लेख नाही आणि तसेच सदरील झेरॉक्स प्रत मूळ परिपत्रकाची प्रत नाही आणि ती साक्षांकीतही

नाही, त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असून, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना, जन माहिती अधिकारी यांना विनामूल्य देण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० नुसार नोंदणी झालेल्या संस्थांनी वाटप केलेल्या कर्जावर दंड व्याज आकारणीबाबतच्या जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने पारीत केलेल्या परिपत्रकाची प्रती, अशी माहिती एकूण दोन मुद्दयाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०९-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व्दारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या पुस्तकामध्ये संकलित केली आहे त्या पुस्तकाचा तपशील अपिलार्थीस कळविला. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-१२-२००७, १४-०१-२००८, २०-०२-२००८ व २४-०३-२००८ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि या सर्व सुनावण्यास अपिलार्थी गैरहजर राहिल्याने अपिलार्थीस काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहीत धरुन त्यांनी अपिलार्थीचे अपील दिनांक ०३-०४-२००८ रोजीच्या निर्णयाव्दारे खारीज केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी गैरहजर व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता आणि तसेच अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी नैसर्गिक न्याय तत्वानुसार एक संधी देण्याच्या दृष्टीने, अपिलार्थीच्या दिनांक ३०-११-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी या टप्प्यावर सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा अपर निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ३०-११-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच, तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा अपर निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ३०-११-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रामचंद्र दिनकर रत्नपारखी, रत्नकुंज निवास, जवाहर कॉलनी, नगर रोड, बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक, सहकारी संस्था (पतसंस्था), कार्यालय सहकार आयुक्त, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२७८
निर्णय दिनांक : १९.०५.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. भारतभूषण शशिकांत जैस्वाल,<br>रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद | | |

त्रयस्थ पक्ष : श्री. इस्तापे ज्ञानेश्वर रमेश,
श्री. अतार सलिम अहेमद व श्री.
लिंबेकर मोहन बाबूराव.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७.०८.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०५.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्या कार्यालयाकडे एप्रिल, २००८ ते फेब्रुवारी, २००९ या कालावधीमध्ये चित्रकला शिक्षण सेवक पदाकरिता करण्यात आलेल्या भरतीसंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये -

चित्रकला शिक्षणसेवक आक्षेप यादीत जाहीर केलेल्या अ.क्र.१० वरील इस्तापे ज्ञानेश्वर रमेश, अ.क्र.२१ वरील अतार सलीम अहमद, अ.क्र. २५ वरील लिंबेकर मोहन बाबुराव यांनी चित्रकला शिक्षण सेवक पदासाठी सादर केलेल्या अर्जांच्या व त्यासोबत जोडलेल्या कागदपत्रांच्या सत्यप्रती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती टपालाद्वारे किंवा व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे दि.०८.०७.२००९ रोजी प्रथम अपील केले. तथापि त्यांनी या प्रकरणी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. २३.०३.२००९ रोजीच्या पत्राद्वारे आवश्यक ती माहिती रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य उपलब्ध करुन दिली होती. तथापि या पत्त्यावर अपिलार्थी माहिती घेण्यासाठी उपलब्ध न झाल्याने माहितीचे पोस्टाचे पाकीट त्यांना विनातामिली परत आले. यानंतर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपिलावरील दि. ०९.१०.२००९ रोजीच्या सुनावणीच्या वेळी त्यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली संपूर्ण माहिती दिली. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ, सदर माहिती प्राप्त झाल्याबाबतची अपिलार्थीची पोचसही त्यांनी आयोगास सादर केली.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना दि.

०९.१०.२००९ रोजी त्यांच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी आणि तसेच त्यांनी आयोगाकडे दि. १७.०८.२००९ रोजी द्वितीय अपील सादर केल्यानंतर प्राप्त झाली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या पत्त्यावर माहिती पाठविली असता, सदर माहितीचे पाकीट पोस्टाकडून जन माहिती अधिकारी यांना विनातामिली परत प्राप्त झाल्याचा पुरावा त्यांनी आयोगास अवलोकनास्तव सादर केला आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याचे सिध्द होत नाही व अपिलार्थीस आता माहिती प्राप्त झाल्याची पोचसही देखील अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिली असल्याने अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर नव्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक १९.०५.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. भारतभूषण शशिकांत जैस्वाल, द्वारा - कान्हा ॲटोमोबाईल्स, ए-९, जे/१/३५,संजय गांधी मार्केट, पोलीस चौकीजवळ, हडको,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२७९

निर्णय दिनांक : १९.०५.२०१०

१. श्री. विपूल नाथाजी देबाजे, : अपिलार्थी
रा.सेलू, जि.परभणी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सहायक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
सेलू, जि.परभणी.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
परभणी.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०.०८.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक ०५.०५.२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर करण्यात आले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता संपूर्ण

माहिती प्राप्त झाली असून, प्राप्त माहितीसंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नाही त्यामुळे ते त्यांचे विचाराधीन अपील क्रमांक १२७९/०९ स्वखुषीने मागे घेत आहेत.

खुद्द अपिलार्थीनेच त्यांचे आयोगाकडे केलेले द्वितीय अपील आता मागे घेतले असल्याने व ते रद्द करण्याची त्यांनी विनंती केली असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक १२७९/०९, दिनांक १०.०८.२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक १९.०५.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विपूल नाथाजी देबाजे, केशवराज बाबासाहेब मंदिर, पूलाजवळ, सेलू,ता.सेलू, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, सेलू, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२८०

निर्णय दिनांक : १९.०५.२०१०

१. श्री. आश्रोबा साहेबराव गायवळ, : अपिलार्थी
रा.गंगाखेड, जि.परभणी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपविभागीय पोलीस अधिकारी,
गंगाखेड,जि.परभणी

२. जन अपिलीय अधिकारी तथा
पोलीस अधीक्षक, परभणी

त्रयस्थ पक्षः श्री. डी. आर. चव्हाण

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८.०८.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न देता, सुनावणीसाठी बोलावून, तोंडी चर्चा केली व माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २५.०५.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांची मयत मुलगी,कु. पूजा गायवळ, हिच्या मृत्यूप्रकरणी त्यांनी केलेल्या तक्रारी संदर्भात काही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०४.०५.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे अधिनियमातील कलम ८ च्या तरतुदीनुसार नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, परभणी यांच्याकडे दि.३०.०६.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. २४.०८.२००९ रोजीच्या पत्राद्वारे उपविभागीय पोलीस अधिकारी, गंगाखेड यांना अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीच्या प्रती देण्याचे सूचित केले. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा दि. ०७.०५.२०१० रोजीचा लेखी जबाब आयोगास सादर केला असून, या जबाबामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, या प्रकरणी त्यांनी मागणी केलेली कागदपत्रे त्यांना मिळाली आहेत आणि त्यांच्या अर्जाप्रमाणे गुन्हा दाखल झाल्याने त्यांची तक्रार राहिलेली नाही. त्यामुळे आयोगाकडील सुनावणीसाठी हजर राहण्याची त्यांना कोणतीही इच्छा नाही. या जबाबामध्ये त्यांनी सदर प्रकरण निकाली काढण्यात यावे, अशी त्यांची इच्छा व्यक्त केली आहे.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे आणि विशेषतः अपिलार्थीच्या जबाबाच्या जन माहिती अधिकारी यांनी सादर केलेल्या प्रतीचे अवलोकन करता, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज केल्यानंतर प्राप्त झाली असल्याने आणि आता यासंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार उरली नसल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक १९.०५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. आश्रोबा साहेबराव गायवळ,रा.पंचायत समिती क्वार्टर,गंगाखेड, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, गंगाखेड,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२८१

निर्णय दिनांक : १९.०५.२०१०

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. मेनकुदळे वैजनाथ हरीभाऊ,<br>रा.ईटोली, ता.जिंतूर, जि.परभणी | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी,<br>उपवनसंरक्षक परभणी यांचे कार्यालय,<br>परभणी. | : प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी,<br>उपवनसंरक्षक, परभणी यांचे कार्यालय,<br>परभणी. | |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.), परभणी

जन अपिलीय अधिकारी : सहा. वनसंरक्षक (रोहयो), परभणी.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३.०८.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १३.०४.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, दि. ०१.११.१९८९ ते ३१.१०.१९९४ या कालावधीतील स्वतःच्या उपस्थिती अहवालाच्या संदर्भात या कालावधीतील त्यांच्या हजेरीपटाच्या प्रती, व्यक्तिशः मागितल्या होत्या.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०६.०६.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली व काही माहितीसंदर्भात, मा. उच्च न्यायालयाच्या परवानगीने त्यांना माहिती देण्यात येईल, असे अपिलार्थीस कळविले. या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०८.०६.२००९ रोजी प्रथम अपील केले. परंतु या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्याने आणि अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थितांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, उपस्थितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व विशेषतः या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (रोहयो), परभणी यांनी अपिलार्थीच्या दि. ०८.०६.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (रोहयो), परभणी यांनी अपिलार्थीच्या दि.०८.०६.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक १९.०५.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मेनकुदळे वैजनाथ हरीभाऊ,मु.पो.ईटोली, ता.जिंतूर, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.),परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (रोहयो),परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२८२

निर्णय दिनांक : १९.०५.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. आसाराम ग्यानबा कांदे,<br>रा.चोपनवाडी, ता.माजलगाव,जि.बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग, माजलगाव,<br>जि.बीड. | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग,अंबाजोगाई,<br>जि.बीड | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०.०८.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकारी अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, माजलगाव यांच्याकडे त्यांच्या दि. ०९.०२.२००९ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन न दिल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) व २०(२) प्रमाणे शास्ती लावण्याचे आणि शिस्तभंगाची कारवाई करण्याचे आदेश पारित करावेत. जन अपिलीय अधिकारी हे कायद्याच्या तरतुदीप्रमाणे शास्ती लावून किंवा शिस्तभंगाची शिफारस करु शकले असते, परंतु तसे न करता राज्य शासकीय माहिती अधिकाऱ्यांना त्यांनी ताकीद दिली आहे, हे सविस्तर कळेल का? जन अपिलीय अधिकारी हे

जाणूनबुजून माहिती अधिकाऱ्याची पाठराखण करीत आहेत, असे त्यांचे अभिप्राय त्यांनी या अपील अर्जामध्ये देऊन आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०९.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मौजे चोपनवाडी, ता. माजलगाव ते परळी-बीड या राज्य रस्त्याला जोडल्या जाणाऱ्या ग्रामीण रस्त्यावरील डांबरीकरणाच्या संदर्भात एप्रिल, २००८ ते दि.०९.०२.२००९ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण दहा मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती. अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद करुन त्यांना पंचायत समिती, माजलगाव यांनी दि. २२.०८.२००६ रोजी दिलेले प्रमाणपत्र त्यांनी या अर्जासोबत जोडले होते.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०१.०४.२००९ रोजी यासंदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १२.०५.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी दि. ०९.०२.२००९ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती प्राप्त झालेली नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागूनही त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील

कलम २०(१) व २०(२) च्या तरतुदीप्रमाणे शास्ती लावावी आणि त्यांना अपेक्षित असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना विनामूल्य प्राप्त व्हावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज केला, त्यावेळी श्री. बी.डी.साळवे, नावाचे उपअभियंता या पदावर कार्यरत होते. त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंब लावण्याची कारणे त्यांना आता सांगता येणार नाहीत. तथापि आता त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयाच्या दि. १४.०५.२०१० रोजीच्या पत्राद्वारे नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठविली आहे.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व  या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. ०९.०२.२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, असे आढळून आले आहे की, या प्रकरणी मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या एकूण दहा मुद्यांवरील माहितीपैकी मुद्दा क्र. ६,७,८,१० व मुद्दा क्र. ९ मधील, 'मौ. चोपनवाडी येथील काम पूर्ण करण्यासाठी निश्चित कालावधीचे बंधन घातले नसल्यास, असे बंधन न घालण्याची कारणे द्यावीत' या भागाशी संबंधित माहिती  अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून  देय होत नाही. या मुद्यांवर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीचे स्पष्टीकरण अपेक्षित असलेली माहिती मागविली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कृतीबद्दलचे स्पष्टीकरण अथवा निर्णयाबद्दलची कारणे अर्जदारास कळविण्याच्या प्रक्रियेचा समावेश या अधिनियमामध्ये नाही. त्यामुळे वरील परिच्छेदात स्पष्ट केल्याप्रमाणे,अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ६,७,८ व ९ मधील अंशतः भाग आणि मुद्दा क्र. १० या मुद्यांशी संबंधित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. मात्र उर्वरित सर्व मुद्यांवरील आणि मुद्दा क्र. ९ मधील उर्वरित भागावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या मुद्यांवरील माहिती त्यांच्याकडील दि. १४.०५.२०१० रोजीच्या

पत्राद्वारे रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य पाठविली आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत. परंतु या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास अधिनियमातील कलम ७(१) मध्ये विहित केलेल्या मुदतीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याचे व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी अपिलार्थीस दि. १२.०५.२००९ रोजीच्या निर्णयाद्वारे पंधरा दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित करुनही जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्याचे टाळले आहे, ही बाब नजरेआड करण्यासारखी नाही. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना विहित मुदतीत न देऊन व कार्यकारी अभियंता यांनी दि. १२.०५.२००९ रोजीच्या आदेशाद्वारे दिलेल्या मुदतीत अपिलार्थीस कोणतीही माहिती न पुरवून संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. बी.डी. साळवे, उपविभागीय अभियंता सध्या रजेवर) यांनी आपल्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट करुन स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब सचिव (सार्वजनिक बांधकाम विभाग) यांना उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी, श्री. बी.डी.साळवे (सध्या रजेवर) यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. सचिव (सार्वजनिक बांधकाम विभाग) यांना संबंधित जन माहिती अधिकारी, श्री. बी.डी.साळवे (सध्या रजेवर) यांच्यावर प्रचलित

सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक १९.०५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. आसाराम ग्यानबा कांदे,रा.चोपनवाडी, पो. दिंद्रुड,ता.माजलगाव,जि.बीड-४३१ १२८.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम उपविभाग, माजलगाव, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम वभाग,अंबाजोगाई, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (सार्वजनिक बांधकाम विभाग), मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२८३

निर्णय दिनांक : १९.०५.२०१०

१. श्री. गणेश साहेबराव लांडगे, : अपिलार्थी
रा. माजलगाव, जि.बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
पंचायत समिती, माजलगाव,
जि.बीड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, बीड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कार्यालयीन अधीक्षक,
पंचायत समिती, माजलगाव,
जि.बीड

जन अपिलीय अधिकारी : गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, माजलगाव,
जि. बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८.०८.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. २८.०६.२००९ रोजीच्या आदेशान्वये खरी व अचूक माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करुनही त्यांना माहिती दिली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०४.०३.२००९ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "माजलगाव तालुक्यातील सन २००४-०८ या कालावधीमध्ये विविध योजनेअंतर्गत शासनाकडून मंजूर झालेल्या घरकुलाच्या निधीमध्ये भ्रष्टाचार करुन अधिकाऱ्याने घरकुलाचे बांधकाम न करता निधी वाटप केल्याबाबत", या विषयावर एकूण तीन मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - उपरोक्त कालावधीमध्ये बांधण्यात आलेल्या घरकुलाचे लाभार्थ्यांसह काढलेले फोटो, लाभार्थ्यांच्या घराच्या जागेच्या पी.टी.आर. ची झेरॉक्स प्रत किंवा त्या घराच्या ताब्याच्या झेरॉक्स प्रती व योजनेचा लाभ घेण्याअगोदर घराचे बांधकाम केले आहे काय, त्याचा पाहणी अहवाल अथवा सहन जागेत घरकुलाचे बांधकाम केल्याच्या पुराव्याच्या झेरॉक्स प्रती - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०८.०४.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०१.०६.२००९ रोजी यासंदर्भात प्रथम अपील केले. परंतु या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी, त्यांच्या दि. ०८.०७.२००९ रोजीच्या आदेशाद्वारे "जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या समन्वयाने सुधारीत माहिती विहित कालावधीमध्ये अपिलार्थीस द्यावी",असे जन माहिती अधिकारी यांना सूचित कले. तथापि यानंतरही अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जातील तीन मुद्यांशी संबंधित संपूर्ण माहिती

अपिलार्थीस दि. ०८.०४.२००९ रोजीच्या पत्राद्वारे पुरविली आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशावर कार्यवाही न करण्याचे कारण माहिती अधिकाऱ्यास विचारले असता, त्यांनी मूळातच अपिलार्थीस संपूर्ण माहिती दिली असल्याने, जन अपिलीय अधिकारी यांच्या सूचनेसंदर्भात त्यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही, असे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून खरी व अचूक माहिती अपेक्षिली आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर त्यांचे मुद्देनिहाय कोणते आक्षेप आहेत, हे त्यांनी या अपील अर्जामध्ये नमूद केलेले नाही. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. ०८.०७.२००९ रोजीच्या निर्णयामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पुरविलेल्या माहितीमध्ये, काही घरकुलाच्या फोटोवर फक्त गावाचे नाव लिहिले आहे, घरकुल लाभधारकाचे नाव इ. माहिती नमूद केलेली नाही,असे अपिलार्थीने नमूद केल्याचा उल्लेख असल्याचे दिसून येत आहे. यासंदर्भात स्पष्ट करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकाऱ्याने अर्जदारास ज्या स्वरुपात त्यांच्याकडे माहिती उपलब्ध आहे, त्याच स्वरुपात ती अर्जदारास देण्याची तरतुद आहे, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध होती, त्या स्वरुपात त्यांनी ती अपिलार्थीस पुरविली आहे. त्यामुळे जर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या या माहितीवर काही आक्षेप असतील तर या आक्षेपाचे निराकरण त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांच्याकडून करुन घ्यावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

आयोगाकडे सादर केलेल्या कागदपत्रांवरुन त्यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माजलगाव यांच्याकडे अपिलार्थीने त्यांच्या या मुद्यासंदर्भात दि. ०२.०५.२००९, ११.०५.२००९ रोजी अशाच स्वरुपाची तक्रार केली आहे. या तक्रार अर्जावर गट विकास अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २६.०५.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस देण्यात आलेली माहिती ही कार्यालयीन अभिलेख्यावरुन देण्यात आलेली असल्याचे स्पष्ट केले आहे. आज रोजी या माहितीसंदर्भात मौखिक युक्तिवाद करण्यासाठी अथवा सबळ पुरावा सादर करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत किंवा जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती ही दिशाभूल करणारी कशी आहे, हे स्पष्ट करणारा कोणताही सबळ पुरावा सादर न केल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील आवश्यक त्या सबळ पुराव्याअभावी फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक १९.०५.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गणेश साहेबराव लांडगे,रा. पंचशीलनगर (मंजरथरोड),माजलगाव, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक,पंचायत समिती, माजलगाव, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, माजलगाव, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२८४

निर्णय दिनांक १९-०५-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. बोंदर दत्तात्रय सुग्रीव,<br>रा. वडगांव (शि), पो. निपाणी, तालुका कळंब,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, वडगांव (शि),<br>तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, कळंब,<br>तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित दिनांक ३०-१२-२००५ ते ०५-०२-२००९ या कालावधीतील ग्रामसभेच्या ठरावाच्या सर्व प्रती, ग्रामपंचायत, वडगांव (शि) येथे जमा झालेली पाणीपट्टी व घरपट्टी, ग्रामपंचायतला केलेल्या कामाचे मुल्यांकन, हजेरीपत्रकाच्या झेरॉक्स,

या कालावधीतील मासिक सभेतील सर्व ठरावाच्या नकला, ठरावानुसार काम केलेल्या कामाचा तपशील व याबाबत चौकशीच्या पोच पावत्या व या कालावधीमध्ये घरकुल वाटप केलेल्या लाभार्थ्यांची नावे, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-०३-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १४०० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि सदर पत्राचा स्वीकार अपिलार्थीने केला नाही आणि अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही आदेश पारीत न केल्यामुळे व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी गैरहजर व अपिलार्थीचे प्रतिनिधी आणि जन माहिती अधिकारी हजर आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस आवश्यक त्या माहितीपोटीचे शुल्क भरण्यासाठी त्यांनी दिनांक ०७-०३-२००९ रोजी पत्र लिहिले होते, तथापि अपिलार्थीने या पत्राचा स्वीकार करण्यासाठी नकार दिला, त्यामुळे त्या अपिलार्थीस माहिती पुरवू शकल्या नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांना त्यांनी युक्तिवादात नमूद केलेले दिनांक ०७-०३-२००९ रोजीचे पत्र आयोगास दाखविता आले नाही.

दिनांक ०७-०३-२००९ रोजीचे पत्र दाखवा अशी आयोगाने सूचना केली असता, त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०९-०३-२००९ रोजी लिहिलेल्या पत्राची प्रत आयोगास दाखविली. तसेच अपिलार्थीने माहिती स्वीकारण्यास नकार दिल्यापृष्ठ्यर्थ त्यांनी पंचनामा देखील केला होता, असे त्यांनी आयोगास अवगत केले. सदर पंचनाम्याची प्रत पाहता, या पंचनाम्यावर दिनांक ०५-०३-२००९ असा उल्लेख आहे, त्यामुळे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क निश्चितपणे जन माहिती अधिकारी यांनी कधी कळविले हे आयोगास आढळून येत नाही. तथापि त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०९-०३-२००९ रोजी दिलेले पत्र ग्राह्य धरल्यास असे आढळून येत आहे की, या पत्रामध्ये अपिलार्थीने अधिनियमातील ७ (३) (क) मधील तरतुदीनुसार अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा तपशील दिलेला नाही, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०९-०३-२००९ रोजीच्या पत्राव्दारे, अपिलार्थीस शुल्काचा तपशील न कळवून अधिनियमातील ७ (३) (क) चा भंग केला असल्यामुळे, अपिलार्थीस त्यांना आता ही माहिती विनामूल्य पुरवावी लागेल. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ व्दारे, ठरावानुसार काम केलेल्या कामाचा तपशील व याबाबत चौकशीची पोच पावती, अशी माहिती मागितली आहे. अपिलार्थीने या मुद्दयाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची असून, त्यामध्ये अपिलार्थीने त्यांना निश्चितपणे कोणत्या कामाची, कोणत्या मुद्दयावर माहिती हवी आहे याचा उल्लेख केलेला नाही. ' कामाचा तपशील ' म्हणजे कामाची कोणत्या मुद्दयावरील माहिती त्याचा उल्लेख अपिलार्थीने या अर्जामध्ये केलेला नाही, त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ शी संबंधित माहिती अपिलार्थीस, जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही, उर्वरित सर्व मुद्दयांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ वगळता, उर्वरित सर्व मुद्दयांवरील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, वडगांव (शि), तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांच्या कार्यालयातून हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे मुद्दा क्रमांक ५ वरील माहिती वगळता, उर्वरित सर्व मुद्दयांवरील माहिती अपिलार्थीस सात दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बोंदर दत्तात्रय सुग्रीव, रा. वडगांव (शि), पो. निपाणी, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, वडगांव (शि), तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२८५

निर्णय दिनांक  १९-०५-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सूर्यवंशी संजीवन प्रल्हादराव,<br>सहायक प्रकल्प अधिकारी, निरंतर शिक्षण विभाग,<br>जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा प्राचार्य, शासकीय अध्यापक विद्यालय, हदगांव,<br>तालुका हदगांव, जिल्हा नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा प्राचार्या, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नांदेड | : | प्रतिवादी |

प्रत्याक्षात : जन अपिलीय अधिकारी : संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन परिषद, पुणे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०८-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, प्राचार्या एस. पी. पुट्टावार यांना वरिष्ठांनी आदेश देऊनही, त्यांनी अपिलार्थीचे फेब्रुवारी २००९ पासूनचे वेतन, थकीत प्रकरणे निकाली न काढल्यामुळे व यासंदर्भात कोणताही खुलासा न केल्याने, त्यांनी विचाराधीन अपील

आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-०४-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, शासकीय अध्यापक विद्यालय, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड यांच्याकडे खालीलप्रमाणे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती.

" मा. शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय म. रा. पुणे यांचे आदेश क्रमांक अविब/ १००९/१०५४१/११-ब-२/२०७४ दि. २४/०२/२००९ चा आदेश (०२) मा. शिक्षण उपसंचालक लातूर विभाग लातूर यांचे आदेश जा. क्र. शिउसं/ला/आस्था-१/२००८-०९/४२२३/३४ दि. ०४/०२/२००९ च्या आदेशान्वये आपणास आदेशित केले असतानाही आपण माहे फेब्रुवारी २००९ चे वेतन, आयक भरणा, वैद्यकीय परिपुर्ती देयक, कार्यमुक्ती प्रवास देयक, अर्जित रजा देयक आणि थकीत वेतन दि. १२/१०/२००७ व दि. १३/१०/२००७ या दोन दिवसाचे वेतन व दि. ०१/०३/२००८ ते १७/०३/२००८ या कालावधीचे वेतन आपणास आदेश आसतानाही आपण मंजुरीसाठी का पाठविले नाही व वेतन का काढले नाही यांच तसेच सुधारीत वेतन निश्चीती का केलेले नाही खुलासा द्यावा. "

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतलेला आहे)

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-०५-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने सदरचे अपील प्राचार्या, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नांदेड यांच्याकडे केले होते, तथापि त्या या प्रकरणाशी संबंधित अपिलीय अधिकारी नसल्यामुळे, त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील शिक्षण उपसंचालक, लातूर यांच्याकडे पाठवून दिले. यानंतर शिक्षण उप

संचालकांनी त्यांच्या दिनांक १८-०७-२००९ रोजीच्या पत्राव्दारे, अपिलार्थीस माहिती देण्याचे प्राचार्य, शासकीय अध्यापक विद्यालय, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड यांना सूचित केले. परंतु यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी आणि प्राचार्या, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नांदेड हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांचे प्रवास देयक सोडून उर्वरित सर्व वेतन त्यांनी सप्टेबर २००९ मध्ये अदा केले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०४-०४-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या ' माहिती ' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार, अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे इतपत प्रक्रिया सीमित आहे. या प्रक्रियेत अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दलची कारणे अथवा निर्णयाबद्दलची कारणे आणि खुलासे अपेक्षित करणारी माहिती मागणे आणि जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयाबद्दलची स्पष्टीकरणे व खुलासे अर्जदारास देणे, अशा प्रकारच्या प्रक्रियेचा माहिती अधिकार अधिनियमा-मध्ये समावेश नाही. त्यामुळे या प्रकरणी मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, त्यांना अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत

नसल्यामुळे व अपिलार्थीने या प्रकरणी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार चुकीच्या अपिलीय प्राधिकरणाकडे त्यांचे अपील केले असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सूर्यवंशी संजीवन प्रल्हादराव, सहायक प्रकल्प अधिकारी, निरंतर शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, शासकीय अध्यापक विद्यालय, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन परिषद, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२८६

निर्णय दिनांक १९-०५-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. पवार बन्सी लिंबाजी,<br>रा. सतेवाडी, पो. देवळा (बु.), तालुका वडवणी,<br>जिल्हा बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उप अभियंता, जिल्हा परिषद लघुपाटबंधारे<br>उपविभाग, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा<br>परिषद, बीड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१-०४-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, " काम किती लाखाचे होते त्याचा तपशील, सदरच्या अंदाजपत्रका-तील कामाच्या काय काय तरतुदी करावयाच्या होत्या, कामाचे स्वरुप व मातीचे प्रकार, तलावात पाणी न राहण्याचे कारण, तलावाची लांबी, रुंदी, ऊंची व त्याची दबाई करावयाची होती काय,

कामाचे लाभ क्षेत्र व पडीत क्षेत्र द्यावे, काम कशाव्दारे केले माहिती व वर्णन ", अशी माहिती शीघ्र टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-०४-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती शाखा अभियंता यांनी सविस्तर दिली असल्याचे अपिलार्थीस अवगत केले आणि या कामामध्ये कोणत्याही त्रुटी नाहीत, काम चांगले झाले आहे व अपिलार्थीचे समाधान झाले असल्याचे अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयात दिनांक १६-०३-२००९ रोजीच्या लेखी पत्राव्दारे निवेदन सादर केले असल्याचे कारण दर्शवून, अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज निकाली काढला. जन माहिती अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०६-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी आणि जन अपिलीय अधिकारी हजर आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती जिल्हाधिकारी, बीड यांच्यासमक्ष दिनांक २९-१२-२००९ रोजी दिलेली आहे.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये त्यांना कोणत्या कामाची माहिती आवश्यक आहे, त्या कामाचा उल्लेख केलेला नाही, त्यामुळे अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन

माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही पूर्णपणे मोघम असल्याचे सिध्द होत आहे. केवळ अपिलार्थी या प्रकरणाशी संबंधित बीड जिल्हयातील वडवणी तालुक्यातील रहिवासी असल्याने मौजे वडवणी येथील तलावाच्या कामाची माहिती त्यांना संबधितांनी दिनांक २९-१२-२००९ रोजी म्हणजे अपिलार्थीने आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर उपलब्ध करुन दिली आहे. या बाबी पाहता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर वेगळ्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. परिणामी अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पवार बन्सी लिंबाजी, रा. सतेवाडी, पो. देवळा (बु.), तालुका वडवणी, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद लघुपाटबंधारे उपविभाग, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२८७

निर्णय दिनांक १९-०५-२०१०

१ श्री. पांढरपोटे ज्योतीराम सर्जेराव, : अपिलार्थी
शेलापुरी नवीन वसाहत, माजलगांव, तालुका माजलगांव,
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण
कंपनी मर्यादित, उपविभाग, माजलगांव, तालुका
माजलगांव, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण
कंपनी मर्यादित, विभागीय कार्यालय, अंबाजोगाई, जिल्हा
बीड

प्रत्याक्षात : जन अपिलीय अधिकारी : उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत
वितरण कंपनी मर्यादित, विभागीय कार्यालय,
अंबाजोगाई, जिल्हा बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती न दिल्यामुळे व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये, जो जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रत्यक्षात दिनांक २८-०१-२००९ रोजी प्राप्त झाला त्या अर्जान्वये, त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित काही माहिती विस्तृत प्रमाणात मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १०-०२-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस पुरविली व अपिलर्थीस माहितीपोटी ज्या कागदपत्राच्या प्रती आवश्यक होत्या त्याकरिता लागणारे शुल्क अपिलार्थीस कळविले. तथापि त्यावेळी अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न करता व जन माहिती अधिकारी यांना शिवीगाळ केली आणि या पत्राची पोच जन माहिती अधिकारी यांना देण्यास नकार दिला, असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे, तथापि यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही. यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असा खुलासा केला की, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची पोच त्यांच्याकडील आवक रजिस्टरमध्ये आहे, तथापि अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्या कार्यालयातील संबंधित उप अभियंत्याने गहाळ केला आणि तो कार्यकारी अभियंता यांच्या निदर्शनास न आल्याने ते अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय देऊ शकले नाहीत. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व वरील परिच्छेदामध्ये स्पष्ट केलेली वस्तुस्थिती पाहता, अपिलार्थीच्या दिनांक १६-०३-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथमतः या टप्प्यावर सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभागीय कार्यालय, अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १६-०३-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभागीय कार्यालय, अंबाजोगाई, जिल्हा बीड यांनी अपिलार्थीच्या

दिनांक १६-०३-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पांढरपोटे ज्योतीराम सर्जेराव, शेलापुरी नवीन वसाहत, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उपविभाग, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभागीय कार्यालय, अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२८८

निर्णय दिनांक १९-०५-२०१०

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. जळबाजी सटवाजी शेरे,<br>सहायक संचालक, सामाजिक वनीकरण विभाग, परभणी | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा सचिव, विभागीय जात पडताळणी कार्यालय,<br>औरंगाबाद | |
| २ | जन अपिलीय अधिकारी,<br>विभागीय जात पडताळणी कार्यालय, औरंगाबाद | : प्रतिवादी |

| | | |
|---|---|---|
| प्रत्याक्षात : | जन माहिती अधिकारी | : संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद |
| | जन अपिलीय अधिकारी | : विभागीय समाजकल्याण अधिकारी (जाप्रपस), विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-०८-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय मान्य नसल्यामुळे व त्यांची मूळ फाईल व जातीचे

प्रमाणपत्र गहाळ झाले असल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे त्यामध्ये नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०४-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, (अपिलार्थीच्या मूळ अर्जावर दिनांक ०२-०३-२००९ अशी तारीख असून, सदरचा अर्ज जन माहिती अधिकारी यांना दिनांक ०९-०४-२००९ रोजी प्राप्त झाला आहे) त्यांच्या कार्यालयास सतत पत्रव्यवहार व प्रत्यक्ष भेटून चौकशी केली असता उडवाउडवीची उत्तरे दिली जातात, नियमानुसार किती दिवसात जात पडताळणी करुन देणे आवश्यक आहे, जेष्ठता यादीत माझे नाव कोणत्या ठिकाणी आहे, आणखी किती वर्ष लागतील, अडचण काय ? खुलासा करा, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०५-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-०७-२००९ रोजी आदेश दिले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे प्रकरण लातूर समितीस पाठविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले व जन माहिती अधिकारी यांना या प्रकरणामध्ये अपिलार्थीस माहिती देण्यास विलंब लागल्याबद्दल ताकीद दिली. जन अपिलीय अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये प्रश्नार्थक स्वरुपाची व त्यांच्याकडून कारणे व स्पष्टीकरणे मागणारी माहिती विचारली असल्याने त्यांनी ही माहिती अपिलार्थीस पुरविली नाही. त्यांनी आयोगास असे अवगत केले की, सर्व कागदपत्रांची योग्य प्रकारे पुर्तता केल्यास जात पडताळणी प्रकरण तीन महिन्यामध्ये अंतिमतः निकाली निघू शकते. या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ जात प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता, अपिलार्थीचे मूळ गाव नांदेड जिल्ह्यातील हदगांव तालुक्यातील असल्यामुळे, त्यांनी अपिलार्थीचे प्रकरण लातूर येथील समितीकडे पाठविले आहे. या प्रकरणासंदर्भात त्यांनी लातूर येथील संबंधित अधिका-यांशी दूरध्वनीवरुन संपर्क साधला असता, त्यांनी अपिलार्थीचे जात पडताळणी प्रकरण त्यामध्ये त्रुटी असल्यामुळे, त्या त्रुटींची पुर्तता करण्यासाठी त्यांना दिनांक ०१-०१-२०१० रोजी त्यांच्याकडे परत पाठविले, असे त्यांना सांगण्यात आले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीमध्ये, नियमाप्रमाणे किती दिवसात जात पडताळणी करुन देणे आवश्यक आहे व अपिलार्थीचे ज्येष्ठता यादीतील स्थान ही माहिती वगळता, अपिलार्थीस त्यांच्या जात पडताळणी प्रकरणाकरिता किती वर्ष लागतील, अडचण काय या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस देय होत नाही. याबाबत जात पडताळणीकरिता सामाजिक न्याय विभागाने विहित केलेला कालावधी सर्वसाधारण परिस्थितीत तीन महिन्याचा असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या वरील युक्तिवादामध्ये आयोगास अवगत केले आहे व अपिलार्थीचे ज्येष्ठता यादीतील स्थान ही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही, कारण यासंदर्भातील माहिती जात पडताळणी समिती, लातूर यांच्या कार्यक्षेत्रातील आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रकरण लातूर येथील कार्यालयास दिनांक ०५-०७-२००९ रोजी पाठविले आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केलेल्या या वस्तुस्थितीची कल्पना अपिलार्थीस द्यावी असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे. सबब, जन माहिती अधिकारी यांना

असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांना देय असलेली वरील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी. अपिलार्थीच्या दिनांक ०९-०४-२००९ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही याचे कारण जन माहिती अधिकारी यांनी असे स्पष्ट केले आहे की, अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात ही माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता कधीही उपस्थित राहिले नाहीत.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत हे पाहता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी वेळोवेळी प्रयत्न करुनही माहिती प्राप्त झाली नाही, हा त्यांचा आक्षेप आयोग फेटाळून लावत आहे.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांच्या कार्यालयातून हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना देय असलेली माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमीत होताच व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जळबाजी सटवाजी शेरे, सहायक संचालक, सामाजिक वनीकरण विभाग, परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी (जाप्रपस), विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२८९

निर्णय दिनांक १९-०५-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अशोक सुखदेव खेडकर,<br>रा. सोयगांव, तालुका सोयगांव, जिल्हा औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सोयगांव,<br>तालुका सोयगांव, जिल्हा औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), सिल्लोड,<br>तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०८-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती मिळाली असल्याने, आणि वेळेवर पूर्ण माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-०४-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाशी संबधित काही माहिती एकूण पाच मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - शासनाचे १९९९ चे आदेश असताना देखील सोयगांव तालुक्यात ग्राम दक्षता समिती का स्थापन करण्यात आली नाही, ग्राम दक्षता समिती स्थापन केली असल्यास आपण दिलेल्या आदेशाची प्रत, अध्यक्षांनी तारीख कळविली नाही तर सचिवांनी १५ दिवसानंतर बैठक बोलाविणे बंधनकारक असताना देखील आपण बैठक का बोलाविली नाही, अंबर दिव्याच्या संदर्भात शासनाने ०३ जुलै १९९७ व ११ फेब्रुवारी १९९८ रोजी आदेश दिल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्याच्यावर केलेली कार्यवाही आणि सोयगांव तालुक्यात जी रेशन वितरण व्यवस्था चालविली जात आहे ती व्यवस्था कोणत्या मिटींगचे आधारे चालविण्यात येते त्याच्या प्रोसिडींगची छायांकित प्रत - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २८-०५-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस काही माहिती दिली, तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०६-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५-०७-२००९ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीस सात दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित व अपिलार्थी आणि जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नसल्याचे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज केला त्यावेळी ते या पदावर कार्यरत नव्हते, त्यावेळी श्री. पवार नावाचे नायब तहसीलदार जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत होते. त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २४-०४-२००९ रोजीच्या अर्जास दिनांक २८-०५-२००९ रोजी प्रतिसाद दिलेला आहे. अपिलार्थीस या संदर्भात आवश्यक असलेली माहिती ते आता सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरविण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, सर्व संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील, जन माहिती अधिकारी यांनी सोयगांव तालुक्यातील ग्राम दक्षता समिती का स्थापन करण्यात आली नाही व मुद्दा क्रमांक ३ व्दारे विचारलेली - जन माहिती अधिकारी यांनी बैठक का बोलाविली नाही, ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण ती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या ' माहिती ' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये, अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दलची कारणे अथवा स्पष्टीकरणे अपेक्षित करणारी माहिती मागणे आणि माहिती अधिका-याने त्यांच्या कृतीबद्दलची अथवा निर्णयाबद्दलची कारणे व स्पष्टीकरणे अर्जदारास देणे, अशा प्रकारच्या प्रक्रियेचा समावेश नाही. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व ३ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही, मात्र उर्वरित मुद्दा क्रमांक २, ४ व ५ शी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २८-०५-२००९ रोजीच्या पत्राव्दारे

पुरविलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, ही माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पूर्णतः चुकीची आणि दिशाभूल करणारी दिली असल्याचे आयोगास आढळून येत आहे. सबब, संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २, ४ व ५ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीस माहिती देताना जर जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयाशी संबंधित नाही असे आढळून आले तर, त्यांनी ही माहिती ज्या कार्यालयाशी संबंधित आहे त्या कार्यालयाशी स्वतः संपर्क साधून नंतर, ती माहिती संबंधित कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस याच मुदतीत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी तहसीलदार, तहसील कार्यालय, सोयगांव, तालुका सोयगांव, जिल्हा औरंगाबाद यांच्या कार्यालयातून हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीच्या दिनांक २४-०४-२००९ रोजीच्या मूळ अर्जास, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २८-०५-२००९ रोजीच्या पत्राव्दारे दिलेली माहिती ही पूर्णपणे चुकीची आणि दिशाभूल करणारी असल्यामुळे, ते अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र असल्याचे सिध्द होत आहे. सबब, महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, सोयगांव जिल्हा औरंगाबाद (श्री. पवार,

सध्या लातूर येथे कार्यरत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहिती-तील मुद्दा क्रमांक २, ४ व ५ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी.

३. महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, सोयगांव जिल्हा औरंगाबाद (श्री. पवार, सध्या लातूर येथे कार्यरत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अशोक सुखदेव खेडकर, रा. सोयगांव, तालुका सोयगांव, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सोयगांव, तालुका सोयगांव, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२९०

निर्णय दिनांक : २०.०५.२०१०

१. श्री. जालिंधर जयवंत नागरगोजे, औरंगाबाद. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग क्र.२, जालना : प्रतिवादी

२. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग क्र.२, जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५.०७.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग क्र.२, जालना यांच्याकडे प्रथम अपील केले असता, त्यांना माहिती उपलब्ध करुन न दिल्यामुळे व निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १४.०५.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, आमदार श्री. बबन लोणीकर, परतुर यांच्या आमदार निधीमधून माहिती

अधिकाऱ्याच्या कार्यालयाने सन २००४ ते मार्च,२००९ पर्यंत केलेल्या कामांची माहिती एकूण २ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - आमदार निधीतून केलेल्या विविध विकास कामांची यादी, प्रत्येक कामाच्या अंदाजित खर्चाची रक्कम, ज्या संस्थांना कामे देण्यात आली त्या संस्थांची यादी व कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांची संख्या - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१५.०६.२००९ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेली माहिती त्यांना दि. १५.०५.२०१० रोजीच्या पत्रान्वये त्यांना रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली, तथापि ही माहिती घेण्याचे अपिलार्थीने नाकारले.

अपिलार्थीच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी ही माहिती घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास स्वतः उपस्थित राहून माहिती घेण्याचा प्रयत्न केला. तथापि त्यांना ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून उपलब्ध होऊ शकली नाही. त्यामुळे आता त्यांना ही माहिती संबंधितांच्याकडून विनामूल्य उपलब्ध व्हावी व संबंधितांच्यावर अधिनियमातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात यावी, अशी त्यांनी आयोगास विनंती केली.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पोस्टाद्वारे पुरविलेली माहिती घेण्याचे नाकारण्याचे कारण आयोगाने अपिलार्थीच्या प्रतिनिधीस विचारले असता, पोस्टमन ज्या वेळी त्यांच्याकडे माहितीचे रजिस्टर्ड पाकीट घेऊन आला, त्यावेळी ते घरी नव्हते, असे कारण त्यांनी आयोगास दिले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१४.०५.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये टपालाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही अधिनियमातील तरतुदींनुसार सुसंगत होती. त्यामुळे अपिलार्थीच्या दि. १४.०५.२००९ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीप्रमाणे विहित केलेल्या मुदतीमध्ये प्रथम प्रतिसाद देणे त्यांना अनिवार्य होते. तथापि त्यांनी अपिलार्थीच्या या अर्जासंदर्भात कोणताही होकारात्मक अथवा नकारात्मक प्रतिसाद दिला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय घेण्याचे सौजन्य दाखविले नाही. यासंदर्भात खुलासा करताना जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयीन अधीक्षकाने अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्या कार्यालयात प्राप्त झाल्याची बाब त्यांच्या निदर्शनास आणली नाही, असे स्पष्ट केले. तथापि त्यांचा हा खुलासा आयोग अमान्य करीत आहे. अपिलार्थीच्या माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार केलेल्या प्रथम अपील अर्जाची जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेऊन एकप्रकारे उपेक्षा केली आहे. जन अपिलीय अधिकारी श्री. बी.डी.चाटे तथा कार्यकारी अभियंता, जालना सा.बां.विभाग क्र.२ यांच्या अशाप्रकारच्या बेजबाबदार कार्यशैलीची नोंद सचिव (सार्वजनिक बांधकाम विभाग) यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

त्याचबरोबर अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन तत्कालीन जन माहिती अधिकारी, श्री. आर.एस. वर्मा, (सध्या महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक -४, ( मेरी नाशिक), महामार्ग विभाग क्र.१ येथे

कार्यरत) यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे आणि त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीनुसार करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले असल्यामुळे सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांना या प्रकरणाशी संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. आर.एस.वर्मा (सध्या महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, ( मेरी नाशिक), नाशिक -४, महामार्ग विभाग क्र.१ येथे कार्यरत) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.१५.०५.२०१० रोजी पाठविलेल्या कथित माहितीचे अवलोकन केले असता, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सकृतदर्शनी सुसंगत असल्याचे आढळून येत आहे. तथापि या माहितीमध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ मधील, प्रत्येक कामासाठी किती निविदा आल्या, या मुद्यावरील माहितीचा समावेश नाही. यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे स्पष्ट केले की, त्यांनी राज्य शासनाच्या प्रचलित आदेशानुसार ही सर्व कामे सहकारी संस्थांना दिली आहेत. सहकारी संस्थांना काम देताना निविदा काढण्याची आवश्यकता नसल्याने या कामाच्या निविदा त्यांनी न काढता, जिल्हयाच्या काम वाटप समितीच्या सल्ल्यानुसार ही कामे सहकारी संस्थांना दिली आहेत. जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, जन अपिलीय अधिकारी यांच्या या स्पष्टीकरणासह त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील ही माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांचे आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांना या प्रकरणाशी संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. आर.एस.वर्मा (सध्या सध्या महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, ( मेरी नाशिक), नाशिक -४, महामार्ग विभाग क्र.१ येथे कार्यरत) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक २०.०५.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जालिंधर जयवंत नागरगोजे,प्लॉट नं. पी ४/४/६, विठ्ठलनगर, रामनगर,एन-२, सिडको,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (सार्वजनिक बांधकाम), मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२९१

निर्णय दिनांक : २०.०५.२०१०

१. श्री. ओमप्रकाश राजाराम मंत्री, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
एम.आय.डी.सी.चिकलठाणा,औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
चिकलठाणा,औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी
मर्यादित,एम.आय.डी.सी.चिकलठाणा,
औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी
मर्यादित, विभाग क्र. २,
गारखेडा,औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८.०६.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी, श्री. दिगंबर दत्तात्रय वायकोस, उपकार्यकारी अभियंता यांनी अपिलार्थीच्या आयोगास उद्देशून लिहिलेल्या दि. १९.०५.२०१० रोजीच्या पत्राची प्रत आयोगास सादर केली. या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना आवश्यक ती माहिती दि.११.०५.२०१० रोजी प्राप्त झाली असल्यामुळे आता ते आयोगाकडे दाखल केलेले विचाराधीन अपील क्र. १२९१/०९ हे मागे घेत असल्याचे नमूद केले आहे.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेले विचाराधीन अपील, त्यांना आता आवश्यक ती माहिती प्राप्त झाली असल्याने मागे घेतले असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. १२९१/०९, दि. ०८.०६.२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक २०.०५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. ओमप्रकाश राजाराम मंत्री, द्वारा प्रिंट-एन-कोट,बी-१०, एम.आय.डी.सी., चिकलठाणा, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,एम.आय.डी.सी.चिकलठाणा,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभाग क्र. २, गारखेडा,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२९२

निर्णय दिनांक : २०.०५.२०१०

१. श्री. शेख मुजीब शेख खुदाबक्ष, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापिका,
नुर ऊर्दू प्राथमिक शाळा, उस्मानपूरा,
औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. सालेहा बानो अकबर खान,
सचिव-हजरत शाहनुर हम्वी
एज्युकेशन अँड वेलफेअर सोसा.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४.०८.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०९.०४.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष सालेहा बानो अकबर खान यांच्या वैयक्तिक मान्यतेसाठी सादर केलेल्या पुराव्याबाबत जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, नूर ऊर्दू प्राथामिक शाळा, उस्मानपूरा यांच्याकडे एकूण ८ मुद्यांवर काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या

माहितीमध्ये - सहशिक्षिकेच्या पद भरण्यासाठी जाहिरात दिलेल्या वर्तमानपत्राचे नाव, दिनांक व जाहिरातीची कात्रणे, मुलाखतीसाठी हजर असलेल्या उमेदवारांची यादी, श्रीमती सालेहा बानो अकबर खान यांच्या नियुक्तीस मंजूरी देण्यासाठी सचिव, हजरत शाहनुर हम्वी एज्युकेशनल ॲण्ड वेलफेअर सोसायटी,औरंगाबाद यांनी कार्यकारी मंडळाची बैठक घेण्यासाठी काढलेल्या नोटीसची प्रत, सदर संस्थेच्या कार्यकारी मंडळाने श्रीमती सालेहा बानो अकबर खान यांच्या नियुक्तीस दिलेल्या मंजूरीच्या ठरावाची प्रत,श्रीमती सालेहा बानो अकबर खान यांच्या नियुक्तीस मंजूरी देण्यासाठी सचिव, शालेय समिती, नुर उर्दू प्राथमिक शाळा, उस्मानपूरा, औरंगाबाद यांनी कार्यकारी मंडळाची बैठक घेण्यासाठी काढलेल्या नोटीसची प्रत, सचिव, शालेय समिती, नुर उर्दू प्राथमिक शाळा,उस्मानपूरा,औरंगाबादच्या कार्यकारी मंडळाने श्रीमती सालेहा बानो अकबर खान यांच्या नियुक्तीस दिलेल्या मंजूरीच्या ठरावाची प्रत, संस्थेच्या नियुक्ती आदेशाची प्रत व श्रीमती सालेहा बानो अकबर खान यांचे शैक्षणिक व व्यावसायिक प्रमाणपत्राची प्रत - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०८.०५.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती वैयक्तिक स्वरुपाची असल्याने माहिती त्यांना देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे दि.०६.०६.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १८.०७.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०४.०८.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन या पत्राद्वारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संस्थेशी निगडीत असल्यामुळे व या संस्थेला माहिती अधिकार अधिनियम, २००५ लागू नसल्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ७ व ८ व्यतिरिक्त इतर मुद्यांवर माहिती देता येणे शक्य नसल्याचे कळविले व अपिलार्थीस फक्त

त्यांच्याकडे उपलब्ध असलेली संस्थेच्या नियुक्ती आदेशाची प्रत व त्रयस्थ पक्षाच्या शैक्षणिक पात्रतेसंदर्भातील माहिती पुरविली. ही माहिती अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.७ व ८ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मागितली होती. तथापि मूळ अर्जात मागणी केलेली माहिती दिली नसल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी त्रयस्थ पक्षासह उपस्थित आहेत.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांना अद्यापपावेतो प्राप्त न झालेल्या माहितीची मागणी कायम ठेवली.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संस्थेकडे असल्यामुळे व या संस्थेस माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू होत नसल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ७ व ८ च्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही मुद्यावरील माहिती पुरविली नाही. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थी हे त्यांच्याकडे वारंवार माहिती अधिकार कायद्यानुसार बऱ्याच वेळा विविध प्रकारची माहिती मागवत असतात. त्यांच्या अशाप्रकारच्या प्रवृत्तीने त्यांना शाळेत काम करणे कठीण झाले आहे. अपिलार्थीच्या पत्नीचे चौकशी प्रकरण त्यांच्याकडे चौकशीकरिता असल्यामुळे अपिलार्थी हे त्यांच्यावर माहिती अधिकार अधिनियमाचा दबाव टाकून त्यांच्या नियमित कामकाजामध्ये अडथळे आणत आहेत, त्यामुळे अपिलार्थीचे अपील फेटाळून लावावे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे जरी त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात माहिती मागितली असली तरीही त्या माहितीचे स्वरुप सार्वजनिक असे असल्यामुळे ही माहिती अपिलार्थीस पुरविल्यास अधिनियमातील कलम ८(१) व ९ मधील कोणत्याही तरतुदीचा भंग होईल, असे आयोगास वाटत नाही. अपिलार्थीने

त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेल्या मुद्यावरील बहुतेक सर्व माहिती ही, संबंधित शाळेने शिक्षणाधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेतील शिक्षक/कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यता प्राप्त करुन घेण्यासाठी केलेल्या अर्जाशी निगडीत आहे, त्यामुळे ही माहिती शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्या कार्यालयातही उपलब्ध असणार. ही माहिती संबंधित मुख्याध्यापिका, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्या कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊ शकतात. सबब जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, नुर उर्दु प्राथमिक शाळा, उस्मानपुरा,औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र.७ व ८ वगळता उर्वरित ६ मुद्यांवरील माहिती त्यांनी संबंधित संस्थेकडून अथवा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून आठ दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीच्या वर्तनाबाबत वेगवेगळे आक्षेप नोंदविले आहेत. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अशाप्रकारच्या आक्षेपांचे निराकरण करण्यासाठी वेगवेगळया यंत्रणा व सक्षम प्राधिकरण अस्तित्त्वात असल्यामुळे व अर्जदाराच्या वर्तनाची, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागविल्यास, दखल घेण्याची तरतुद अधिनियमामध्ये नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या

वर्तनास्तव त्यांना माहिती नाकारण्याचा आग्रह धरण्याची त्यांची कृती चुकीची असल्याचे त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ७ व ८ वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक २०.०५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख मुजीब शेख खुदाबक्ष,रा.रोशन गेट, शरीफ कॉलनी, परवाना हॉटेलच्या मागे, गल्ली नं. १, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका,नुर ऊर्दू प्राथमिक शाळा, उस्मानपूरा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२९३

निर्णय दिनांक : २०.०५.२०१०

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. राजापुरकर योगेश गंगाधरराव,<br>रा.येवती, ता.धर्माबाद,जि.नांदेड. | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी,<br>गट साधन केंद्र, धर्माबाद, जि.नांदेड | : प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, नांदेड | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५.०८.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना गट शिक्षणाधिकारी यांच्याकडून त्यांच्या दि. ०५.०५.२००९ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना प्राप्त न झाल्याने त्यांनी दि. ०८.०६.२००९ रोजी शिक्षणाधिकारी (प्रा.) नांदेड यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी विहित मुदतीत निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाद्वारे त्यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०५.०५.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००८-०९ या कालावधीमध्ये गट साधन

केंद्रातील साधन व्यक्तींची व मे/जुन,२००९ प्रशिक्षणासाठी निवड करण्यात आलेल्या साधन व्यक्तींची माहिती, साधन व्यक्तींच्या निवडीसाठी वापरलेले निकष आणि पात्र साधन व्यक्तींच्या संदर्भात काही माहिती एकूण ५ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - गट साधन केंद्रातील साधन व्यक्ती, प्रशिक्षणासाठी निवडण्यात येणाऱ्या साधन व्यक्ती निवडीचे निकष, साधन व्यक्तीची निवड करताना त्यांचे पद,सेवाकाळ,शैक्षणिक पात्रता या बाबी लक्षात घेऊन त्यांची निवड होते का, निवडीच्या निकषानुसार तालुक्यातील पात्र साधन व्यक्तींची यादी, मे/जुन-२००९ प्रशिक्षणासाठी निवडलेल्या साधन व्यक्तींची नावे व त्यासाठी वापरण्यात आलेले निकष, गट साधन केंद्रात सन २००८-०९ या कालावधीत निवडलेल्या साधन व्यक्तींची यादी व त्यासाठी वापरलेले निकष यासंदर्भातील माहिती - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास व प्रथम अपील अर्जास जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयातील कर्मचारी श्री. रेवलवार यांच्याशी आयोगाच्या कार्यालयातून दि.१७.०५.२०१० रोजी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून त्यावेळी आजच्या सुनावणीसंदर्भात कल्पना देऊनही, ते स्वतः अथवा त्यांचा प्रतिनिधी यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या दि. ०५.०५.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती वगळता उर्वरित चार मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी

यांच्याकडे त्यांच्या एखाद्या निर्णयाबद्दल अथवा कृतीबद्दल स्पष्टीकरण अथवा अभिप्राय मागणे आणि जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांचे अभिप्राय देणे अशाप्रकारच्या प्रक्रियांचा समावेश नाही. त्यामुळे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ द्वारे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नसल्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. मात्र उर्वरित चारही मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत शीघ्र टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेतली नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. शिक्षण विभागाशी संबंधित आयोगाकडे दाखल झालेल्या द्वितीय अपील अर्जामधील नांदेड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाशी संबंधित प्रथम अपील अर्जांवर शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद नांदेड हे आपले निर्णय देत नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. आयोगाने याची सखेद नोंद घेतली असून सचिव (शालेय शिक्षण),मंत्रालय,मुंबई यांनी अशाप्रकारच्या शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्या वर्तनाबद्दल चौकशी करुन संबंधितांच्यावर आवश्यक वाटल्यास योग्य ती कारवाई करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीच्या अर्जास अधिनियमातील कलम ७(१) मधील तरतुदीप्रमाणे कोणताही प्रतिसाद न दिल्याने ते अधिनियमातील कलम २० (१) च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरत असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. सबब संबंधित जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, गट साधन केंद्र, धर्माबाद यांनी अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याबद्दल त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश

निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत शीघ्र टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी,गट साधन केंद्र धर्माबाद,जि.नांदेड यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक २०.०५.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजापुरकर योगेश गंगाधरराव,जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,येवती, पो. येताळा, ता.धर्माबाद,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी,गट साधन केंद्र, धर्माबाद, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (शालेय शिक्षण), मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२९४

निर्णय दिनांक : २०.०५.२०१०

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. अब्दुल वहिद बाखरसाब,<br>रा.बावलगाव, ता.बिलोली, जि.नांदेड | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>उपकार्यकारी अभियंता (बांधकाम), दक्षिण विभाग,<br>जिल्हा परिषद, नांदेड. | : प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता (बांधकाम), दक्षिण विभाग,<br>जिल्हा परिषद, नांदेड. | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५.०८.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन व त्यांना माहिती अधिकाऱ्याने जाणूनबुजून माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०४.०५.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील बिलोली ते बावलगाव या रस्त्याच्या कामासंदर्भात माहिती एकूण ४ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - झालेल्या कामाच्या मोजमापपुस्तिकांची नक्कल, गुत्तेदाराचे नाव व त्यांचा रजिस्ट्रेशन क्रमांक, दिनांक ०४.०५.२००९ पर्यंत किती काम झाले, त्याकरिता गुत्तेदारास किती रक्कम देण्यात आली, त्याची

चेकसह माहिती व दि. ३०.०८.२००६ रोजी कार्यकारी अभियंता (बांधकाम), दक्षिण विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडून कामाची चौकशी करुन अहवाल पाठविण्यासाठी आलेल्या पत्रासंदर्भात सदर कामाच्या चौकशी अहवालाची प्रत - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०१.०७.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २०.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे निर्णय देऊन अपिलार्थीस असे कळविले आहे की, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ ते ३ शी संबंधित माहिती पुरविली असून मुद्दा क्र. ४ शी संबंधित माहिती,चौकशी संदर्भात असल्याने, ही बाब पूर्णपणे गोपनीय असल्याने अपिलार्थीस ही माहिती देता येणार नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस सदरचे पत्र दि. २०.०७.२००९ रोजी पाठविले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयास आयोगाच्या कार्यालयातून दि.१७.०५.२०१० रोजी दूरध्वनीद्वारे आजच्या सुनावणीसंदर्भात कल्पना देऊनही, ते स्वतः अथवा त्यांचा प्रतिनिधी यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडून 'व्यक्तिशः' माहितीची मागणी केल्यानंतर माहितीच्या अर्जासंदर्भातील पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे उत्तरदायित्त्व

अर्जदाराचे असते. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचे अशाप्रकारचे उत्तरदायित्त्व कशाप्रकारे पार पाडले आहे हे कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीवरुन असे आढळून येत आहे की, ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील एकूण चार मुद्यांपैकी तीन मुद्यांवरील माहिती पुरविली गेल्याचे संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या दि. २०.०७.२००९ रोजीच्या पत्रामध्ये नमूद केलेले आहे. तथापि प्रत्यक्ष ही माहिती अपिलार्थीस प्राप्त झाली किंवा कसे, हे देखील आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे व सर्व संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही. या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ च्या संदर्भात चौकशी अहवाल ही बाब गोपनीय असल्यामुळे, यासंदर्भातील माहिती अपिलार्थीस उघड करण्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी नाकारले आहे. जन अपिलीय अधिकारी यांची ही कृती चुकीची आहे. अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्या कामाच्या चौकशीसंदर्भातील अहवाल मागितला आहे. हा अहवाल उघड केल्याने, माहिती अधिकार अधिनियमातील कलम ८(१) मधील तरतुदींचा कोणत्याही प्रकारे भंग होईल, असे आयोगास सकृतदर्शनी आढळून येत नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस उघड करावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पाठवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर

अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक २०.०५.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अब्दुल वहिद बाखरसाब,मु.बावलगाव, पो. कार्ला (बु.), ता.बिलोली, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता (बांधकाम) दक्षिण विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम) दक्षिण विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२९५

निर्णय दिनांक : २०.०५.२०१०

१. श्री. राचेट्टी शेखर बाबूराव, : अपिलार्थी
रा. तुगाव (नं.२), ता.उमरगा, जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी,पंचायत समिती,उमरगा,
जि.उस्मानाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, उस्मानाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९.०७.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, मुदत संपल्यानंतरही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे आणि जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर सुनावणी न घेतल्यामुळे संबंधित माहिती अधिकाऱ्यावर दंडात्मक कारवाई करण्यासाठी व आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांना देण्याचे आदेशित करण्यासाठी त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ३०.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित व्यापक व्याप्ती असलेली सन २००३ ते दि. ३०.०३.२००९ या

कालावधीतील काही माहिती एकूण सहा मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद

न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०८.०५.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ११.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली. तथापि अपिलार्थीच्या अर्जानुसार सुनावणीची ही तारीख पुढे ढकलून दि. २७.०६.२००९ रोजी अंतिम सुनावणी ठेवली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर राहिले, त्यावेळी अपिलार्थीने त्यांच्या दि. २४.०७.२००९ रोजीच्या अर्जाद्वारे जन अपिलीय अधिकारी यांना गट विकास अधिकारी,उमरगा यांच्याकडून माहिती मिळाल्याची लेखी कबूली दिली व त्यांचा अपील अर्ज निकाली काढण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने दि. ०९.०७.२००९ रोजी वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले होते.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दि. २४.०७.२००९ रोजी त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती विनामूल्य पुरविली आहे. प्राप्त माहितीच्या संदर्भात अपिलार्थीची कोणतीही तक्रार नसल्याची, अपिलार्थीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना उद्देशून दि. २४.०७.२००९ रोजीच्या पत्रामध्ये कबूली दिली आहे. तसेच अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त झाली असल्याचे व प्राप्त माहिती संदर्भात कोणतीही तक्रार नसल्याचे दि. २४.०७.२००९ रोजीच्या पत्रामध्ये माहिती अधिकाऱ्यासही लेखी स्वरुपात कबूल केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या या युक्तिवादापृष्ठयर्थ आवश्यक तो पुरावा आयोगास सादर केला आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्याकडून व्यापक व्याप्ती असलेली व

एकूण सहा विषयांशी संबंधित माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित जन माहिती अधिकारी हे संबंधित ग्रामपंचायतचे ग्रामसेवक होते. तरीही त्यांनी ही माहिती संबंधित ग्रामसेवकांकडून प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस पुरविली आहे. अपिलार्थीस पुरविण्यात येणाऱ्या माहितीची व्याप्ती मोठया प्रमाणात असल्यामुळे त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी थोडा विलंब लागला आहे.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि. ०९.०७.२००९ रोजी द्वितीय अपील केल्यानंतर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २४.०७.२००९ रोजी आवश्यक असलेली माहिती प्राप्त झालेली आहे. तसेच यासंदर्भात त्यांच्या प्रथम अपील अर्जाच्यासंदर्भात सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांना त्यांच्या दि. २४.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे माहिती प्राप्त झाल्याने त्यांचे प्रथम अपील निकाली काढण्याची विनंती केली आहे. या बाबी पाहता, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून पूर्णपणे प्राप्त झाली असल्याचे दिसून येत आहे व तसेच अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांनी दि. ०८.०५.२००९ रोजी केलेले प्रथम अपील निकाली काढण्याची विनंती केली असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील अर्जावर नव्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आता आयोगास उरलेले नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक २०.०५.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राचेट्टी शेखर बाबूराव,रा. तुगाव (नं.२), ता.उमरगा, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती,उमरगा,जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२९६

निर्णय दिनांक २०-०५-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सुग्रीव सोपानराव मुंडे,<br>सा. आत्ताच एक्सप्रेस, कार्यालय जे-१३, विजयश्री<br>कॉलनी, एन-५, सिडको, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा सहायक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,<br>गारखेडा परिसर, औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, गारखेडा<br>परिसर, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

प्रत्याक्षात : जन माहिती अधिकारी : १. कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक २, परभणी

२. उप कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग नाथनगर (उत्तर), पैठण

जन अपिलीय अधिकारी : सहायक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, गारखेडा परिसर, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद यांनी आदेशित करुनही माहिती न दिल्यामुळे, त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीनुसार योग्य ती कार्यवाही करुन त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयातील जायकवाडी प्रकल्प डाव्या कालव्याबाबत सन २००५ ते दिनांक २६-०२-२००९ पर्यंतची काही माहिती एकूण पाच मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जायकवाडी प्रकल्पाच्या डावा कालव्यातील पाण्याचा लाभ किती शेतकरी घेतात, या शेतक-यांकडून दरवर्षी प्रत्येकी किती रक्कम पाणीपट्टी म्हणून वसूल केली जाते, या कालव्याच्या कार्यक्षेत्रात कोणकोणती कामे केली जातात, यासंदर्भातील दिलेल्या निविदा जाहिराती कोणकोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द केल्या जातात त्या वर्तमानपत्रांची नावे, त्यांनी सादर केलेली बिले व त्यांना जाहिरात प्रकाशित करण्याबाबत दिलेल्या आदेशाच्या प्रती, या कालव्यावरील एकूण पुलांची संख्या, या पुलांच्या दुरुस्तीची कामे केव्हा केली जातात, या कालव्यावर एकूण किती उपकालवे आहेत व ते कोणकोणत्या उपविभागात आहेत त्याची यादी - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे मागितली असून या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०४-०३-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती देण्यासाठी दोन स्वतंत्र प्राधिकरणे असल्याने त्यांच्याकडे अर्ज करण्याचे अपिलार्थीस सूचित केले व तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जासोबत सादर केलेल्या दारिद्र्यरेषेखालील प्रमाणापत्रावर अपिलार्थीचे

नाव नसल्यामुळे ते प्रमाणपत्र अग्राह्य आहे, असे अपिलार्थीस अवगत केले. तथापि यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात दिनांक २३-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २१-०४-२००९ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीने विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली असल्याने ती अपिलार्थीस पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्याचे संबंधित जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील आपल्या माहितीची मागणी कायम ठेवली.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दोन प्राधिकरणाकडे म्हणजे कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग, परभणी व पैठण यांच्याकडे उपलब्ध असल्याने त्यांनी त्यांच्या दिनांक ०४-०३-२००९ रोजीच्या पत्राव्दारे, अपिलार्थीस ही माहिती संबंधित प्राधिकरणाकडून घेण्याचे सूचित केले व या पत्राची प्रत संबंधित विभागांना दिली. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासोबतचे सादर केलेले त्यांचे दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्र हे अग्राह्य असल्याचे त्यांनी अपिलार्थीस त्याचवेळी कळविले होते. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २१-०४-२००९ रोजीच्या दिलेल्या निर्णयाप्रमाणे त्यांना पैठण विभागाने दिनांक २२-०७-२००९ रोजी माहिती पुरविली आहे, परंतु परभणी विभागाने त्यांना यापूर्वीच दिनांक ०२-०४-२००९ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून पाहून जाण्याचे

सूचित केले, तथापि ही माहिती पाहण्यासाठी अपिलार्थी हे कधीही हजर झाले नाहीत, त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती प्राप्त होऊ शकली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी मूळात अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात आहे. ही माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यसाठी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयातील साधनसामग्री प्रमाणाबाहेर निश्चितपणे वळवावी लागणार आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी या घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर कधीही नाकारलेले नाही. पैठण विभागाने दिनांक २२-०७-२००९ रोजी अपिलार्थीस माहिती पुरविली आहे, परभणी विभागाने अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पाहून जाण्याचे त्यांच्या दिनांक ०२-०४-२००९ रोजीच्या पत्राव्दारे सूचित केले आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अंदाजे ५० हजार शेतक-यांशी संबंधित आहे आणि या सर्व शेतक-यांच्या पाणीपट्टी वसुलीच्या रकमेच्या संदर्भात अपिलार्थीस आवश्यक ती माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे पुरेसे अनुदान उपलब्ध नाही. अपिलार्थीने अधिनियमातील कलम ७ (५) मध्ये विहित केलेल्या दारिद्र्यरेषेखालील व्यक्तीच्या बाबतीतील सवलतीचा फायदा घेऊन, ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य अपेक्षिली आहे. यासंदर्भात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता, त्यामध्ये आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाबरोबर सादर केलेले प्रमाणपत्र श्री भालेकर रा. निपाणी, तालुका जिल्हा औरंगाबाद यांच्या-कडून साक्षांकीत करुन घेतले आहे. या प्रमाणपत्रान्वये दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती म्हणून श्री. मुंडे सोपान किसन असे नाव लिहिले आहे. हे नाव व अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांनी लिहिलेले नाव श्री. सुग्रीव सोपानराव मुंडे, ही दोनही नावे पूर्णतः वेगळ्या व्यक्तीची आहेत. अपिलार्थीने सादर केलेले दारिद्र्यरेषेखालील व्यक्तीचे प्रमाणपत्र हे दिनांक २४-१२-१९९९ रोजी पारीत केले

गेले आहे हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुग्रीव सोपानराव मुंडे, सा. आत्ताच एक्सप्रेस, कार्यालय जे-१३, विजयश्री कॉलनी, एन-५, सिडको, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक २, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग नाथनगर (उत्तर), पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, गारखेडा परिसर, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२९७

निर्णय दिनांक २०-०५-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. गजानन शंकर बोर्डे,<br>रा. हिवरा (काबली), तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, हिवरा (काबली),<br>तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती,<br>जाफ्राबाद, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०८-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी श्री. राजेंद्र मधुकर कंकाळ यांनी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक २०-०५-२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर

केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी आयोगाकडे अपील केल्यानंतर त्यांना ग्रामपंचायत कार्यालय हिवरा (काबली), तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना येथील ग्रामसेवक श्री. कंकाळ यांनी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. माहिती पुरविली असल्यामुळे त्यांचे विचाराधीन अपील निकाली काढावे, अशी त्यांनी या पत्रामध्ये आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीची त्यांचे आयोगाकडे केलेले विचाराधीन व्दितीय अपील निकाली काढण्याची केलेली विनंती लक्षात घेऊन, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गजानन शंकर बोर्डे, रा. हिवरा (काबली), तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, हिवरा (काबली), तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, जाफ्राबाद, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२९८

निर्णय दिनांक २०-०५-२०१०

१ श्री. ए. डी. पाटील, : अपिलार्थी
डॉ. जाधव गल्ली, छाजेडनगर, कन्नड, तालुका कन्नड,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),
जिल्हा परिषद, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : ३. कार्यालयीन अधीक्षक, पंचायत विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद
४. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कन्नड, जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कन्नड व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक २०-०५-२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर करण्यात आले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, विचाराधीन व्दितीय अपिलासंदर्भातील मूळ अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता प्राप्त झाली असून प्राप्त माहितीसंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नाही, त्यामुळे ते त्यांचे विचाराधीन अपील क्रमांक १२९८/२००९ स्वखुषीने मागे घेत आहेत.

खुद्द अपिलार्थीनेच त्यांचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील आता मागे घेतले असल्याने व ते रद्द करण्याची त्यांनी विनंती केली असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. ए. डी. पाटील, डॉ. जाधव गल्ली, छाजेडनगर, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, पंचायत विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कन्नड, जिल्हा औरंगाबाद

४ जन अपिलीय अधिकारी, तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२९९

निर्णय दिनांक २०-०५-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. दिनेश शिवलाल राठोड,<br>सहजीवननगर, विठ्ठल रुख्मीणी मंदिराजवळ,<br>अंबड नाका, जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, जालना | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जालना | : | प्रतिवादी |

प्रत्याक्षात : जन माहिती अधिकारी : १. मुख्याध्यापक, माध्यमिक आश्रम शाळा, राठोडनगर, तालुका जिल्हा जालना

२. मुख्याध्यापक, श्री शिवाजी प्राथमिक आश्रम शाळा, शिवणी (तांडा), तालुका जिल्हा जालना

त्रयस्थ पक्ष : मुख्याध्यापक, श्री शिवाजी पोस्ट बेसिस आश्रम शाळा व माध्यमिक आश्रम शाळा, शिवणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण, खोटी व दिशाभूल करणारी माहिती प्राप्त झाल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०२-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, श्री शिवाजी प्राथमिक आश्रम शाळा, शिवणी (तांडा), तालुका जिल्हा जालना या शाळेचे नमुना नंबर ४ रजिस्टर (डेड स्टॉक रजिस्टर) सन २००५ ते डिसेंबर २००८, रोजकिर्द रजिस्टर सन २००४ ते २००८, शालेय पोषण आहार रजिस्टर २००७ ते २००८ च्या प्रती, शालेय पोषण आहाराचा तांदूळ शिजविणा-या व्यक्तीचे नाव व पत्ता आणि नियुक्त केलेल्या वेळीच्या करारनाम्याच्या प्रतीची माहिती ' स्वतः येणार ' अशी मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न मिळाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-०४-२००९ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीस निश्चित शुल्क न कळविल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस तात्काळ विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १७-०४-२००९ रोजी ४५० पृष्ठांची माहिती अपिलार्थीस पुरविली, तथापि प्राप्त माहिती अपूर्ण, खोटी व दिशाभूल करणारी असल्याच्या कारणावरुन, अपिलार्थीने वरील परिच्छेदा-मध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती ही अपूर्ण व खोटी आहे आणि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या कॅशबुकच्या प्रतीवर जन माहिती अधिकारी यांच्या सह्या नाहीत. तसेच डेड स्टॉक रजिस्टर व त्यांचे कॅशबुक यांच्यातील माहितीचा मेळ लागत नसल्यामुळे ही माहिती उपयोगी नसल्याचे वाटत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस अशा स्वरुपाची माहिती आतापर्यंत एकूण आठ वेळा विनामूल्य दिली असून, त्यांना विनाकारण त्रास देण्याच्या उद्देशाने अपिलार्थीने त्यांच्याकडील ही माहिती मागितली आहे. यावर कायदेशीर कारवाई करावी, अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असेही अवगत केले की, अपिलार्थीने या प्रकरणी व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही अपिलार्थी ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी स्वतः कधीही उपस्थित राहिले नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०२-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ते ' स्वतः येणार ' असे नमूद केले होते यावरुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने त्यांच्याकडून स्वतः माहिती हस्तगत करुन घेणे मूळात अभिप्रेत होते असे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर त्या अर्जासंदर्भातील पुढील घडामोडी ज्ञात होण्याकरिता अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित होणे आवश्यक असते. तथापि या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचे अशा प्रकारचे उत्तरदायित्व योग्य त-हेने पार पाडले असल्याचा सबळ पुरावा त्यांनी आयोगास सादर केलेला नाही. यासंदर्भात त्यांना आयोगाने विचारले असता त्यांच्याकडे अशा प्रकारचा कोणताही पुरावा उपलब्ध नसल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाच्या दिवशीच दिनांक १७-०४-२००९ रोजी अपिलार्थीस एकूण ४५० पृष्ठांची माहिती

विनामूल्य दिलेली आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध होती, त्याच स्वरुपात त्यांनी ती अपिलार्थीस हस्तांतरीत केली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात त्यांनी ती अर्जदारास देणे अभिप्रेत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागताना ती साक्षांकीत स्वरुपात मागितली नाही, त्यामुळे त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती ही साक्षांकीत स्वरुपात दिलेली नाही. अपिलार्थीस पुरविलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती त्यांना पुरविली आहे हे जन माहिती अधिकारी यांनी अमान्य केलेले नाही. या माहितीचे परीक्षण करतांना अपिलार्थीच्या या माहितीमध्ये त्रुटी असल्याचे आढळून आले आहे. या त्रुटीची पुर्तता करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना असे आदेश देण्याची अधिकारिता आयोगास नाही. कारण अशा प्रकारची कार्यवाही ही प्रशासकीय स्वरुपाची अशी आहे. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर त्यांचे जर काही आक्षेप असतील तर त्यांनी या आक्षेपांचे निराकरण समाजकल्याण विभागाच्या सक्षम प्राधिकरणाकडून करुन घ्यावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने ज्या कारणास्तव आयोगाकडे व्दितीय अपील केले, त्यातील एकही कारण अधिनियमाच्या मर्यादेमध्ये सिध्द होऊ शकत नसल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दिनेश शिवलाल राठोड, सहजीवननगर, विठ्ठल रुख्मीणी मंदिराजवळ, अंबड नाका, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, माध्यमिक आश्रम शाळा, राठोडनगर, तालुका जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री शिवाजी प्राथमिक आश्रम शाळा, शिवणी (तांडा), तालुका जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३००

निर्णय दिनांक २०-०५-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अजित किसनलालजी कोठारी,<br>घर नं. २-२०-१५, पारसीगल्ली, काद्राबाद, जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा जिल्हाधिकारी, नगरपालिका प्रशासन विभाग,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, जालना | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा जिल्हाधिकारी, नगरपालिका प्रशासन विभाग,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, जालना | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : | नगर परिषद कार्यालय, जालना |
| | जन अपिलीय अधिकारी | : | मुख्याधिकारी, नगर परिषद, जालना |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २३-०३-२००९ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्राप्त झालेली नाही व त्यांनी दिनांक २८-०४-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेण्यात आली नसल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जिल्हाधिकारी, नगरपालिका प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांच्याकडे, जालना नगरपरिषदेच्या दिनांक ०१-०४-२००८ ते २०-०३-२००९ या कालावधीमध्ये नगर परिषद अंतर्गत येणा-या रस्त्यासाठी प्राप्त झालेले अनुदान आणि या अनुषंगाने नगरपरिषदेने केलेल्या कामा-संदर्भात काही माहिती एकूण सहा मुद्दयाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीने सदरचा अर्ज जिल्हाधिकारी, जालना यांना उद्देशून केला होता. सदर अर्ज जिल्हाधिकारी, जालना यांनी मुख्याधिकारी, नगर परिषद, जालना यांच्याकडे दिनांक ३१-०३-२००९ रोजी पाठविला व या पत्राची प्रत अपिलार्थीस पाठविली. तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात दिनांक २८-०४-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने सदरचा अपील अर्ज जिल्हाधिकारी, जालना यांना उद्देशून केला होता, त्यांनी दिनांक २९-०४-२००९ रोजीच्या पत्राव्दारे हा अपील अर्ज मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, जालना यांच्याकडे, ते या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी असल्याने त्यांच्याकडे पाठविला. या अपील अर्जावर संबंधितांनी निर्णय घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आयोगास आढळून येत नाही. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. सय्यद सऊद, नगर परिषद अभियंता, नगर परिषद, जालना उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. सय्यद सऊद, नगर परिषद अभियंता, नगर परिषद, जालना यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०५-०८-२००९ रोजी व्यक्तिशः

हस्तांतरीत केली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती आयोगास दाखविली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २३-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०५-०८-२००९ रोजी आवश्यक ती माहिती व्यक्तिशः पुरविली आहे. अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीचे अवलोकन करता, ती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आयोगास सकृतदर्शनी आढळून येत आहे. अपिलार्थीस ही माहिती अपिलार्थीने आयोगाकडे व्दितीय अपील सादर केल्यानंतर प्राप्त झाली असल्याने, अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत. परंतु ती माहिती अपिलार्थीस, त्यांनी माहितीसाठीचा दिनांक २३-०३-२००९ रोजी अर्ज केल्यानंतर दिनांक ०५-०८-२००९ रोजी म्हणजे, अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने प्राप्त झाली असल्याचे आयोगास आढळून येत आहे. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने माहिती देऊन स्वत:ला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब, मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, जालना यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक ज्यांना अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे अशा सर्वांवर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२.	मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, जालना यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंग-विषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अजित किसनलालजी कोठारी, घर नं. २-२०-१५, पारसीगल्ली, काद्राबाद, जालना.

२ जन माहिती अधिकारी, मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३०१

निर्णय दिनांक २०-०५-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. बाबासाहेब धर्मा पगारे,<br>जयभिमनगर, टाऊन हॉल, प्रा. अविनाश वाघ यांच्या<br>बाजूला, फिरोज किराणाजवळ, घाटी, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>भूसंपादन अधिकारी, भूसंपादन कार्यालय, जालना | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी,<br>भूसंपादन कार्यालय (गावठाण), जिल्हाधिकारी कार्यालय,<br>जालना | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे कारण दर्शवून, विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयातर्फे मौजे नळणी (बु.), तालुका भोकरदन येथील पाझर तलावासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीच्या संदर्भात एकूण दहा मुद्दयांव्दारे काही

माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - १९९२ साली या पाझर तलावासाठीची आर्थिक तरतूद, जमिनी संपादित केलेल्या शेतक-यांची संख्या, जमिनीचे गट क्रमांक व ७/१२ चे उतारे, त्यावेळचे जमिनीचे व्हॅल्युएशन काय होते व आताचे काय आहे, शेतक-यांना जमिनीचा मोबदला कसा व कोणत्या वेळेस देण्यात आला, सदरील शेतक-यांना धरणग्रस्ताचे प्रमाणपत्र देण्यात आले का, असल्यास कोणाला त्यांची नावे, या प्रकल्पामध्ये एकूण किती लोकांची शेती गेली व कोणाकोणास हप्ते देण्यात आले त्यांची नावे, शेतजमिनी शासनाच्या प्रकल्पाखाली गेल्या तर शेतक-यांना किती दिवसाच्या आत मोबदला देण्यात येतो, कोणत्या कारणाने मोबदला थांबविण्यात येतो, १६ वर्षे शेतक-यांना झालेल्या मानसिक व शारीरिक त्रासाला जबाबदार कोण व महाराष्ट्र शासनाचा सदरील प्रकल्प कोणाच्या आदेशाने कोणाच्या अधिपत्याखाली राबविण्यात आला - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून शीघ्र टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी, भूसंपादन कार्यालय (गावठाण), जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांच्याकडे दिनांक १२-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी, जालना यांनी दिनांक २९-१२-२००८ रोजी निर्णय देऊन, जन माहिती अधिकारी यांचा खुलासा लक्षात घेऊन अपिलार्थीचे म्हणणे योग्य वाटत नसल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आणि अपिलार्थी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी दिनांक १६-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात, जन माहिती अधिकारी यांच्याकडून फक्त एका शेतक-याची यादी पुरविण्यात आली असून ती यादी दुस-या प्रकल्पाशी संबंधित आहे. या व्यतिरिक्त त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती अद्यापपावेतो प्राप्त झालेली नाही. त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची त्यांना आवश्यकता आहे. ही माहिती व्यक्तिशः प्राप्त करुन घेण्यासाठी ते भूसंपादन अधिकारी (गावठाण) यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित झाले असता, भूसंपादन अधिका-याच्या दारावरील शिपायाने अपिलार्थीस साहेबाकरिता चहा आणण्याचे फर्मावले. सदर शिपायाच्या या सूचनेप्रमाणे, शिपायाच्या या सूचनेचे त्यांनी पालन केले. परंतु एवढे असूनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेल्या सुनावणीच्या वेळी अनुपस्थित राहण्याचे कारण अपिलार्थीस विचारले असता, त्यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीचे पत्र मुद्दाम उशिराने पाठविले. सुनावणीची कल्पना त्यांनी त्यांच्या निकालपत्रकामध्ये त्यांच्या भावाला दिली असे नमूद केले आहे. तथापि त्यांचे हे भाऊ मनोरुग्ण असल्याने, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपिलाच्या सुनावणीसंदर्भात कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या संपूर्ण माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

अपिलार्थीच्या या विधानाचे खंडन करण्यासाठी जन माहिती अधिकारी अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक १६-१०-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ३ मधील, "जमिनीचे आताचे व्हॅल्युएशन काय आहे," या भागावरील, मुद्दा क्रमांक ५ मधील, "सदरील शेतक-यांना धरणग्रस्त प्रमाणपत्र देण्यात आले आहे काय," व मुद्दा क्रमांक ९ पूर्णतः ही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही, कारण या मुद्दयांव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे अभिप्राय व स्पष्टीकरणे

अपेक्षित करणारी माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अशा प्रकारच्या माहितीचा समावेश माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या ' माहिती ' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये होत नाही, परंतु उर्वरित सर्व मुद्दयांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १६-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील, मुद्दा क्रमांक ३ व ५ मधील वर स्पष्ट केलेल्या भागाशी व मुद्दा क्रमांक ९ शी संबंधित माहिती वगळता, उर्वरित सर्व मुद्दयांवरील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७ व ८ व्दारे, संपादित केलेल्या जमिनीच्या मोबदल्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे स्पष्ट करण्यात येत आहे की, त्यांनी भूसंपादन कायद्यातील भूसंपादन मोबदल्यासंदर्भातील तरतुदी व त्या अनुषंगाने शासनाकडून त्यांना प्राप्त झालेल्या निर्णयाच्या व परिपत्रकाच्या अद्ययावत प्रती अपिलार्थीस विनामूल्य पुरवाव्यात.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बाबासाहेब धर्मा पगारे, जयभिमनगर, टाऊन हॉल, प्रा. अविनाश वाघ यांच्या बाजूला, फिरोज किराणाजवळ, घाटी, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी, भूसंपादन अधिकारी, भूसंपादन कार्याल, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी, भूसंपादन कार्यालय (गावठाण), जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३०२

निर्णय दिनांक : २१.०५.२०१०

१. श्री. माणिक लक्ष्मणराव भोसीकर, : अपिलार्थी
रा.पानभोसी, ता.कंधार, जि.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मंडळ कृषि अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, कंधार,
जि.नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी,
कंधार, जि.नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी कार्यालय,
कंधार,जि.नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०.०८.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २०.०४.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण पाच मुद्यांद्वारे सोयाबीन फाऊंडेशन बियाण्याच्या संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सोयाबीन फाऊंडेशन बियाणे रजिस्ट्रेशन केलेल्या पावत्या अपिलार्थीकडून जन माहिती अधिकारी यांनी स्वीकारल्याचा दिनांक,

जन माहिती अधिकारी यांनी सोयाबीन फाऊंडेशन बियाणे खरेदीच्या पावत्या स्वीकारल्याचा दिनांक, सोयाबीन फाऊंडेशन बियाणे बिज प्रक्रियेस दिलेली वजन पावती जन माहिती अधिकारी यांनी स्वीकारल्याचा दिनांक आणि बिजोत्पादन कार्यालयामध्ये उत्पादीत केलेल्या सोयाबिन बियाण्यासाठी रु. १०००/- प्रति क्विंटल प्रोत्साहनपर अनुदान सन २००८-०९ चे अपिलार्थीस का देण्यात आले नाही व सन २००७-०८ हे अनुदान कोणत्या आधारावर(बेसवर) देण्यात आले - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १५.०६.२००९ रोजी प्रथम अपील केले. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून आले आहे की, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दोन वेगवेगळया दिनांकाचा - २९.०६.२००९ व १६.०७.२००९ एकाच मजकुराचा निर्णय, वेगवेगळया स्वरुपातील आदेशाद्वारे दिलेला आहे. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील मान्य करुन अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०६.०७.२००९ रोजी अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे त्यांना विनामूल्य माहिती पाठविली. तथापि अपिलार्थीस ही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले होते.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचे आयोगास अवगत

केले. त्यांनी आयोगास पुढे असे सांगितले की, कंधार येथील कृषी विभागाच्या हलगर्जीपणामुळे त्यांना सन २००८-०९ चे प्रोत्साहनपर अनुदान प्राप्त झाले नाही आणि त्यामुळे त्यांचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे.आयोगाने अपिलार्थीस त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याशी कधी संपर्क साधला याबाबतच्या सबळ पुराव्याची मागणी केली असता, अशाप्रकारचा सबळ पुरावा अपिलार्थीकडे उपलब्ध नसल्याचे अपिलार्थीने आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दि. ०६.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे पाठविली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी त्यांच्या कार्यालयाकडील जावक नोंदवहीचा उतारा आयोगास दाखविला. यावरुन जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. १६९०, दि. ०६.०७.२००९ अन्वये अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती पाठविल्याचे दिसून येत आहे.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील त्यांना सन २००८-०९ चे प्रोत्साहनपर अनुदान का देण्यात आले नाही, या मुद्यावरील माहिती वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. माहिती अधिकार अधिनियमामध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या निर्णयाबद्दलची अथवा कृतीबद्दलची कारणे विचारणे आणि जन माहिती अधिकाऱ्याने अर्जदारास त्यांच्या कृतीचे समर्थन करणारे स्पष्टीकरण देणे, अशाप्रकारच्या प्रक्रियेचा, समावेश नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या मुद्दा क्र. ५ मधील या भागावर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती देय असणार नाही. परंतु उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी दि. ०६.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस पुरविलेल्या

कथित माहितीचे आयोगाने अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या या मुद्यासंदर्भात, कृषी आयुक्त, पुणे यांच्या दि. १७.०४.२००८ रोजीच्या परिपत्रकाची प्रत अपिलार्थीस पुरविली आहे. या परिपत्रकातील पृष्ठ क्र. ९ ते १२ अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ द्वारे मागितलेल्या माहितीतील,त्यांना देय असलेल्या माहितीचा समावेश आहे, याचे अपिलार्थीने अवलोकन करावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांना सन २००८-०९ चे अनुदान तालुका कृषि अधिकारी, कंधार यांच्या बेपर्वाईमुळे मिळाले नसल्याचे आयोगास अवगत केले आहे. यासंदर्भात अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी त्यांच्या या गाऱ्हाण्याची तड कृषि विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडून लावून घ्यावी. या संदर्भातील अपिलार्थीस अपेक्षित असलेला निर्णय हा प्रशासकीय स्वरुपाचा असून अशाप्रकारचे प्रशासकीय निर्णय देण्याची अधिकारिता आयोगास नाही, असे त्यांच्या येथे निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

या घटनाक्रमावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती पुरविल्याचे आयोगास आढळून येत आहे. तथापि अपिलार्थीने व्यक्तिशः माहिती मागितली असताना,जन माहिती अधिकारी यांनी ती अपिलार्थीस अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे पाठविली व ती प्राप्त झाली नसल्याचे अपिलार्थीने आज रोजी सुनावणीमध्ये आयोगास अवगत केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली व वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली त्यांना देय होत असलेली संपूर्ण माहिती, विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी

यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली व वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली त्यांना देय होत असलेली संपूर्ण माहिती,अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक २१.०५.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. माणिक लक्ष्मणराव भोसीकर,रा.पानभोसी, ता.कंधार, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, कंधार, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,कंधार, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३०३

निर्णय दिनांक : २१.०५.२०१०

१. श्री. अंगद ज्ञानोबा चाटे, : अपिलार्थी
रा. आंदबोरी (चि.), ता.किनवट, जि.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
ग्रामपंचायत कार्यालय, आंदबोरी (चि.),
ता.किनवट, जि.नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, किनवट, जि.नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : ग्राम विकास अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, आंदबोरी (चि.),
ता.किनवट, जि.नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०.०८.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी, श्री. लक्ष्मण कनीराम राठोड यांनी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक २०.०५.२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २७.०९.२००९ रोजी त्यांनी या प्रकरणी मागणी केलेली संपूर्ण माहिती प्राप्त झाली असल्यामुळे त्यांचे विचाराधीन अपील निकाली काढून, पंजिका बंद करण्यात यावी, अशी त्यांनी

या प्रकरणी या पत्राच्या अखेरीस आयोगास विनंती केली आहे. अपिलार्थीने या पत्राद्वारे केलेली विनंती आयोग मान्य करीत असून अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक १३०३/०९, दिनांक १०.०८.२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक २१.०५.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अंगद ज्ञानोबा चाटे,रा. आंदबोरी (चि.), ता.किनवट, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी,ग्रामपंचायत कार्यालय, आंदबोरी (चि.),ता.किनवट, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, किनवट, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३०४

निर्णय दिनांक : २१.०५.२०१०

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. शिंदे शेषराव वामन,<br>रा.जेवरी, ता.निलंगा, जि.लातूर. | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>समाज कल्याण अधिकारी गट-अ,<br>जिल्हा परिषद, लातूर. | : प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, लातूर | |

त्रयस्थ पक्ष : मुख्याध्यापक,
कै. सरस्वती शिंदे निवासी अपंग विद्यालय,
निलंगा,जि.लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८.०८.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अपिलार्थीस तात्काळ माहिती देण्याचे आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर शास्ती लादावी व लागू असलेल्या सेवानियमानुसार शिस्तभंगाची कार्यवाही करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ३०.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी गट-अ, जि.प. लातूर यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाचे पत्र

दि. १७.०७.२००८, १५.०३.२००८ व ०२.०३.२००९ रोजी मुख्याध्यापक, कै.सरस्वती शिंदे अपंग निवास विद्यालय,निलंगा यांना पत्र पाठवून अपिलार्थीचे वेतन देयक सादर करण्याबाबत आदेशित केलेले आहे, या पत्रातील आदेशानुसार कर्मचारी वेतनाबाबत त्यांनी काही कार्यवाही केली आहे काय, केली नसेल तर का केली नाही, याची लेखी माहिती जन माहिती अधिकारी यांच्या स्वाक्षरीने व कार्यवाही अहवालाची झेरॉक्स प्रत, अशा स्वरुपाची माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०९.०६.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १५.०७.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस तात्काळ विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीचे वेतन देण्यासंदर्भात संबंधित शाळेचे मुख्याध्यापक यांना दि. ०२.०३.२००९ रोजी आदेशित केले असता, संबंधित मुख्याध्यापकाने त्यांच्याकडील दि. १८.०३.२००९ रोजीच्या पत्राद्वारे त्यांना असे कळविले की, अपिलार्थी हे संबंधित शाळेचे सन २००६-०७ या वर्षात प्रभारी मुख्याध्यापक म्हणून काम पाहत होते. त्यावेळी शाळेचे सर्व दस्तावेज त्यांच्या ताब्यात होते. त्यांनी सन २००६-२००७ या वर्षाचे कर्मचारी हजेरीपत्रक गायब केले आहे. त्यामुळे त्या कालावधीमध्ये अपिलार्थी शाळेत हजर होते किंवा कसे याचा बोध होत नाही. सन

२००७-०८ मध्ये अपिलार्थी दि. ०२.०८.२००७ हा दिवस वगळता उर्वरित कालावधीमध्ये ते सतत अनधिकृत गैरहजर राहिले असल्यामुळे त्यांची वेतन देयके सादर करण्यात आली नाहीत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे खुलासे व स्पष्टीकरणे अपेक्षित करणाऱ्या स्वरुपातील माहिती मागितली असल्याचे दिसून येत आहे. अशाप्रकारची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील "कार्यवाही अहवाल" हा भाग वगळता उर्वरित कोणत्याही मुद्यावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या कार्यवाहीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी मुख्याध्यापक, कै. सरस्वती शिंदे निवासी अपंग विद्यालय,निलंगा यांना अपिलार्थीचे वेतन देण्याकरिता दि. ०२.०३.२००९ रोजीच्या पत्राद्वारे सूचना दिल्या असता,त्या पत्रावर संबंधित शाळेच्या मुख्याध्यापक यांना दि. १८.०३.२००९ रोजी त्यांचे स्पष्टीकरण सादर केले आहे व तसेच त्यांनी त्यांच्याकडील दि. १८.०३.२००९ रोजीच्या दुसऱ्या पत्रान्वये, सन २००६-०७ या कालावधीमध्ये अपिलार्थी संबंधित शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक म्हणून कार्यरत असताना कर्मचारी हजेरीपत्रक अपिलार्थीने स्वतःच्या ताब्यात ठेवल्यासंदर्भात, अपिलार्थीस कळविले असल्याचे दिसून येत आहे. या दोन्ही पत्रांच्या प्रती आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर सादर केल्या आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे, व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर अपिलार्थी हे माहिती घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये उपस्थित राहिले होते का, अशी आयोगाने जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीस विचारणा केली

असता,जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीने त्यांच्याशी त्यांच्या मूळ अर्जातील माहिती प्राप्त करुन घेण्यासंदर्भात संपर्क साधला होता, असे आयोगास अवगत केले. या संदर्भातील निश्चित तारीख त्यांना आयोगास अवगत करुन देता आली नाही. अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील देय माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना आता असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी त्यांच्या दि. ०२.०३.२००९ रोजी मुख्याध्यापक यांना उद्देशून दिलेल्या पत्राची व संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाने जन माहिती अधिकारी यांना दि. १८.०३.२००९ रोजी दिलेल्या दोनही पत्रांच्या प्रती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः संपर्क साधल्याची कबूली संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आजच्या सुनावणीमध्ये आयोगास दिली आहे. अपिलार्थीने प्रत्यक्षात संपर्क साधूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आजतागायत कोणतीही माहिती दिली नसल्याचे देखील या प्रकरणी आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आणि जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेल्या युक्तिवादावरुन नि:संशयपणे सिध्द होत आहे. या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी, श्री. लक्ष्मण ईरबा वाघमारे (सध्या समाज कल्याण अधिकारी, यवतमाळ या पदावर कार्यरत) यांनी त्यांच्या

अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमातील कलम ७ (१) मधील तरतुदीप्रमाणे प्रतिसाद न देण्याच्या कृतीद्वारे स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर अधिनियमातील कलम २०(२) च्या तरतुदीनुसार प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस सचिव (सामाजिक न्याय) यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ०२.०३.२००९ रोजी मुख्याध्यापक यांना उद्देशून दिलेल्या पत्राची व संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाने जन माहिती अधिकारी यांना दि. १८.०३.२००९ रोजी दिलेल्या दोन पत्रांच्या प्रती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्याव्यात.

३. सचिव (सामाजिक न्याय) यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी, श्री. लक्ष्मण ईरबा वाघमारे (सध्या समाज कल्याण अधिकारी, यवतमाळ या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक २१.०५.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शिंदे शेषराव वामन,मु.पो.जेवरी, ता.निलंगा, जि.लातूर-४१३ ५२१.

२. जन माहिती अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी गट-अ,जिल्हा परिषद,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (सामाजिक न्याय), मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३०९
निर्णय दिनांकः २१-०५-२०१०

१. श्री. विश्वनाथ भाऊराव मगर, : अपिलार्थी
रा.बीड

**विरुध्द**

१. चेअरमन, : प्रतिवादी
आनंद मागासवर्गीय सह.गृहतारण संस्था मर्या.,
बीड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपनिबंधक,
सहकारी संस्था, तालुका बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.०८.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याने ते दोषी असल्याकारणाने त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०६.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे चेअरमन, आनंद मागासवर्गीय सहकारी गृहतारण संस्था मर्या., बीड यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर संस्थेकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका बीड यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.२१.०४.२००९ रोजी प्रथम

अपील केले. सदर अपिलावर उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका बीड यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. २१.०५.२००९ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील अंशतः मंजूर केले व त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना १० दिवसात देण्याचे संबंधित संस्थेच्या जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही माहिती न मिळाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. २१.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित व संबंधित संस्थेचे वकील व उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका बीड हे उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित संस्थेस, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने त्यांचे रिट पिटीशन क्र. ३६४८/२००७, श्री बालाजी सहकारी स्पिनींग मिल्स मर्या.,रिसोड,जि.वाशिम विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर या प्रकरणामध्ये दि. ०२.०३.२००९ रोजी खालीलप्रमाणे दिलेला निर्णय तत्पूर्वी विचारात घेणे आवश्यक आहे.

**"It is the contention of the petitioner that the petitioner Co-Operative Society is not a Public Authority and, therefore, Right to Information Act, 2005 is not applicable to the petitioner and, therefore, respondent no.6 could not pass any such order. When the matter is taken up for hearing, learned counsel for the parties concede that this point is squarely covered by judgment of this Court in Writ Petition No.5666/2007; Dr.Panjabrao Deshmukh Urban Co-Operative Bank Ltd., Amravati ..vs.. The**

**State Information Commissioner, Vidarbha Region, Nagpur and Ors., dated 13.01.2009, <u>wherein this Court held that a Co-operative Society, registered under the Maharashtra Co-Operative Societies Act, is not a public authority within the meaning of Section 2(h) of Right to Information Act or a State within the meaning of Article 12 of the Constitution of India and, therefore, Right to Information Act is not applicable.”</u>**

वरील निर्णयाचे अवलोकन करता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार 'सार्वजनिक प्राधिकरण' असे मानता येणार नाही, असे दिसून येत आहे. या प्रकरणी देखील असाच युक्तिवाद लागू होत असल्यामुळे अपिलार्थीने ज्या सहकारी संस्थेकडे माहिती मागितली आहे, त्या सहकारी गृहतारण संस्थेस उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी लागू होणार नाहीत.

अशाप्रकारे मा. उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित गृहतारण संस्थेस लागू होत नसल्याने उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका बीड यांचे दि. २१.०५.२००९ रोजीचे आदेश रद्द करण्याचे आदेशित करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र.१३०९/०९ फेटाळण्यात येत आहे.

२. उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका बीड यांचे दि. २१.०५.२००९ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांकः २१-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विश्वनाथ भाऊराव मगर, रा.विश्वकमल, सांगर फॅब्रीकेशन समोर, शाहूनगर, पांगरी रोड, बीड, ता.जि.बीड

२. चेअरमन, आनंद मागासवर्गीय गृहतारण सहकारी संस्था मर्या., गजानन मंदिराच्या बाजूला, शिवाजीनगर, बीड, ता.जि.बीड.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका बीड.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३०५

निर्णय दिनांक  २१-०५-२०१०

१ श्री. पी. पी. केंद्रे, : अपिलार्थी
पंचायत समिती (आ. प.), अहमदपूर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, जागजी,
तालुका जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,
उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०८-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९९८-९९ दिवाळी बोनस वाटपाच्या नोंदवहीची साक्षांकीत सत्यप्रत व पी. टी. कॅशबुक नमुना नं. ३२, ३३ च्या सत्यप्रती ही माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना अपूर्ण माहिती मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-०४-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, विविध कालावधीशी संबंधित, पाचव्या वेतन आयोगाच्या फरकाच्या

रकमेसंदर्भात व बोनस वाटपासंदर्भात आणि इतर अनुषंगिक मुद्दयावर काही माहिती एकूण चार मुद्दयांव्दारे नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०६-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १४-०७-२००९ रोजी माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याच्या कारणावरुन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी, दिवाळी बोनस वाटपाची नोंदवही त्यांच्या कार्यालयातून गहाळ झाली असल्यामुळे, त्यांना ही माहिती अपिलार्थीस पुरविता आली नाही. अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील तरतुदीपेक्षा विलंबाने पुरविण्याचे कारण आयोगाने जन माहिती अधिकारी यांना विचारले असता, त्यांनी आयोगास असे सांगितले की, त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः ०२-०६-२००९ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली होती. यासंदर्भात त्यांनी आयोगास त्यांच्या कार्यालयाचे दिनांक ०२-०६-२००९ रोजीचे पत्र सादर केले असून, या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असल्याचे व ती माहिती अपिलार्थीने येऊन घेऊन जाण्याचे अपिलार्थीस सूचित केले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने

त्यांच्या दिनांक ३०-०४-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे, त्यामुळे ती अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ मधील तरतुदीनुसार देय होत आहे. अपिलार्थीच्या दिनांक ३०-०४-२००९ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २९-०५-२००९ रोजी अगर तत्पूर्वी प्रतिसाद देणे अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अभिप्रेत असताना, या प्रकरणी अपिलार्थीस ही मुदत व्यपगत झाल्यानंतर दिनांक ०२-०६-२००९ रोजी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासंदर्भात प्रथम प्रतिसाद दिला, तो प्रतिसाद देखील चुकीचा आहे, कारण अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३०-०४-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे, जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाव्दारे माहिती मागितली असता, जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून अपिलार्थीस घेऊन जाण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांची ही कृती सर्वथा गैर व चुकीची आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या माध्यमाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षिली आहे, त्याच माध्यमाव्दारे अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (१) मध्ये विहित केलेल्या मुदतीत त्यांनी अर्जदारास प्रतिसाद देणे या अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचा अपिलार्थीस दिनांक ०२-०६-२००९ रोजी दिलेला प्रतिसाद हा पूर्णपणे अवैध असल्याचे सिध्द होत आहे. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०६-२००९ रोजी प्रथम अपील केल्यानंतर दिनांक १४-०७-२००९ रोजी प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस काही माहिती पुरविली. या माहितीमध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील, सन १९९८-९९ या वर्षाच्या बोनस वाटपाच्या नोंदवहीची प्रत उपलब्ध नाही. ही नोंदवही गहाळ झाल्याचे, आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले आहे. त्यामुळे आता या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होऊ शकणार नाही. यासंदर्भात अशा प्रकारच्या माहितीचे अभिलेखे गहाळ केल्यामुळे, संबंधित जन माहिती अधिकारी यांना हे अभिलेखे जतन करुन ठेवण्याची जबाबदारी त्यांच्या कार्यालयातील ज्या

कर्मचा-यावर होती, त्या कर्मचा-यावर फौजदारी अथवा प्रशासकीय कारवाई करणे गरजेचे होते. जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारची कोणतीही कारवाई या प्रकरणी केल्याचे आयोगास आढळून येत नाही. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील, सन १९९८-९९ च्या बोनस वाटपाची नोंदवही त्यांच्या कार्यालयातील ज्या कर्मचा-यांनी गहाळ केली आहे, अशा सर्व कर्मचा-यांवर हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत फौजदारी गुन्हा दाखल करावा अथवा आवश्यक वाटल्यास त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करावी आणि त्याप्रमाणे त्यांनी केलेली कारवाई, हे आदेश निर्गमीत होताच याच कालावधीत अपिलार्थीस कळवावी. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून पी. टी. कॅशबुक नमुना नं. ३२, ३३ च्या सत्यप्रतीची माहिती मागितली आहे. तथापि अपिलार्थीने ही माहिती त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जामध्ये नमूद केलेली नाही, त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून या प्रकरणी देय होत नाही. अपिलार्थीस अद्यापही या मुद्दयावरील माहितीची आवश्यकता असल्यास, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे याकरिता माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार स्वतंत्र अर्ज करावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ३०-०४-२००९ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रथमतः कोणताही प्रतिसाद न देता व नंतर अवैध व चुकीचा प्रतिसाद देणे आणि तदनंतर विलंबाने अपिलार्थीस अपूर्ण माहिती पुरवून, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. त्यांनी अशा प्रकारे अपिलार्थीस अपूर्ण माहिती देऊन, अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग केल्यामुळे, ते अधिनिमयातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र होत आहेत. सबब, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या

प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे संबंधित सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे कारवाई करुन ती, त्यांना हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत अवगत करावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे संबंधित सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानिमानुसार शिस्तभंग-विषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २१-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पी. पी. केंद्रे, पंचायत समिती (आ. प.), अहमदपूर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, जागजी, तालुका जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३०६

निर्णय दिनांक २१-०५-२०१०

१ श्री. मधुकर हिराजी मुळे, : अपिलार्थी
शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १,
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी (जाप्रपस),
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १,
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : श्रीमती सुवर्णा मनोहरराव भायेकर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०८-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्रीमती सुवर्णा मनोहरराव भायेकर यांच्या संदर्भात एकूण दोन मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - डॉ. आंबेडकर स्मारक हायस्कूल, पूर्णा यांच्या दिनांक ०६-०१-२००५ रोजीच्या पत्रावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही, या पत्रातील त्रयस्थ पक्ष उमेदवार श्रीमती सुवर्णा मनोहरराव भायेकर यांची जात पडताळणी करण्यात आली असल्यास, प्रमाणपत्राची छायांकीत सत्यप्रत आणि पडताळणी केली नसल्यास त्याचा खुलासा - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-०२-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने संदर्भित केलेल्या त्रयस्थ पक्षाचे जात पडताळणी प्रकरण त्रुटीच्या पुर्ततेअभावी दिनांक २९-०७-२००५ रोजी उमेदवाराला परत केल्याचे अपिलार्थीस कळविले व सन २००६ मध्ये परभणी, हिंगोली जिल्हयाकरिता वेगळी समिती स्थापन करण्यात आलेली असल्याने सदरचे प्रकरण जात पडताळणी समिती क्रमांक २ औरंगाबाद यांच्याकडे वर्ग करण्यात आले असल्याचे अपिलार्थीस कळविले, तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती औरंगाबाद यांच्याकडे दिनांक २०-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ११-०५-२००९ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीची वस्तुस्थिती त्यांना सविस्तर अवगत करुन, अपिलार्थीचे अपील निकाली काढले व त्यांच्या कार्यालयाने या प्रकरणी उपस्थित केलेल्या त्रुटीची पुर्तता केल्यास त्यावर १५ दिवसाच्या आत सदर प्रकरण निर्णयासाठी समितीकडे सादर करण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष अनुपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी दिनांक ०५-०२-२००९ रोजी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती अपिलार्थीस पुरविल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ मधील त्रयस्थ पक्षाच्या, पडताळणी न करण्याची कारणे, या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही, कारण ही माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या ' माहिती ' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कृतीबद्दलची अथवा निर्णयाबद्दलची कारणे विचारणे आणि जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कृतीबद्दलचे अथवा निर्णयाचे समर्थन करणारे स्पष्टीकरण अर्जदारास देणे, अशा प्रकारच्या प्रक्रियेचा यामध्ये समावेश नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०५-०२-२००९ रोजी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे आयोगास आढळून येत आहे. अशा प्रकारे अपिलार्थीस देय असलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अधिनियमातील कलम ७ (१) मधील विहित केलेल्या कालावधीमध्ये दिली असल्यामुळे, अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर वेगळ्याने कोणताही विचार करण्याचे कारण व प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०५-०२-२००९ रोजी पत्र पाठविल्याचा सबळ पुरावा आयोगास सादर केला आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०५-०२-२००९ रोजी आवश्यक ती माहिती

पुरविल्याचे सिध्द होत आहे. परिणामी अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २१-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मधुकर हिराजी मुळे, शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी (जाप्रपस), विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३०७

निर्णय दिनांक २१-०५-२०१०

१ श्री. राजेंद्र हौसराव देशमुख, : अपिलार्थी
कोल्हेर रोड, नगर परिषद कॉलनी, गेवराई,
तालुका गेवराई, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, गेवराई, तालुका
गेवराई, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, गेवराई,
तालुका गेवराई, जिल्हा बीड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : वरिष्ठ लिपीक, नगर परिषद कार्यालय, गेवराई,
तालुका गेवराई, जिल्हा बीड

त्रयस्थ पक्ष : श्री. कैलास लिंबाजी पवळे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो माहिती प्राप्त न झाल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३१-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. कैलास लिंबाजी पवळे यांच्यासंदर्भात, काही माहिती खालीलप्रमाणे मागितली होती.

" १. कैलास लिंबाजी पवळे यांचे नेमणुक संचिका व कार्यालयीन आदेश दि. ०१-०१-२००६ ते ३१-१२-२००८ पर्यंत माहिती.

२. शासन उदिष्ट बाबत आदेशाच्या प्रती वसुलीबाबत, पत्र, स्मरणपत्र.

३. वर्ष २००६ ते २००७ व २००८ ते २००९ व २००५ ते २००६ वसुलीची टक्केवारी प्रतिमाहसह, २००५ एप्रिल ते माहे डिसेबर २००८ पर्यंत व २००६ ते २००७ व २००७ ते २००८.

४. माहे एप्रील २००६ ते ३१-१२-२००८ पर्यंत वसुली कर्मचारी यांचे रजेबाबत (किरकोळ, आजारी, अर्जित रजा) सविस्तर माहिती. "

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतलेला आहे)

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून शीघ्र टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, गेवराई यांच्याकडे दिनांक २९-०५-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६-०६-२००९ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीचे अपील फेटाळले. सदर अपील नाकारण्याचे समर्थन करताना जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १६-०६-२००९ रोजीच्या निर्णयामध्ये, मात्र माहिती उशिरा का होईना परंतु अपिलार्थीस माहिती दिल्याचे आणि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याचे व ती विस्तृत स्वरुपात असूनही

अपिलार्थीस माहिती दिल्याने, अपिलार्थीचे अपील फेटाळण्याचा निर्णय घेतल्याचे म्हटले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ३०-०६-२००९ रोजी व परत दिनांक २१-०७-२००९ रोजी त्यांनी मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ व ३ शी संबंधित माहिती अपिलार्थीस दिली. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व ४ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी या मुद्दयाव्दारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सविस्तर असल्यामुळे व अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून निश्चितपणे कोणत्या माहितीची आवश्यकता आहे याचा बोध होत नसल्याने, ती अपिलार्थीस देण्याचे दिनांक २१-०७-२००९ रोजीच्या पत्राव्दारे नाकारले. या सर्व प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी, त्रयस्थ पक्ष अनुपस्थितीत व अपिलार्थी आणि जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. विठ्ठल तिपाले, लिपीक उपस्थित आहेत.

अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांच्या मूळ अर्जातील कोणतीही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नसल्याचे आयोगास अवगत केले. यासंदर्भात आयोगाने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक २१-०७-२००९ रोजी माहिती पुरविल्याचे अवगत केले असता व यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक तो पुरावा सादर केल्याचे त्यांच्या निदर्शनास आणून दिले असता, त्यांनी असे अभिप्राय व्यक्त केले की, संबंधित नगर परिषदेने पोस्टमनला मॅनेज केले असल्यामुळे, जरी जन माहिती अधिकारी यांच्याकडील अभिलेख्यामध्ये अपिलार्थीस पोस्टाने माहिती दिली असल्याचे सिध्द केले असले तरी, प्रत्यक्षात त्यांना ही माहिती प्राप्त झालेली नाही. ' मॅनेज ' या शब्दाचा अर्थ अपिलार्थीने असा स्पष्ट केला की, नगर परिषदेकडील संबंधित अधिका-यांना जन माहिती अधिकारी यांनी पोस्टमनशी संगनमत करुन अपिलार्थीस माहिती न देण्याचा घाट घातला आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३१-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे सकृतदर्शनी आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सकृतदर्शनी मोघम असल्यासारखी आयोगास वाटत आहे. तथापि यासंदर्भात अपिलार्थीने आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना त्रयस्थ पक्ष श्री. कैलास लिंबाजी पवळे यांची नेमणूक संचिका व कार्यालयीन आदेश दिनांक ०१-०१-२००६ ते ३१-१२-२००८ या कालावधीशी संबंधित त्यांच्या कार्यालयीन आदेशाच्या प्रती अपेक्षित असल्याचे आयोगास आढळून येत आहे. मुद्दा क्रमांक ४ व्दारे अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाच्या किरकोळ, आजारीपणाच्या व अर्जित रजेच्या संदर्भात सविस्तर माहिती अशी माहिती मागितली आहे. ही माहिती देखील मोघम स्वरुपाची असल्याचे आयोगास आढळून येत आहे. ' सविस्तर माहिती ' म्हणजे नेमकी कोणत्या मुद्दयावरील माहिती हे अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये स्पष्ट केलेले नाही. या मुद्दयासंदर्भात आज रोजी झालेल्या सुनावणीमध्ये अपिलार्थीने त्यांना त्रयस्थ पक्षाच्या माहे एप्रिल २००६ ते दिनांक ३१-१२-२००८ या कालावधीशी संबंधित किरकोळ, आजारी व अर्जित रजेच्या अर्जाच्या प्रती आवश्यक असल्याचे स्पष्टीकरण आयोगास दिले आहे. तेव्हा अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भात, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी त्रयस्थ पक्षाच्या एप्रिल २००६ ते दिनांक ३१-१२-२००८ पर्यंतच्या कालावधीतील त्यांनी विचारलेल्या सर्व रजेच्या प्रती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

वरील परिच्छेदामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व ४ च्या संदर्भातील त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून निश्चितपणे कोणती माहिती हवी असल्याचे स्पष्टीकरण आयोगास दिले आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या स्पष्टीकरणाप्रमाणे

अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पोस्टाने माहिती पाठवू नये, पोस्टमनशी संगनमत करुन जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीपर्यंत माहिती पोहचू देत नाहीत असे आपल्या युक्तिवादामध्ये म्हटले आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३१-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली व वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी. जन माहिती अधिकारी यांना पुढे असेही सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस ही माहिती दोन त्रयस्थ साक्षीदारांच्या उपस्थितीत पुरवावी. अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त कालावधीत कार्यालयीन वेळेत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून ही माहिती, या निर्णयामध्ये आदेशित केल्याप्रमाणे संबंधितांकडून उपलब्ध करुन घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २१-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राजेंद्र हौसराव देशमुख, कोल्हेर रोड, नगर परिषद कॉलनी, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक, नगर परिषद कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३०८

निर्णय दिनांक २१-०५-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. कुटे उध्दव विठ्ठल,<br>मु. वंजारवाडी, पो. राजुरी (न), तालुका जिल्हा बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तालुका कृषि अधिकारी, बीड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तालुका कृषि अधिकारी, बीड | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-१२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक १२-०४-२०१० रोजीचे एक पत्र आयोगास सादर करण्यात आले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून या प्रकरणाशी संबंधित पूर्ण माहिती मिळाल्याने आणि त्यामुळे त्यांचे समाधान झाल्याने ते विचाराधीन अपील मागे घेत आहेत.

या पत्रामध्ये त्यांनी आयोगास त्यांचे अपील रद्द करण्याची विनंती केली आहे. अपिलार्थीने केलेली ही विनंती आयोग मान्य करीत असून अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २१-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. कुटे उध्दव विठ्ठल, मु. वंजारवाडी, पो. राजुरी (न), तालुका जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८८२

निर्णय दिनांक : ३१.०५.२०१०

१. श्री. रामचंद्र मारुती कांबळे, : अपिलार्थी
रा.तुळजापूर, जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी, वर्ग-१,
पंचायत समिती, तुळजापूर, जि.उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १४.१२.२००९ रोजी फेरसादर केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही माहिती अधिकाऱ्याने त्यांना जाणूनबुजून दुष्ट हेतूने माहिती दिली नाही, त्यामुळे त्यांच्यावर शास्तीची व दंडात्मक कार्यवाही करावी आणि पदाचा दुरुपयोग करुन कर्मचाऱ्यांना पाठीशी घालून प्रकरण दाबण्याचा प्रयत्न केल्यामुळे संबंधितांच्यावर निलंबनाची कार्यवाही करावी व त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्याचे आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २७.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर यांच्याकडून त्यांच्या कार्यक्षेत्रातील एकूण १४ ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवक/ग्रामसेविकासंदर्भात सन २००३-०८ या

कालावधीतील काही माहिती एकूण ९ मुद्यांद्वारे नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती. अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले होते.

अपिलार्थीस अपेक्षित माहिती गट विकास अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०३.०१.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. २०.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांना सात दिवसांचे आत अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे स्वतः अथवा त्यांचा कोणीही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर यांचेकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील मौ. कामठा,अपसिंगा, सावरगाव, खानापूर, केशेगाव, धोत्री, ईटकळ, आरबळी,कार्ला,जवळकोटवाडी, मानेवाडी, बाभळगाव, खुदावाडी, वागदरी या गावाच्या ग्रामपंचायतीमध्ये कार्यरत असलेल्या ग्रामसेवक/ग्रामसेविकांच्या कामकाजाबाबत एकूण ९ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता, या माहितीची व्याप्ती मोठया प्रमाणात आणि तिचे स्वरुप सर्वसाधारण असे असल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या ९ मुद्यांवरील माहितीपैकी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २,४,५,६,७,८ या मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस देय होत नाही. या सर्व मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागविली आहे. यातील मुद्दा क्र. ८ द्वारे

अपिलार्थीने संबंधित ग्रामसेवकांच्याविरुध्द आलेल्या तक्रारीचे स्वरुप व त्याचा तपशील अशी माहिती मागविली आहे. तक्रारीचे 'स्वरुप व तपशील' म्हणजे अपिलार्थीस नेमक्या कोणत्या मुद्यावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे, हे समजून येत नाही. तसेच ही माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधित व वैयक्तिक स्वरुपाची असल्याने व ही माहिती उघड झाल्यास अपिलार्थी कशाप्रकारे व कोणते व्यापक जनहित साध्य करणार आहेत याचा उल्लेख केला नसल्याने या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस देय नाही. अपिलार्थीने या सर्व मुद्यांमध्ये, "तपासणी केली असल्यास तपासणीची माहिती", "सदर ग्रामसेवक मुख्यालयी राहत असल्याचे पुरावे दाखविणारी कागदपत्रे", "सर्व ग्रामसेवक/ग्रामसेविकेंनी सर्व कामकाज नियमाप्रमाणे केले असल्यास त्याची खात्री दर्शविणाऱ्या कागदपत्रांच्या प्रती" अशा मोघम स्वरुपाची माहिती मागविली आहे जी अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणार नाही. कारण माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागताना ती एका विशिष्ट मुद्यावर व स्पष्ट स्वरुपाची असणे भाग आहे. तसेच माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे अभिप्राय व खुलासे अपेक्षित करणारी माहिती मागणे आणि माहिती अधिकाऱ्याने त्यांच्या कृतीबद्दलची कारणे अथवा स्पष्टीकरणे अर्जदारास देणे, अशाप्रकारच्या प्रक्रियांचा समावेश नाही. त्यामुळे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे वरील मुद्याद्वारे मागणी केलेली ही माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी विसंगत आहे व म्हणून ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय नाही. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १, ३ व ९ मधील, संबंधित ग्रामसेवकांच्या सन २००३-०८ या कालावधीतील कीर्द,जमाखर्चाच्या नोंदवहीच्या प्रती, संबंधित ग्रामसेवक/ग्रामसेविकांच्या वेतनश्रेणी मान्यतेसाठी प्रस्ताव दाखल करताना अवलंबिलेली पध्दत दर्शविणारी कागदपत्रे व संबंधित ग्रामसेवक/ग्रामसेविकांच्या लेखा परीक्षण अहवालामध्ये त्यांच्यावर लेखा परीक्षकाने दिलेले अभिप्राय, ही माहिती अपिलार्थीस देय होत आहे. हे पाहता, जन माहिती

अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १,३ व ९ शी संबंधित या परिच्छेदात स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांच्याकडील उपलब्ध माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १,३ व ९ शी संबंधित, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, संपूर्ण देय माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरावावी.

**औरंगाबाद**
**दिनांक ३१.०५.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रामचंद्र मारुती कांबळे,रा.वेताळनगर,तुळजापूर, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, वर्ग-१,पंचायत समिती, तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८८३

निर्णय दिनांक : ३१.०५.२०१०

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. सय्यद विकारोद्दीन,<br>रा. पैठण, जि.औरंगाबाद | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, पैठण,<br>जि.औरंगाबाद | : प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी,<br>औरंगाबाद | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९.०४.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत.जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले दि. ३१.०५.२०१० रोजीचे निवेदन आयोगास सादर करण्यात आले असून या निवेदनामध्ये त्यांच्या विचाराधीन अपिलावरील सुनावणी पुढे ढकलण्याची विनंती त्यांनी आयोगास केली आहे.

अपिलार्थीच्या विनंतीचा विचार करता, त्यांच्या विचाराधीन अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत असून संबंधितांना पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल.

नियोजित सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही गैरहजर राहिले तर त्यांच्या गैरहजेरीत सदर प्रकरणी निर्णय घेण्यात येईल व तो दोन्ही पक्षास बंधनकारक राहील.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३१.०५.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सय्यद विकारोद्दीन,द्वारा राणा ॲटो पार्टस्, उद्यान रोड, बस स्टॅण्डजवळ, पैठण, जि.औरंगाबाद-४३१ १०७.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, पैठण,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८८४

निर्णय दिनांक : ३१.०५.२०१०

१. श्री. विकास कुमार बागडी, : अपिलार्थी
रा.जालना

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अधिकारी,
लघुपाटबंधारे (सिंचन),जिल्हा परिषद, जालना

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपअभियंता,
लघुपाटबंधारे जिल्हा परिषद
उपविभाग, परतूर,जि.जालना

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अधिकारी,
लघुपाटबंधारे विभाग,
जिल्हा परिषद, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून त्यांना माहिती देण्यात न आल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०४.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील परतूर, उपविभागाशी संबंधित व जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित रोजगार हमी योजनेच्या कामासंदर्भात काही माहिती एकूण १२ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कालावधी जुन,२००६ ते ऑगस्ट,२००८ असा होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०४.१०.२००८ रोजी प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती परतूर उपविभागाशी संबंधित असल्याने कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, जालना यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतदीनुसार दि. ०८.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे उपअभियंता, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद उपविभाग,परतूर यांच्याकडे पाठविला व अपिलार्थीस माहिती देण्याचे त्यांना सूचित केले. तथापि मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याच्या कारणास्तव अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांच्याकडे दि.१५.११.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे,जिल्हा परिषद, जालना यांनी अपिलार्थीस दि. २९.१२.२००८ पर्यंत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना त्यांच्याकडील दि. २०.१२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे सूचित केले परंतु यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्तीची कारवाई

करण्यात यावी, अशी आयोगास विनंती केली व त्यांना आवश्यक असलेली ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांनी वैयक्तिक पातळीवर देखील बरेच प्रयत्न करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती प्राप्त झाली नसल्याचा दावा केला.

उपस्थित कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे,जि.प.जालना यांनी अपिलार्थीस तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. डी.बी.जाधव (सध्या निलंबित) यांनी माहिती न दिल्याचे मान्य केले व आता ही माहिती अपिलार्थीस १५ दिवसांचे आत देण्याचे आयोगास आश्वासित केले व त्याचप्रमाणे आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी बरीचशी माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची आहे, त्यामुळे ती अपिलार्थीस देय होत नाही.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील परतूर उपविभागामार्फत केल्या गेलेल्या कामाशी संबंधित काही माहिती एकूण १२ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी एकूण ११ मुद्यांवरील माहिती ही प्रत्यक्षात परतूर उपविभागाशी संबंधित होती व मुद्दा क्र. १२ शी संबंधित माहिती ही स्वतः कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयाशी संबंधित होती. तथापि त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे वाचन नीट न करता स्वतःच्या कार्यक्षेत्राशी संबंधित माहिती अपिलार्थीस देण्याची तयारी या घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर दर्शविलेली नाही.

अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुद्दा क्र. ५,७,८,१० व ११ अंशतः - 'विभागीय दक्षता पथकामार्फत, रोहयो समितीमार्फत तपासणी करण्यात आली का?' या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होणार नाही. उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत असल्याचे आढळून येत आहे. त्यामुळे आता जन अपिलीय

अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये कबूल केल्याप्रमाणे त्यांना ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५,७,८,१० व ११ अंशतः वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

या संपूर्ण घटनाक्रमामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याची कोणत्याही टप्प्यावर तयारी दर्शविली असल्याचे आयोगास आढळून आलेले नाही. जन माहिती अधिकारी यांच्या अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद न देण्याच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. आज रोजी सुनावणीसाठी ते आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यांचे या प्रकरणी म्हणणे नोंदविण्याच्यादृष्टीने व त्यांना त्यांच्या बचावाची एक संधी उपलब्ध करुन देण्याकरिता जन माहिती अधिकारी तथा तत्कालीन उपअभियंता, लघुपाटबंधारे जिल्हा परिषद,उपविभाग परतूर श्री. डी.बी. जाधव यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती प्राप्त होण्यापासून अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ काळ वंचित ठेवल्याबद्दल त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु.२५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

श्री. डी. बी. जाधव हे सध्या निलंबित असल्यामुळे, आयोगाच्या या आदेशाची प्रत श्री. डी. बी. जाधव यांना पोहोच करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांची राहील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे मुद्दा क्र. ५,७,८,१०, व ११ अंशतः वगळता उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, लघुपाटबंधारे जि.प.उपविभाग परतूर,जि.जालना, श्री. डी.बी. जाधव (सध्या निलंबित) यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३१.०५.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विकास कुमार बागडी,रा.नाथ गल्ली, सदर बाजार,जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता,लघुपाटबंधारे जिल्हा परिषद उपविभाग, परतूर,

जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अधिकारी,लघुपाटबंधारे विभाग,जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, लघुपाटबंधारे जिल्हा परिषद,उपविभाग परतूर, श्री. डी.बी. जाधव (सध्या निलंबित) (मार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना) यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

५. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२५०
निर्णय दिनांक ३१/०५/२०१०

| | | |
|---|---|---|
| १ श्री. सरकटे महेंद्र काशिराम,<br>रा.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>सहसंचालक,<br>तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहसंचालक,<br>तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद | | |

**निर्णय**

श्री.सरकटे महेंद्र काशिराम, रा.नांदेड यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०७.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. १५.१०.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. ०१.१२.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २१६ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३१/०५/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सरकटे महेंद्र काशिराम, व्दारा-सरकटे के.आर., मनार बिल्डींग, गाळा क्र.०८, शासकीय तंत्रनिकेतन वसाहत, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२५१
निर्णय दिनांक ३१/०५/२०१०

| | | |
|---|---|---|
| १ श्री. आकाश भगवान सुरवसे,<br>रा.वडगांव (काटी), ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, तुळजापूर, जि.उस्मानाबाद | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, उस्मानाबाद | | |

**निर्णय**

श्री. आकाश भगवान सुरवसे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०१.०६.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. ०६.०९.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. ०४.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ८७ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३१/०५/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. आकाश भगवान सुरवसे, मु.पो.वडगांव (काटी), ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८८५

निर्णय दिनांक ३१-०५-२०१०

१ श्री. मधुकर हिराजी मुळे, : अपिलार्थी
शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पूर्णा,
तालुका पूर्णा, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी

त्रयस्थ पक्ष : श्री. दिलीप रावजी राजभोज, श्री. गंगाधर तुळशीराम सपाटे, श्री. मनोहर बालाजी पांचाळ

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्याकडून जास्तीचे शुल्क घेऊन, त्यांना अपूर्ण माहिती मिळाल्यामुळे व जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-१२-२००८ रोजी सुनावणी घेऊन निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. दिलीप रावजी राजभोज, श्री. गंगाधर तुळशीराम सपाटे, श्री. मनोहर बालाजी पांचाळ या तिघांना मौजे गौर येथे देण्यात आलेली घरकुले कोणत्या योजनेतून दिली गेली त्या योजनेचे नाव व या योजनेच्या शासकीय निर्णयाची प्रत, लाभार्थ्यांस घरकूल देताना ग्रामपंचायत कार्यालयाने लेखी कळविलेल्या पत्राची छायांकीत प्रत, संबंधित लाभार्थ्यांना घरकूल देण्याबाबत घेतलेल्या ठरावाची छायांकीत प्रत व एप्रिल २००६ ते मार्च २००८ या कालावधीमध्ये गौर येथे ग्रामसभा घेण्यात आली का, घेतली नसेल तर न घेण्याची कारणे आणि ठराव न घेता लाभार्थ्यास घरकुले कशी दिली याबाबत खुलासा, अशी माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २२-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे एकूण शुल्क रुपये ३८६ इतके त्यांना चलनाव्दारे भरणा करण्याचे सूचित केले. अपिलार्थीने त्याप्रमाणे स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा पूर्णा येथे ३८६ रुपये इतकी रकम चलनाव्दारे दिनांक ०६-१०-२००८ रोजी भरली. तथापि यानंतरही शुल्क भरुनही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-१२-२००८ रोजी सुनावणी ठेवूनही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाही.

अपिलार्थीने त्यांचा युक्तिवाद आयोगास फॅक्सव्दारे पाठविला असून, त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपिलाची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी दिनांक ०५-१२-२००८ रोजी सुनावणी घेतली व त्यांचे अपील गडबडीत निकाली काढले. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीने भरलेले शुल्क परत करा, असे तोंडी आदेश दिले होते. दिनांक ३१-०३-२००९ रोजी त्यांनी दिलेल्या कथित निर्णयामध्ये अपिलार्थीस माहिती प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने कबूल केले असा चुकीचा उल्लेख केला आहे. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून पाच पृष्ठांची व अपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण तीन मुद्दयाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी, मुद्दा क्रमांक ३ मधील, "गौर येथे ग्रामसभा घेण्यात आली का, ग्रामसभा घेतली नसेल तर न घेण्याचे कारण व ठराव न घेताच संबंधित लाभार्थ्यांना घरकुले कशी दिली याबाबतचा खुलासा," याबाबतची माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या ' माहिती ' या शब्दाच्या तरतुदीप्रमाणे, अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात ती अर्जदारास उपलब्ध करुन देण्यासंदर्भात, जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदी-प्रमाणे कार्यवाही करणे, इतपत सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दलची कारणे व स्पष्टीकरणे अपेक्षित करणारी माहिती मागणे आणि माहिती अधिका-याने त्यांच्या कृतीबद्दलची कारणे अथवा स्पष्टीकरणे अर्जदारास देणे, अशा प्रकारची प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील या भागावरील माहिती, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. मात्र अपिलार्थीच्या अर्जातील उर्वरित संपूर्ण माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती

दिली हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीच्या दिनांक १८-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जास गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पूर्णा यांनी अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे विहित मुदतीत जरी प्रतिसाद दिला असला, तरीही हा प्रतिसाद चुकीचा आहे. कारण माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (३) (क) च्या तरतुदीनुसार अर्जदारास त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविताना या शुल्काचा तपशील उदा. अर्जदारास देण्यासाठी प्रस्तावित केलेल्या माहितीच्या पृष्ठांची अंदाजे संख्या व माहितीचा प्रतिपृष्ठ दर इत्यादी तपशील देणे हे जन माहिती अधिकारी यांना अनिवार्य आहे. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पूर्णा यांच्या दिनांक २२-०९-२००८ रोजीच्या पत्राचे अवलोकन केले असता, त्यांनी अशा प्रकारचा कोणताही तपशील अपिलार्थीस न कळवून माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (३) (क) च्या तरतुदीचा भंग केला आहे. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता विनामूल्य माहिती देय होत आहे. परिणामी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीकडून त्यांनी माहितीपोटीचे चलनाव्दारे स्वीकारलेले शुल्क रुपये ३८६ इतके त्यांना परत करावे लागेल. सदर शुल्क अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत परत करावे, असे गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पूर्णा यांना आदेशित करण्यात येत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी निश्चितपणे कोणत्या मुद्दयावर अद्यापपावेतो माहिती देणे बाकी आहे, याची आयोगास उपलब्ध कागदपत्रावरुन कल्पना येत नसल्यामुळे, अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## **आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पूर्णा तथा जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी-कडून या प्रकरणी माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये ३८६ इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ३१-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मधुकर हिराजी मुळे, शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८८६

निर्णय दिनांक ३१-०५-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. नंदवे तातेराव जगन्नाथराव,<br>रा. नांदगांव, पो. गांजूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम<br>उपविभाग, चाकूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,<br>उस्मानाबाद | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, चाकूर, जिल्हा लातूर

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी जाणीवपूर्वक नाकारले असल्यामुळे अधिनियमातील

कलम २० (२) नुसार जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना प्रतिदिनी २५० रुपये याप्रमाणे दंड व शिस्तभंगविषयक कारवाई करावी. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाच्या दिनांक ०१-०१-२००५ ते ०१-०६-२००८ या कालावधीमधील किरकोळ खर्चासाठी प्राप्त झालेल्या अनुदानाच्या विनियोगासंदर्भात एकूण सात मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या कालावधीमध्ये कार्यालयीन खर्चासाठी प्राप्त झालेली रक्कम, खर्च झालेली रक्कम, खर्च झालेल्या रकमेच्या व्हावचर्सच्या प्रती, ऑडिटच्या प्रती, या कालावधीमध्ये शासकीय विश्रामगृहात किती व्हीआयपी थांबले त्याचा तपशील, व्हीआयपीवर झालेला एकूण खर्च व या कालावधीमध्ये रोजगार हमी योजनोखालील करण्यात आलेल्या कामावरील मजुरांचे मस्टर्स, कामाचे हजेरीपत्रक व मोजमाप पुस्तिकांच्या नोंदी - या मुद्दयांचा समावेश होता. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषे-खालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २१-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपात असल्यामुळे आणि ती माहिती अपिलार्थीस देण्यासाठी शासकीय साधनसामग्रीचा प्रमाणाबाहेर वापर करावा लागणार असल्यामुळे, अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ७ (९) प्रमाणे उघड करण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्या-कडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०८-२००८ रोजी यासंदर्भात प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-११-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. प्रथम अपिलावर निर्णय

देताना जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील सुनावणीच्या दरम्यान त्यांनी अपिलार्थीचे प्रबोधन केले असे कारण दर्शविले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे निश्चितपणे कशा स्वरुपात व कशा प्रकारे प्रबोधन केले याचा कोणताही या निर्णयामध्ये उल्लेख नाही. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी अनुपस्थित व अपिलार्थी, सध्याचे आणि तत्कालीन जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने, त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी व त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य प्राप्त व्हावी.

सध्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कालावधी साडेतीन वर्षाचा असून या कालावधीतील माहिती अपिलार्थीस छायांकीत स्वरुपात देण्यासाठी त्यांच्याकडे पुरेसे अनुदान उपलब्ध नसल्यामुळे ते ही माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देऊ शकले नाहीत. तथापि अपिलार्थी ही माहिती त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून कधीही विनामूल्य पाहू शकतात.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने वेगवेगळ्या स्वरुपाची व मोठ्या कालावधीशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ शी संबंधित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण या मुद्दयाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही विशिष्ट स्वरुपाची माहिती न मागविता ' किती व्हीआयपी थांबले होते याचा तपशील ' अशी माहिती मागितली होती.

व्हीआयपीचा तपशील म्हणजे नेमके, व्हीआयपीची नावे, पत्ते, संख्या याबाबत अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये कोणत्याही प्रकारचा उल्लेख केलेला नाही. परिणामी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली ही माहिती, ती मोघम स्वरुपाची असल्यामुळे, देय होत नाही. तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७ व्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही कामाचा विशिष्ट असा उल्लेख न करता, दिनांक ०१-०१-२००५ ते ०१-०६-२००८ या कालावधीतील जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे करण्यात आलेल्या रोजगार हमी योजनेच्या कामाच्या मजुराच्या मस्टरच्या प्रती आणि त्यांच्या मोजमाप पुस्तिकातील नोंदीची मागणी केली आहे. या मुद्दयावरील माहिती ही विस्तृत स्वरुपाची आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २१-०८-२००८ रोजी दिलेला प्रतिसाद हा बरोबर आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे अशा प्रकारचे स्वरुप पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ ते ६ मधील मुद्दा क्रमांक ५ शी संबंधित माहिती वगळता उर्वरित माहिती त्यांना लिखित स्वरुपात हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. मुद्दा क्रमांक ३ व्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत खर्च केलेल्या रकमेच्या व्हावचर्सच्या प्रतीची मागणी केली आहे. यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, त्यांच्या कार्यालयातर्फे खर्च करण्यात आलेल्या सर्व व्हावचर्सच्या मूळ प्रती ते दरमहा त्यांच्या कार्यालयाच्या मासिक लेख्याबरोबर महालेखापालांना सादर करीत असल्यामुळे या व्हावचर्सच्या प्रती त्यांना आता अपिलार्थीस देता येणार नाहीत. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे स्पष्ट करण्यात येत आहे की, त्यांच्या कार्यालयातील ' कार्यालयीन खर्च ' या लेखाशीर्षाखाली दिनांक ०१-०१-२००५ ते ०१-०६-२००८ या कालावधीत झालेल्या खर्चाशी संबंधित त्यांच्या कार्यालयातील कॅशबुकच्या झेरॉक्स प्रती, या मुद्दयावरील माहितीप्रीत्यर्थ अपिलार्थीस उपलब्ध करुन द्याव्यात. जेणेकरुन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती उपलब्ध होऊ शकेल. जर अपिलार्थीस या व्हावचर्सच्या प्रतीची आवश्यकता असेल तर त्यांनी या संदर्भात महालेखापाल, नागपूर यांच्याकडे माहिती अधिकार

अधिनियमाखाली अर्ज करावा, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७ व्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही विस्तृत व्याप्ती असलेली असल्यामुळे अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, या मुद्दयावरील माहितीची त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत स्वतः उपस्थित राहून तपासणी करावी. या माहितीबाबत त्यांचे काही आक्षेप असतील तर त्यांनी आपल्या आक्षेपांबाबत जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेगळ्याने अर्ज करावा किंवा ही माहिती स्वतः लिहून घ्यावी. जेणेकरुन अपिलार्थीच्या अडचणीचे निराकरण होण्यास मदत होईल.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावर शास्ती व शिस्तभंगाची कारवाई करण्याची विनंती केली आहे. या मुद्दया-संदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ११-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जास त्यांच्या सद्सद्विवेकबुध्दिला स्मरुन प्रतिसाद दिला असल्यामुळे आणि अधिनियमातील कलम ७ (१) मधील तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांना अर्जदारास सकारण माहिती नाकारणे अनुज्ञेय असल्यामुळे, अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांचेवर शास्ती लावण्याची विनंती अमान्य करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ व ७ वगळता उर्वरित सर्व मुद्दयावरील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५

दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी व मुद्दा क्रमांक ७ शी संबंधित माहिती त्यांना याच कालावधीमध्ये तपासणीसाठी विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ३१-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नंदवे तातेराव जगन्नाथराव, रा. नांदगांव, पो. गांजूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, चाकूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२८३

निर्णय दिनांक ३१-०५-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. महादेव भिमराव केंद्रे,<br>रा. भोजनकवाडी, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>तालुका कृषि अधिकारी कार्यालय, परळी वैजनाथ,<br>तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी,<br>विभागीय कृषि कार्यालय, अंबाजोगाई,<br>तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नाही व त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक २६-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, परळी तालुक्यामध्ये त्यांच्या कार्यालयातर्फे सन २००७ व २००८ या

वर्षामध्ये केल्या गेलेल्या शेततलावाच्या कंटूर बंडींग, साईट नाला बंडींग व सीसीटी या कामाच्या मंजूर अहवालाच्या प्रती, कामाची यादी, मंजूर झालेल्या कामाच्या अहवालाच्या प्रती, कामाच्या मस्टरच्या प्रती, मंजूर झालेल्या बिलाच्या प्रती, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज मंडळ कृषि अधिकारी परळी-१, परळी-२ व सिरसाळा यांच्याकडे पाठविला व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयास सादर करण्याचे मंडळ अधिका-यांना सूचित केले आणि या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. तथापि विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार विभागीय कृषि कार्यालय, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड यांच्याकडे दिनांक ०३-०७-२००८ रोजी यासंदर्भात प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी विभागीय कृषी कार्यालय यांनी कोणताही निर्णय न देता अपिलार्थीस तालुका कृषि अधिकारी, परळी वैजनाथ यांनी, त्यांच्या दिनांक २१-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे तालुका कृषि अधिकारी, परळी वैजनाथ यांच्याकडे नव्याने अपील करण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आणि अपिलार्थी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून, त्यांच्या कार्यालयाने सन २००७ व २००८ या वर्षामध्ये परळी तालुक्यामध्ये केल्या गेलेल्या शेततलावाच्या कंटूर बंडींग, साईट नाला बंडींग व सीसीटी या कामाच्या मंजूर अहवालाच्या प्रती, कामाची यादी, मंजूर झालेल्या कामाच्या अहवालाच्या प्रती, कामाच्या मस्टरच्या प्रती, मंजूर झालेल्या बिलाच्या प्रती, अशी माहिती अपेक्षिली होती. ती त्यांनी मुदतीत न दिल्यामुळे संबंधित

जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्तीची कारवाई करण्यात यावी व अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन द्यावी. या माहितीसाठी लागणारे शुल्क भरण्यासाठी ते तयार आहेत.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली आणि वरील युक्तिवादामध्ये स्पष्ट केलेली माहिती अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांना देय होत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदी-मध्ये विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन, अपिलार्थीस कोणतीही माहिती न पुरवून संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याचे या प्रकरणी नि:संशयपणे सिध्द होत आहे. या प्रकरणी तालुका कृषि अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयातील मंडळ कृषि अधिकारी परळी-१, परळी-२ व सिरसाळा यांच्याकडून माहिती येणे अभिप्रेत होते. तथापि त्यांनी तालुका कृषि अधिकारी कार्यालयातील जन माहिती अधिका-यास आवश्यक ती माहिती न पुरविल्यामुळे, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जामध्ये मागणी केलेली माहिती उपलब्ध होऊ शकली नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदी-अन्वये अपिलार्थीस माहिती देण्यासाठी माहिती अधिका-यास सहाय्य करणारे त्यांचे सहायक व कर्मचारी यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतूद आहे. हे पाहता या प्रकरणी माहिती अधिकारी, तालुका कृषि अधिकारी यांच्या कार्यालयातील व या कार्यालयातील सर्व संबंधित मंडळ कृषि अधिकारी हे अपिलार्थीस माहिती न पुरविल्यामुळे अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र होत आहेत. सबब, आयुक्त (कृषि) पुणे

यांना या प्रकरणाशी संबंधित तालुका कृषि अधिकारी यांच्या कार्यालयातील (तालुका कृषि अधिकारी कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड) सर्व संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. आयुक्त (कृषि) पुणे यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांचे सहायक (तालुका कृषि अधिकारी कार्यालय, परळी, जिल्हा बीड यांच्या कार्यालयातील मंडळ कृषी अधिकारी) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ३१-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. महादेव भिमराव केंद्रे, रा. भोजनकवाडी, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी, विभागीय कृषि कार्यालय, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे - ०५ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.